| ३. | चंद्रपूर | १. उजवा कालवा व उप कालवे | ८०९ | १९० | ११०० |
| | | २. आसोलामेंढा नुतनीकरण | २५१९ | -- | १५५६.३० |
| | | **एकूण** | **२८८२६** | **७०००२** | **४७२०.२२५** |

**(स्त्रोत: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर २००१ भुसंपादन व पुनर्वसन)**

सारणी क्र. १.६ वरुन गोसीखुर्द प्रकल्पामध्ये धरण व कालव्यामध्ये भंडारा ६५६ हे. नागपूर १२०५ हे. आणि चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण ११०० हेक्टर वनजमीन बाधित आहे. तिनही जिल्ह्यातील एकूण २९६१.१०२ हेक्टर आहे. टेकेपार उपसा सिंचन योजना, पाघोरा उपसा सिंचन योजना भंडारा जिल्ह्यातील आहे, तसेच नागपूर जिल्ह्यातील मोखाबर्डी उपसा सिंचन योजना आणि आसोलामेंढा नूतनीकरण यामध्ये एकूण १७५९.१२३ हेक्टर वनक्षेत्र बाधित आहे. प्रकल्पांतर्गत तिनही जिल्ह्यातील ४७२०.२२५ हेक्टर वनजमीन बाधित आहे.

भंडारा जिल्ह्यातील एकूण १०४३९ हेक्टर खाजगी जमीन धरणाने बाधित आहे. तर राजस्व जमीन ४६१९ हेक्टर आहे. १५०५९ हे. नागपूर जिल्ह्यातील खाजगी जमीन धरणाने

बाधित आहे. तर २१९३ हेक्टर राजस्व जमीन धरणाने बाधित आहे. तसेच चंद्रपूर येथील एकूण ८०९ हेक्टर जमीन (खाजगी) धरणाने बाधित आहे. तर १९० हेक्टर राजस्व जमीन धरणाने प्रभावित आहे आणि आसोलामेंढा नुतनीकरणाकरिता २५१९ हेक्टर जमीन बाधित आहे. एकूण २८८२६ हेक्टर खाजगी जमीन धरणाने बाधित आहे. तर ७००२ हेक्टर राजस्व जमीन धरणाने प्रभावित आहे.

**१.९ एकूण बुडीत आणि एकूण पाण्याखालील क्षेत्र:** तक्ता क्र.१.७ व १.८ मध्ये या प्रकल्पांत एकूण बुडीत क्षेत्र आणि एकूण पाण्याखालील क्षेत्र दर्शविले आहे.(२६)

**सारणी क्र.१.७**

**एकूण बुडीत क्षेत्र**

| **अ.क्र.** | **क्षेत्र** | **बुडीत जमीन (हेक्टर)** |
|---|---|---|
| १. | वन जमीन | ३४९७ चौ.कि.मी. |
| २. | शेत जमीन | २३७६२ चौ.कि.मी. |
| ३. | पॅसेस जमीन (पडीत रस्त्यातील) | ७६ चौ.कि.मी. |
| ४. | मानवी वस्ती आणि ईतर | १०२९ चौ.कि.मी. |
| | **एकूण** | **२८३६४ चौ.कि.मी.** |

**(स्त्रोत: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर २००१ भुसंपादन व पुनर्वसन)**

सारणी क्र. १.७ मध्ये गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पांतर्गत एकूण बुडीत जमीनीमध्ये ३४९७ हेक्टर चौ.कि.मि. वनजमीन आहे. धरणात २३७६२ हेक्टर चौ.कि.मि. शेतजमीन बुडीत आहे. त्याचप्रमाणे मानवी वस्ती आणि इतर ठिकाणावरील एकूण १०२९ हेक्टर चौ.कि. शेतजमीन प्रकल्पांतर्गत बुडीत आहे. एकूण धरणात २८३६४ हेक्टर चौ.कि.मि. जमीन बुडीत आहे. त्याचप्रमाणे ७६ हेक्टर चौ.कि.मी. पडीत रस्त्यातील जमीन धरणात बुडीत आहे.

**सारणी क्र.१.८**

**एकूण पाण्याखालील क्षेत्र**

| | |
|---|---|
| खाजगी क्षेत्र | १४१०९.९८ हेक्टर |
| शासकीय क्षेत्र | ७९३०.१० हेक्टर |
| **एकूण क्षेत्र** | **२२०४०.०० हेक्टर** |

**(स्त्रोत: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर २००१ भुसंपाद व पुनर्वसन)**

सारणी क्र. १.८ मध्ये गोसीखुर्द प्रकल्पात एकूण पाण्याखालील क्षेत्रामध्ये १४१०९.१० हे. जमीन खाजगी क्षेत्रातील आहे, तर शासकीय क्षेत्रातील ७९३०.१० हे. असे एकूण २२०४०.०० हे. क्षेत्र पाण्याखालील जमिनीचे आहे.

**१.१० एकूण पाण्याखालील खाजगी क्षेत्राचे तालुक्यानुसार विभाजन:** तक्ता क्र. १.९ मध्ये पाण्याखालील खासगी क्षेत्राचे तालुक्यानुसार विभाजन दिलेले आहे.[२७]

**सारणी क्र. १.९**

**एकूण पाण्याखालील खाजगी क्षेत्राचे विभाजन**

| **अ.क्र.** | **तालुका** | **जमीनीचा प्रकार** | | | **एकूण जमीन हेक्टर** |
|---|---|---|---|---|---|
| | | शेतजमीन हेक्टर | पडीक जमीन हेक्टर | सिंचित जमीन हेक्टर | |
| १. | भंडारा | १७१३.४२ | २४०.२५ | ३६.६५ | १९९०.३२ |
| २. | पवणी | २३३६.१६ | १९८.५१ | ४९.८५ | २५८४.५२ |
| ३. | कुही | ४०७७.९० | ३२७.५० | ७८.०० | ४४८३..४३ |
| ४. | भिवापूर | ४५६९.८४ | ३९०.०९ | ९१.७० | ५०५१.६३ |
| | **एकूण जमीन** | **१२६९७.३५** | **११५६.८५** | **२५६.२०** | **१४१०९.९८** |

**(स्त्रोत: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर २००१ भुसंपाद व पुनर्वसन)**

सारणी क्र. १.९ मध्ये एकूण पाण्याखालील १९९०.३२ हे. खासगी क्षेत्रातील जमीन भंडारा तालुक्यात आहे त्यापैकी ३६.६५ हेक्टर जमीन सिंचित आहे तर १७१३.४२ हेक्टर शेतजमीन आहे. पवनी तालुक्यामध्ये २५८४.५२ हे. जमीन पाण्याखालील आहे. ४९.८५ हे. जमीन सिंचित आहे आणि २३३६.१६ हेक्टर शेतजमीन आणि कूही तालुक्यात एकूण

४४८३.८४ हे. जमीन पाण्याखालील आहे. तर भिवापूर तालुक्यात ५०५१.६३ हे. जमीन पाण्याखालील आहे. भंडारा तालुका, पवनी, कुही आणि भिवापूर तालुक्यातील एकूण १२६९७.३५ हेक्टर शेतजमीन पाण्याखालील आहे. त्याचप्रमाणे एकूण चारही तालुक्यातील ११५६.८५ हेक्टर पडीक जमीन पाण्याखाली राहणार आहे. तसेच सिंचित जमीन २५६.२० हेक्टर आहे. एकूण खासगी क्षेत्रातील १४१०९.९० हेक्टर जमीन पाण्याखाली राहणार आहे.

**१.११ भू–रचना:** उत्तरेकडील उंचवट्याचा प्रदेश सातपुडा पर्वताच्या शृंखलेद्वारा बनलेला असून त्यात भिमसेन कोका, गंगाझरी दटेकसा, चींचगड इत्यादी टेकड्या आहेत. पूर्वेकडील भाग डोंगराळ असून गायमुख, चंद्रपूर, अंबागड, प्रतापगड व गायखुरी डोंगराचा समावेश होतो. प्रतापगडाचे डोंगर सर्वांत मोठे आहे. जिल्ह्याचे स्वाभाविक विभाग पुढीलप्रमाणे आहेत. मध्यभागातील गायखुरी व आग्नेय भागातील प्रतापगडचा डोंगराळ प्रदेश, वायव्य भागातील अंबागडचे डोंगराळ प्रदेश तर, पश्चिम आणि दक्षिण पूर्व व ईशान्य भागातील वैनगंगेचा प्रदेश आहे. वैनगंगा ही महत्वाची नदी असून जिल्ह्यात उत्तर पूर्व भागात प्रवेश करुन भंडारा शहराजवळ व पुढे दक्षिणेस चंद्रपूर जिल्ह्यात प्रवेश करते. बाह्या, पांगोळी, सुर गाढवी, चंदण, बावनथडी ह्या वैनगंगेच्या उपनद्या आहेत. वैनगंगेची भंडारा जिल्ह्यातील लांबी १३० कि.मि. असून बाह्य नदी चिंचगड पहाडावरुन उगम पाऊन उत्तरेकडे वाहत जाते.[(२८)]

**१.१२ हवामान:** गोसीखुर्द प्रकल्प मान्सून प्रदेशात येत असल्यामुळे उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे तीनही ऋतु आढळतात. महिन्यानुसार या प्रदेशातील तापमान बदलत असते. गोसीखुर्द प्रकल्प समुद्रसपाटीपासून फार दूर असल्यामुळे या प्रदेशाचे हवामान विषम स्वरूपाचे आहे. येथील उन्हाळा तीव्र असतो. तापमानात एकाच दिवशी बराच चढ–उतार होण्याचे प्रसंग बरेचदा येतात. या प्रदेशात बहुतांशी पाऊस जून–सप्टेंबर या महिन्यात पडतो. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पावसाची सुरुवात होते व ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत बहूतेक पाऊस असतो. वार्षिक पावसाच्या ९० टक्के पाऊस याच अवधीत पडत असतो. या प्रदेशातील सरासरी पर्जन्यमान १४६८. मि. मि. आहे.[(२९)]

**१.१३ वनाच्छादीत क्षेत्र:** एकूण ३०७७१३ चौ.कि.मि. जमीनीपैकी ६३,६९१ चौ.कि.मि. वनजमीन महाराष्ट्रात आहे. अर्थात २१ टक्के प्रमाण महाराष्ट्राराच्या एकूण जमीनीतील

वनजमीनीचे आहे. मराठवाड्याच्या एकूण जमीनीपैकी वनजमीनीचे प्रमाण केवळ ४.५ टक्के आहे. उर्वरित महाराष्ट्राच्या वनजमीनीचे प्रमाण १६.६० टक्के तर विदर्भाच्या एकूण ९७३२१ चौ.कि.मि. जमीनीपैकी ३७५७६ चौ.कि.मि. वनजमीन आहे, तर या वनजमीनीचे प्रमाण ३७.५९ टक्के आहे. (३०)

## १.१४ जिल्हानिहाय माहिती:

**१.१४.१ भंडारा जिल्हा:** वैनगंगा नदीच्या खोऱ्यात उत्तर–पूर्वेकडे भंडारा जिल्हा स्थित आहे. त्याचा विस्तार २०° ३९′ ते २१° ३९′ उत्तर अक्षांश व ७९° २७′ पूर्व ते ८०° ४७′ पूर्व रेखांशाच्या दरम्यान आहे. भंडारा जिल्ह्याच्या उत्तरेस मध्यप्रदेशाचा बालाघाट जिल्हा, पूर्वेस गोंदिया जिल्हा, दक्षिणेस चंद्रपूर जिल्हा आणि पश्चिमेस नागपूर जिल्हा आहे. भंडारा जिल्ह्याचे ९३२ वर्ग चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्रफळ असून २००१ च्या जनगणनेनुसार ११.३६ लक्ष लोकसंख्या आहे. ग्रामीण भागात खेड्यामध्ये ९०.४६ टक्के लोकसंख्या राहते, येथील ७८.४७ टक्के लोकसंख्या ही शिक्षित आहे. भंडारा जिल्ह्याची १२ लक्ष लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार आहे. शहरी भागात १९.४८ टक्के व ८०.५२ टक्के ग्रामीण भागात राहणारी लोकसंख्या आहे, तर शैक्षणिक स्तर ८३.७६ टक्के असून २९४ प्रति चौरस कि.मी. लोकसंख्येची घनता आहे.[३१]

**१.१४.२ नागपूर जिल्हा:** महाराष्ट्राच्या उत्तर–पूर्वेकडे सातपुडा पर्वत रांगेच्या दक्षिण भागात नागपूर जिल्हा स्थित आहे. नागपूर जिल्ह्याच्या उत्तरेस मध्यप्रदेश राज्य असून पूर्वेस भंडारा जिल्हा आहे. तर दक्षिणेस चंद्रपूर जिल्हा असून पश्चिमेस वर्धा जिल्हा आहे. ९८९२ व. कि. मी. भौगोलिक क्षेत्रफळ नागपूर जिल्ह्याचे आहे. जिल्ह्याची २००१ च्या जनगणनेनुसार ४०.६७ लक्ष लोकसंख्या आहे, तर २०११ च्या जनगणनेनुसार ४६.५४ लक्ष लोकसंख्या आहे. शैक्षणिक स्तर ८८.३९ टक्के आहे, तर ३१.६९ टक्के शहरी व ६८.३१ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते, तर ४७० प्रति चौरस कि.मी. लोकसंख्येची घनता आहे. १००० पुरूषामागे ९५१ स्त्रिया आहेत.[३२]

**१.१४.३ चंद्रपूर जिल्हा:** जिल्हा वैनगंगा आणि वर्धा नदीच्या खोऱ्यात स्थित असून जिल्ह्याच्या उत्तरेला नागपूर, भंडारा व वर्धा असे तीन जिल्हे असून पश्चिमेला यवतमाळ जिल्हा आहे.

तसेच पूर्वेला गडचिरोली जिल्हा असून दक्षिणेला आंध्रप्रदेशचा आदिलाबाद जिल्हा आहे. जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १०४८९ वर्ग कि.मी. आहे, तर २००१ च्या जनगणनेनुसार १७.७२ लक्ष आणि २२.०४ लक्ष लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार आहे व लोकसंख्येची घनता १९३ प्रति चौरस कि.मी. आहे. शिक्षणाचे प्रमाण ८८.२२ टक्के आहे. ६४.८२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात, तर ३५.१८ टक्के शहरात राहते.[(३३)]

**१.१५ सारांश:** प्राचीन काळापासून विकास प्रकल्पामुळे सर्वसामान्य शेतकरीवर्गाला आणि आदिवासी समाजाला विस्थापित किंवा स्थलांतरित व्हावे लागते. गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पामुळे एकूण ५६१०४ लोकसंख्या धरणग्रस्त झालेली आहे. साधारणता १६०० कुटुंब प्रकल्पग्रस्त झालेली आहेत. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील ८३१२ चंद्रपूर जिल्ह्यातील १५४२ आणि भंडारा जिल्ह्यातील ६००० कुटुंब आहेत. प्रकल्पामुळे एकूण २५०८०० हेक्टर जमिनीला जलसिंचनाचा लाभ मिळणार आहे. प्रकल्पाचे बांधकामाला सुरुवात झाली तेव्हा या प्रकल्पाचा खर्च ३७२ करोड रुपये होता परंतु ३४ वर्ष होऊनही आज प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही आणि त्याचा तो खर्च वाढत जाऊन आज १८४९४.५७ कोटी रुपये या प्रकल्पाला खर्च आलेला आहे. तरीसुद्धा प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही २०२३ पर्यंत पूर्ण होणार आहे. प्रकल्पाची पाण्याची क्षमता ४० टीएमसी इतकी आहे. प्रकल्पाचा लाभ भंडारा, चंद्रपूर आणि नागपूर या तीनही जिल्ह्यांना मिळणार आहे. सध्या या प्रकल्पामुळे ५०३१७ हेक्टर जलसिंचन होते. वैनगंगा नदीवर भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात गोसेखुर्द या गावाजवळ या धरणाची निर्मिती होत आहे. एकूण या प्रकल्पामुळे २०० गावे प्रभावित आहेत. त्यापैकी ९३ गावे हे पूर्णत: प्रभावित आहेत आणि १०७ गावे ही अंशता प्रभावित आहेत. ९३ गावे पूर्णता प्रभावित आहेत त्यापैकी नागपूर जिल्ह्यातील ५१, चंद्रपूर जिल्ह्यातील ८ आणि भंडारा जिल्ह्यातील ३४ गावे आहेत. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला पुनर्वसनाची जागा मिळालेली आहे आणि त्यांचे पुनर्वसन झपाट्याने चालू आहे.

# संदर्भ


१) मृणालीणी फडनवीस व प्राची देशपांडे–२००४ गोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील पुनर्वसनाच्या समस्या एक आर्थिक अध्ययन –भाऊराव देवरस मानव संसाधन विकास व शोध प्रतिष्ठाण नागपूर पान नं.१

२) Goldgsmit and Hildyard (1986) The Social and Environmenatl Effects of Large Dam, Sage Journal, pp. 281-311

३) Fernandes, W., J.C. Das & S. Rao (1989) _Displacement and Rehabilitation: An Estimate of Extent and Projects\$, in Fernandes & Ganguly Thukral, pp. 62–88.

४) Indian Institute of Techonology Roorkee, Development project vs. Internally Displaced Population in India: A Liturature Based Appraisal, February 2011, p. 6

५) Gleick, P.H. 1999. The World\$s Water: The Biennial Report on Freshwater Resources. Island Press. Washington D.C. pp-19-38

६) Lobo, Lancy: Land Acquisition, Displacement and Ressettlment in Gujrat 1947-2004, New Dehli, 2009, p.7

७) GOI Ministry of Water Resources, River Development & Ganga Rejuvenation, Lok Sabha, started questions No. 171 Answered on 05.05.2016 by Sushri Uma pp. 5-7

८) Fernandes 1991 Fernandes, W. (1991) _Power and Powerlessness: Development Projects and Displacement of Tribals\$, Social Action. 42(3): 243–70.

९) Satyajit Singh.Taming the Waters. OUP. 1997 and government figures available at hppt: //www.dam.org

१०) data recived regarding displacement from the Ministry of Trible Affairs dated 21.11.2013

११) Lok Sabha Started questions No. 198 dated 22.8.2013 Available at Reference Note no.30/Ref./December/2013 pp. 11-12

१२) www.krishi.maharashtra.gov.in.watershed

१३) https://en.wikipedia.org/wiki/Gosi_Khurd_Irrigation_Project, Socio-Economic Survey : WAPCO Company, New Delhi, pp. 14-16

१४) तत्रैव पान नं. २६

१५) तत्रैव पान नं.२८

१६) तत्रैव पान नं.४३

१७) तत्रैव पान नं.४८

१८) Socio-Economic Surve of Gosikhurd Irrigation Project by Water and Power Consultancy Servises (WAPCOS) India, pp. 18

१९) तत्रैव पान नं.४२

२०) तत्रैव पान नं. ४६

२१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर: २००१ भुसंपादन व पुनर्वसन पान नं.२१

२२) तत्रैव पान नं.२५

२३) तत्रैव पान नं.४४

२४) तत्रैव पान नं.६८

२५) तत्रैव पान नं.७२

२६) तत्रैव पान नं.८६

२७) तत्रैव पान नं.१४५

२८) https://mr.wikipedia.in.bhandara

२९) तत्रैव पान नं.३

३०) www.mahaforest.gov.in, report file, pp. 47-53

३१) Distinct Census Handbook: Cenus of India, Govt. Bhandara (1991, 2001, 20011) of India Publication, pp. 18-22

३२) District Census Handbook: Cenus of India, Govt. Nagpur (1991, 2001, 20011) of India Publication, pp. 22-24

३३) District Census Handbook: Cenus of India, Govt. Chandrapur (1991, 2001, 2011) of India Publication, pp.16-19

# प्रकरण–२

# संशोधन विषयाशी संबंधित सहित्याचा आढावा

**२.१ प्रास्ताविक:** विस्थापन आणि पुनर्वसन या साधारणता आर्थिक आणि सामाजिक समस्या आहेत. मानव प्राचीन काळापासून वनावर, जंगलावर, पर्यावरणावर आपली उपजिविका भागवीत आलेला आहे. परंतु कधीकधी नैसर्गिक, कृत्रिम, पर्यावरणीय किंवा मानवनिर्मित जलसिंचन प्रकल्पाच्या बांधणीमुळे या समाजाला किंवा लोकांना स्थलांतरित किंवा विस्थापित व्हावे लागते. जलसिंचन प्रकल्पाच्या बांधणीमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसवन व पुनःर्स्थापना कशा पद्धतीने झालेले आहे. यामध्ये शासनाची भूमिका काय आहे? देश–विदेशातील जलसिंचन प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांकरिता कोणत्या संशोधकांनी अभ्यास केलेला आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन योग्य पद्तीने झालेले आहे काय? यावर आधारित कोणती पुस्तके, प्रकल्प संशोधन अहवाल, संशोधन अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे आणि वेबसाईट जे साहित्य उपलब्ध आहे. त्या संशोधन साहित्याचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात आलेला आहे.

“Practically all human knowledge can be found in books and libraries and money in the Banks. Unlike other animals that must start a new with each generation, man builds upon the accumulated and recorded knowledge of the past. His constant adding to the vast store of knowledge makes progress possible in all areas of human endeavor” (John B. West)

१) **कु. कुभांरे सी.वी. (२००६)** यांनी ‘गोसीखुर्द प्रकल्पाच्या निर्मितीमुळे नागपूर जिल्ह्यातील प्रभावित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाच्या समस्या एक आर्थिक अध्ययन’ (१९९०–२००५) या विषयावर २००६ मध्ये पीएच.डी पदवीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रबंध सादर केला त्यामध्ये त्यांनी नागपूर जिल्ह्यातील ५१ गावे पूर्णतः बाधित आहेत या गावातील २० टक्के कुटुंबाची नमुना निवड करुन आपल्या शोध प्रबंधात त्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाच्या ठिकाणी फारसे रोजगाराची साधणे उपलब्ध नाहीत. प्रभावित शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत आणि व्यावसायिक समस्या सुद्धा आहेत. गोसीखुर्द प्रकल्पबाधितांच्या समस्या आणि पुनर्वसनाच्या नावाखाली गावाबाहेर

पडल्यानंतर त्यांना रोजगार मिळवून देण्याची जबाबदारी अद्याप सरकारने उचललेली नाही. विस्थापनाच्या कायद्यात अशी सोय बाधितांसाठी राहील असा कुठलाही प्रयत्न झालेला दिसत नाही. त्यामुळे उपजिवीकेचा व रोजगाराचा प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे.

शासनाद्वारे शेतकऱ्यांसाठी सुरु केलेल्या योजनेमध्ये शेतकरी प्रशिक्षण, सेंद्रिय व जैविक खत तंत्रज्ञान पुरवठा, ५० टक्के अनुदानावर सुधारित शेती औजारांचे वाटप आणि राष्ट्रीय बायोगॅस योजना राबविल्या गेल्या, परंतु या योजनांचा पुनर्वसनातील लोकांना फारसा लाभ झालेला नाही. नागपूर जिल्ह्यात एकूण दोन तालुके धरणाने प्रभावित आहेत. नागपूर जिल्ह्यातील प्रकल्पबाधित लोकांची संख्या ५० टक्के आहे. यामध्ये भिवापूर तालुयाच्या तुलनेत कुही तालुयात अधिक प्रकल्पबाधित लोकसंख्या आहे. फारच कमी प्रमाणात तेथील लोकं नोकरी करताना आढळतात. शिक्षकी पेशात काम करणारे व लाईनमनचे काम करणारे अशा ठराविक नोकऱ्यांमध्येच काम करणाऱ्या व्यक्ती आढळतात.

प्रकल्पग्रस्त गावातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेती व्यतिरिक्त लोक लहान–मोठे व्यवसाय करतात जसे कुंभारकाम, दोरखंड तयार करणे, पशुपालन, मासेमारी, शेती, मालाच्या प्रक्रियेशी संबधित उद्योग इत्यादी प्रकल्पामुळे जी गावे अंशत: बाधित झाली आहेत त्या गावातील लोकांची शेत–जमिन किंवा घरे या दोन पैकी एक बाधित झाले आहे. गावातील लोकांची एका ठिकाणी घरे आहेत आणि दुसऱ्या ठिकाणी त्यांना शेतजमिन मिळाल्या आहेत प्रत्येक वेळी शेतीकडे लक्ष देणे त्यांना शक्य होत नाही म्हणून मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांनी शेती आणि शेतीची संबधित इतर उद्योगाचा त्याग केलेला आहे.[(१)]

२) **श्री. गझघाटे विलास (२००५)** यांनी 'गोखीखुर्द प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे सामाजिक–आर्थिक विकासाचे अभिक्षेत्रिय' विश्लेषन या विषयावर २००५ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रबंध सादर केला त्यामध्ये त्यांनी २५ टक्के गावांची प्रतिदर्श पद्धतीने निवड केली त्याचप्रमाणे आर्थिक–सामाजिक विकासाची पातळी निश्चित करण्यासाठी Z score पद्धत आणि Multiple Corelation तसेच Co-relation Matrix या सांख्यिकीय पद्धतीचा अवलंब केला. प्रस्तुत प्रबंधात प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या सामाजिक–आर्थिक विकासाच्या पातळीमध्ये अभिक्षेत्रीय विषमता मोठ्या प्रमाणात आढळली

तसेच पूर्णतः प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या तुलनेत अंशतः प्रकल्पग्रस्त लेकसंख्येची सामाजिक–आर्थिक विकासाची पातळी अधिक आहे. पूर्णतः प्रकल्पग्रस्त एकूण क्रियाशील लोकसंख्येत ५६.६५ टक्के मुख्य कामगार असून ४३.३५ टक्के सीमांत कामगार आहेत. त्यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यात सर्वात कमी तर, नागपूर जिल्ह्यात कामगारांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. भंडारा, पवनी व भिवापूर तिन्ही तालुयातील एकूण प्रकल्पग्रस्त ६० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्येचे २० हजार रुपयांपेक्षा वार्षीक उत्पन्न कमी आहे.[(२)]

३) **श्री. झांबरे एस.पी (२००९)** यांनी गोदिंया जिल्ह्यातील मध्यम जलसिंचन प्रकल्पाचे आर्थिक अध्ययन (१०९९२–२००२) या विषयावर २००९ मध्ये पीएच.डी. पदवीसाठी राष्ट्र संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात प्रबंध सादर केला. त्यामध्ये त्यांनी गोंदिया जिल्ह्यातील मध्यम सहा प्रकल्पांचे लाभ–व्यय गुणोत्तर ही आर्थिक संकल्पना मांडून प्रकल्पबांधण्यापूर्वी या क्षेत्राला एकूण अन्न–धान्यापासून किती मूल्य मिळत होते आणि प्रकल्पबांधणीनंतर एकूण लाभ व तोट्याचे प्रमाण किती होते हे लाभ–व्यय गुणोत्तर वापरुन पाहिले. त्यामध्ये २००२–०३ या वर्षात सहा मध्यम जलसिंचन प्रकल्पात १.६० ते ३.२० टक्के पर्यंत लाभात वाढ झालेली आहे. हंगामी व स्थायी रोजगार निर्माण झालेत. शेतीवरील सरासरी गुंतवणूक खर्च वाढून एकूण उत्पादनात वाढ होऊन सरासरी उत्पन्नात वाढ झाली.[(३)]

४) **डॉ. मृणालीनी फडणवीस व डॉ प्राची देशपांडे (२००४)** यांनी गोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील 'पुनर्वसनाच्या समस्या एक अर्थिक अध्ययन' नागपूर २००४ मध्ये पुस्तक प्रकाशित केले त्यामध्ये प्रकल्पग्रस्त लोकांना शासनाने पुनर्वसनाच्या ठिकाणी राहण्यासाठी ज्या प्राथमिक सुविधा लागतात, जवळपास त्या सर्व पूर्ण केलेल्या आहेत.

गोसीखुर्द क्षेत्रातून विस्थापित झालेल्या लोकांकरिता कोणता रोजगार सुरू करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण पुनर्वसनाच्या ठिकाणी शेतीयोग्य जमीन नाही या विस्थापनाच्या प्रक्रियेत युवा पिढीवर बराच अन्याय होत आहे कारण या वर्गासांठी रोजगार प्रशिक्षण शिबिरे उपलब्ध नाहीत. ते पुनर्वसनाच्या गावठाणांमध्ये जायला तयार नाही. शासनाने केलेला हा सर्व खर्च जवळपास वाया गेल्यासारखाच आहे. कारण बेरोजगारीची समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. या अभ्यासात डॉ. मृणालीनी फडणवीस व

डॉ. प्राची देशपांडे यांनी मार्गदर्शक सर्वेक्षण (Pilot Survey) पद्धतीचा वापर केलेला आहे आणि नागपूर व भंडारा येथील ४०० कुटूंबाचे सर्वेक्षण आणि विविध गटासोबत चर्चा जसे, सरपंच, महिला गट, इंजिनियर्स व पुनर्वसन कार्यक्रम अधिकारी इत्यादी. [४]

५) A Survey of Resettlement with alternative livelihood for project affected person of Gosikhurd Irrigation Project (2004) A Research Report of a Project of R.S. Ruikar institute of labour and sociocultural studies directed by Dr. Mrunalini fadanvis and Dr. Prachi Deshpande the study focuses on possible alternative employment opportunities and income genaration schemes for project affected persones in primary, secondary and tertary sector method used for this project on base of pilot survey, meeting with surpanch and agro project expert and engineears ect. Out of the feet from this get points is,

1. No schemes or provisions for imparting traning to youth, women and interested Persons of the village.
2. No Subsistence allowance provided.
3. No Subsidy for House construction.
4. Absence of time limit of Rehabiliation Process.
5. Land claim not aceepted.
6. Insurance facility is not provided. [5]

६) **श्री. तनपुरे मधुकर देवरस (२०१७)** यांनी ‘अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील घोड व कुकडी जलसिंचन प्रकल्पामुळे झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा अभ्यास (१९९६–२००६) या विषयात त्यांनी २०१७ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे इथून अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी प्राप्त केली. त्यामध्यें आर्थिक बदलांच्या संदर्भात जलसिंचनामुळे अल्पभूधारक, मध्यम व मोठे शेतकरी या सर्वांच्याच सिंचन क्षेत्रात वाढ झाली. तसेच जमीन धारण क्षेत्रात वाढ झाली. लाभार्थी शेतकऱ्यांचे उत्पन्न जवळपास दुप्पट झाले. शेतजमिनीच्या किंमती वाढल्या ज्यामध्ये ३६० टक्के वाढ झालेली आहे. पूर्वी गवताचे, बांबुचे व कौलांची घरे मोठ्या प्रमाणात होती परंतु आता सिमेंटची पक्की घरे मोठ्या प्रमाणात बांधण्यात आलेली आहेत. पुनर्वसनाच्या ठिकाणी आरोग्य सुविधा, शाळा, समाज मंदिर बांधण्यात आले आहे. दुग्धव्यवसायात वाढ झाली आहे. श्रीगोंदा आणि

कर्जत तालुक्यात जास्त वाढ झाली. साखर कारखाने निर्माण झालेत व काही प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळाला आहे.(६)

७) **श्री. जगदीश बी. सपकाळे (२०१५)** यांनी Rehabilitation – The Problem of Dam Affected Displaced people: A study of Warna River in Maharashtra\$ या विषयावर संशोधन लेख International Journal of Science and Research (IJSR). Index copernicus Valuem २०१५ मध्ये प्रकाशित झाला. त्यामध्ये प्रकल्पग्रस्तांचा विकास अत्यंत कमी झालेला आहे. ७१.४३ टक्के प्रकल्पग्रस्त कमी उत्पन्न गटात येतात. ४३ टक्के प्रकल्पग्रस्त लोकांचे उत्पन्न ५०००० रूपयापेक्षा कमी आहे. ४७.६२ टक्के प्रकल्पग्रस्तांचे उत्पन्न ५० हजार ते १ लाख रूपयांच्या दरम्यान आहे. ते सुद्धा जलसिंचनाचा वापर करत होते. पुनर्वसीत प्रकल्पग्रस्तांच्या मुलांनी मोठ्या प्रमाणात पुनर्वसनानंतर शाळा सोडल्याची दिसते. पुनर्वसनाच्या ठिकाणी शाळा उपलब्ध नाही, त्यामुळे त्यांचे पालक त्याच्याकरिता रोजगार शोधत असत. पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त लोकसंख्या सर्व समाधानी होती. सर्व सुखसोई त्यांच्या गावात उपलब्ध होत्या, परंतु त्या सुखसोई पुनर्वसनाच्या ठिकाणी नाहीत त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची निराशा झाली. तसेच रोजगाराच्या संधी पुरेशा प्रमाणात पुनर्वसनाच्या ठिकाणी उपलब्ध नव्हत्या आणि कृषी संबंधित उद्योग व रोजगार फारशा प्रमाणात नव्हते. गावातील पुरूष लोकसंख्येने रोजगाराच्या शोधात शहरात स्थलांतर केले आणि कुटुंबांना काही काळ पुनर्वसीत गावातच ठेवले.(७)

८) **Government of India – Ministry of Water Resources (2016)** River development and Ganga Rejuvenation मार्फत लोकसभेत Rehabilitation of displaced families due to irrigation project\$ या विषयावर श्री. राम तहाल चौधरी व श्री. लक्ष्मन गीलुबा या दोघांनी वरील विषयावर लोकसभेत प्रश्न उपस्थित केला त्याचे उत्तर सुश्री उमा भारती (The Minister of Water Resources, River development and Ganga Rejuvenation) यांनी दिनांक ५.५.२०१६ ला दिले. त्यामध्ये त्यांनी संपूर्ण भारतातील राज्यांतील मोठ्या आणि मध्यम जलसिंचन प्रकल्पबांधणीमुळे जी लोकसंख्या धरणग्रस्त झालीत ती जलसिंचन प्रकल्पाप्रमाणे राज्यवार दिलेली आहे. त्यामध्ये महाराष्ट्राची सर्वात जास्त ७१३१३६ जलसिंचन प्रकल्पामुळे लोकसंख्या धरणग्रस्त झालेली आहे आणि त्यांचे

पुनर्वसन करायचे आहे. केंद्र शासनाने National Rehabilitation and Resettlement Policy 2007 (NRRP-2007) आणि Right to Fair compensation and Transparency in land Acquisition Rehabilitation and Resettlement Act 2013 यांना योग्य पद्धतीने लागू करण्यात येईल असे आश्वासन दिले. धरणग्रस्त लोकांच्या दृष्टिकोनातून केंद्र आणि राज्य प्रकल्प अधिकारी वर्गाच्या मार्फत प्रकल्पग्रस्तांना योग्य आणि अस्तित्वात असलेला (कायद्यानुसार) भरपाई खर्च देईल.[८]

९) **डॉ. रविंद्र गराडा** यांनी **(२०१५)** Development project caused resettlement and rehabilitant policy: Overviews on dam projets in Odisa (India)\$ या विषयावर संशोधन पेपर Journal of Humanities and Social Sciences (IQSR-JHSS) Issue-3, Vol. VII March - 2015 मध्ये प्रकाशित झाला त्यामध्ये ते म्हणतात Rehabilitation and Resettlement Amendment bill 2015 टिकेपासून मुक्त नाही. एकूण ५४८.७९४ प्रकल्पग्रस्त लोकसंख्येपैकी काही लोकांचे फक्त पुनर्वसन केले. ओडीसामध्ये जी लोकसंख्या प्रकल्पग्रस्त झालीत त्यांना Land Acquisition Act-1984 प्रमाणे भरपाई देण्यात आली परंतु त्यांच्या शेतजमिनीवर जी त्यांची घरे, विहिरी, फळझाडे होती त्यांचा फारसा काहीही मोबदला मिळालेला नाही आणि शासनाने बाजारभावाप्रमाणे त्यांना भरपाई खर्च दिलेला नाही, त्यामुळे प्रकल्पग्रस्त लोकसंख्येची निराशा झाली आणि ते दारूचे सेवन करायला लागले तसेच इतर वाईट व्यसनाच्या आहारी गेले.[९]

१०) **Associats Engineering Surveyors Limited (2018)** च्या मार्फत The Project on irrigation scheme development in Central and Eastern, Uganda Resettlement Action plan for Atari irrigation Scheme report या विषयावर नोव्हेंबर २०१८ मध्ये JICA अंतर्गत अहवाल प्रकाशित झाला. या अहवालामध्ये जी प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला ३० टक्के भरपाई खर्च सहा महिन्याच्या आत दिला जातो. तर १५ टक्के भरपाई रक्कम ही सहा महिन्यानंतर दिली जाते. त्यामुळे ही १५ टक्के भरपाई रक्कम एकूण भरपाई रकमेच्या disturbance Allowance म्हणून दिला जातो. प्रकल्पग्रस्त जमिनीचे दोन भागात वर्गीकरण केले जाते. एक शेतजमीन व दुसरी राहत्या घरांची जमीन व घर बघितले जाते, तसेच घरांचे बांधकाम कशा प्रकारचे आहे त्यानुसार त्या घराचा मोबदला निश्चित केला जातो. शेतजमिनीवर असलेल्या

झाडांचा मोबदला देतांना झाडे मोठी, मध्यम की लहान आहेत ते बघून त्या झाडांचे मूल्य निश्चित केले जाते. तसेच फळांच्या झाडाचे वेगळे मूल्य निश्चित केले जाते. घरांचा भरपाई खर्च देतांना घरांमध्ये कुठल्याही प्रकारच्या सोई सुविधा आहेत, घरातील इतर स्थावर संपत्तीचे नुकसान झालेले आहे की, नाही ते बघितले जाते. तसेच चालू बाजारभावानुसार किंवा Replacement Cost नुसार घराचा भरपाई खर्च दिला जातो. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची दिनांक निश्चित केली जाते.(१०)

११) **रविंद्रकुमार वरहांडे, संजय राजे व पायल चाफले (२०१३)** यांनी Realistic Study of Rehabilitation and Resettlement of Project Affected Persons (PAP\$s) of Gosikhurd Project in Maharashtra State\$ या विषयावर संशोधन पेपर International Journal of Emerging Technology and Advanced Engineering (IJETAE) Volume-3, Issue -9, सप्टेंबर २०१३ ला प्रकाशीत झाला. त्यांनी प्रकल्पग्रस्त गावे (AV-Affected Villages) आणि पुनर्वसन गावे (RV-Rehabilited Villages ) यांच्या अभ्यासात पुनर्वसीत गावांना तालुक्याच्या जवळ आणण्यात आले. साधारणतः भिवापूर तालुक्यात सर्व पुनर्वसीत गावे १८ किलो मीटरच्या आत आहेत, जेव्हा की हे प्रकल्पग्रस्त कुटुंबे पुनर्वसनापूर्वी १८ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर रहात होते. प्रकल्पग्रस्तांना जे घराकरिता प्लॉट किंवा जागा देण्यात आली आहे, ते घराचे नियोजन करून देण्यात आलेली आहे, तसेच गावठाणापेक्षा प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाच्या ठिकाणी घराकरिता मोठे प्लॉट किंवा जागा देण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना घरांचा जो भरपाई खर्च देण्यात आलेला आहे, तो घर बांधणीच्या तुलनात्मक खर्चानुसार देण्यात आलेला आहे. जमिनीचा जो मोबदला प्रकल्पग्रस्तांना देण्यात आला तो २.०–३.२ लाख रूपये प्रति हेक्टर असा होता. ४८.८४ टक्के कुटुंबे हे इतर व्यवसाय किंवा रोजगार करत होते. ते फक्त जमिनीवर आधारित नव्हती त्यांच्याकडे जमीन १ हेक्टरपेक्षाही कमी किंवा काही भूमिहीन होते. सरासरी शेतजमिनीचा भरपाई खर्च मुख्यमंत्री पॅकेज आणि व्याजदर जोडून ३.२४ लाख प्रति हेक्टर देण्यात आला. ५१.१६ टक्के प्रकल्पग्रस्तांकडे १ हेक्टरपेक्षा जास्त जमिन होती जी प्रकल्पात गेली.(११)

१२) **श्री. सुर्यवंशी अजित मारोती (२०१६)**: यांनी मोठ्या जलसिंचन प्रकल्पाचा कृषी विकासावरील परिणाम दुधगंगा प्रकल्पाचा अर्थशास्त्रीय अभ्यास या विषावर २०१६ मध्ये

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून त्यांना विद्यावाचस्पती पदवी प्राप्त झाली. दुधगंगा प्रकल्पाचा अभ्यास करीत असतांना जलसिंचनामुळे लोकांचे उत्पन्न वाढले व त्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारल्याचे दिसून आले. २७.७ टक्के शेतकरी हे आर.सी.सी. घरात राहतात. ८३.५४ टक्के शेतकऱ्यांकडे मोटारसायकल आहे. तसेच २०.६४ टक्के लोकांच्याकडे चार चाकी वाहन आहे. टी.व्ही., वॉशिंग मशीन, संगणक, म्युझीक सिस्टीम, मोबाईल या वस्तूच्या वापरात वाढ झाल्याने लोकांचे राहणीमान सुधारले आहे. शेतीत रोजगाराची स्थिती वाढली आहे, कारण लागवडीखालील क्षेत्र वाढल्याने शेतमजुरांची गरज भासू लागली, त्यामुळे शेतमजुरांना बारमाही काम मिळाले. ऊस या नगदी पिकांचे उत्पादनात वाढ झाल्याने साखर कारखान्यांची निर्मिती झाली व ग्रामीण भागात औद्योगीकरण झाले. परिणामता ग्रामीण भागात ट्रॅक्टर रिपेअरी, पेट्रोल पंप, ड्रायव्हर, ऊसतोड मजूर, शाळा, कॉलेजची साखर कारखान्यामार्फत स्थापना, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी वाहतूक, चहा टपरीवाले इ. लोकांना रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे रोजगारात वाढ झाली आहे. १७८ जलसिंचन सुविधांमुळे लोकांचे उत्पन्न वाढले. याचा परिणाम म्हणून त्यांचा प्रवास खर्च वाढला, यात्रा, सण, उत्सवावरील खर्च वाढला, मासिके, वर्तमानपत्रे, शिक्षण कर, धुम्रपान यावरील खर्च वाढला आहे. तसेच अभ्यास क्षेत्रातील शेतकऱ्यांची बचत प्रवृत्तीही वाढत आहे. लागवडीखालील जमिनीत तीप्पट वाढ झाली आहे. शेतीला पाणी देण्यासाठी नदीवरून, कालव्यावरून पाईपलाईन केल्या आहेत. जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण बांध–बंदिस्ती यावरील खर्च वाढला आहे. शेतीत यांत्रिकीकरण करण्यासाठी ट्रॅक्टर, पॉवरट्रेलर, फवारणी पंप, औषधे याचा वापर होत आहे. शेतजमिनीचे उत्पादन वाढवण्यासाठी माती परीक्षण करून खतांचा वापर करू लागले. संकरित बी–बीयाणांचा वापर वाढला. शेतकरी कृषीविषयक सल्ला तज्ञ व्यक्तीकडून घेऊ लागलेत आणि आंतरपीकही घेऊ लागलेत. तसेच शेतीकडील पारंपारिक दृष्टिकोन सोडून व्यावसायिक दृष्टीने शेतीकडे पाहण्याचा कल वाढू लागला आहे. तसेच शेतकरी शेतीशी संलग्न व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन या व्यवसायातून उत्पन्न वाढवू लागले आहेत. शेतकरी शक्यतो सहकारी संस्था आणि राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेतात, कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले पण परतफेडीचे प्रमाणही वाढले आहे. जरी

जलसिंचनाचे फायदे प्रचंड असले तरी थोड्याफार प्रमाणात तोट्यांनाही सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जमिनीच्या क्षारीकरणाचा प्रश्न आणि पाणथळ जमिनीच्या प्रश्नाचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आपली जमिन क्षारपड झाली असे १८.१७ टक्के लोकांनी सांगितले आहे आणि २६.१२ टक्के लोकांनी जमीन पाणथळ झाली आहे असे सांगितले आहे.(१२)

१३) **श्री. रजनीस (२००७)** यांनी _Chamera dam project study of intended and unintended consequences\$ या विषयावर २००७ मध्ये पंजाब विद्यापीठातून समाजशास्त्र विषयात विद्यावाचस्पती पदवी प्राप्त झाली. त्यांच्या संशोधनात एकूण १२४१ कुटुंब प्रकल्पग्रस्त झालेत. त्यांनी एकूण कुटुंबाच्या २० टक्के नमुना म्हणून निवड केली. त्यामध्ये २४८ कुटुंब येतात. स्तरीय नमुना निवड तंत्र (Systemaic random sampling techniuqe) पद्धतीचा वापर केला. २४८ कुटुंबापैकी १२ कुटुंब दुसऱ्या भागात स्थलांतरीत झालेत त्यामुळे फक्त २३६ कुटुंबांची आकडेवारी गोळा करण्यात आली. ३६.४४ टक्के लोकसंख्या शासकीय नोकरी करतांना आढळले. तर या प्रकल्पातच २७.९६ टक्के प्रकल्पग्रस्तांना नोकरी दिली. एक तृतीयांश प्रकल्पग्रस्तांचे उत्पन्न २५०० रूपये प्रति महिना पेक्षा कमी आहे. तर ७०५१–१५००० रूपयांच्या दरम्यान ३६ टक्के लोकसंख्येच उत्पन्न आहे. एकूणन २३६ कुटुंबापैकी १३८ कुटुब पुर्नतः प्रकल्पग्रस्त झालेत तर ९८ कुटुंबांची फक्त जमीन गेली तर राहत्या घरावर काहीही परिणाम झालेला नाही. म्हणजे ९८ कुटुंब अंशतः प्रभावित आहेत या प्रकल्प बांधणीमुळे एकूण २३६ कुटुंबापैकी ७६ कुटुंबांना (३२.२० टक्के) क्रोध निर्माण झाला. २० कुटुंबाना (८.४८ टक्के) काहीही करू शकत नाही अशी परिथती निर्माण झाली तर १४० कुटुंबाना (५९.३२ टक्के) या प्रकल्पबांधणीमुळे आनंद व्यक्त केला.(१३)

१४) **श्री. शिंदे पांडुरंग बी. (२०१७)** यांनी Quot Economic of Rehabilitation – A study of Bhima (Ujani) Irrigation Project Quot\$ या विषयात त्यांना २०१७ मध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ईथून अर्थशास्त्र या विषयात विद्यावाचस्पती पदवी प्राप्त झाली. नमुना निवड केलेल्या पुनर्वसन गावांमध्ये ग्रामीण व शहरी भागात पिण्याच्या पाण्याची समस्या फार मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. १४.३७ टक्के लोकसंख्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित

आहे. आपल्या सुशिक्षित मुला–मुलींकरिता १२.९४ टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्येने शासकीय नोकरीची मागणी केलेली आहे. प्रकल्पग्रस्त नमुना निवड केलेल्या लोकांनी भरपाई म्हणून मिळालेला प्लॉट व मिळालेली जमीन याबद्दल शासनाकडे तक्रार केलेली आहे. भरपाई म्हणून मिळालेल्या जमिनीचा हिस्सा लहान असून जमिनीत उत्पादकता नाही. ११.५० टक्के प्रकल्पग्रस्तांनी जास्त जमिनीची मागणी केली. तसेच धरणग्रस्त जमिनीची भरपाई खर्च म्हणून मागणी केली. घर बांधणीकरीता मिळालेला प्लॉट व घराची नुकसान भरपाई समाधानकारक नाही. ७ टक्के प्रकल्पग्रस्त लोकांनी भिमा जलसिंचन प्रकल्पाचे पाणी हे औद्योगिक क्षेत्राला देण्यास विरोध दर्शविला. मोठ्या प्रमाणात प्रकल्पग्रस्त गावे health facility पासून वंचित आहेत. जवळपास ५.०४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी पुनर्वसनाच्या ठिकाणी health centre ची मागणी केलेली आहे. शासनाने जी जागा दिलेली आहे ती जागा आणि पुनर्वसन गाव यामध्ये बरेच अंतर आहे. तसेच रोड सुद्धा व्यवस्थित नाहीत. ४.३२ टक्के लोकसंख्येने सांगितले की लोडशेडींगची समस्या जास्त प्रमाणात आहे.(१४)

१५) **Fact finding committee on the sris ailam project 1986:** श्रीसेलम प्रकल्पातील Fact Finding Committee च्या अहवालानुसार गावकऱ्यांनी दगडाच्या घरांची किंमत रु.११५६४ तर गवताच्या झोपडीची किंमत रु.२५०० मूल्य निर्धारित केले. परंतु शासनाने दगडाच्या घरांची किंमत रु.५५६१ तर झोपडीची रु.६४५ म्हणजे फक्त एक तृतीआंश मूल्य विस्थापितांना देण्यात आले.(१५)

१६) **श्री. उत्तम कांबळे (२०१७)** सकाळ, सर्वहारांच्या वेदना: महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्यानंतर ३३२ प्रकल्प बांधणीचे काम सुरू झाले त्यापैकी १७५ जलसिंचन प्रकल्पाचे काम पूर्ण झाले या सर्व प्रकल्पामुळे १९५० गावे बाधित झाली असून त्यातील २.५० लाख (अडीच लाख) कुटुंबे विस्थापित झाली. एका कुटुंबात ४ व्यक्ती होते असे गृहीत धरले तर जवळपास १० लाख लोकसंख्या विस्थापित झालेली आहे. आतापर्यंत ९.५ टक्के प्रकल्पग्रस्त लोकांना शासकीय नोकरी मिळाली आहे तर उर्वरित ९०.५ टक्के लोकसंख्या नोकरीची वाट पहात आहे आणि त्यांच्या दोन पिढ्या सुध्दा खल्लास झाल्यात.(१६)

**२.२ संशोधन साहित्याचे महत्व:** पायाभूत प्रकल्पांच्या इमारतीद्वारे किंवा मोठ्या विकास प्रकल्पामुळे जसे की मोठी आणि मध्यम धरणे, वीज प्रकल्प, रेल्वे, औद्योगिक प्रकल्प, रस्ते, बंदरे, स्वरक्षण आस्थापने इत्यादी प्रकल्पांमुळे लोकसंख्येचे मोठ्या प्रमाणात विस्थापन झाले आहे. द्वितीय स्वरुपात उपलब्ध असलेले संशोधन साहित्य हे संशोधकाच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वपूर्ण असते. द्वितीय साहित्यात प्रकल्पग्रस्तांचा कशा पद्धतीने अभ्यास करण्यात आलेला आहे. द्वितीय साहित्याचे काय निष्कर्ष आहेत? हे संशोधन कर्त्याला माहित असणे आवश्यक असते. पुर्वी एखाद्या प्रकल्पाचा अभ्यास झाला असेल त्या प्रकल्पाचा आर्थिक आणि सामाजिक दृषिटकोनातून कसा अभ्यास करण्यात आलेले आहे. प्रकल्पामुळे धरणग्रस्त झालेल्या लोकसंख्येला आर्थिक किंवा सामाजिक तोटा किंवा हानी झालेली आहे काय? कि नाही हे संशोधकांच्या दृष्टीने बघणे किंवा अभ्यास करणे महत्वाचे आहे. अभ्यासामध्ये आकडेवारी कशाप्रकारे संपादन केली आहे. कुठली संशोधन पद्धती वापरली आहे? माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषणाचे स्वरुप कसे आहे? एकूणच पुर्वीच्या संशोधन साहित्याचे समाजाला देशाला व विशेषत: संशोधकाला नवीन संशोधन करण्यात अत्यंत उपयुक्त असते. या कारणाने संशोधन साहित्याचा एक विशेष महत्व आहे.

**२.३ सारांश:** संशोधन विषयाची संबंधित साहित्याचा आढावा यामध्ये विविध पुस्तके वर्तमानपत्रातील लेख, संशोधन अहवाल, पीएच.डी. प्रबंध, संशोधनात्मक लेख अशा विविध द्वितीय स्वरुपाच्या आकडेवारीवरुन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. द्वितीय स्वरुपाची आकडेवारी ही संपूर्ण प्रकल्पग्रस्तांवर आधारित आहे. त्या प्रकल्पग्रस्तांना एखाद्या प्रकल्प बांधणीमुळे नफा झाला कि तोटा झाला? त्यांचे पुनर्वसन कशा पद्धतीने झाले? त्यावर आधारित विविध पुस्तकांचा, संशोधन अहवालांचा व पीएच.डी संशोधन प्रबंधाचा अभ्यास करुन त्यांच्या साहित्याचा आढावा घेण्यात आला.

संशोधन साहित्याचा अभ्यास करण्यासाठी बऱ्याच प्रकाशित अप्रकाशित संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आला. संशोधनामध्ये उद्दिष्टे मांडलेली आहेत आणि उद्दिष्टानुसार गृहितकृत्ते देण्यात आलेली आहेत. नमुना निवड पद्धत आणि गृहितकाचे पडताळणी

करण्याकरिता आवश्यक आकडेवारीला अनुसरुन सांख्यिकीय विश्लेषणक करण्यासाठी खर्च–लाभ वर्गीकरण आणि सामाजिक खर्च–लाभ वर्गीकरणाचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

# संदर्भ

१) कुभांरे सी. वी. (२००६) गोसीखुर्द प्रकल्पाच्या निर्मितीमुळे नागपुर जिल्हयातील प्रभावित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाच्या समस्या एक आर्थिक अध्ययन.

२) गझघाटे विलास (२००५) गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे सामाजिक–आर्थिक विकासाचे अभिक्षेत्रिय विश्लेषण.

३) झांबरे एस.पी (२००९) गोदिंया जिल्हयातील मध्यम जलसिंचन प्रकल्पाचे अर्थिक अध्ययन.

४) मृणालीणी फडनवीस व प्राची देशपांडे (२००४) गोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील पुनर्वसनाच्या समस्या एक आर्थिक अध्ययन.

५) Mrunalini Fadanvis and Prachi Deshpande (2004) A survey of resettlement with alternative livelihood for project affected persons of Gosikhurd Irrigation Project.

६) तनपुरे मधुकर देवरस (२०१७) ‘अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा व कर्जत तालुक्यातील घोड व कुकडी जलसिंचन प्रकल्पामुळे झालेल्या सामाजिक व आर्थिक बदलांचा अभ्यास.

७) जगदीश बी. सपकाळे (२०१५) ‘Rehabilitation – The Problem of Dam Affected Displaced people: A study of Warna River in Maharashtra\$

८) सुश्री उमा भारती (२०१६) ‘Rehabilitation of displaced families due to irrigation project\$

९) डॉ. रविंद्र गराडा (२०१५) development project caused resettlement and rehabilitant policy: Overviews on dam projets in Odisa (India)

१०) Associats Engineering Surveyors Limited (2018) The Project on irrigation scheme development in Central and Eastern\$ Uganda Resettlement Action plan for Atari irrigation Scheme.

११) रविंद्रकुमार वरहांडे, संजय राजे व पायल चाफले (२०१३) Realistic Study of Rehabilitation and Resettlement of Project Affected Persons (PAP\$s) of

Gosikhurd Project in Maharashtra State\$ IJETAE, Volume-3, Issue -९, pp 506-512

१२) सुर्यवंशी अजीत मारोती (२०१६): मोठ्या जलसिंचन प्रकल्पाचा कृषी विकासावरील परिणाम दुधगंगा प्रकल्पाचा अर्थशास्त्रीय अभ्यास.

१३) रजनीस (२००७) Chamera dam project study of intended and unintended consequences

१४) शिंदे पांडुरंग बी. (२०१७) Quot Economic of Rehabilitation – A study of Bhima (Ujani) Irrigation Project Quot.

१५) Fact Finding Committee (1986) The Srisailam Project 1986 p 258

१६) उत्तम कांबळे (२०१७) सर्वहारांच्या वेदना–सकाळ २८ मे

# प्रकरण–३

# संशोधनाची कार्यपद्धती

**३.१ प्रास्ताविकः** कुठल्याही प्रकारच्या अभ्यासात संशोधन पद्धतीला विशेष स्थान आहे. पूर्वी संशोधन झालेल्या अभ्यासाचा आढावा घेऊन त्याच विषयात नवीन संशोधन करणे आवश्यक असते. त्यामुळे पूर्वी अभ्यास झालेल्या संशोधनाचा नवीन संशोधनात फार उपयोग होतो. प्रस्तुत प्रकरणात पीएच.डी., अहवाल व संशोधन लेखांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**३.२ संशोधन समस्या:** कृषीतील तांत्रिक बदलांचा जलसिंचन प्रकल्पांचा पर्यावरणीय संसाधनांवर तसेच त्या प्रकल्पांअतर्गत धरणग्रस्त लोकसंख्येवर मुख्यता परिणाम होतो. त्यामुळे त्यांचा विकास खुंटतो. प्रस्तुत शोध प्रबधांत धरणग्रस्त लोकांच्या आर्थिक, रोजगार विषयक, उत्पन्न विषयक तसेच त्यांच्या उपजीविकेबद्दल अभ्यास केला आहे.

वेगवेगळ्या समस्यांचा सामना प्रकल्पग्रस्त लोकसंख्या करीत आहेत, त्यात रोजगाराची समस्या, उत्पन्नाची समस्या, पुनर्वसनाची समस्या, स्थलांतराची समस्या, घरांची समस्या, पीक लागवडीची समस्या, शिक्षणाची समस्या, पाळीव प्राण्यांची समस्या, जंगल तोडण्याची समस्या व वनसंपत्तीची समस्या निर्माण झाल्या, या समस्यांच्या निराकरणासाठी शासनाचे धोरण कासवाच्या गतीने वाटचाल करीत आहे. प्रकल्पाच उद्घाटन होऊन ३० वर्षे झाले तरीही धरणाचे बांधकाम व पुनर्वसनाची कामे पूर्ण झालेले नाहीत.

प्रकल्प पूर्ण झाल्यावर २,५०,८०० हेक्टर शेतजमीन ओलीताखाली येउ शकते. प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून ९० टक्के रक्कम केंद्र सरकार खर्च करण्यासाठी तयार आहे आणि १० टक्के रक्कम राज्य शासनाला खर्च करायची आहे. परंतु २००९ मध्ये राज्य सरकारने १० टक्के रक्कम खर्च करायला मान्यता दिल्यामुळे या प्रकल्पाला आता राष्ट्रीय प्रकल्प म्हणून मान्यता मिळाली आहे. या सर्व समस्यांचा शोध घेऊ न त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी हा विषय निवडला आहे.

**३.३ अभ्यासाचे महत्त्व:** आजच्या आधुनिक जगात आर्थिक विकासाला फार महत्त्व आहे. जलसिंचन प्रकल्प हा एक विकासाचा आधारभूत स्तंभ आहे. जेव्हा त्या प्रकल्पाच्या

सभोवतालचा विकास आणि एकूण उत्पादनात वाढ झालेली असेल तेव्हा त्या प्रकल्पामुळे जी लोकसंख्या बाधीत झाली त्यांनी आपल्या शेतीशी संबधित रोजगाराचा, उत्पन्नाचा, व्यवसायाचा त्याग केलेला आहे त्या विस्थापितांकरीता पुनर्वसनासंबधी, आरोग्यविषयक, आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक सोयी केल्या आहेत काय? त्याचप्रमाणे गोसीखुर्द प्रकल्पापूर्वी त्या लोकांची आर्थिक आणि व्यवसायविषयक काय परिस्थिती होती? प्रकल्पग्रस्त लोकसंख्या कशाप्रकारे जीवन जगत आहेत याकडे फारसे लक्ष दिले नाही. प्रकल्पग्रस्तांचा आर्थिक, रोजगारविषयक, उत्पन्नविषयक, बचत, गुंतवणूक आणि व्यवसायविषयक अभ्यासाचे महत्त्व निर्माण झालेले आहे आणि म्हणूनच हा विषय घेण्यात आला.

आजच्या प्रगत अर्थव्यवस्थेमध्ये जलसिंचन प्रकल्पाला महत्त्वाचे स्थान आहे. पाण्याच्या सोयीमुळे शेतीचा संपूर्ण विकास घडवून आणता येतो. त्या धरणामुळे जे लोक प्रभावित झाले त्या धरणग्रस्त लोकसंख्येच्या आर्थिक आणि त्यांच्या रोजगार व उपजीविके संबंधी अभ्यास शोध प्रबंधामध्ये केलेला आहे.

## ३.४ विषय निवडीचे समर्थन:

१) प्रकल्पग्रस्त लोकांचे कोणते प्रश्न आहेत? त्यांच्या पुनर्वसनाची काय समस्या आहे? त्यांना व्यवसाय व रोजगारविषयक काय समस्या आहेत? त्यांना शासनाकडून रोजगार किंवा व्यवसायांचे प्रशिक्षण दिले काय? प्रकल्पग्रस्तांच्या राहणीमानाचा स्तर काय आहे? त्यांना जमीनीचा मोबदला योग्य बाजारभावाप्रमाणे मिळालेला आहे काय? की नाही? असे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न समजण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या अर्थिक समस्या या विषयाच्या अभ्यासाची फार उपयुक्तता होईल.

२) देशाला आर्थिक धोरण ठरविण्यासाठी कोणत्या प्रकल्पाला मान्यता घावी? सिंचनाच्या एकूण लाभ क्षेत्रात कोणत्या प्रकल्पाने वाढ होईल जलसिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्त लोकांचा व देशाचा आर्थिक विकास कसा करता येईल? तसेच जलसिंचन प्रकल्पावर जल विद्युत प्रकल्प (Hydro Electricity Project) तयार करुन वीजनिर्मिती करुन देशाचा विकास साधता येईल अशी या अभ्यासाची उपयुक्तता आहे.

३) देशाला कोणत्या प्रकल्पात किती गुंतवणूक करायची? कोणता जलसिंचन प्रकल्प आधी बांधायचा? म्हणजे देशाच्या विकासामध्ये कोणत्या प्रकल्पांना अग्रक्रम द्यावा ज्यामुळे जलद गतीने देशाचा विकास होईल. जेव्हा प्राथमिक क्षेत्राचा विकास होतो तेव्हाच औद्योगिक क्षेत्राचा विकास होतो, हे धोरण समजण्यासाठी वरील विषयाच्या अभ्यासाची उपयुक्तता फार जास्त आहे.

## ३.५ अभ्यासाच्या मर्यादा:

१) **कार्यक्षेत्र:** 'गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पग्रस्त लोकांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन' हा अभ्यास फक्त गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पासाठी मर्यादित आहे इतर कुठल्याही जलसिंचन प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला हा अभ्यास लागू होत नाही म्हणजेच या अभ्यासाचे कार्यक्षेत्र गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांपुरतेच निर्धारित आहे. (पूर्णत: ९३ प्रभावित गावे )

२) **कालावधी/कालखंड:** या प्रकल्पाची सुरूवात १९८३ ला झालेली आहे. सदर अभ्यासाकरीता २००७-२०१२ हा कालखंड निवडला आहे त्यामुळे गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पग्रस्त लोकांच्या आर्थिक समस्या हा अभ्यास फक्त २००७-२०१२ या कालावधीसाठी मर्यादित आहे ही कालखंडाशी संबंधित एक मर्यादा आहे.

३) **तालुका:** सदर विषयाचा अभ्यास पवनी, भंडारा, सावरी, कुही आणि भिवापूर तालूक्यातील प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचा अभ्यास आहे.

४) **सबंधित:** संशोधन प्राथमिक माहितीवर आधारित आहे आणि प्रकल्पग्रस्तांनी भरलेल्या प्रश्नावलीच्या माहितीवर आधारित निष्कर्ष काढले आहेत.

## ३.६ संशोधनाची उपयुक्तता :

१) नवीन संशोधन करण्याकरिता हे संशोधन एक आढावा म्हणून उपयोगी पडेल.

२) शासनाला पुढील किंवा नवीन जलसिंचन प्रकल्प बांधणीमुळे विस्थापित लोकांच्या पुनर्वसन संबंधी किंवा पून:स्थापनेसंबंधी धोरण ठरविताना उपयोगी.

३) प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला धरणापासून किती आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्यासंबंधित माहिती समाजतील सर्व लोकसंख्येला मिळेल.

४) जलसिंचन प्रकल्पाच्या निर्मितीमुळे प्रकल्पग्रस्तांना मिळणारे लाभ किंवा तोटा यासंबंधित आकडेवारी उपलबध होते.

५) प्रकल्पग्रस्तांना किती आर्थिक आणि व्यावसायिक समस्यांचा सामना करीत आहेत याची माहिती शासनाला मिळते.

६) प्रकल्पग्रस्तांच्या व्यवसायात रोजगारात किती वाढ किंवा घट झाली आणि त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात किती वाढ किंवा घट झाली याची आकडेवारी शासनाला त्याचप्रमाणे समाजाला उपयोगी पडते.

७) प्रकल्पग्रस्तांच्या बेरोजगारीच्या प्रमाणात वाढ किंवा घट झाली या संबंधी आकडेवारी उपलब्ध होते.

## ३.७ संशोधनाची सैद्धांतीक पार्श्वभुमि:

**३.७.१ व्यय–लाभ वर्गीकरण (Cost Benefit Analisis)**: भारतात सर्वप्रथम व्यय–लाभ विश्लेषणाचा उपयोग प्रा. डी. आर. गाडगीळ यांनी महाराष्ट्रात गोदावरी आणि प्रवरा नदीवर धरण व्यवस्थेकरिता उपयोगात आणली होती. त्यानंतर प्रा. सुहानी व नीळकंठ रथ यांनी हीराकुंड धरण योजना यांचे व्यय–लाभ मुल्यांकन केले आहे. १९५८ मध्ये प्रोफेसर गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ६ सिंचन योजनांचा व्यय–लाभ अनुपात यांचा अभ्यास केला होता.

जलसिंचन प्रकल्पाच्या निर्मितीमुळे समाजाला देशाला त्या प्रकल्पाचा किती लाभ मिळेल किंवा त्या प्रकल्पापासून किती हानी होईल याचा अभ्यास व्यय–लाभ वर्गीकरणात (Cost Benefit Analisis) केला जातो. [१] म्हणजेच प्रकल्प मुल्यांकनाच्या आधारे याचा अभ्यास केला जातो. एखाद्या प्रकल्पामुळे लाभ मिळत असेल तर निश्चितच शासन त्या प्रकल्पाचे बांधकाम करते. परंतु जर त्या प्रकल्पामुळे हानी होत असेल तर शासन त्या प्रकल्पाची निर्मिती करीत नाही. व्यय–लाभ वर्गीकरणातून प्रकल्पाला मिळणारा नफा जर जास्त असेल तर धरणाचे बांधकाम केले जाते. म्हणजे एकूणच व्यय–लाभ वर्गीकरण हे नफ्याचे वर्गीकरण आहे असे आपण म्हणू शकतो. यामध्ये समाजाला होणाऱ्या तोट्याचे स्पष्टीकरण दर्शविले जात नाही. फक्त त्या प्रकल्पापासून भविष्यात मिळणारे नफे किंवा फायदा लक्षात घेतल्या जातो आणि फायदा

म्हणजेच नफा जर खर्चापेक्षा जास्त असेल तर निश्चितच त्या प्रकल्पाचे बांधकाम केल्या जाते. त्यामुळे व्यय–लाभ वींकरण हे सामाजिक आणि समाजाच्या दृष्टिकोनातू प्रकल्पाचं योग्य प्रतिबिंब दर्शवित नाही.

**३.७.२ सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरण (Social Cost Benefit Analisis):** सामाजिक खर्च लाभ वर्गीकरण हे समाजाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा असतो. सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणात एखाद्या प्रकल्पामुळे समाजावर काय परिणाम होतो. याचा अभ्यास सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणात केला जातो.[२] साधारण सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणामध्ये सकारात्मक सामाजिक लाभ आणि नकारात्मक सामाजिक खर्च असे दो भागात परिणाम दर्शविल्या जाते. सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरण यालाच आर्थिक वर्गीकरण सुद्धा म्हटले जाते. कारण ते समाजाच्या दृष्टिकोनातून दर्शविलेले असते म्हणजेच समाजाला त्या प्रकल्पापासून किती लाभ झालेला आहे आणि समाजाला त्या प्रकल्पापासून किती तोटा सहन करावा लागत आहे किंवा सामाजिक हानी होत आहे.

व्यय–लाभ वर्गीकरण आणि सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरण यामध्ये विशेषत: दोन गोष्टींवर फरक आढळून येतो. खर्च लाभ वर्गीकरणाचे स्वरुप संख्यात्मक दृष्टिकोनातून असते तर सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणाचे संख्यात्मक त्याचबरोबर गुणात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. व्यय–लाभ वर्गीकरणामध्ये वैयक्तिक नफ्याची मोजणी प्रकल्पाच्या अंतर्गत केली जाते. परंतु सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणामध्ये एकूण समाजाच्या सामाजिक मुल्यांवर काय परिणाम होतो. या घटकांचा अभ्यास केला जातो.

व्यय–लाभ वर्गीकरणात सामाजिक मुल्यांचे प्रतिबिंब दिसत नाही. परंतु सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणात सामाजिक मुल्यांचे प्रतिबिंब हा एक महत्त्वाचा विषय आहे. सामाजिक मुल्यांना विशेष महत्व दिल्यामुळे सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरण हे व्यय–लाभ वर्गीकरणापेक्षा वेगळे आहे. एखाद्या प्रकल्पात फायदेशीर किंवा हानिकारक बाह्य (Externalities) प्रभाव असू शकतात. हे प्रभाव व्यय–लाभ वर्गीकरणात केला जात नाही. परंतु तेच प्रभाव सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणात गणल्या जातात. सामाजिक व्यय–लाभ वर्गीकरणाचे दोन दृष्टिकोन आहेत.

१. UNIDO दृष्टिकोन आणि

२. L-M दृष्टिकोन

UNIDO (United Nation Industrial Development Organization) १९७८ मधील व्यवहारिक प्रकल्प मूल्यांकनासाठी नामांकित मार्गदर्शक आहे. प्रकल्पामुळे वित्तीय नफा कशाप्रकारे दाखवितात. त्याचे स्पष्टीकरण UNIDO संकल्पनेत दिलेले आहे.[३] वित्तीय नफा प्रकल्पातील निव्वळ वर्तमान मुल्य प्रदर्शित करते आणि त्यांचे मोजमाप आदानांचा खर्च आणि प्रधान यापासून मिळालेला लाभ बाजार किंमतीवर अवलंबून असतो.

Net Present Value of a project is calculated as:

$$NPV = \sum_{t=o}^{T} \left\{ \frac{Vt - Ct}{(1+K)t} \right\} - Io$$

NPV= Net Present Value

Vt= Value of output at market price at time t

Ct= Value of inputs at market price at time t

K= Discount Rate

T= Lifetime of the project

Io= Initial cost at the start of the project [४]

The project is viewed as financially feasible if NPV>0

L-M दृष्टीकोन I.M.D. Little and James Mirrless यांनी विकसित केला त्यामुळे याला L-M दृष्टीकोन म्हणूनही ओळखले जाते.

**३.७.३ प्रकल्प मुल्यांकन:** आर्थिक विकासाच्या काळात देशांमध्ये निरनिराळे प्रकल्प हाती घेतले जातात. त्यामागे काही उद्देश असतात व त्यांच्या प्रगतीसाठी कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. अशा प्रकारच्या प्रकल्पाचे मुल्यांकन करणे हा विकास कार्यक्रमाचा एक आवश्यक भाग मानला जातो. एखाद्या प्रकल्पामध्ये परताव्याचा दर किती आहे तो सामाजिक दृष्टीकोनातून किती फायदेशीर आहे. तसेच त्यामुळे रोजगार, व्यवस्थापन, पुनर्गुंतवणूक, प्रशिक्षण इत्यादी बाबतीत कोणते अनुषंगिक परिणाम घडून येतात. याचे मुल्यमापन करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रकल्प मुल्यांकन होय.

दुसऱ्या शब्दात अधिक महत्त्वाच्या बाजूने प्रस्तावित प्रकल्पामुळे त्या प्रदेशातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये कोणता बदल घडून येऊ शकतो याचा अंदाजही प्रकल्प मुल्यांकनामुळे घेता येतो. [५] प्रकल्प मुल्यांकनासाठी प्रचलित असलेली एक पद्धत खर्च लाभ विश्वषणाची आहे. सामान्य भाषेत असे म्हणता येईल की एखाद्या प्रकल्पासाठी होणारा सर्व खर्च आणि त्या प्रकल्पाचे सर्व प्रकारचे लाभ यांचा विचार करुन शेवटी निव्वड लाभ या पद्धतीने काढला जातो. या पद्धतीची उपयुक्तता ही आहे की तिच्या सहाय्याने गुंतवणूक विषयक निर्णय शास्त्रीय आधारावर घेता येतात.

**३.७.४ छाया किंमत:** छाया किंमतीविषयी सर्वप्रथम जॉन टिंबरर्जन यांनी १९५५ मध्ये आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या मते छाया किंमत म्हणजे ती किंमत जि संतुलन किंमतीच्या रुपाने कोणत्याही वस्तू किंवा साधनाच्या वास्तविक किमतीचे प्रदर्शन करते. या किंमती वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या क्षेत्रात किंवा व्यवसायात वेगवगळ्या असू शकतात तसेच बाजार किंमतीपेक्षा वेगळे असू शकतात. छाया किंमती म्हणजे त्या वेळी बाजारात प्रचलित असतील, जेव्हा विवेचनाधीन गंतवणुकीचा एकंदरीत आकृतीबंध वास्तवात कार्यान्वित होऊन जातो आणि श्रम, भांडवल, विनिमय या बाजारांमध्ये संतुलनाची स्थिती असेल.

Obtening Net Benefit of a project at Shadow Prices is calculated as:

Calculating Net Benefit of the project from social point of view by:

$$\text{NPV} = \sum_{t=o}^{T} \left\{ \frac{Vt - Ct}{(1+K)t} \right\} - Io$$

NPV= Net Present Value

Vt= Shadow price of benefit at time t

Ct= Shadow price of Operating Expenses at time t

K= Social Discount Rate

T= Lifetime of the project

Io= Initial cost at the start of the project[६]

ॲक्युम यांच्या मते छाया किंमती या घटकांच्या सीमांत उत्पादकतेच्या मूल्य बरोबर असते. अशा वेळेस अशा तंत्राची निवड केल्या गेली असेल ज्याद्वारे संसाधनांची उपलब्धता त्यांची मागणी आणि उत्पादनाचे तंत्र या संदर्भात जास्तीत जास्त उत्पादनाची शक्यता वाढते.

## ३.८ संशोधनाची उद्दिष्ट्ये:

१. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या आर्थिक/ उत्पन्नाविषयक संरचनेचा अभ्यास करणे

२. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या व्यावसायिक (रोजगार विषयक) संरचनेचा अभ्यास करणे.

३. प्रकल्पाने बाधित होणारे वनक्षेत्र आणि वनसंपत्तीपासून होणाऱ्या आर्थिक तोट्यांचे अध्ययन करणे.

४. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे आर्थिक नुकसान भरपाई करण्यासाठी सरकारने केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

५. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या पुनर्वसन कार्याचा आढावा घेणे.

## ३.९ गृहितके:

१) गोसीखुर्द प्रकल्पामुळे धरणग्रस्त लोकांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

२) प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या उपजीविकेची/रोजगाराची साधने कमी झाली आहेत.

**३.१० संशोधन पद्धती:** प्राथमिक आणि द्वितीय तथ्यांवर आधारित असलेले हे सखल संशोधन आहे, त्यासाठी सविस्तर तथ्य संकलन केले आहे. संशोधनात स्तरित यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा (Stratified Randan Sampling) अवलंब करुन प्रकल्पग्रस्त गावातील त्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांची साध्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीनुसार निवड केली.

**३.१०.१ नमुना निवड पद्धत:** गोसीखुर्द प्रकल्पातील एकूण २०० गावे प्रभावित आहेत त्या २०० गावांपैकी ९३ गावे पूर्णत: आणि १०७ गावे ही अंशत: प्रभावित आहेत. एकूण पूर्णत: ९३ प्रकल्पग्रस्त गावापैकी १९ गावांची स्तरीय यादृच्छिक पद्धतीने निवड केली, त्यामध्ये कूही तालुक्यातील ०६, भिवापूर ०४, पवनी ०२, भंडारा ०५ व सावरी ०२, अशी एकूण १९ गावांची निवड केली आणि त्यापैकी प्रत्येकी २० कुटुंबाची (भानापूर व आसापूर चक या सावरी तालुक्यातील गावातून–१८) अशी एकूण ३७६ कुटुंबाची निवड केली. त्यानंतर प्रत्येक गावातून भूमिहीन, सिमांत शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, निम्नमध्यम, मध्यम शेतकरी व मोठे शेतकरी यांचे समप्रमाण घेतले आहे, परंतु अल्प भूधारक व सिमांत शेतकरी जास्त होते

त्यामुळे त्यांची नमुना म्हणून जास्त प्रमाणात निवड करण्यात आली. सिमांत शेतकरी २.५ एकरपेक्षा कमी, अल्प भुधारक शेतकरी २.५–५ एकर दरम्यान, निम्न मध्यम भूधारक शेतकरी ५–१० एकर दरम्यान, मध्यम शेतकरी १०–२५ एकर दरम्यान, मोठे शेतकरी २५ एकरपेक्षा अधिक हे प्रमाण ठरविले.

**सारणी क्र. ३.१**

**जमीन धारणेनुसार निवड केलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या**

| प्रकल्पग्रस्तांची बाधित जमीन (एकरमध्ये) | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| भूमिहीन | २९ | ७.७१ |
| ००–२.५ एकर (सिमांत शेतकरी) | १२४ | ३२.९८ |
| २.५–५ एकर (अल्प भूधारक शेतकरी) | १५६ | ४१.४८ |
| ५–१० एकर (निम्न मध्यम भूधारक) | ५७ | १५.१६ |
| १०–२५ एकर (मध्यम शेतकरी) | ०९ | २.३९ |
| २५ एकर पेक्षा जास्त (मोठे शेतकरी) | ०१ | ०.२६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**सारणी क्र. ३.२**


**पुर्णत: प्रकल्पग्रस्त गावे व अभ्यासासाठी निवडलेली गावे**

| जिल्हा | एकूण जिल्हानिहाय पुर्णत: प्रकल्पग्रस्त गावे | तालुका | तालुकावार एकूण पुर्णत: प्रकल्पग्रस्त गावे | तालुकानिहाय एकूण पुर्णत: प्रकल्पग्रस्त गावातून नमुना निवड केलेली गावे | टक्केवारी | प्रत्येक गावातून निवड केलेले २०/१८ प्रकल्पग्रस्त | एकूण तालुकानिहाय गावातून निवड केलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नागपूर | ५१ | कृही | ३४ | ०६ | ३१.५८ | २० | १२० | ३१.९१ |
| | | भिवापूर | १७ | ०४ | २१.०५ | २० | ८० | २१.२८ |
| भंडारा | ३४ | भंडारा | २३ | ०५ | २६.३१ | २० | १०० | २६.६० |
| | | पवनी | ११ | ०२ | १०.५३ | २० | ४० | १०.६४ |
| चंद्रपूर | ०८ | सावरी | ०८ | ०२ | १०.५३ | १८ | ३६ | ९.५७ |
| **एकूण** | **९३** | **एकूण** | **९३** | **१९** | **१००** | | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: स्तरीय यादृच्छिक नमुना निवड)**

## नकाशा क्र.३.१

## प्रकल्पांतर्गत एकूण बुडीत क्षेत्र आणि पूणर्तः प्रकल्पग्रस्त गावातून नमुना निवड केलेली गावे




(स्त्रोत: गोसीखुर्द जलसिंचन विभाग: नकाशे प्रकल्पासंदर्भातील माहिती Blue Print) [७]

**सारणी क्र. ३.३**

**पुर्णतः प्रकल्पग्रस्त प्रतिदर्श/ नमुना निवड गावांची नावे**

| अ.क्र. | नागपूर जिल्हा | अ.क्र. | भंडारा जिल्हा |
|---|---|---|---|
| | **तालुका भिवापूर** | | **तालुका पवनी** |
| १. | घाडेघाट | ११. | मेंढा |
| २. | घाटउमरी | १२. | पेंढरी |
| ३. | धुटानबोरी | | **तालुका भंडारा** |
| ४. | पांजरेपाट | १३. | जाख |
| | **तालुका कुही** | १४. | मौदी |
| ५. | टेकेपार | १५. | वळद |
| ६. | आंभोरा (खुर्द) | १६. | इटगाव |
| ७. | धामनी | १७. | जामगाव |
| ८. | उमरी | | **चंद्रपूर जिल्हा** |
| ९. | रूयाड | | **तालुका सावरी** |
| १०. | आंभोरा (कला) | १८. | भानापूर |
| | | १९. | आसापूर चक |

**(स्त्रोतः गोसीखुर्द जलसिंचन विभागः नकाशे प्रकल्पासंदर्भातील माहिती** Blue Print) (८)

**३.१०.२ तथ्य संकलनाची साधनेः** 'गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पग्रस्त लोकांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन' (२००७-२०१२) या विषयाचे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करताना जी माहिती गोळा केली त्या माहितीचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

**३.१०.२ अ) प्राथमिक आकडेवारी** : आकडेवारी गोळा करण्यासाठी पुढील साधनांचा वापर केला आहे.

१) प्रकल्पग्रस्त लोकांकरिता प्रश्नावली.

२) प्रकल्पाचे आणि बाधित वनक्षेत्राचे निरीक्षण.

३) विविध गटासोबत चर्चा (सरपंच, महिला गट, इंजिनियर्स व पुनर्वसन कार्यक्रम अधिकारी).

४) प्रकल्पाधिकारी मुलाखत अनुसूची.

**३.१०.२ ब) द्वितीय स्त्रोत:** द्वितीय स्वरुपाची आकडेवारी गोळा करण्यासाठी गोसीखुर्द प्रकल्पाचा अर्थसंकल्प, पुनर्वसन खर्च, शासकीय योजना, नोंदवह्या, दैनंदिनी इ. मधून माहिती गोळा केली आहे. संशोधनाकरीता अधिक असणारी माहिती गोळा करण्यासाठी जिल्हा सांख्यिकिय कार्यालय नागपूर, विदर्भ पाटबंधारे विभाग नागपूर, गोसीखुर्द पाटबंधारे विभाग पवनी (वाही) वन विभाग भंडारा व चंद्रपूर यांचे वार्षिक अहवाल, योजनांची माहिती व प्रकल्पग्रस्तांसाठी केलेल्या शासकीय योजना व पुनर्वसनावरील खर्च याच बरोबर नियतकालिके, विविध लेख, दैनिक वर्तमानपत्रातील लेख, गोसीखुर्द प्रकल्पग्रस्त लोकसंख्येवर लिहलेली पुस्तके, संशोधन अहवाल, पीएच.डी. प्रबंध तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी विकासाच्या योजना व प्रशिक्षण केंद्र, जिल्हा माहिती केंद्र, जिल्हा नियोजन मंडळ इत्यादींच्या मार्फत माहिती मिळविली.

**३.१०.२ क) माहितीचे विश्लेषण** : आकडेवारीचे योग्य वर्गीकरण करुन योग्य त्या श्रेणीमध्ये आणि तालिकेमध्ये क्रमबध्द करुन त्यावरुन शोध प्रबधांमध्ये आकृत्या, नकाशे आणि निरनिराळ्या प्रकारचे आलेख तयार करुन शास्त्रीय आणि आर्थिक पद्धतीने विश्लेषण केले. संशोधनामध्ये अचूकता, स्पष्टता आणि शुध्दता आणण्यासाठी सांख्यिकिय व अर्थशास्त्रीय मात्रात्मक तंत्र (Statistical, Quantitative Technique of Economics) पद्धतीचा अवलंब केला. प्रकल्पग्रस्त लोकांच्या आर्थिक घटकांमध्ये सहसंबंध पद्धतीचा (Corelation Method) वापर करण्यात आला आहे.

## ३.११ शोध प्रबंधाचा आराखडा:

**प्रकरण: १ संशोधन विषयाची ओळख:** गोसीखुर्द प्रकल्पावर आणि प्रकल्पग्रस्तांवर आधारित प्रस्तावना तसेच धरणग्रस्त लोकांचे विस्थापन व पुनर्वसनासंबंधी माहिती दिली, त्याचप्रमाणे गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पाचे स्थान व विस्तार संबंधित सविस्तर माहिती प्रस्तुत केली.

**प्रकरण: २ संशोधन विषयाशी संबंधित सहित्याचा आढावा:** धरणग्रस्तांची आर्थिक आणि व्यावसायिक संरचनेवर आधारित संशोधन सहित्याचा आढावा घेतला आहे.

**प्रकरण: ३ संशोधनाची कार्यपद्धती**: प्रकरणात संशोधन समस्या, विषयक निवडीचे समर्थन, संशोधनाची उद्दिष्थ्ये, गृहित कल्पना, अभ्यास पद्धती, तथ्य संकलनाची साधने, अभ्यासाची मर्यादा, संशोधनाचा कालवधी, कार्यक्षेत्र व विषयाचे महत्त्व या बाबी विचारात घेतल्या आहेत.

**प्रकरण**: **४ माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन:** गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पापूर्वी आणि प्रकल्पानंतर धरणग्रस्तांची आर्थिक आणि व्यावसायिक संरचना कशी होती आणि आताच्या (सध्याच्या) परिस्थितीत कशी आहे? प्रकल्पग्रस्तांच्या व्यावसायिक, रोजगार व आर्थिक परिस्थितीवर काय परिणाम झाले? प्रकल्पग्रस्त लोकसंख्येकरिता शासनाने कोण–कोणत्या योजना राबविल्या? घर बांधणीकरिता जमीनी दिलेल्या आहेत काय? शेतजमीन दिलेली आहे काय? प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या कुटुंबातील व्यक्तिला शासकीय सेवेत नोकरी दिलेली आहे काय? पुनर्वसनाच्या काय समस्या आहेत? त्यांना शैक्षणिक, आरोग्यविषयक सेवा उपलब्ध आहेत काय? इत्यादींचा अभ्यास केला. प्रश्नावलीद्वारे जमा केलेल्या आकडेवारीचे निरीक्षण उद्दिष्टानुसार केले व गृहितकांची पडताळणी केली आहे.

**प्रकरण: ५ संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारसी :** या प्रकरणामध्ये सर्व प्रकरणांचा थोड्यात निष्कर्ष व धरणग्रस्त लोकांच्या परिस्थितीवर झालेल्या आर्थिक परिणामांचा तसेच प्रकल्पग्रस्त लोकांच्या उपजीविकेवर व रोजगारावर आधारित शिफारसी आणि प्रकल्पग्रस्त लोकांच्या पुनर्वसनासंबधी आणि पर्यायी वनव्यवस्थेसंबधी शिफारसी प्रस्तुत केल्या. एकदंर प्रकल्पग्रस्त लोकांवर आधारित शैक्षणिक, आर्थिक व पुनर्वसनासबंधी शिफारसीचां अभ्यास शोध प्रबंधात केला आहे.

**३.१२ सारांश:** संशोधन कार्यपद्धती प्रकरण क्रमांक ३ अंतर्गत संशोधन कार्य पद्धतीमध्ये संशोधनाकरिता घेतलेला विषय गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक समस्यांचा अभ्यास यावर आधारित संशोधनाच्या समस्या, संशोधन विषयाचे महत्व हा विषय का निवडण्यात आला. या संशोधन अभ्यासाच्या काय मर्यादा आहेत. कार्यक्षेत्राशी संबंधित, कालावधी संबंधित तालुक्याची जिल्हयाची संबंधित काय मर्यादा आहे याचा अभ्यास करण्यात

आला. संशोधनाची उद्दिष्टे व संशोधन पद्धतीला अनूसरुण नमुना निवड पद्धतीमध्ये १९ गावाची प्राथमिक स्वरुपात आकडेवारी गोळा करण्यात आली. भंडारा, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यातील ९३ गावांपैकी १९ गावांची नमुना म्हणून निवड करण्यात आली. या १९ गावांपैकी ३७६ कुटुंबाची प्रश्नावलीच्या माध्यमाने माहिती गोळा करण्यात आली. नंतर या माहितीचे सारणीकरण आणि वर्गीकरण करण्यात आले आणि नंतर निष्कर्ष काढण्यात आले. तसेच प्रकल्पाशी संबंधित असलेल्या वन विभागातील अधिकारी, पाटबंधारे विभागातील अधिकारी, विदर्भ पाटबंधारे विभागातील अधिकारी, सांख्यिकी कार्यालय नागपूर, शासकीय योजना, लोकसंख्या विषयक लिहिलली पुस्तके या द्वितीय स्वरुपाच्या आकडेवारीचा अभ्यास करण्यात आला. अशाप्रमाणे या शोध प्रबंधाचा आराखडा तयार करण्यात आला. आराखड्यात एकूण ५ प्रकरण निर्धारित करण्यात आले. प्रकरण चारमध्ये टि चाचनी (t test) आणि सहसबंध पद्धत (Corelation Method) ही सांख्यिकीय पद्धत वापरण्यात आली. थोडक्यात एकूण संशोधनाकरिता पूर्ण प्रकरणाची रुपरेखा निश्चित करण्यात आलेली आहे.

# संदर्भ


1) Erikes, J.H. (1999) Comparing the Economic Planning for Voluntary and Involuntary Resettlement. In Cernea, M. (1999), Ed. The Economics of Involuntary Resettlement, p.117

2) Ibid. (2001) "The Cost Benefit Dilemma: Strategies and Alternatives" Economic and Political Weekly, May- 26, pp. 1824

3) UNIDO (1981) Guidlins for project evaluation. pp. 124

4) तत्रैव, पान नं.१४२

5) Manual of Industrial Project Ananlisis in Developing Countries (1968) Vol.II, OECD, pp. 79

6) तत्रैव, पान नं.९८

7) गोसीखुर्द जलसिंचन विभाग: नकाशे प्रकल्पासंदर्भातील माहिती Blue Print.

8) तत्रैव, Blue Print.

9) Kothari, C.R. (2004), Research Methodology, p.184.

10) Gupta, S.C. & Kapoor, U.K.(1983) Fundamentals of Mathematical Statistics, pp 248.

11) Swain, A.K.P.C. (2005). A Text Book of Population Studies, p.82.

12) धुरी निलम देवेंद्र (२००८) संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर,. पान नं.२२

13) ढगे एस.के./ रासे सी. व्ही. (२०११) संशोधन पद्धती, के एस प्रकाशन, पुणे, पान नं.३४–३५

14) कुऱ्हाडे बी. एम. (२०११) शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, पान नं.४३–४४

15) नाडगोंडे गुरुनाथ (२०११) सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, केल्हापूर, पान नं.७२–७४

16) मोरया सुनिल (२०१२) सामाजिक संशोधन पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पान नं.६८–६९

## प्रकरण–४

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

**४.१ प्रास्ताविक**: अर्थशास्त्रीय संशोधनाच्या अभ्यासात माहितीच्या विश्लेषणाला एक विशेष महत्त्व आहे. प्रश्नावलीच्या माध्यमाने प्राथमिक स्वरुपात जी माहिती गोळा केली जाते त्या माहितीचे सारणीकरण करुन प्राथमिक स्वरुपाच्या त्या माहितीवर विविध सांख्यिकीय चाचण्या वापरल्या जातात आणि त्यातून निष्कर्ष काढले जातात. म्हणजेच सांख्यिकीय तंत्र वापरुन गृहितकृत्याची पडताळणी केली जाते. सहसंबंध व टी चाचणी (t test) या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुन प्रस्तुत प्रकरणामध्ये आर्थिक निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

संशोधनात सांख्यिकीय चाचण्यांचा वापर केल्याने अचूक, योग्य व समर्पक निष्कर्ष निघतात आणि भावी संशोधन कार्यास या माहितीच्या विश्लेषणाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. सारणीकरण करुन प्राथमिक माहितीचे विश्लेषण सदर प्रकरणात केले गेले. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे आर्थिक व व्यावसायीक विश्लेषण केले आहे. तसेच प्रकल्पबांधनीपूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि प्रकल्पबांधणीनंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांच्या रोजगार व उत्पन्नावर काय परिणाम झाला याचा तुलनात्मक दृष्टिकोनातून आर्थिक व व्यावसायिक अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे.

**४.२: प्रकल्पग्रस्तांचा सामाजिक अभ्यास**: प्रकल्पग्रस्तांच्या अभ्यासामध्ये सामाजिक दृष्टिकोन पाहणे आवश्यक असते. सामाजिक दृष्टिकोनांतर्गत शैक्षणिक स्थिती, त्यांचे शिक्षण, राहणीमान, धर्म, जात, वंश, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांची संख्या, एकूण त्यांना किती मुलेबाळे आहेत, स्त्री–पुरुषाचे प्रमाण काय आहे? पुरुषांचे प्रमाण जास्त आहे की स्त्रियांचे जास्त आहे. म्हणजे एकूण प्रकल्पग्रस्तांच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

**४.२.१ धर्मानुसार स्थिती**: वेगवेगळ्या धर्माचे लोक भारतामध्ये एकत्र राहतात. धर्मानुसार प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या वर्गीकरणात कुठल्या धर्माचा विकास जास्त झाला, कुठल्या धर्माचा विकास कमी झाला, एकाच धर्माचा विकास जास्त झाला की इतर धर्माचा विकास झाला. हे पाहण्याच्या दृष्टिकोनातून धर्मानुसार प्रकल्पग्रस्तांचे वर्गीकरण तक्ता क्र. ४.१ मध्ये दिलेले आहे.

**सारणी क्र. ४.१**


**धर्मानुसार वर्गीकरण**

| **धर्म** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| हिंदू | २५९ | ६८.८९ |
| मुस्लिम | १४ | ३.७२ |
| ख्रिश्चन | ०० | ०.०० |
| बौध्द | १०३ | २७.३९ |
| शीख | ०० | ०.०० |
| इतर | ०० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१**

**धर्मानुसार वर्गीकरण**




तक्ता क्र. ४.१ मध्ये ६८.८९ टक्के प्रकल्पग्रस्त हिंदू धर्मातील आहे, तर मुस्लीम समाज हा ३.७२ टक्के आहे, व बौध्द समाज दुसऱ्या क्रमांकावर म्हणजेच २७.३९ टक्के आहे. म्हणजे एकूण प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत हिंदू, बौध्द व मुस्लीम समाज आढळतो, तर इतर धर्माची लोकसंख्या शून्य आहे. एकूणच लोकसंख्येत हिंदू धर्माची लोकसंख्या सर्वाधिक आहे.

## सारणी. क्र. ४.२

## तालुकानिहाय धर्मानुसार वर्गीकरण

| | | हिंदू | मुस्लिम | ख्रिश्चन | बौध्द | शीख | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ८१ | ५ | ० | ३४ | ० | ० | १२० |
| | टक्केवारी | ६७.५ | ४.६७ | ०.०० | २८.३३ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ६१ | ३ | ० | १६ | ० | ० | ८० |
| | टक्केवारी | ७६.२५ | ३.७५ | ०.०० | २०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २५ | ३ | ० | १२ | ० | ० | ४० |
| | टक्केवारी | ६२.५० | ७.५० | ०.०० | ३०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ६८ | २ | ० | ३० | ० | ० | १०० |
| | टक्केवारी | ६८.०० | २.०० | ०.०० | ३०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | २४ | १ | ० | ११ | ० | ० | ३६ |
| | टक्केवारी | ६६.६७ | २.७८ | ०.०० | ३०.५६ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| **एकूण** | | **२५९** | **१४** | **०** | **१०३** | **०** | **०** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **६८.८९** | **३.७२** | **०.००** | **२७.३९** | **०.००** | **०.००** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्र.४.२ वरुन लक्ष्यात येते की, तालुकानिहाय प्रकल्पग्रस्तांच्या धर्मानुसार टक्केवारीचे वर्गीकरण केल्यास ० ते ७६.२५ अशी टक्केवारी नोंदविता येते. तालुकानिहाय या आकडेवारीत चढ–उतार झाल्याचे दिसून येते. एकूण धर्मानुसार लोकसंख्येपैकी हिंदू धर्मांतील प्रकल्पग्रस्तांची संख्या सर्वाधिक आहे. कुही तालुक्यात एकूण ६७.५ टक्के हिंदू, २८.३३ टक्के बौध्द तर मुस्लिम ४.६७ टक्के आहेत. ख्रिश्चन व शीख धर्माची टक्केवारी शून्य आहे. भिवापूर या तालुक्यात सर्वोच्च ७६.२५ टक्के हिंदू आहेत. त्यापाठोपाठ बौध्द २० टक्के तर मुस्लिमांची संख्या ३.७५ टक्के आहे. बौध्द–मुस्लिमांच्या तुलनेन कुही तालुक्यातील संख्या घटलेली आहे. ख्रिश्चन व शीखांची टक्केवारी शून्यच आहे.

पवनी तालुक्यात ७.५० टक्के मुस्लिम प्रकल्पग्रस्त आहेत. बौध्द ३० टक्के तर हिंदू ६२.५० टक्के प्रकल्पग्रस्त आहेत, भंडारा तालुक्यात २ टक्के प्रकल्पग्रस्त मुस्लिम आहेत. हिंदू ६८ टक्के तर बौध्द ३० टक्के आहेत. येथेही ख्रिश्चन व शिखांची संख्या शून्य टक्के आहे. सावरी

तालुक्यात बौध्दांची तालुकानिहाय टक्केवारी ३९.५६ टक्के असून मुस्लिम २.७८ टक्के तर हिंदू सर्वात जास्त ६६.६७ टक्के प्रकल्पग्रस्त झाली आहे, तर ख्रिश्चन व मुस्लिम शून्य टक्के आहेत.

**४.२.२ शैक्षणिक स्थिती**: अर्थशास्त्राचा विकासाचा दृष्टिकोन बघण्याकरिता शिक्षण महत्त्वाचे आहे. लोकसंख्येचा आर्थिक आणि सामाजिक विकास शैक्षणिक स्थितीनुसार किती झाला हे निश्चित होते. शिक्षणावरुन त्यांच्या उत्पन्नात, व्यवसायात व राहणीमाणात एकंदर कोणकोणत्या गोष्टींचा विकास झाला हे बघण्याकरिता शैक्षणिक संरचना अत्यंत महत्त्वाची आहे.

**सारणी क्र. ४.३**


**शैक्षणिक स्थिती**

| **शिक्षण** | **वारंवारिता** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| अशिक्षित | १७ | ४.५२ |
| १० वी पर्यंत | १८९ | ५०.२७ |
| १२ वी पर्यंत | १०५ | २७.९२ |
| पदवी | ३७ | ९.८४ |
| पदविका | १६ | ४.२६ |
| पदव्युत्तर | १२ | ३.१९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.२**

**शैक्षणिक स्थिती**




सारणी क्र. ४.३ वरुन अशिक्षितांचे प्रमाण ४.५२ टक्के, तर ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तिंनी १० वी पर्यंत शिक्षण घेतले ते ५०.२७ टक्के आहे. १२ वी पर्यंत शिक्षण हे २७.९२ टक्के लोकसंख्येने घेतले व ज्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले आहे ते ९.८४ टक्के आहेत. तर ज्या प्रकल्पग्रस्त लोकसंख्येनी पदविका (डिप्लोमा) शिक्षण घेतलेले आहे, ते ४.२६ टक्के आहे व ज्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे त्यांचे प्रमाण ३.९ टक्के, तर १० वी पर्यंत शिक्षित लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक ते म्हणजे ५०.२७ टक्के आहे.

## सारणी क्र. ४.४

## तालुकानिहाय शैक्षणिक स्थिती

| | | अशिक्षित | इ. १० वी पर्यंत | इ. १२ वी पर्यंत | पदवी | पदविका | पदव्युत्तर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ५ | ६२ | ३१ | १२ | ६ | ४ | १२० |
| | टक्केवारी | ४.१७ | ५१.६७ | २५.८३ | १०.०० | ५.०० | ३३.३३ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ३ | ४१ | २२ | ९ | ३ | २ | ८० |
| | टक्केवारी | ३.७५ | ५१.२५ | २७.५० | ११.२५ | ३.७५ | २.५० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २ | २० | ११ | ४ | २ | १ | ४० |
| | टक्केवारी | ५.०० | ५०.०० | २७.५० | १०.०० | ५.०० | २.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ५ | ४८ | २८ | १० | ५ | ४ | १०० |
| | टक्केवारी | ५.०० | ४८.०० | २८.०० | १०.०० | ५.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ४ | १६ | १३ | २ | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | ११.११ | ४४.४४ | ३६.११ | ५.५६ | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **१७** | **१८९** | **१०५** | **३७** | **१६** | **१२** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **४.५२** | **५०.२७** | **२७.९३** | **९.८४** | **४.२६** | **३.१९** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्र. ४.४ वरुन तालुकानिहाय सरासरी शैक्षिणिक स्थितीचा अंदाज येतो. निरक्षर ते उच्चशिक्षित अशी वर्गवारी दिसून येते. शैक्षणिक संसाधनावर झालेला परिणाम पाहता एकूण प्रकल्पग्रस्तांची काही अपवाद सोडल्यास असलेली प्रगती नाजूक आहे. कुही तालुक्यात इ. १० पर्यंत शिक्षण झालेले ५१.६७ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत. इ. १२ वी पर्यंतचे २५.८३ टक्के, पदवीपर्यंतचे १० टक्के तर पदविका घेतलेले ५ टक्के, पदव्युत्तर ३३.३३ टक्के प्रकल्पग्रस्त तर ४.१७ अशिक्षितही आहेत. भिवापूर तालुक्यात पदव्युत्तर प्रमाण २.५० टक्के, पदवी ११.२५ टक्के, पदविका ३.७५ टक्के, इ. १२ वी पर्यंत २७.५० टक्के, इ. १० वी पर्यंत शिक्षण घेतलेले ५१.२५ टक्के प्रकल्पग्रस्त तर ३.७५ टक्के इतकी लोकसंख्या अशिक्षितांची आहे.

पवनी तालुक्यात अशिक्षितांचा भरणा ५ टक्के, इ. १० वी पर्यंतचे ५० टक्के, इ. १२ वी पर्यंतचे २७.५० टक्के, पदवी १० टक्के, पदविका ५ टक्के तर पदव्युत्तर विभागात शिक्षण घेतलेले केवळ २.५ टक्के लोकसंख्येचे प्रमाण आहे. भंडारा तालुक्यात पदव्युत्तर विभागात अंशत: वाढ होऊन ते ४ टक्के पर्यंत वाढलेले आहे. अशिक्षित ५ टक्के इ. १० वी ४८ टक्के, इ. १२ वी २८ टक्के आणि पदवी १० टक्के, पदविका ५ टक्के असे आहे. सावरी तालुका इ. १२ वी पर्यंतच्या शिक्षणामध्ये सर्व तालुक्यांमध्ये अग्रेसर आहे. पदविका शून्य टक्के, पदव्युत्तर २.७८ टक्के, पदवी ५.५६ टक्के आहे. हे प्रमाण एकूण तालुक्यात सर्वांत कमी आहे. इ. १२ वी पर्यंत ३६.११ टक्के, इ. १० चा ४४.४४ टक्के तर ११.११ टक्केवारी अशिक्षितांची आहे.

### ४.२.३ वयोमानानुसार वर्गीकरण:

प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या वयोमानानुसार वर्गीकरणामध्ये कुठल्या वयोगटांच्या विकास जास्त झाला. कुठला वयोगट जास्त उत्पन्न मिळवतो लहान मुलं जे १४ वर्षाखालील आहेत ते काय करतात. शिक्षण घेतात की शेती या कामांमध्ये समाविष्ट आहे आणि ६० वर्षापेक्षा ज्यांचे वय जास्त आहे ते व्यक्ती काय करतात व तरुण व्यक्ती शेती आणि शेतीशी संबंधित इतर कामांमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. प्रस्तुत सारणी क्र. ३.५ मध्ये अभ्यास केलेला आहे.

**सारणी क्र. ४.५**


**वयोमानानुसार वर्गीकरण**

| वयोगट | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| ०–१४ | ७४ | १९.६८ |
| १४–२५ | ७५ | १९.९५ |
| २५–३५ | ७८ | २०.७४ |
| ३५–५० | ६० | १५.९६ |
| ५०–६० | ७९ | २१.०१ |
| ६० पेक्षा जास्त | १० | २.६६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.३**

**वयोमानानुसार वर्गीकरण**




सारणी क्र. ४.५ वरुन ०–१४ या वयोगटात १९.६८ टक्के लोकसंख्या आहे, तर १४–२५ वयोगटात १९.९५ टक्के, २५–३५ वयोगटात २०.७४ टक्के ३५–५० या वयोगटात १५.९६ टक्के आणि ५०–६० गटात २१.०१ टक्के सर्वात जास्त आहे. ६० पेक्षा जास्त वयोगटातील लोकसंख्येचे पमाण फक्त २.६६ टक्के आहे म्हणजे अत्यंत कमी आहे.

**४.२.४ संवर्गानुसार वर्गीकरण**:

प्रकल्पग्रस्तांचे संवर्गानुसार वर्गीकरणात अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त व भटक्या जाती, इतर मागास वर्ग आणि खुला प्रवर्ग या संवर्गामधून किती लोकसंख्या धरणग्रस्त झाली त्या धरणग्रस्तांचे संवर्गानुसार स्पष्टिकरण प्रस्तुत सारणीत आहे.

**सारणी क्र. ४.६**


**संवर्गानुसार वर्गीकरण**

| संवर्ग | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ओपन (खुला) | ०७ | १.८६ |
| ओ.बी.सी. | १३५ | ३५.९१ |
| एस.टी. | ७८ | २०.७४ |
| एस.सी. | ११४ | ३०.३२ |
| एन.टी. | ४२ | ११.१७ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.४**

**संवर्गानुसार वर्गीकरण**




वरील सारणी क्र. ४.६ नुसार ओपन संवर्गातील लोकसंख्येचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे १.८६ टक्के आहे, तर ओ.बी.सी. संवर्गातील सर्वाधिक म्हणजेच ३५.९१ टक्के असून अनुसुचित जातीचे ३०.३२ टक्के आणि अनुसुचित जमातीचे २०.७४ टक्के, तर सर्वात कमी प्रमाण म्हणजे ११.१७ टक्के लोकसंख्या एन.टी. समाजाची आहे.

## सारणी क्र. ४.७

## तालुकानिहाय संवर्गानुसार वर्गीकरण

| | | ओपन | ओबीसी | एस.टी. | एस.सी. | एन.टी. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **कुही** | **वारंवारिता** | २ | ४१ | २३ | ३९ | १५ | १२० |
| | **टक्केवारी** | १.६७ | ३४.१७ | १९.१७ | ३२.५० | १२.५० | १००.०० |
| **भिवापूर** | **वारंवारिता** | १ | ३२ | १६ | २३ | ८ | ८० |
| | **टक्केवारी** | १.२५ | ४०.०० | २०.०० | २८.७५ | १०.०० | १००.०० |
| **पवनी** | **वारंवारिता** | १ | १८ | ७ | ९ | ५ | ४० |
| | **टक्केवारी** | २.५० | ४५.०० | १७.५० | २२.५० | १२.५० | १००.०० |
| **भंडारा** | **वारंवारिता** | ३ | ३६ | १९ | ३२ | १० | १०० |
| | **टक्केवारी** | ३.०० | ३६.०० | १९.०० | ३२.०० | १०.०० | १००.०० |
| **सावरी** | **वारंवारिता** | ० | ८ | १३ | ११ | ४ | ३६ |
| | **टक्केवारी** | ०.०० | २२.२२ | ३६.११ | ३०.५६ | ११.११ | १००.०० |
| **एकूण** | | **७** | **१३५** | **७८** | **११४** | **४२** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **१.८६** | **३५.९०** | **२०.७४** | **३०.३२** | **११.१७** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

वरील तक्ता क्र. ४.७ चा अभ्यास करता एकूण संवर्गानुसार विभाजन करता काही विशेष फरक आढळून येतो. कुही तालुक्यात एकूण संवर्गानुसार ओ.बी.सी. घटकाचे प्रमाण ३४.१७ टक्के आहे. त्याखाली ३२.५० टक्के एस.सी. संवर्गातील प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण व एस. टी. १९.१७ टक्के आणि एन.टी. १२.५० टक्के तर, ओपन गटातील प्रमाण १.६७ टक्के, सर्वात

कमी आहे. एकंदरीत असे निदर्शनास येते की, सर्वसाधारण संवर्गातील प्रकल्पग्रस्त अल्पशः प्रमाणात बाधित झाले आहेत.

एकूण लोकसंख्येपैकी भिवापूर तालुक्यातील ओ.बी.सी. प्रवर्गाची संख्या इथेही सर्वात जास्त आहे. ती ४० टक्के इतकी आहे. एस. सी. प्रवर्गातील २८.७५ टक्के, एस. टी. २० टक्के, एन.टी. १० टक्के तर ओपन संवर्गातील प्रकल्पग्रस्त केवळ १.२५ टक्के आहेत. पवनी तालुक्याची आकडेवारी पाहता संपूर्ण तालुक्यामध्ये ओबीसींची संख्या सर्वाधिक ४५ टक्के इतकी पवनी तालुक्यातील असल्याचे दिसते. एस.सी. २२.५० टक्के, एस. टी. १७.५० टक्के, एन. टी. १२.५ टक्के तर ओपन प्रवर्गातील प्रकल्पग्रस्तांची संख्या कुही, भिवापूर तालुक्यापेक्षा जास्त म्हणजे २.५० टक्के इतकी वाढलेली दिसते.

एकूण लोकसंख्येपैकी भंडारा तालुक्यात ओ.बी.सी. ३६ टक्के, एस.सी. ३२ टक्के, एस. टी. १९ टक्के, एन. टी. १० टक्के तर ओपन ३ टक्के आहेत. सावरी तालुक्याची आकडेवारी पाहता तिथे कुणीही ओपन संवर्गातील व्यक्ती प्रकल्पग्रस्त म्हणून बाधित झाली नाही. एस. टी. प्रवर्गातील प्रकल्पग्रस्तांची संख्या ही सर्वाधिक ३६.११ टक्के आहे. एस.सी. ३०.५६ टक्के, तर २२.२२ टक्के ओबीसीची एकूण तालुक्यातील टक्केवारी पाहता सर्वात कमी आहे. एकूण टक्केवारीचा विचार करता ओबीसी संवर्गातील प्रकल्पग्रस्त सर्वाधिक आहेत तर ओपन संवर्गातील सर्वात कमी आहेत.

### ४.२.५ मातृभाषेनुसार वर्गीकरण:

जी लोकसंख्या धरणाने बाधित आहे, त्या लोकसंख्येला कुठली बोलीभाषा बोलता येते? त्यांची मातृभाषा काय? ती प्रकल्पग्रस्त लोकसंख्या कुठली बोलीभाषा बोलतात? काय ते मराठी बोलतात, हिंदी बोलतात, इंग्रजी बोलतात किंवा इतर कुठली भाषा बोलतात? म्हणजे त्यांना कुठल्या भाषेचे ज्ञान आहे याचा अभ्यास खालील तक्त्यात केला आहे.

**सारणी क्र. ४.८**

**मातृभाषेनुसार वर्गीकरण**

| मातृभाषा (बोलीभाषा) | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| मराठी | ३७६ | १०० |
| हिंदी | ०० | ०० |
| इंग्रजी | ०० | ०० |
| इतर | ००० | ०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तक्ता क्र. ४.८ वरुन एकूण मराठी भाषा बोलणारी १०० टक्के लोकसंख्या आहे, कारण सर्व प्रकल्पग्रस्तांची मातृभाषा ही मराठी आहे. हिंदी, इंग्रजी व इतर भाषेचे प्रमाण शून्य आहे. महाराष्ट्रातील ग्रामीण भाग असल्यामुळे १०० टक्के लोकसंख्या ही मराठी बोलीभाषा व्यवहारात उपयोगात आणतात. म्हणजे १०० टक्के लोकसंख्या मराठी बोलते.

### ४.२.६ वैवाहिक स्थिती:

प्रकल्पामुळे जी लोकं प्रभावित झालीत काय ते अविवाहित होती? काय ते विवाहित होती? विधवा होती की काही घटस्फोटित होते. सामाजिक दृष्टिकोनातून या घटकांना एक स्थान आहे, म्हणून प्रकल्पग्रस्तांची वैवाहिक स्थिती खाली दर्शविली आहे.

**सारणी क्र. ४.९**


**वैवाहिक स्थिती**

| विवाह स्थिती | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| अविवाहित | २५ | ६.६५ |
| घटस्फोटित | ६ | १.६० |
| विधवा | ९ | २.३९ |
| विवाहित | ३३६ | ८९.३६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.५**

**वैवाहिक स्थिती**




वरील सारणी क्र. ४.९ वरुन वैवाहिक स्थितीमध्ये ६.६५ टक्के अविवाहित तर, १.६० टक्के घटस्फोटित लोकसंख्या आहे, तर विधवा स्त्रियां २.३९ टक्के आणि विवाहित पुरूषांचे प्रमाण ८९.३६ टक्के आहे. एकूणच प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत विवाहितांचे प्रमाण जास्त आढळून आले.

**४.२.७ अपत्यांचे वर्गीकरण**:

प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला किती अपत्य आहे? चार अपत्ये आहेत, पाच अपत्य आहेत की, दोन अपत्य आहेत की, एकच आहे? प्रकल्पग्रस्त कुटुंबातील ज्यांना कमी मुलं आहेत त्यांचा विकास झपाट्याने झालेला आहे का? त्यांना पाच किंवा पाच पेक्षा जास्त मुले आहेत अशा प्रकल्पग्रस्तांचा विकास झाला आहे काय? याचा अभ्यास खालील सारणीमध्ये केला आहे.

**सारणी क्र. ४.१०**


**अपत्यांचे वर्गीकरण**

| अपत्यांची संख्या | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| ० | १२ | ३.१९ |
| १ | ३५ | ९.३१ |
| २ | १७५ | ४६.५४ |
| ३ | ११३ | ३०.०५ |
| ४ | २८ | ७.४५ |
| ५ किंवा ५ पेक्षा जास्त | १३ | ३.४६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.६**

**अपत्यांचे वर्गीकरण**




तक्ता क्र. ४.१० मध्ये ज्यांना एकही अपत्य नाही, अशी लोकसंख्या ३.१९ टक्के आहे. ज्यांना एकच मूल आहे, अशी ९.३१ टक्के आहे, तर सर्वाधिक ज्यांना दोन अपत्य आहेत ते

४६.५४ टक्के आहेत तर तीन अपत्य असलेल्यांची ३०.०५ टक्के प्रमाण आहे. चार अपत्यांची ६.४५ टक्के व पाच किंवा पाच पेक्षा जास्त अपत्यांची ३.४६ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत.

**सारणी क्र. ४.११**

**तालुकानिहाय अपत्यांचे वर्गीकरण**

| | | ० | १ | २ | ३ | ४ | ५ किंवा ५ पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ३ | १० | ५२ | ४२ | ८ | ५ | १२० |
| | टक्केवारी | २.५० | ८.३३ | ४३.३३ | ३५.०० | ६.६७ | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | २ | ७ | ३८ | २४ | ६ | ३ | ८० |
| | टक्केवारी | २.५० | ८.७५ | ४७.५० | ३०.०० | ७.५० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | १ | ४ | २२ | ७ | ४ | २ | ४० |
| | टक्केवारी | २.५० | १०.०० | ५५.०० | १७.५० | १०.०० | ५.०० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ४ | ११ | ४६ | २९ | ८ | २ | १०० |
| | टक्केवारी | ४.०० | ११.०० | ४६.०० | २९.०० | ८.०० | २.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | २ | ३ | १७ | ११ | २ | १ | ३६ |
| | टक्केवारी | ५.५६ | ८.३३ | ४७.२२ | ३०.५६ | ५.५६ | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **१२** | **३५** | **१७५** | **११३** | **२८** | **१३** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **३.१९** | **९.३१** | **४६.५४** | **३०.०५** | **७.४५** | **३.४६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

अपत्यांच्या संख्येच्या वर्गीकरणाचा प्राथमिक सर्वेक्षणानुसार तालुकानिहाय तक्ता पाहता सारणी क्र. ४.११ मध्ये खालील वारंवारिता दिसून येते. कुही तालुक्यात २ अपत्य असलेल्या कुटुंबांची संख्या ४३.३३ टक्के आहे. ३ अपत्य असलेले ३५ टक्के, ४ अपत्य असलेले ६.६७ टक्के, पाच अपत्य असलेले ४.१७ टक्के, १ अपत्य असलेले ८.३३ टक्के तर शून्य अपत्य असलेले कुटुंब २.५० टक्के आहे.

दोन अपत्य असलेले ४७.५० टक्के कुटुंब भिवापूर तालुक्यात आहेत. त्या खालोखाल ३ अपत्य असलेले ३० टक्के, १ अपत्य असलेले ८.७५ टक्के, ४ अपत्य असलेले ७.५० टक्के, ५ अपत्य असलेले ३.७५ टक्के तर शून्य अपत्य असलेल्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण २.५० टक्के आहे. पवनी तालुक्यात अपत्यांची टक्केवारी ही सर्व तालुक्यात सर्वाधिक आहे, ती ५५ टक्के आहे. ३

अपत्ये असलेले १७.५० टक्के एक व चार अपत्ये असलेले १० टक्के, ५ अपत्ये असलेले ५ टक्के तर शून्य अपत्य असलेली कुटुंबांची लोकसंख्या ही २.५० टक्के आहे.

एकूण लोकसंख्येतील भंडारा तालुक्यांच्या अपत्यांचे वर्गीकरण करता शून्य अपत्य असलेले ४ टक्के, ५ अपत्ये असलेले २ टक्के, ४ अपत्य असलेले ८ टक्के तर १ अपत्य असलेले ११ टक्के, ३ अपत्य असलेले २९ टक्के आणि दोन अपत्य असलेले लोकसंखेचे प्रमाण एकूण टक्केवारीपेक्षा ४६ टक्के असे सर्वाधिक आहे. सावरी तालुक्यात शून्य अपत्य असलेल्या प्रकल्पग्रस्तांची एकूण आकडेवारी संपूर्ण तालुकानिहाय जास्त आहे. ती ५.५६ टक्के अशी आहे. चार अपत्य असलेली संख्याही ५.५६ टक्के च आहे. पाच अपत्य असलेले २.७८ टक्के, तीन अपत्य असलेले ३०.५६ टक्के, दोन अपत्य असलेले ४७.२२ टक्के तर एक अपत्य असलेल्या कुटुंबांची संख्या ८.३३ टक्के इतकी नोंदविली गेली आहे. एकूण सारणीची आकडेवारी पाहता दोन अपत्यांची संख्या सरासरी सर्वाधिक तर पाच अपत्यांची संख्या असलेल्या लोकसंख्येची वारंवारिता सर्वात कमी आहे.

### ४.२.८ कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण:

प्रकल्पग्रस्त कुटुंब हे कुठल्या कुटुंब पध्दतीने राहतात एकत्र की विभक्त कुटुंब पध्दतीने राहतात. त्यांचा कुठल्या कुटुंब पद्धतीत राहिल्याने आर्थिक आणि व्यावसायिक विकास होतो. हे खालील सारणीत दिलेले आहे.

**सारणी क्र. ४.१२**

**कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| कुटुंबाचा प्रकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| एकत्र | ३१६ | ८४.०४ |
| विभक्त | ६० | १५.९६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तक्ता क्र. ४.१२ मध्ये ३७६ लोकसंख्येपैकी ३१६ लोकसंख्या म्हणजेच ८४.०४ टक्के लोकसंख्या ही एकत्र कुटुंब पद्धतीत राहतात, तर १५.९६ टक्के लोकसंख्या ही विभक्त कुटुंब

पद्धतीत राहतात. म्हणजेच एकत्र कुटुंब पद्धतीत राहण्याचे प्रमाण ग्रामीण भागात अजूनही जास्त आहे.

### ४.२.९ कुटुंबातील सदस्यांचे वर्गीकरण:

प्रकल्पग्रस्त कुटुंबात किती सदस्य राहतात. म्हणजेच एकत्र कुटुंब पद्धती असेल तर निश्चितच जास्त असतील आणि विभक्त असेल तर निश्चितच एका कुटुंबात कमी व्यक्ती राहत असतात. कुटुंबात राहणाऱ्या सदस्यांचे आर्थिक निकषांच्या दृष्टिकोनातून वर्गीकरण खालील सारणीत आलेले आहे.

**सारणी क्र. ४.१३**


**कुटुंबातील सदस्यांचे वर्गीकरण**

| कुटुंबातील एकूण सदस्य संख्या | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | १० | २.६६ |
| २ | ९ | २.३९ |
| ३ | ५६ | १४.८९ |
| ४ | १४७ | ३९.१० |
| ५ | ९३ | २४.७३ |
| ६ | ४९ | १३.०३ |
| ७ | २ | ०.५३ |
| ८ किंवा ८ पेक्षा जास्त | १० | २.६६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.७**

**कुटुंबातील सदस्यांचे वर्गीकरण**




एकत्र आणि विभक्त कुटुंब पद्धतीत राहणारे सदस्यांचे वर्गीकरण वरील सारणी क्र. ४.१३ मध्ये आहे. कुटुंबात ४ व्यक्ती राहणाऱ्यांचे प्रमाण ३९.१० टक्के आहे, तर पाच व्यक्ती कुटुंबात राहणाऱ्यांचे प्रमाण २४.७३ टक्के आहे. तसेच सहा व्यक्ती राहणाऱ्यांचे १३.०३ टक्के प्रमाण आहे व ज्या कुटुंबात सात व्यक्ती राहतात त्यांचे ०.५३ टक्के प्रमाण आहे व २.६६ टक्के प्रमाण एकत्र कुटुंब पद्धतीत आठ किंवा आठ पेक्षा जास्त व्यक्ती राहणाऱ्यांचे आहे.

### ४.२.१० प्रकल्पग्रस्तांमधील स्त्री–पुरुषांचे प्रमाण:

जी लोकसंख्या धरणाने बाधित झालेली आहे, त्या लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण काय आणि पुरुषांचे प्रमाण काय? कुठल्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण जास्त आहे, म्हणजे स्त्री किंवा पुरुष या पैकी कुठल्या प्रकल्पग्रस्तांना स्त्री किंवा पुरुषाला धरणामुळे जास्त हानी झाली हे तक्ता क्र. ४.१४ मध्ये दिलेले आहे.

**सारणी क्र. ४.१४**


**स्त्री–पुरुषांचे प्रमाण**

| अ.क्र. | स्त्री–पुरुष प्रमाण | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्त्री | १८४ | ४८.९४ |
| २. | पुरुष | १९२ | ५१.०६ |
| ३. | एकूण | ३७६ | १०० |
| | स्त्री –पुरुष प्रमाण – १०००, पुरुष – ९५८.३३ स्त्रीया | | |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.८**

**स्त्री–पुरुषांचे प्रमाण**




सारणी क्रमांक ४.१४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १९२ पुरुष तर १८४ स्त्रिया आहेत. म्हणजेच प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण ५१.०६ टक्के, तर स्त्रियांचे प्रमाण ४८.९४ टक्के आहे. प्रकल्पग्रस्तांमध्ये स्त्री–पुरुष प्रमाणात, १००० पुरुषामागे ९५८.३३ स्त्रिया आहेत, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.

**४.३ प्रकल्पग्रस्तांचा आर्थिक अभ्यास:** भूपृष्टावरील घटकात मानवीय क्रिया–कौशल्यामुळे काही सांस्कृतिक बदल घडून येतात व या बदलांचा परिणाम तेथे असलेल्या मानवाच्या

आर्थिक विकासावर होतो, परंतु कधी–कधी मानवी क्रियांचा परिणाम मानव नैसर्गिक संसाधनाच्या विकासावर होत नसून त्याचा उलट परिणाम दिसून येतो. मानव स्वतःच्या विकासाकरिता पर्यावरणावर काही प्रमाणात विजय मिळवून आपला विकास करण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु या प्रयत्नात कधी–कधी मानवाचा विकास होत नसून त्याची प्रगतीच खुंटते. कोणत्याही धरणाचे बांधकाम हे मानवाच्या प्रयत्नांचा अविष्कार आहे व त्या अविष्कारामुळे देशाचा विकास तर हातो परंतु प्रकल्पामुळे विस्थापितांना त्याची किमंत मोजावी लागते. विस्थापितांचे पुनर्वसन हा प्रकार नगण्य ठरत आहे. विकासाचे लाभार्थी होण्याऐवजी हे बाधित विकासाचे बळीच ठरतात. एका धरणामुळे समाजाचा विकास होतांना हाजारो कुटुंबाचे विस्थापनही होत असते. अशा आर्थिक प्रकारच्या परिणामांचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये केला आहे.

जलसिंचन प्रकल्प देशातल्या विकासाला मोलाचे योगदान देतो. प्रकल्पामुळे देशाचा विकास होऊन मानवाचाही विकास होतो. जलसिंचन प्रकल्पामुळे प्रकल्पा सभोवतालच्या शेतजमीनीतील उत्पादनात वाढ होऊन प्रकल्पा सभोवतालच्या भागात रोजगार निर्माण होतो. या जलसिंचन प्रकल्पामुळे मूळची लोकसंख्या विस्थापित होते. विस्थापितांच्या आर्थिक व सामाजिक तोट्याकडे फारसे कुणीही लक्ष देत नाही आणि त्याचा परिणाम प्रकल्पग्रस्थांच्या आर्थिक जीवनावर मोठ्या प्रमाणात दिसतो. विस्थापितांच्या पुनर्वसनाकडे लक्ष न देता प्रकल्पाच्या बांधकामावर व प्रकल्पापासून मिळणाऱ्या लाभावर समाजाचे व सरकारचे लक्ष जास्त असते.

### ४.३.१ प्रकल्पामध्ये जमीन गेलेल्या प्रकल्पग्रस्तांची स्थिती:

गोसीखुर्द प्रकल्पमध्ये किती लोकांची जमीन गेली? किती लोकांची शेतजमीन गेली? जमीन त्यांची स्वतःची होती का? किंवा भाडेतत्वावर करीत होते शेतकऱ्यांना त्यांची शेतजमीन अत्यंत महत्त्वाची असते, कारण उत्पन्नाचा एक प्रमुख स्त्रोत म्हणून ते शेतजमिनीकडे बघतात. हे खालील तक्त्यात दिलेले आहे.

**सारणी क्र. ४.१५**

**प्रकल्पामध्ये जमीन गेलेल्या प्रकल्पग्रस्तांची स्थिती**

| गोसीखुर्द प्रकल्पामध्ये आपली जमीन गेली आहे काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | २९ | ७.७१ |
| होय | ३४७ | ९२.२९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तक्ता क्रमांक ४.१५ मध्ये एकूण ३७६ लोकसंख्येपैकी ३४७ लोकसंख्येची म्हणजेच ९२.२९ टक्के लोकसंख्येची जमीन प्रकल्पात गेलेली आहे, तर ७.७१ टक्के भूमिहीन लोकसंख्या आहे.

### ४.३.२ प्रकल्पाने बाधित शेतीचे वर्गीकरण:

प्रकल्पामध्ये किती शेती बाधित झाली हे बघण्याचा प्रयत्न केला आहे. शेती हे रोजगार, व्यवसाय आणि उत्पन्नाचे एकमेव साधन आहे, कारण ग्रामीण भागातील लोकसंख्या ही पूर्णपणे शेतीवर अवलंबून असते. शेतीशिवाय इतर रोजगार त्यांना सहसा उपलब्ध होत नाही. शेती ही ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचे महत्त्वाचे निकष आहे.

**सारणी क्र. ४.१६**


**प्रकल्पाने बाधित शेतीचे वर्गीकरण**

| किती जमीन धरणग्रस्त आहे (एकरमध्ये) | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| भूमिहीन | २९ | ७.७१ |
| ००-२.५ | १२४ | ३२.९८ |
| २.५-५ | १५६ | ४१.४८ |
| ५-१० | ५७ | १५.१६ |
| १०-२५ | ०९ | २.३९ |
| २५ पेक्षा जास्त | ०१ | ०.२६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.९**

**प्रकल्पाने बाधित शेतीचे वर्गीकरण**




प्रकल्पाने बाधित शेतीचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.१६ मध्ये, एकूण शेतजमिनीपैकी ०-२.५ एकर किंवा १ हेक्टर शेतजमिन प्रकल्पात गेलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ३२.९८ टक्के

आहे, तर ४१.४८ टक्के प्रमाण २.५–५ एकर जमीन प्रकल्पात गेलेल्या प्रकल्पग्रस्तांचे आहे, १५६ प्रकल्पग्रस्त लोकसंख्या या गटात आहे. ५–१० एकर दरम्यान ५७ लोकांची जमीन प्रभावित आहे, ते १५.१६ टक्के, तर १०–२५ एकर गटात २.३९ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत आणि अत्यंत मोठे शेतकरी म्हणजेच २५ एकर पेक्षा जास्त जमीन प्रकल्पाने बाधित शेतकरी फक्त १ आहे, म्हणजेच ०.२६ टक्के प्रमाण आहे. १–२ हेक्टर शेतजमीन प्रकल्पात बाधित झालेल्या ४१.४८ टक्के शेतकऱ्यांचे प्रमाण हे सर्वात जास्त, तर ७.७१ टक्के लोकसंख्येला शेतजमिन नाही ते प्रकल्पग्रस्त भूमिहीन आहेत.

### **४.३.३ बाधित जमिनीच्या प्रकाराचे वर्गीकरण**:

प्रकल्पामध्ये जमीन महत्त्वाची असते. प्रकल्पामध्ये कोणत्या प्रकरची जमीन गेलीत? काय ती जमीन कोरडवाहू होती? ती सिंचित होती? की पिकाखाली होती? की त्या जमिनीवर कुठल्याही प्रकारचे उत्पादन होत नव्हते. म्हणजे ती पडीक होती कारण विकासाच्या आर्थिक निकषांमध्ये शेतीच्या प्रकारला अनन्यसाधारण महत्त्व आहे. खालील सारणीमध्ये प्रकल्पाने बाधित जमिनीच्या प्रकाराचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे.

**सारणी क्र. ४.१७**


**बाधित जमिनीच्या प्रकाराचे वर्गीकरण**

| जमिनीचा प्रकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| भूमिहीन | २९ | ७.७१ |
| कोरडवाहू | ५३ | १४.१० |
| पडीक | ११ | २.९३ |
| सिंचित | ६९ | १८.३५ |
| पिकाखाली | २१४ | ५६.९१ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१०**

**बाधित जमिनीच्या प्रकाराचे वर्गीकरण**




वरील सारणी क्र. ४.१७ वरुन एकूण प्रकल्पाने बाधित जमिनीपैकी ७.७१ टक्के लोकसंख्येला कुठल्याच प्रकारची जमीन नाही, म्हणजेच ते प्रकल्पग्रस्त भूमिहीन आहेत. कोरडवाहू जमिनीचे प्रमाण १४.१० टक्के आहे. पडीक जमीन २.९३ टक्के आहे. सिंचित जमीन १८.३५ टक्के तर ५६.९१ टक्के पिकाखालील जमीनीचा वाटा आहे. सर्वाधिक कमी वाटा पडीक जमिनीचा आहे म्हणजेच प्रकल्पात एकून पिकाखालील जमीन जास्त प्रमाणात गेली आहे, त्याचा परिणाम प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नावर झाला व त्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत झाली.

**सारणी क्र. ४.१८**

**तालुकानिहाय बाधित जमिनीच्या प्रकाराचे वर्गीकरण**

| | | भुमिहीन | कोरडवाहू | पडीक | सिंचित | पिकाखालील | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | १० | १८ | ३ | १५ | ७२ | ७२ | १२० |
| | टक्केवारी | ८.३३ | १५.०० | २.५० | १२.५० | ६०.०० | १२.५० | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ३ | १४ | ३ | १८ | ४४ | ४४ | ८० |
| | टक्केवारी | ३.७५ | १७.५० | ३.७५ | २२.५० | ५५.०० | २२.५० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २ | ५ | १ | ७ | २५ | २५ | ४० |
| | टक्केवारी | ५.०० | १२.५० | २.५० | १७.५० | ६२.५० | ६२.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ६ | १५ | ४ | २१ | ५४ | ५४ | १०० |
| | टक्केवारी | ६.०० | १५.०० | ४.०० | २१.०० | ५४.०० | ५४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ८ | १ | ० | ८ | १९ | १९ | ३६ |
| | टक्केवारी | २२.२२ | २.७८ | ०.०० | २२.२२ | ५२.७८ | २२.२२ | १००.०० |
| **एकूण** | | **२९** | **५३** | **११** | **६९** | **२१४** | **२१४** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **७.७१** | **१४.१०** | **२.९३** | **१८.३५** | **५६.९१** | **५६.९१** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तालुकानिहाय प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या प्राथमिक सर्वेक्षणाचे वर्गीकरण करता सारणी क्र. ४.१८ नुसार लक्षात येते की, बागायती, पडीक तसेच पर्जन्यमानावर अवलंबून असलेल्या जमिनीच्या प्रतवारीनुसार बाधितांची संख्या कमी जास्त आहे. पिकाखालील टक्केवारी कुही तालुक्यातील सर्वाधिक ६० टक्के आहे. सिंचित क्षेत्र १२.५० टक्के आहे. पडीक जमिन २.५० टक्के आहे तर भूमिहीन ८.३३ टक्के आणि पावसावर अवलंबून असलेले क्षेत्र एकूण क्षेत्रापैकी केवळ १५ टक्के आहे. म्हणजेच एकूण जमिनी ओलीताखालील आहेत असे दिसून येते.

एकूण ५५ टक्के क्षेत्र हे भिवापूर तालुक्यातील पिकाखालील बाधित झाले आहे. सिंचित क्षेत्र २२.५० टक्के कोरडवाहू १७.५० टक्के तर भूमिहीन व पडीक क्षेत्राची टक्केवारी ३.७५ टक्के आहे. एकूण तालुक्यापैकी पवनी तालुक्यात पिकाखालील जमिनींचे प्रमाण ६२.५० टक्के अशे

सर्वाधिक आहे. सिंचित १७.५० टक्के कोरडवाहू १२.५० टक्के, भूमिहीन ५ टक्के तर पडीक जमिनीचे क्षेत्र २.५० टक्के आहे. भंडारा तालुक्यातही ५४ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीची प्रतवारी पिकाखालील जमिनीची आहे. त्यापाठोपाठ २१ टक्के सिंचित, कोरडवाहू क्षेत्र १५ टक्के तर भूमिहीन ६ टक्के आणि पडीक ४ टक्के अशी जमिनीची विभागणी आहे. सावरी तालुक्यात शून्य टक्के पडीक जमिनी प्रकल्पग्रस्त भागात आलेली आहे. म्हणजेच अधिक क्षेत्र हे ओलीताखालील आहे. त्यामध्ये सिंचित २२.२२ टक्के, पिकाखालील ५२.७८ टक्के, भूमिहीनांचे २२.२२ टक्के आणि कोरडवाहू क्षेत्र सर्व तालुक्यात कमी असे अल्प प्रमाणात म्हणजेच २.७८ टक्के इतकेच आहे. एकूणच टक्केवारीचा विचार करता प्रकल्पग्रस्तांच्या जवळजवळ ५३ टक्के जमिनी ह्या पिकाखालील आहेत.

**४.३.४ शेतजमीनीच्या किंमतीची तुलनात्मक स्थिती:** जेव्हा प्रकल्पाची निर्मिती होते तेव्हा शासनाला मोठ्या प्रमाणात जमीन हस्तगत करावी लागते. त्या जमिनीची काय किंमत आहे हे शासनाच्या दृष्टिकोनातून बघणे अत्यंत महत्त्वाचे आणि प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टिकोनातून त्या शेतजमिनीची बाजारभावानुसार काय किंमत आहे हे महत्त्वाचे असते. कारण त्या जमिनीपासून त्या शेतकऱ्याला रोजगार उपलब्ध होत असतो. प्रकल्पाची निर्मिती झाल्याने त्या शेतजमिनीला त्या प्रकल्पग्रस्त व्यक्तीला सोडावे लागते. त्या सोडलेल्या जमिनीचा शासनाने किती मोबदला दिलेला आहे आणि त्या शेतजमिनीची बाजारभावानुसार किती किंमत आहे याचा अभ्यास खालील सारणीत करण्यात आलेला आहे.

## सारणी क्र. ४.१९


## शेतजमीनीच्या किंमतीची तुलनात्मक स्थिती

| जमिनीची किंमत (रु. लाखात) | बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत | | शासनाने प्रति एकर जमिनीचा दिलेला मोबदला | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| भुमिहीन | २९ | ७.७१ | २९ | ७.७१ | ० | ०.०० |
| ०–५० हजार | ३१ | ८.२४ | १०७ | २८.४६ | ७६ | २०.२२ |
| ५० हजार –१ लाख | ५१ | १३.५७ | २०६ | ५४.७९ | १५५ | ४१२२ |
| १–२ लाख | २४२ | ६४.३६ | ३४ | ९.०४ | –२०८ | –५५.३२ |
| २–३ लाख | २३ | ६.१२ | ०० | ०० | –६.१२ | –६.१२ |
| ३–५ लाख | ०० | ०० | ०० | ०० | ० | ०.०० |
| ५ लाखापेक्षा जास्त | ०० | ०० | ०० | ०० | ० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** | **३७६** | **१००** | **०** | **०.००** |

(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

**आकृती क्र. ४.११**

**शेतजमीनीच्या किंमतीची तुलनात्मक स्थिती**




सारणी क्र. ४.१९ मध्ये बाजारभावानुसार प्रति एकर शेतजमिनीचा भाव व शासनाने मोबदला म्हणून दिलेला भाव यातील फरक वरील तक्त्यात दिला आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांना जमीन नाही असे भूमिहीनांचे प्रमाण ७.७१ टक्के आहे. शासनाचे या ७.७१ टक्के भूमिहीन प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला मोबदला दिलेला नाही, म्हणजेच हे प्रमाण शून्य आहे. बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत असलेले ०-५० हजार या गटातील ८.२४ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत, त्याच गटातील जमिनीचा शासनाने प्रति एकर दिलेला मोबदला २८.४६ टक्के प्रकल्पग्रस्तांना मिळाला आहे. शासनाने दिलेला मोबदला प्रति एकर टक्केवारीत २०.२२ टक्के वाढ दर्शविली आहे. बाजारभावानुसार १३.५७ टक्के प्रकल्पग्रस्तांची जमिन ५० हजार -१ लाख या गटातील आहे. परंतू शासनाने या गटात दिलेला मोबदला ५४.७९ टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला मिळाला. टक्केवारीतील बदल किंवा वाढ ही ४१.२२ टक्के इतकी आहे. १-२ लाख रुपये बाजारभावानुसार किंमत असलेली जमिन ६४.३६ टक्के लोकसंख्येची होती. शासनाने

९.०४ टक्के प्रकल्पग्रस्तांना १-२ लाख रुपये या गटात मोबदला दिला, यामध्ये ५५.३२ टक्के हा दोहोंमधील बदल किंवा घट दर्शविते. २-३ लाख किंमत गटातील जमीन ६.१२ टक्के प्रकल्पग्रस्तांची बाजारभवावानुसार ठरलेली आहे. त्यापैकी शासनाने शून्य टक्के लोकांना मोबदला दिलेला आहे. म्हणजेच ६.१२ टक्के प्रकल्पग्रस्तांना बाजारभावानुसार किंमत अदा केली नाही. ३-५ लाख आणि ५ लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या जमिनीचे प्रमाण शून्य आहे.

**सारणी क्र. ४.२०**

**तालुकानिहाय बाजारभावानुसार जमिनीच्या किंमतीचे वर्गीकरण**

| | | भुमिहीन | ०-५० हजार | ५० हजार - १ लाख | १-२ लाख | २-३ लाख | ३-५ लाख | ५ लाखापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ९ | १० | १७ | ७६ | ८ | ० | ० | १२० |
| | टक्केवारी | ७.५० | ८.३३ | १४.१७ | ६३.३३ | ६.६७ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ५ | ७ | १२ | ५१ | ५ | ० | ० | ८० |
| | टक्केवारी | ६.२५ | ८.७५ | १५.०० | ६३.७५ | ६.२५ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | ४ | ३ | ५ | २६ | २ | ० | ० | ४० |
| | टक्केवारी | १०.०० | ७.५० | १२.५० | ६५.०० | ५.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ८ | ८ | १४ | ६३ | ७ | ० | ० | १०० |
| | टक्केवारी | ८.०० | ८.०० | १४.०० | ६३.०० | ७.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ३ | ३ | ३ | २६ | १ | ० | ० | ३६ |
| | टक्केवारी | ८.३३ | ८.३३ | ८.३३ | ७२.२२ | २.७८ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| एकूण | | **२९** | **३१** | **५१** | **२४२** | **२३** | **०** | **०** | **३७६** |
| एकूण टक्केवारी | | **७.७१** | **८.२४** | **१३.५६** | **६४.३६** | **६.१२** | **०.००** | **०.००** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे वरील तक्त्यानुसार प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मूल्यांचे बाजारभावानुसार मूल्यांकन केल्यास वरील सारणी क्र. ४.२० मध्ये एकूण पाच बाधित तालुक्यांचा तुलनात्मक अभ्यास पाहता एकूण जमिनीचे मूल्य हे ५ लाखापेक्षा जास्त या गटामध्ये शून्य आहे. कुही तालुक्यात १-२ लाख या गटातील मूल्य असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण ६३.३३ टक्के आहे. ५० हजार -१ लाखात १४.१७ टक्के, २-३ लाख गटात ६.६७

टक्के, तर ०–५० हजार या गटातील जमिन असलेल्या लोकांची टक्केवारी ८.३३ टक्के इतकी आहे.

भिवापूर तालुक्यात भूमिहीनांची टक्केवारी ६.२५ टक्के इतकी आहे. ०–५० हजार गटात ८.७५ टक्के, ५० हजार –१ लाखात १५ टक्के, तर १–२ लाखात ६३.७५ टक्के लोकसंख्या आहे. २–३ लाख या गटात ६.२५ टक्के तर ३–५ लाखापेक्षा जास्त गटात शून्य लोकसंख्या आहे. पवनी तालुक्यात भूमिहीन लोकसंख्येचे प्रमाण १० टक्के, क्षेत्र ५ लाखपेक्षा जास्त किंमतीचे असलेली ० टक्के, ०–५० हजार गटात ७.५० टक्के, ५० हजार–१ लाखात १२.५० टक्के तर, ६५ टक्के प्रमाण १–२ लाख या गटातील लोकसंख्येचे आहे. ३–५ लाख या गटातील जमिन असलेले प्रकल्पग्रस्त ५ टक्के आहेत.

भूमिहीन व ०–५० हजार मूल्य असलेल्या गटातील लोकसंख्या अनुक्रमे ८ टक्के प्रमाण भंडारा तालुक्यात आहे. ५० हजार–१ लाख या दरम्यान १४ टक्के, १–२ लाखात किंमत असलेले लोक ६३ टक्के इतके, २–३ लाख यामध्ये ७ टक्के लोकसंख्या एकूण टक्केवारीच्या प्रमाणात आहे. त्यापेक्षा मोठ्या म्हणजेच ५ लाखापेक्षा जास्त किंमतीचे जमीन असलेले प्रकल्पग्रस्त शून्य टक्के आहेत.

सावरी तालुक्यात एकूण तालुकानिहाय गटांची तुलना करता १–२ लाख या गटातील जमिनीची किंमत असलेल्या लोकसंख्येची टक्केवारी ७२.२२ टक्के अशी सर्वाधिक आहे. भूमिहीन व ०–५० हजार या गटातील लोकसंख्या प्रत्येकी ८.३३ टक्के, तर ५० हजार–१ लाखामध्ये देखील ८.३३ टक्के लोकसंख्या आहे. २–३ लाख या गटात २.७८ टक्के तसेच ५ लाखापेक्षा जास्त गटाची लोकसंख्या शून्य आहे. एकूण सारणींचा विचार करता ६४.३६ टक्के एकट्या १–२ लाख या गटातील लोकसंख्येची आहे.

## सारणी क्र. ४.२१

## तालुकानिहाय जमिनीचा शासनाने दिलेल्या मोबदल्याचे वर्गीकरण

| | | भुमिहीन | ०–५० हजार | ५० हजार – १ लाख | १–२ लाख | २–३ लाख | ३–५ लाख | ५ लाखापेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ९ | ३४ | ६६ | ११ | ० | ० | ० | १२० |
| | टक्केवारी | ७.५० | २८.३३ | ५५.०० | ९.१७ | ०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ५ | २४ | ४४ | ७ | ० | ० | ० | ८० |
| | टक्केवारी | ६.२५ | ३०.०० | ५५.०० | ८.७५ | ०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | ४ | १२ | २० | ४ | ० | ० | ० | ४० |
| | टक्केवारी | १०.०० | ३०.०० | ५०.०० | १०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ८ | २८ | ५५ | ९ | ० | ० | ० | १०० |
| | टक्केवारी | ८.०० | २८.०० | ५५.०० | ९.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ३ | ९ | २१ | ३ | ० | ० | ० | ३६ |
| | टक्केवारी | ८.३३ | २५.०० | ५८.३३ | ८.३३ | ०.०० | ०.०० | ०.०० | १००.०० |
| **एकूण** | | **२९** | **१०७** | **२०६** | **३४** | **०** | **०** | **०** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **७.७१** | **२८.४६** | **५४.७९** | **९.०४** | **०.००** | **०.००** | **०.००** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

शासनाने प्रतिएकरी दिलेल्या मोबदल्याचे रुपयातील मूल्यमापन करताना सरासरी प्रमाण वरील तक्ता. क्र. ४.२१ वरुन दिसते. विविध मूल्य गटातील एकूण जमिनीचे वर्गीकरणात ५० हजार ते ५ लाखापर्यंतच निर्धारित केलेले दिसते. पाच लाखापेक्षा जास्त मोबदला कुणाही प्रकल्पग्रस्ताला मिळाला नसल्याचे दिसून येते. तालुकानिहाय प्राथमिक सर्वेक्षणाच्या माहितीवर आधारित आकडेवारी व वारंवारिता पाहता कुही तालुक्यात जमिन नसलेले भूमिहीन हे ७.५० टक्के, ५० हजारापर्यंत २८.३३ टक्के, ५० हजार ते १ लाख ५५ टक्के, १–२ लाखात ९.१७ टक्के तर २–३ लाख व ५ लाखापेक्षा जास्त उत्पन्न गटात शून्य टक्के प्रमाण आहे. भिवापूर तालुक्यात जमिन नसलेल्या भाडेकरुंच ६.२५ टक्के प्रमाण आहे. ०–५० हजार रु. गटात ३० टक्के, ५० हजार ते १ लाख या गटात ५५ टक्के, १–२ लाख ८.७५ टक्के,

तर २–३ लाख आणि ३–५ लाख व ५ लाखापेक्षा जास्त या गटात लोकांना शून्य टक्के मोबदला मिळाला आहे.

पवनी तालुक्यात भुमिहीन ७.५० टक्के, १–२ लाख या गटाला १० टक्के, तर ०–५० हजार ३० टक्के आणि ५० हजार –१ लाख गटाला ५० टक्के मोबदला मिळाला. त्यापेक्षा जास्त २–३ लाख, ३–५ लाख आणि ५ लाखापेक्षा जास्त मूल्यलाभ ० टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला मिळाला आहे. भंडारा तालुकानिहाय एकूण मोबदल्याच्या टक्केवारीचे प्रमाण ५५ टक्के हे ५० हजार ते १ लाख या गटाचे आहे. ०–५० हजारापर्यंत २८ टक्के, भुमिहीनांचे ८ टक्के, तर १–२ लाख या वर्गात ९ टक्के प्रमाण आहे. ३ ते ५ लाख आणि त्यापेक्षा जास्त गटाचे प्रमाण ० टक्के आहे.

सावरी यातालुक्यात जमिन नसलेले भूमिहीनांचे प्रमाण ८.३३ टक्के आहे. १–२ लाख या गटात ८.३३ टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला मोबदला मिळाला आहे. ५० हजार ते १ लाख या गटाला ५८.३३ टक्के, ०–५० हजार २५ टक्के, २ लाखापेक्षा जास्त मोबदला शून्य टक्के लोकांना मिळाला आहे.

### ४.३.५ मोबदल्याचे इतर स्वरुपात वर्गीकरण:

प्रकल्पग्रस्तांना कुठल्या स्वरुपात मोबदला मिळालेला आहे. मोबदला मिळाला की नाही हे प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. मोबदला विशेषत: आर्थिक मोबदला फारच महत्त्वाचा आहे, कारण त्यांची शेतजमिन प्रकल्पात गेली आहे आणि त्यांना अपेक्षा आहे की, योग्य मोबदला मिळावा.

**सारणी क्र. ४.२२**

**मोबदल्याचे इतर स्वरूपात वर्गीकरण**

| मोबदला इतर स्वरूपात दिला काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | ३७५ | ९९.७३ |
| होय | ०१ | ०.२७ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तक्ता क्र. ४.२२ वरुन शासनाने जो मोबदला दिलेला आहे तो कोणत्या स्वरूपात आहे व दिलेला आहे की नाही हे विचारणा प्रकल्पग्रस्तांना करण्यात आली, त्यामध्ये ९९.७३ टक्के लोकसंख्येने स्पष्टपणे नाही असे उत्तर दिले, तर ०.२७ टक्के लोकसंख्येने होय हे उत्तर दिले म्हणजेच आर्थिक स्वरूप सोडून इतर स्वरूपात मोबदले दिलेले आहेत.

**४.३.६ मोबदला मिळणाऱ्या स्वरुपाचे वर्गीकरण**:

एखादी शेतजमिन प्रकल्पाने बाधित होते तेव्हा, त्या जमिनीचा शासनाकडून मोबदला दिला जातो. मोबदला कुठल्या स्वरुपाचा आहे काय प्रकल्पग्रस्तांना नोकरी मिळाली, भांडवल मिळाले की फक्त आर्थिक मोबदला मिळाला हे अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून आणि त्या प्रकल्पबाधित व्यक्तीच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. खालील सारणी क्रमांक ४.२३ मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या मोबदला कोणत्या स्वरुपात मिळाला त्याचा अभ्यास केला आहे.

**सारणी क्र. ४.२३**


**मोबदला मिळनाऱ्या स्वरुपाचे वर्गीकरण**

| मोबदल्याचे स्वरूप | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नोकरी | ०१ | ०.२७ |
| शेती | ०० | ०.०० |
| भांडवल | ०० | ०.०० |
| इतर साधणे | ०० | ०.०० |
| नाही | ३७५ | ९९.७३ |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१२**

**मोबदला मिळनाऱ्या स्वरुपाचे वर्गीकरण**




सारणी क्रमांक ४.२३ मध्ये एकूण प्रकल्पात गेलेल्या जमिनीचा शासनाने पैशाचे स्वरूप सोडून इतर स्वरूपात मोबदला दिलेला आहे, त्यामध्ये ०.२७ टक्के लोकांना पाटबंधारे विभागात पहारेकरी पदांवर नौकरी दिलेली आहे, तर ९९.७३ टक्के लोकसंख्येला इतर स्वरूपात मोबदला दिलेला नाही. म्हणजेच त्यांना आर्थिक स्वरूपात किंवा शेती, भांडवल व इतर कोणत्याही स्वरूपात मोबदला दिलेला नाही.

**४.३.७ बाधित जमिनीच्या अधिकारांचे वर्गीकरण:**

प्रकल्पाची निर्मिती झाल्यानंतर त्या शेतजमिनीवर कोणाचा अधिकार आहे या बुडीत क्षेत्रामध्ये जी शेतजमिन आहे त्या जमिनीवर शासनाचा अधिकार आहे की प्रकल्पग्रस्तांचा अधिकार आहे हे प्रस्तुत सारणी क्र. ३.२४ मध्ये याचा अभ्यास केलेला आहे.

**सारणी क्र. ४.२४**


**बाधित जमिनीच्या अधिकारांचे वर्गीकरण**

| प्रकल्पात गेलेल्या जमिनीवर सध्या कोणाचा अधिकार आहे? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| शासनाचा | ३४७ | ९२.२९ |
| प्रकल्पग्रस्तांचा | २९ | ७.७१ |
| कुणाचाही नाही | ०० | ०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१३**

**बाधित जमिनीच्या अधिकारांचे वर्गीकरण**




सारणी क्रमांक ४.२४ मध्ये एकूण प्रकल्पात गेलेल्या जमिनीपैकी किंवा शेतीपैकी ९२.२९ टक्के जमिनीवर शासनाचा अधिकार आहे. ७.७१ टक्के शेतजमिनीवर प्रकल्पग्रस्तांचा अधिकार आहे म्हणजेच त्यांनी अजूनही आपल्या शेतीवरचा अधिकार सोडलेला नाही, तर

कुणालाही अधिकार नाही अशा शेतजमिनीचा वाटा हा शून्य टक्के आहे. म्हणजेच प्रकल्पग्रस्त अजुनही ७.७१ टक्के त्या शेतीवर शेती करीत आहेत.

### ३.३.८ स्वत:च्या मालकीच्या घरांची स्थिती:

प्रकल्पग्रस्तांचे जे राहते घर होते, ते प्रकल्पाने प्रभावित झाले काय? त्यांच्या जीवनावर काय परिणाम झाला आहे? ते घर त्यांचे स्वत:चे होते किंवा ते भाडेतत्वावर राहत होते. आर्थिक दृष्टिकोनातून एखाद्या व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा त्यांच्या घरावरुन निश्चित होत असतो.

**सारणी क्र. ४.२५**

**स्वत:च्या मालकीच्या घरांची स्थिती**

| स्वत:च्या मालकीचे घर आहे काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३६४ | ९६.८१ |
| नाही | १२ | ३.१९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

तक्ता क्रमांक ४.२५ मध्ये स्वत:च्या मालकीची घरे ९६.८१ टक्के लोकसंख्येकडे आहेत, तर उर्वरित ३.१९ टक्के लोकसंख्येकडे स्वत:चे घर नाही ते भाड्याने राहतात असे आढळले. म्हणजेच ३.१९ टक्के प्रकल्पग्रस्त भाडेकरू आहेत. एकंदरीत स्वत:च्या मालकीचे घरांचे प्रमाण प्रकल्पग्रस्तांमध्ये जास्त आहे.

### ४.३.९ प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्थानाचे वर्गीकरण:

प्रकल्पाची निर्मिती होते तेव्हा राहते घर सुध्दा नष्ट केल्या जाते. प्रकल्पामुळे बाधित होते, काय ते घर गावठाणात आहे? किंवा त्या गावठाणाच्या बाहेर आहे, कारण शासन जेव्हा प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला घरांचा मोबदला देतो त्यावेळेस ते घर गावठाणात आहे की गावठाणाबाहेर आहे हे कटाक्षाने बघितले जाते.

**सारणी क्र. ४.२६**


**प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्थानाचे वर्गीकरण**

| घराचे स्थान कुठे आहे? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| गावठाण | २९७ | ७८.९९ |
| गावठाणाबाहेर | ६७ | १७.८२ |
| घर नसलेले (भाडेकरु) | १२ | ३.१९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१४**

**प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्थानाची स्थिती**




प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या घरांचे स्थान गावठानात किंवा गावठाणाबाहेर आहे हे सारणी क्रमांक ४.२६ मध्ये बघितले असता ७८.९९ टक्के लोकसंख्या ही गावठाणात राहात होती. तर १७.८२ टक्के लोकसंख्या ही गावठाणाबाहेर राहात होती. ३.१९ टक्के लोकसंख्या ही घर नसलेली आहे. म्हणजेच ३.१९ टक्के लोकसंख्या ही भाड्याच्या घरात राहतात.

**४.३.१० शासनाने घरांचा दिलेला मोबदल्याची स्थिती**: शासनाने घरांचा मोबदला दिलेला आहे की नाही हे बघणे महत्त्वाचे आहे. कारण घर गेले तर मोबदला मिळायला हवा. त्याशिवाय प्रकल्पग्रस्तांना पर्याय शिल्लक राहत नाही. अन्न, वस्त्र, निवारा त्यामधील निवारा महत्त्वाचे साधन आहे आणि जीवन जगण्याकरिता आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून सुध्दा अत्यंत महत्त्वाचे आहे.

**सारणी क्र. ४.२७**

**शासनाने घरांचा दिलेला मोबदल्याची स्थिती**

| **शासनाने घराचा मोबदला दिला काय?** | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|
| होय | २९७ | ७८.९९ |
| नाही | ६७ | १७.८२ |
| घर नसलेले (भाडेकरू) | १२ | ३.१९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्रमांक ४.२७ वरुन शासनाने ७८.९९ टक्के लोकसंख्येला घरांचा मोबदला दिलेला आहे, तर १७.८२ टक्के लोकसंख्येला घरांचा मोबदला दिलेला नाही, कारण ही १७.८२ टक्के घरे गावठाणाच्या बाहेर होती तर भाडेकरू लोकांना घरांचा एकही मोबदला देण्यात आलेला नाही. परंतु गावठाणाबाहेर राहणाऱ्या घरातील लोकसंख्येने आंदोलनास सुरूवात केलेली आहे व काही प्रमाणात लोकांना मोबदला मिळाला आहे.

**४.३.११ प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्वरुपाचे वर्गीकरण:**

प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे स्वरुप कसे आहे? घर सिमेंटचे, कौलारू, मातीची की गवताची आहे, यावरुन त्या व्यक्तीच्यां राहणीमानाचा दर्जा निश्चित होत असतो. घर जितके मोठे तितका तो व्यक्ति ग्रामीण भागांमध्ये श्रीमंत समजला जातो. घर हे आर्थिक विकासाचे एक निकष आहे. खालील सारणी क्र. ३.२८ मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्वरुपाचे वर्गीकरण दर्शविले आहे.

**सारणी क्र. ४.२८**


**प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्वरूपांचे वर्गीकरण**

| घराचे स्वरूप कसे होते? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| गवताची | २४ | ६.३८ |
| मातीचे | ९९ | २६.३३ |
| कौलारू | १६७ | ४४.४१ |
| सिमेंटचे | ३२ | ८.५१ |
| पत्र्याचे (टिन) | ४२ | ११.१७ |
| घर नसलेले (भाडेकरू) | १२ | ३.१९ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१५**

**प्रकल्पग्रस्तांच्या घरांच्या स्वरूपांचे वर्गीकरण**




सारणी क्रमांक ४.२८ मध्ये एकूण प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत ६.३८ टक्के लोकसंख्येची घरे ही गवताची आहेत. २६.३३ टक्के मातीची घरे आहेत. ४४.४१ टक्के कौलारू, तर ८.५१ टक्के वाटा हा सिमेंटच्या घरांचा आहे. ११.१७ टक्के वाटा हा पत्र्याचा किंवा टिनांच्या घरांचा

आहे, व ३.१९ टक्के घरात भाडेकरू राहतात, त्यामुळे या घरांचा मोबदला त्या घरांच्या घरमालकांना मिळाला आहे.

## सारणी क्र. ४.२९

## तालुकानिहाय घरांच्या स्वरूपाचे वर्गीकरण

| | | गवताचे | मातीचे | कवलांचे | सिमेंटचे | पत्र्याचे | घर नसलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ८ | ३३ | ५१ | ११ | १३ | ४ | १२० |
| | टक्केवारी | ६.६७ | २७.५० | ४२.५० | ९.१७ | १०.८३ | ३.३३ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ४ | २१ | ३८ | ६ | ८ | ३ | ८० |
| | टक्केवारी | ५.०० | २६.२५ | ४७.५० | ७.५० | १०.०० | ५.०० | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २ | ९ | २१ | २ | ५ | १ | ४० |
| | टक्केवारी | ५.०० | २२.५० | ५२.५० | ५.०० | १२.५० | २.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ८ | २५ | ४४ | ७ | १३ | ३ | १०० |
| | टक्केवारी | ८.०० | २५.०० | ४४.०० | ७.०० | १३.०० | ३.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | २ | ११ | १३ | ६ | ३ | १ | ३६ |
| | टक्केवारी | ५.५६ | ३०.५६ | ३६.११ | १६.६७ | ८.३३ | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **२४** | **९९** | **१६७** | **३२** | **४२** | **१२** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **६.२८** | **२६.३३** | **४४.४१** | **८.५१** | **११.१७** | **३.१९** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

वरील ४.२९ तक्त्यावरुन लोकसंख्येच्या तालुकनिहाय घरांच्या स्वरुपाचे वर्गीकरण करताना घरांची बांधणी गवत, माती, कौलारू, सिमेंट किंवा पत्र्याचे कशा स्वरुपाचे होते त्यानुसार मोबदला दिला जात आहे. एकूण प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत तालुकानिहाय वर्गीकरण करताना वरील विविध संसाधनांचा वापर केल्याचे दिसून येते. कुही तालुक्यात गवताची घरे ६.६७ टक्के आहेत. २७.५० टक्के घरे मातीची, ४२.५० टक्के कवलाची, सिमेंटची ९.१७ टक्के तर टिनाची (पत्र्याची) २० टक्के असे वर्गीकरण आहे. घर नसलेले म्हणजेच भाडेकरु राहत असलेले घरांचे प्रमाण ३.३३ टक्के असल्याने घरमालकांना त्याचा मोबदला मिळाला आहे. भिवापूर तालुक्यात हीच टक्केवारी गवताची घरे ५ टक्के, मातीची २६.२५ टक्के, कवलाची ४७.५० टक्के, सिमेंटची ७.५० टक्के तर टिनाची (पत्र्याची) घरे १० टक्के आहेत. ५ टक्के घरे भाडेकरुंची आहेत.

पवनी तालुक्यत एकूण तालुकानिहाय कवलांची घरे सर्वाधिक ५२.५० टक्के आहेत. मातीची २२.५० टक्के, गवताची ५ टक्के, सिमेंटच्या घरांचे प्रमाण ५ टक्के, तर १२.५० टक्के पत्र्याची घरे आहेत. घर नसलेले म्हणजेच भाड्याने दिलेल्या घरांचे २.५० टक्के इतके प्रमाण आहे. सर्वात जास्त ८ टक्के गवतांची घरे ही भंडारा तालुक्यात आहेत इतर तालुक्यात ते कमी आहेत. मातीची घरे २५ टक्के, कवलाची ४४ टक्के, सिमेंटची ७ टक्के, पत्र्याची घरे १३ टक्के तर एकूण घरांपैकी ३ टक्के घरे ही भाडेकरुंची आहेत.

सावरी तालुक्यातील सिमेंटची टक्केवारी इतर तालुक्यांपेक्षा जास्त आहे. तिचे प्रमाण १६.६७ टक्के इतके आहे. गवताची घरे ५.५६ टक्के आहेत. मातीची ३०.५६ टक्के तर कवलांची ३६.११ टक्के घरे आहेत. टिनाची (पत्र्याचे) घरे ८.३३ टक्के आहेत तर घर नसलेले म्हणजेच भाडेकरु राहत असलेली घरे २.७८ टक्के इतकी आहेत. एकूण टक्केवारी पाहता कवलाचे घरांचे प्रमाण ४४.४१ टक्के इतके आहे.

**४.३.१२ घरांचा दिलेला मोबदल्याचे तुलनात्मक वर्गीकरण:** प्रकल्पग्रस्त आनंदित असतो जर शासनाने घरांचा योग्य मोबदला दिला तर त्याचा विकास होतो. शासनाने घरांचा मोबदला अत्यंत कमी दराने दिला असेल तर प्रकल्पग्रस्तांना आर्थिक हानी सहन करावी लागते. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचा विकास होत नाही. प्रकल्पाने जेव्हा एखादे राहते घर बाधित होते त्या बाधित घराचा शासनाने दिलेला मोबदला आणि आजच्या परिस्थितीत त्या राहत्या घराची बाजारभावानुसार किंमत या दोन किंमतीमध्ये काय तफावत आहे, ते आर्थिक दृष्टिकोनातून बघणे महत्वाचे आहे. खालील सारणी क्र. ४.३० मध्ये या घटकांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे.

**सारणी. क्र. ४.३०**


**घरांचा दिलेला मोबदल्याचे तुलनात्मक वर्गीकरण**

| घराची किंमत (रु. लाखात) | बाजारभावानुसार घरांची किंमत | | शासनाने घरांचा दिलेला मोबदला | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०–१ लाख | ४३ | ११.४४ | १८ | ४.७९ | –२५ | –६.६५ |
| १–२ लाख | १२७ | ३३.७८ | ७४ | १९.६८ | –५३ | –१४–१ |
| २–५ लाख | १७२ | ४५.७४ | २३३ | ६१.९७ | ६१ | १६.२३ |
| ५–१० लाख | १८ | ४.७९ | ३६ | ९.५७ | १८ | ४.७८ |
| १०–२० लाख | ०४ | १.०६ | ०३ | ०.८० | –१ | –०.२६ |
| २० लाख पेक्षा जास्त | ०० | ०० | ०० | ०० | ० | ०.०० |
| घर नसलेले (भाडेकरू) | १२ | ३.१९ | १२ | ३.१९ | ० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** | **३७६** | **१००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१६**

**घरांचा दिलेला मोबदल्याचे तुलनात्मक वर्गीकरण**



सारणी क्र. ४.३० नुसार बाजारभावाप्रमाणे प्रकल्पात गेलेल्या घरांची किंमत ०–१ लाख रु. या गटात ११.४४ टक्के इतकी आहे, त्याच गटात शासनाने ४.७९ टक्के प्रकल्पग्रस्तांना घरांचा मोबदला दिला आहे. या टक्केवारीत वाढ ६.६५ टक्के इतकी आहे. ३३.७८ टक्के बाजारभावानुसार घरांची किंमत १–२ लाख रु. या गटातील असून त्यापैकी १९.६८ टक्के घरांना शासनाने शासकीय दराने भरपाई दिली आहे, यात १४.१ टक्के हा दोहोतील फरक किंवा वाढ दर्शविली आहे. सर्वाधिक ४५.७४ टक्के घरांच्या किंमती २–५ लाख रु. या गटातील दरम्यानच्या आहेत, परंतू या गटातील प्रकल्पग्रस्तांना ६१.९७ टक्के घरांचा मोबदला दिला आहे, हे फरकाचे प्रमाण १६.२३ टक्के वाढले आहे. ५–१० लाख रु. बाजारभावानुसार किंमत असलेली ४.७९ टक्के घरे प्रकल्पात गेल्याने शासनाने त्याच घरांना ९.५७ टक्के लोकांना प्रत्यक्ष मोबदला दिला आहे. बाजार भावानुसार घरांची किंमत व शासनाने त्याच घरांना दिलेला मोबदला यातील वाढ ४.७८ टक्के आहे. १०–२० लाख रु. किंमत असलेल्या १.०६ टक्के घरांपैकी ०.८० टक्के घरांना शासकीय मोबदला मिळाला आहे. त्याचे फरक ०.२६ टक्के इतका आहे. २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेले घराचे प्रमाण शून्य आहे. स्वतःच्या मालकीचे घर नसलेले भाडेकरुच्यां घरांची टक्केवारी ३.१९ टक्के आहे, या ३.१९ टक्के घरांचा मोबदला घर मालकानां दिलेला आहे.

## सारणी क्र. ४.३१

## तालुकानिहाय बाजारभावाप्रमाणे घरांच्या किंमतीचे वर्गीकरण

| | | ०–१ लाख | १–२ लाख | २–५ लाख | ५–१० लाख | १०–२० लाख | २० लाखापेक्षा जास्त | घर नसलेले (भाडेकरु) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **कुही** | **वारंवारिता** | १३ | ४२ | ५२ | ७ | २ | ० | ४ | १२० |
| | **टक्केवारी** | १०.८३ | ३५.०० | ४३.३४ | ५.८३ | १.६७ | ०.०० | ३.३३ | १००.०० |
| **भिवापूर** | **वारंवारिता** | ६ | २६ | ३९ | ५ | १ | ० | ३ | ८० |
| | **टक्केवारी** | ७.५० | ३२.५० | ४८.७५ | ६.२५ | १.२५ | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| **पवनी** | **वारंवारिता** | ५ | १४ | १८ | २ | ० | ० | १ | ४० |
| | **टक्केवारी** | १२.५० | ३५.०० | ४५.०० | ५.०० | ०.०० | ०.०० | २.५० | १००.०० |

| | | ०–१ लाख | १–२ लाख | २–५ लाख | ५–१० लाख | १०–२० लाख | २० लाखापेक्षा जास्त | घर नसलेले (भाडेकरु) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भंडारा | वारंवारिता | १३ | ३३ | ४७ | ३ | १ | ० | ३ | १०० |
| | टक्केवारी | १३.०० | ३३.०० | ४७.०० | ३.०० | १.०० | ०.०० | ३.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ६ | १२ | १६ | १ | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | १६.६७ | ३३.३३ | ४४.४४ | २.७८ | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **४३** | **१२७** | **१७२** | **१८** | **४** | **०** | **१२** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **११.४४** | **३३.७८** | **४५.७४** | **४.७९** | **१.०६** | **०.००** | **३.१९** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

प्राथमिक सर्वेक्षणात वरील सारणी क्र.४.३१ नुसार तालुकानिहाय बाजारभावाप्रमाणे केलेले वर्गीकरण लक्षात येते. उपलब्ध बाजारभावानुसार असलेल्या घरांच्या किंमतीत चढ–उतार झोलेला दिसतो. घरांची प्रत व किंमत यांच्या प्रमाणात ही किंमत ठरलेली दिसून येते. कुही तालुक्यात १०.८३ टक्के ०–१ लाख या गटात, तर १–२ लाख या गटात ३५ टक्के आहे. २–५ लाख या किंमतीची घरे ४३.३४ टक्के, ५–१० लाखाची ५.८३ टक्के, १०–२० लाखाची घरे १.६७ टक्के आहेत. २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेली लोकसंख्येची घरे शून्य टक्के आहेत. भाडेकरु राहत असलेली लोकसंख्या ३.३३ टक्के इतकी आहे.

०–१ लाख किंमत असलेल्या घरांची भिवापूर तालुक्यातील लोकसंख्येचे प्रमाण ७.५० टक्के, १–२ लाख घरांची किंमत असलेली लोकसंख्या ३२.५० टक्के, २–५ लाख किंमत असलेली सर्वाधिक ४८.७५ टक्के, ५–१० लाख या दरम्यान ६.२५ टक्के, १०–२० लाख किंमतीच्या घरांतील लोकसंख्येचे प्रमाण १.२५ टक्के आहे. घरांची २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेली लोकसंख्या शून्य आहे, तर ३.७५ टक्के लोकसंख्या ही भाडेकरुंची आहे.

पवनी या तालुक्यात बाजारभावानुसार किंमत विचारली असता १२.५० टक्के लोकसंख्या ०–१ लाखाच्या घरातील आहे. १–२ लाख किंमतीच्या गटात ३५ टक्के, २–५ लाख गटात ४५ टक्के, ५–१० लाख गटामध्ये ५ टक्के, १०–२० लाख गटात शून्य टक्के आणि घरांची २० लाखापेक्षा किंमत जास्त असलेल्या गटाची लोकसंख्या शून्य व भाडेकरुंची लोकसंख्या २.५० टक्के इतकी नोंदविली आहे. भंडारा तालुक्यात ०–१ लाख या गटातील

लोकसंख्या १३ टक्के, १–२ लाख या गटातील ३३ टक्के तर २–५ या किंमतीच्या घरातील लोकसंख्या ४७ टक्के आहे. ३ टक्के प्रमाण हे ५–१० लाख या गटातील, तर १०–२० लाख यातील १ टक्के असे आहे. २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या घरातील लोकसंख्या शून्य आहे, भाडेकरुंची लोकसंख्या ३ टक्के आहे.

सावरी तालुकानिहाय आकडेवारीत ०–१ लाख गटात सर्व तालुक्यात ती १६.६७ टक्के सरासरी जास्त आहे. १–२ लाख किंमती दरम्यान लोकसंख्या ३३.३३ टक्के आहे. २–५ लाख या गटात ४४.४४ टक्के लोकसंख्या तर ५–१० लाख गटात २.७८ टक्के लोकसंख्या प्रकल्पग्रस्तांची आहे. १०–२० लाख आणि २० लाखापेक्षा जास्त किंमत असलेल्या गटाची लोकसंख्या शून्य टक्के आहे. घर नसलेले किंवा भाडेकरुंची टक्केवारी २.७८ टक्के अशी नोंदविली आहे.

**सारणी क्र. ४.३२**

**तालुकानिहाय प्रकल्पग्रस्तांना शासनाने घरांचा दिलेला मोबदला**

| | | ०–१ लाख | १–२ लाख | २–५ लाख | ५–१० लाख | १०–२० लाख | २० लाखापेक्षा जास्त | घर नसलेले (भाडेकरु) | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ६ | २० | ७७ | १२ | १ | ० | ४ | १२० |
| | टक्केवारी | ५.०० | १६.६७ | ६४.१७ | १०.०० | ०.८३ | ०.०० | ३.३३ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ४ | १६ | ४७ | ९ | १ | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | ५.०० | २०.०० | ५८.७५ | ११.२५ | ६.२५ | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २ | १० | २२ | ५ | ० | ० | १ | ४० |
| | टक्केवारी | ५.०० | २५.०० | ५५.०० | १२.५० | ०.०० | ०.०० | २.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ५ | २० | ६५ | ६ | १ | ० | ३ | १०० |
| | टक्केवारी | ५.०० | २०.०० | ६५.०० | ६.०० | १.०० | ०.०० | ३.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | १ | ८ | २२ | ४ | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | २.७८ | २२.२२ | ६१.११ | ११.११ | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **१८** | **७४** | **२३३** | **३६** | **३** | **०** | **१२** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **४.७९** | **१९.६८** | **६१.९७** | **९.५७** | **०.८०** | **०.००** | **३.१९** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

वरील सारणी क्र. ४.३२ मधील आकडेवारीनुसार तालुकानिहाय प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या शासकीय मोबदल्याचे वर्गीकरण आले आहे. कुही तालुक्यात शासनाने दिलेला मोबदला ०–१ लाखापर्यंतच्या गटातील ५ टक्के लोकसंख्येला मिळाला आहे. १–२ लाख गटामध्ये येणारी लोकसंख्या १६.६७ टक्के तर २–५ लाखापर्यंत ६४.१७ टक्के, ५–१० लाख दरम्यान १० टक्के लोकसंख्या आहे. १०–२० लाखापर्यंत ०.८३ टक्के तर २० लाखापेक्षा जास्त मोबदला मिळालेले शून्य लोक आहेत. ३.३३ टक्के लोकसंख्या ही भाडेकरुंची असल्याने मोबदला मूळ घर मालकाला मिळाला आहे.

भिवापूर तालुक्यामध्ये ०–१ लाखात ५ टक्के, १–२ लाख गटात २० टक्के, २–५ लाख गटात ५८.७५ टक्के इतके प्रमाण आहे. ५–१० लाख गटात ११.२५ टक्के, १०–२० लाखात ६.२५ टक्के आणि २० लाखापेक्षा जास्त मोबदला मिळनारी लोकसंख्या शून्य टक्के आहे. तर ३.७५ टक्के भाड्केरु आहेत. पवनी तालुक्यात गट १–२ लाख दरम्यान २५ टक्के लोकसंख्येला मोबदला मिळाला आहे. १–२ लाख गटात ५५ टक्के लोकसंख्या, तर ५–१० लाख गटात १५.५० टक्के प्रकल्पग्रस्तांची संख्या आहे. २० लाखापेक्षा जास्त व १०–२० लाख दरम्यात ही टक्केवारी शून्य आहे. २.५० टक्के हे घर नसलेले भाड्केरु पवनी तालुक्यातील आहेत.

५ टक्के भंडारा तालुक्यातील लोकसंख्येला ०–१ लाख आर्थिक मोबदला मिळाला आहे. १–२ लाख या गटामध्ये २० टक्के, २–५ लाख दरम्यान ६५ टक्के सर्वाधिक लोकसंख्या आहे. ५–१० लाख दरम्यान ६ टक्के, १०–२० लाख दरम्यान १ टक्के मोबदला धारक आहेत. २० लाखापेक्षा अधिक शून्य लोक आहेत. भाडेकरुंची लोकसंख्या ३ टक्के इतकी आहे.

सावरी तालुक्यात बाजारभावानुसार दिलेला मोबदला हा ०–१ लाख गटामध्ये २.७ टक्के १–२ लाख गटात २२.२२ टक्के, २–५ लाख गटात ६१.११ टक्के लोकसंख्या आहे. ५–१० लाख दरम्यान ११.११ टक्के, १०–२० लाखापर्यंत शून्य टक्के, २० लाखापेक्षाही जास्त मोबदला धारक शून्य टक्के लोकसंख्या दिसून येते. घर असलेले भाड्केरु २.७८ टक्के आहेत. वरील तक्त्यातील शासनाने दिलेला शासकीय आर्थिक मोबदला हा २–५ लाख गटामध्ये सर्वात जास्त आहे.

### ४.३.१३ बचतीच्या प्रकाराचे वर्गीकरण:

आपण आपली बचत कुठे करतो म्हणजेच पोस्ट ऑफिसमध्ये, बँकेमध्ये, की एखादी खासगी व्यक्तीकडे करतो की गावातील एखाद्या सावकाराकडे करतो हे बघणे आवश्यक आहे. पैसा हा मानवि जीवनाचा मापदंड आहे. वर्तमानातून मिळालेल्या उत्पन्नातून पैशाची काही बचत करणे आवश्यक असते. ही बचत करण्यासाठी तो नियोजनबद्ध प्रयत्न करीत असतो. केलेल्या बचतीवर आपल्याला व्याजाचा दर मिळतो. व्यक्तीची बचत हे त्याचं भविष्य घडवत असते. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या बचतीचे वर्गीकरण खालील तत्यामध्ये दिलेले आहे.

**सारणी क्र. ४.३३**


**बचतीच्या प्रकाराचे वर्गीकरण**

| बचतीचा प्रकार | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | २८७ | ७६.३३ |
| बँक | ४१ | १०.९० |
| सावकार | ०३ | ०.८० |
| खाजगी व्यक्ती | १४ | ३.७२ |
| पोस्ट ऑफिस | १५ | ३.९९ |
| इतर | ०० | ०० |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१७**

**बचतीच्या प्रकाराचे वर्गीकरण**




सारणी क्र. ४.३३ नुसार एकूण ३७६ प्रकल्पग्रस्तांच्या बचतींमध्ये १०.९० टक्के बँकेत बचत करणाऱ्यांचे प्रमाण आहे, तर ७६.३३ टक्के प्रकल्पग्रस्त प्रकल्पानंतर बचत करीत नाही. सावकरांकडे ०.८० टक्के बचत करण्याचे प्रमाण आहे, तर खाजगी व्यक्ती ३.७२ टक्के, पोस्ट ऑफिस ३.९९ टक्के तर इतर प्रकारात बचतीचे प्रमाण शून्य आहे, म्हणजेच कुठल्याच प्रकारची बचत होत नाही. उत्तर न दिलेली लोकसंख्या ४.२६ टक्के इतकी आहे. एकूणच प्रकल्पग्रस्तांच्या बचतीचे प्रमाण नगन्य झालेले आहे.

**४.३.१४ वार्षिक बचतीचे तुलनात्मक वर्गीकरण:** उत्पन्नातून उपभोगावर झालेल्या खर्चातून शिल्लक राहिलेली रक्कम म्हणजे बचत जेवढे व्यक्तीचे उत्पन्न जास्त असेल तेवढी त्या व्यक्तीची बचत सुध्दा वाढत असते. प्रकल्प बांधण्यापूर्वी प्रकल्पग्रस्त व्यक्ती किती रुपयांची बचत करीत होते आणि प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्त किती बचत करतात त्यांच्या बचतीवर काय परिणाम झाला याचा तुलनात्मक अभ्यास खालील सारणी क्र. ३.३३ मध्ये दर्शविला आहे.

## सारणी. क्र. ४.३४


## वार्षिक बचतीचे तुलनात्मक वर्गीकरण

| वार्षिक बचतीचे वर्गीकरण | प्रकल्पापुर्वी वार्षिक बचत | | प्रकल्पबांधणीनंतर वार्षिक बचत | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| बचत होत नाही | ६ | १.६० | २८७ | ७६.३३ | २८१ | ७४.७३ |
| ०-२५ हजार | ५६ | १४.८९ | २५ | ६.६५ | -३१ | -८.२४ |
| २५-५० हजार | १४३ | ३८.०३ | १८ | ४.७९ | -१२५ | -३३.२४ |
| ५० हजार -१ लाख | ७९ | २१.०१ | १२ | ३.१९ | -६७ | -१७.८२ |
| १-२ लाख | ४३ | ११.४४ | १० | २.६६ | -३३ | -८.७८ |
| २-३ लाख | १५ | ३.९९ | ५ | १.३३ | -१० | २.६६ |
| ३-५ लाख | १३ | ३.४६ | ३ | ०.८० | -१० | -२.६३ |
| ५-१० लाख | ५ | १.३३ | ० | ०.०० | -५ | -१.३३ |
| १० लाखापेक्षा जास्त | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२६ | १६ | ४.२६ | ० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** | **३७६** | **१००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

## आकृती क्र. ४.१८

## वार्षिक बचतीचे तुलनात्मक वर्गीकरण



सारणी क्र. ४.३३ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या एकूण बचतीच्या वर्गीकरणाचा तक्ता पाहता बचत न करण्याचे प्रमाण जास्त आहे. वार्षिक बचतच करु न शकणारे प्रकल्पापूर्वी १.६० टक्के होते तेच प्रकल्पबांधणीनंतर ७६.३३ टक्के इतके वधारले, बचत न करु शकणाऱ्या टक्केवारीत ७४.७३ टक्के वाढ झाली आहे. शेकडा १४.८९ टक्के प्रकल्पग्रस्त ०–२५ हजार या गटात बचत करणारे होते, ते प्रकल्पबांधणीनंतर ६.६५ टक्के झाले, हे घसरल्याचे प्रमाण ८.२४ टक्के आहे. २५–५० हजार रुपये वार्षिक बचत करणाऱ्यांचा गट ३८.०३ टक्के होता, तोच प्रकल्पबांधणीनंतर केवळ ४.७९ टक्के इतका खाली आला यात ३३.२४ टक्के घट झाली आहे. प्रकल्पापूर्वी शेकडा २१.०१ टक्के, ५० हजार ते १ लाख रुपये पर्यंत बचत करणाऱ्या गटात आहेत तेच पुढे प्रकल्पबांधणीनंतर ३.१९ टक्के कमी झाले, म्हणजेच १७.८२ टक्के घट झाली. २–३ लाख बचत गटातील प्रकल्पग्रस्तांचे पूर्वीचे प्रमाण शेकडा ३.९९ टक्के होते. प्रकल्पानंतर अत्यल्प असे १.३३ टक्के झाले आहे, यातील घट २.६६ टक्के आहे.

प्रकल्पापूर्वी ३–५ लाख रुपये गटातील वार्षिक बचत करणारे ३.४६ टक्के प्रकल्पग्रस्त होते, प्रकल्प बांधणीनंतर मात्र ०.८० टक्के बचत करत असल्याचे दिसते. ही घट २.६३ टक्के आहे. वार्षिक ५–१० लाख बचत करणारे १.३३ टक्के प्रकल्पग्रस्त नंतर मात्र शून्य बचत करतात ती १.३३ टक्के ने घटली आहे. १० लाखापेक्षा जास्त बचत करणारे शून्य लोकसंख्या आहे. प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतर उत्तर देऊ न शकलेली शेकडा ४.२६ टक्के लोकसंख्या आहे.

## सारणी क्र. ४.३५

## प्रकल्पापूर्वी तालुकानिहाय वार्षिक बचतीचे वर्गीकरण

| | | बचत होत नाही | ०–२५ हजार | २५–५० हजार | ५० हजार – १ लाख | १–२ लाख | २–३ लाख | ३–५ लाख | ५–१० लाख | १० लाखा पेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | २ | १७ | ४६ | २५ | १४ | ५ | ४ | २ | ० | ५ | १२० |
| | टक्केवारी | १.६७ | १५.०० | ३८.३३ | २०.८३ | ११.६७ | ४.१७ | ३.३३ | १.६७ | ०.०० | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | १ | ११ | ३४ | १६ | ९ | ३ | २ | १ | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | १.२५ | १३.७५ | ४२.५० | २०.०० | ११.२५ | ३.७५ | २.५० | १.२५ | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | १ | ९ | ७ | ११ | ५ | २ | २ | ० | ० | ३ | ४० |
| | टक्केवारी | २.५० | २२.५० | १७.५० | २७.५० | १२.५० | ५.०० | ५.०० | ०.०० | ०.०० | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | २ | १४ | ३८ | २० | १२ | ४ | ४ | २ | ० | ४ | १०० |
| | टक्केवारी | २.०० | १४.०० | ३८.०० | २०.०० | १२.०० | ४.०० | ४.०० | २.०० | ०.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ० | ५ | १८ | ७ | ३ | १ | १ | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | ०.०० | १३.८९ | ५०.०० | १९.४४ | ८.३३ | २.७८ | २.७८ | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **६** | **५६** | **१४३** | **७९** | **४३** | **१५** | **१३** | **५** | **०** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **१.६०** | **१४.८९** | **३८.०३** | **२१.०१** | **११.४४** | **३.९९** | **३.४६** | **१.३३** | **०.००** | **४.२६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्र.४.३४ नुसार पुनर्वसनापूर्वी वार्षिक बचतीत एकूण तालुक्यामध्ये १० लाखापेक्षा जास्त बचत करणारी लोकसंख्या ० टक्के आहे. कुही तालुक्यामध्ये प्रकल्प बांधणीपूर्वी ० ते २५ हजार बचत करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण १५ टक्के आहे. २५–५० हजारादरम्यान ३८.३३ टक्के त्यापुढे ५० हजार–१ लाख रुपये पर्यंत २०.८३ टक्के लोकसंख्या, तर १–२ लाखादरम्यान ११.६७ टक्के लोकसंख्या बचत करताना दिसते. २–३ लाख रुपये पर्यंत हीच लोकसंख्या ४.१७ टक्के, ३–५ लाखापर्यंतच्या गटात ३.३३ टक्के, ५–१० लाखांच्या दरम्यान १.६७ टक्के लोकसंख्या दिसते. १० लाखापेक्षा जास्त कुणीही बचत करीत नाही. बचत होत नाही असे म्हणणारे १.६७ टक्के तर उत्तर देऊ न शकलेले ४.१७ टक्के लोक आहेत.

भिवापूर तालुक्यामध्ये बचत होत नसलेली लोकसंख्या १.२५ टक्के आहे. ०–२५ हजार बचत १३.७५ टक्के लोकसंख्या, २५–५० हजारापर्यंत ४२.५० टक्के लोकसंख्या तर ५ हजार ते

१ लाख या गटातीलन लोकांची २० टक्के लोकसंख्या बचत करत आहे. १–२ लाखामध्ये ११.२५ टक्के, २–३ लाखापर्यंत ३.७५ टक्के, ३–५ लाखापर्यंत २.५० टक्के, ५–१० लाखादरम्यान १.२५ टक्के लोक बचत करताना दिसतात. १० लाखापेक्षा जास्त बचतीचे शून्य प्रमाण आहे. उत्तर देऊ न शकलेले ३.७५ टक्के लोक सर्वेक्षणा दरम्यान आढळले आहेत.

पवनी तालुक्यात २.५० टक्के लोकसंख्येची बचत होत नाही. ०–२५ हजार या गटात २२.५० टक्के लोकसंख्या, २५–५० हजार गटात १७.५० टक्के, ५० हजार ते १ लाखापर्यंत २७.५० टक्के लोक बचत करतात. १–२ लाखापर्यंत १२.५० टक्के सर्व पाचही तालुक्यातील ही टक्केवरी सर्वाधिक आहे. २–३ लाख व ३–५ लाखामध्ये ५ टक्के तर ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त गटाची लोकसंख्या शून्य आहे. उत्तर देऊ न शकलेले ७.५० टक्के लोक पवनी तालुक्यामध्ये येतात.

२ टक्के लोकसंख्या भंडारा तालुक्यातील ही बचत होत नसलेली लोकसंख्या आहे. ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त बचत असलेल्या गटाची टक्केवारी २ आहे. ०–२५ हजारी गटाची १४ टक्के, २५–५० हजार पर्यंत ३८ टक्के आणि ५० हजार ते १ लाखापर्यंत २० टक्के लोकसंख्या दिसून येते. १–२ लाखात १२ टक्के, २–३ लाखात आणि ३–५ लाखात ४ टक्के लोकसंख्या बचत करते. उत्तर देऊ न शकलेले ४ टक्के लोक आहेत.

सावरी तालुक्यात बचत होत नसलेली, ५–१० लाख व १० लाखपेक्षा जास्त गटातील टक्केवारी शून्य आहे. २–३ लाख, ३–५ लाख व उत्तर न दिलेल्या लोकसंख्येची टक्केवारी २.७८ टक्के आहे. ०–२५ हजार गटातील टक्केवारी १३.८९ टक्के, २५–५० हजार गटातील ५० टक्के, तर ५० ते १ लाख या गटामधील टक्केवारीचे प्रमाण १९.४४ टक्के इतके आहे. एकूण प्रकल्पबांधणीपूर्वी तालुकानिहाय बचतीमध्ये २५ ते ५० हजार बचतीचा गट सरासरी टक्केवारीमध्ये ३८.०३ टक्के असा सर्वाधिक आहे.

## सारणी क्र. ४.३६

## प्रकल्पानंतर तालुकानिहाय बचतीचे वर्गीकरण

| | | बचत होत नाही | ०-२५ हजार | २५-५० हजार | ५० हजार - १ लाख | १-२ लाख | २-३ लाख | ३-५ लाख | ५-१० लाख | १० लाखापेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ९३ | ७ | ६ | ३ | ३ | २ | १ | ० | ० | ५ | १२० |
| | टक्केवारी | ७७.५० | ५.८३ | ५.०० | २.५० | २.५० | १.६७ | ०.८३ | ०.०० | ०.०० | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | ६२ | ५ | ३ | ३ | २ | १ | १ | ० | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | ७७.५० | ६.२५ | ३.७५ | ३.७५ | २.५० | १.२५ | १.२५ | ०.०० | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | २९ | ३ | २ | २ | १ | ० | ० | ० | ० | ३ | ४० |
| | टक्केवारी | ७२.५० | ७.५० | ५.०० | ५.०० | २.५० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ७५ | ७ | ५ | ३ | ३ | २ | १ | ० | ० | ४ | १०० |
| | टक्केवारी | ७५.०० | ७.०० | ५.०० | ३.०० | ३.०० | २.०० | १.०० | ०.०० | ०.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | २८ | ३ | २ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | ७७.७८ | ८.३३ | ५.५६ | २.७८ | २.७८ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **२८७** | **२५** | **१८** | **१२** | **१०** | **५** | **३** | **०** | **०** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **७६.३३** | **६.६५** | **४.७९** | **३.१९** | **२.६६** | **१.३३** | **०.८०** | **०.००** | **०.००** | **४.२६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्र. ४.३५ नुसार पुनर्वसनानंतर किंवा प्रकल्पबांधणीनंतर लोकांच्या बचतीमध्ये फरक पडला आहे. पुनर्वसनानंतर या बचतीमध्ये असलेल्या लोकसंख्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तालुकानिहाय आकडेवारी पाहता कुही तालुक्यात ७७.५० टक्के लोकसंख्या बचतच न करणारी आहे. ०-२५ हजार रुपयाची बचत करणारी लोकसंख्या ५.८३ टक्के, २५-५० हजारात ५ टक्के, ५० हजार ते १ लाखापर्यंत व १-२ लाखादरम्यान २.५० टक्के लोक बचत करतात. २ ते ३ लाखापर्यंत ०.८३ टक्के लोकसंख्या बचत करते. ५-१० लाख आणि १० लाखापेक्षा जास्त बचत करणारे शून्य आहेत. ४.१७ टक्के प्रमाण उत्तर न दिलेल्या लोकसंख्येचे आहे.

भिवापूर तालुक्यात बचत न करणारे ७७.५० टक्के लोक, ०-२५ हजारापर्यंतचे ६.२५ टक्के, २५-५० हजारापर्यंतचे ३.७५ टक्के, ५० हजार ते १ लाखादरम्यानचे ३.७५ टक्के, १-२ लाख गटात २.५० टक्के, तर २-३ लाख आणि ३-५ लाखामध्ये प्रत्येकी १.२५ टक्के लोकसंख्या पुनर्वसनानंतर बचत करते. उत्तर न दिलेले ३.७५ टक्के लोकसंख्येचे प्रमाण आहे.

बचत होत नाही अशी लोकसंख्या ७२.५० टक्के पवनी तालुक्यात आहे. ०–२५ हजार या गटामध्ये ७.५० टक्के, २५–५० आणि ५० हजार ते १ लाखापर्यंत ५ टक्के लोक बचत करतात. १–२ लाख बचत करणारे २.५० टक्के लोक आहेत. पुढे २–३ लाख, ५–१० लाख आणि १० लाखापेक्षा जास्त गटातील प्रकल्पग्रस्तांची टक्केवारी शून्य आहे. उत्तर देऊ न शकलेले प्रकल्पग्रस्तांची टक्केवारी सर्व तालुक्यामध्ये पवनी तालुक्यात सर्वाधिक ७.५० टक्के आहे.

भंडारा तालुक्यात प्रकल्प बांधणीनंतर ७५ टक्के लोकसंख्या बचत न करणारी आहे. ०–२५ हजारापर्यंत ७ टक्के, २५–५० हजारात ५ टक्के, तर ५० हजार ते १ लाख आणि १–२ लाखापर्यंतच्या गटातील लोकसंख्या ३ टक्के, २–३ लाख गटात २ टक्के लोकसंख्या बचत करते. ३–५, ५–१० व १० लाखापेक्षा जास्त गटात अनुक्रमे १ टक्के आणि शून्य टक्के लोकसंख्या आहे. उत्तर न दिलेले ४ टक्के लोक आहेत.

सावरी तालुक्यामध्ये बचत न करणारी ७७.७८ टक्के लोकसंख्या सर्वात जास्त आहे. ०–२५ हजार या गटात ८.३३ टक्के, २५–५० हजार या गटात ५.५६ टक्के तर ५० हजार ते १ लाख व १ ते २ लाख या दोन्ही गटात २.७८ टक्के लोक बचत करतात. २–३ लाख, ३–५ लाख, ५–१० लाख आणि १० लाखापेक्षा जास्त बचत करणाऱ्या वर्गाची लोकसंख्या शून्य आहे. उत्तर देऊ न शकलेली लोकसंख्या २.७८ टक्के आहे. एकूण बचतीचे वर्गीकरण करताना शेकडा ७६.३३ टक्के लोकसंख्या बचतच करीत नसल्याचे दिसून येते.

**४.३.१५ प्रकल्पग्रस्तांच्या कर्जाची स्थिती**: स्वतःकडे पैसे किंवा आर्थिक स्त्रोत नसल्यामुळे आर्थिक साहाय्य घ्यावे लागते. त्यालाच कर्ज म्हटले जाते. हा एक आर्थिक व्यवहार असल्याने घेतलेल्या कर्जाची परतफेडीची हमी देणे ऋणकोचे कर्तव्य असते. या प्रकल्पग्रस्तांनी कर्ज घेतले आहे काय? की कर्ज घेतलेले नाही. आपल्यावर किती कर्ज आहे? कुठल्या प्रकारचे कर्ज आहे? एकूण किती रुपयाचे कर्ज आहे? हे आर्थिक दृष्टिकोनातून आवश्यक आहे. कारण कर्ज हा एक आर्थिक निकषचा घटक आहे. खालील तत्यामध्ये याचे स्पष्टीकरण आहे.

**सारणी क्र. ४.३७**

**प्रकल्पग्रस्तांच्या कर्जाची स्थिती**

| आपण कर्ज घेतले आहे काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | ३०६ | ८१.३८ |
| होय | ७० | १८.६२ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

कर्ज घेण्याचे प्रमाण सारणी क्र. ४.३७ मध्ये फारच कमी आहे. ३०६ म्हणजे ८१.३८ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतलेले नाही, तर ७० लोकांनी म्हणजेच १८.६२ टक्के लोकसंख्येनी विविध कारणांसाठी कर्ज घेतलेले आहे.

**४.३.१६ कर्जाच्या स्वरुपाचे वर्गीकरण**:

आपण कर्ज कोणाकडून घेतलेले आहे? बँकेतून घेतलेले आहे की एखाद्या खासगी व्यक्तीकडून घेतलेले आहे? की सावकाराकडून घेतलेले आहे? आणि आपण त्यावर काय व्याजदर देता? आणि आपल्यावर किती कर्ज आहे? यावरुन त्या व्यक्तीची आर्थिक परिस्थिती लक्षात येते. एखाद्या व्यक्तीवर जास्त कर्ज असेल त्या व्यक्तीची आर्थिक बाजू कमकुवत आहे असा दृष्टिकोन समजण्यात येतो. खालील तक्ता क्र. ४.३८ मध्ये याचे वर्गीकरण आले आहे.

**सारणी क्र. ४.३८**


**कर्जाच्या स्वरूपाचे वर्गीकरण**

| कोणाकडून कर्ज घेतले आहे? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| सावकार | ४२ | ११.१७ |
| खाजगी व्यक्ती | १२ | ३.१९ |
| बँक | १६ | ४.२६ |
| इतर | ०० | ०० |
| नाही | ३०६ | ८१.३८ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.१९**

**कर्जाच्या स्वरूपाचे वर्गीकरण**




सारणी क्र. ४.३८ मध्ये १.३३ टक्के लोकसंख्येनी पोस्ट ऑफिस मधून कर्ज घेतलेले आहे, ११.१६ टक्के प्रमाण सावकार कडून कर्ज घेण्याचे आहे, ते आहे तर खाजगी व्यती म्हणजेच मित्र किंवा नातेवाईक मंडळीकडून ३.१९ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतले आहे व बँकेकडून २.९३ टक्के कर्ज घेतलेले आहे. तुलनेने बँकेकडे कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण फारच कमी आहे व ८१.३८ टक्के लोकांनी काहीही कर्ज घेतलेले नाही.

**४.३.१७ कर्ज घेतलेल्या कारणाचे वर्गीकरण**:

आपण कर्ज कुठल्या कारणासाठी घेतलेले आहे? घर बांधण्यासाठी कर्ज घेतला आहे? गुंतवणूक करण्यासाठी कर्ज घेतलेले आहे? की एखादं वाहन खरेदी करण्यासाठी कर्ज घेतले आहे? शेती खरेदी करण्यासाठी घेतले आहे? की समारंभ लग्नासाठी शिक्षणासाठी कर्ज घेतले आहे? एखाद्या व्यवसायाच्या निर्मितीसाठी कर्ज घेतले आहे? कारण कर्ज हे विकासात्मक दृष्टिकोनातून घेतलं असेल म्हणजे एखाद्या व्यवसायासाठी घेतले असेल तर कर्ज आर्थिक उत्पन्न मिळवून देते, परंतु जर लग्नसमारंभ किंवा आजारपण यासाठी घेतले असेल तर

त्या कर्ज घेणाऱ्या व्यक्तीची आर्थिक बाजू कमकुवत होते. प्रस्तुत सारणी क्रमांक ४.३९ मध्ये कर्ज घेतलेल्या कारणाचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.३९**


**कर्ज घेतलेल्या कारणाचे वर्गीकरण**

| कोणत्या कारणाासाठी कर्ज काढले आहे? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| शेती खरेदी | १४ | ३.७२ |
| समारंभ व लग्न | ०९ | २.३९ |
| व्यवसाय निर्मिती (वाहन खरेदी) | १३ | ३.४६ |
| आजारपण | १२ | ३.१९ |
| घर बांधणी | २१ | ५.५९ |
| इतर | ०० | ०० |
| नाही | ३०६ | ८१.३८ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.२०**

**कर्ज घेतलेल्या कारणाचे वर्गीकरण**



सारणी क्रमांक ४.३९ मध्ये एकूण कर्ज घेणाऱ्या कारणांमध्ये शेती खरेदी करण्याकरीता ३.७२ टक्के लोकसंख्येने कर्ज घेतले आहे, तर लग्न व समारंभासाठी २.३९ टक्के लोकांनी कर्ज घेतले व व्यवसाय निर्मितीसाठी (वाहन खरेदी) ३.४६ टक्के आजारपणासाठी ३.१९ टक्के तर नवीन घर बांधणीसाठी ५.५९ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतले आहे. ८१.३८ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतलेले नाही.

**४.३.१८ कर्ज परतफेड केल्याचे वर्गीकरण**:

ज्या व्यक्तीने कर्ज घेतले आहे, त्या व्यक्तीने कर्ज परत केले आहे काय? म्हणजे त्या कर्जाची परतफेड केली आहे काय? कारण एखाद्या कार्यासाठी आपण कर्ज घेतो आणि जर ते कर्ज आपण परत करु शकलो नाही तर त्या व्यक्तीची आर्थिक बाजू अत्यंत हलाखीची आहे हे स्पष्ट होते. खालील सारणी क्र. ४.४० मध्ये प्रकल्पग्रस्तांनी कर्ज परतफेड केल्याचे वर्गीकरण दर्शविले आहे.

**सारणी क्र. ४.४०**

**कर्ज परतफेड केल्याचे वर्गीकरण**

| कर्ज परतफेड केलेल्या प्रकल्पग्रस्तांची स्थिती | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | ६० | १५.९६ |
| होय | १० | २.६६ |
| कर्ज न घेतलेले | ३०६ | ८१.३८ |
| **एकूण** | **७०** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

वरील ३.४० तक्त्यावरुन एकूण ७० लोकांनी कर्ज घेलेले आहे, म्हणजेच १८.६२ टक्के लोकसंख्येनी विविध कारणांसाठी कर्ज घेतलेले आहे. त्यापैकी ६० लोकांनी म्हणजेच १५.९६ टक्के लोकसंख्येने आतापर्यंत कर्ज परत केलेले नाही, तर उर्वरित १० लोकांनी म्हणजेच २.६६ टक्के लोकसंख्येने घेतलेले कर्ज परत केलेले आहे.

**४.३.१९ प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये झालेली वाढ किंवा घटीचे वर्गीकरण**: प्रकल्पग्रस्तांच्या कर्ज काढण्याच्या प्रवृत्तीत वाढ झालेली आहे की घट झालेली आहे.

पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्तांनी किती कर्ज काढले आणि पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांनी किती कर्ज परत केले किंवा काढले, कारण कर्जाचा परिणाम हे प्रल्पग्रस्तांच्या जीवनावर होत असतो.

**सारणी. क्र. ४.४१**


**प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये झालेली वाढ किंवा घटीचे वर्गीकरण**

| तालुका | कर्जबाजारीपणाची स्थिती | | कर्जबाजारीपणाची स्थिती | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | वाढ | टक्केवारी | घट | टक्केवारी | |
| कुही | २० | २१.७४ | १०० | ३५.२१ | १२० |
| भिवापूर | १५ | १६.३० | ६५ | २२.८९ | ८० |
| पवनी | ३५ | ३८.०४ | ६५ | २२.८९ | ४० |
| भंडारा | १० | १०.८७ | ३० | १०.५६ | १०० |
| त्रवरी | १२ | १३.०४ | २४ | ८.४५ | ३६ |
| **एकूण** | **९२** | **१००.००** | **२८४** | **१००.००** | **३७६** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.२१**

**प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये झालेली वाढ किंवा घटीचे वर्गीकरण**



सारणी क्र. ४.४१ मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये झालेली वाढ किंवा घटीचे स्पष्टीकरण दिलेले आहे. कुही तालुक्यातील एकूण १२० प्रकल्पग्रस्त लोकसंख्यापैकी २० प्रकल्पग्रस्तांच्या म्हणजेच २१.७४ टक्के लोकांच्या कर्जबाजारीपणात वाढ झालेली आहे, तर १०८ किंवा २८.७२ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणात घट झालेली आहे. भिवापुर तालुक्यात एकूण १६.३० टक्के लोकसंख्येच्या कर्जबाजारीपणात वाढ झाली, तर २२.८९ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये घट झालेली आहे. पवनी तालुक्यात ३८.०४ टक्के घट तर, २२.८९ टक्के वाढ झालेली आहे. भंडारा तालुक्यात १० प्रकल्पग्रस्त किंवा १०.८७ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये वाढ झालेली आहे, तर ३० किंवा १०.५६ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणामध्ये घट झालेली आहे. सावरी तालुक्यात एकूण ३६ प्रकल्पग्रस्त लोकसंख्येत १२ लोकसंख्येच्या कर्जबाजारीपणात वाढ, तर २४ लोकांच्या कर्जबाजारीपणात घट झालेली आहे. कर्जबाजारीपणामध्ये सावरी तालुक्यात घट झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण, वाढ होणाऱ्या कर्जबाजारी प्रकल्पग्रस्तांच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. एकूण पाचही तालुक्यात ९२ प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणापत वाढ झाली, तर २८४ लोकांच्या कर्जबाजारीपणामध्ये घट झालेली आहे. त्यांचे प्रमाण अनुक्रमे ३४.४७ टक्के वाढ व ७५.५३ टक्के घट झालेली आहे.

### ४.३.२० तालुकानिहाय प्रतिदिवस मजुरीच्या दरातील झालेला तुलनात्मक बदल:

प्रकल्प बांधणीपुर्वी मजुरीचे दर काय होते? प्रति दिवस मजुरांना किती रुपये मजुरी मिळत होती? आणि त्याच भागात प्रकल्प बांधणल्यानंतर मजुरीच्या दरात काय बदल झाला तो बदल धनात्मक आहे की ऋणात्मक आहे हे बघणे गरजेचे असते, कारण त्याचा परिणाम प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक जीवनावर होतो.

## सारणी. क्र. ४.४२


## तालुकानिहाय प्रतिदिवस मजुरीच्या दरातील झालेला तुलनात्मक बदल

| तालुका | छुरुष | | स्त्रिया | | पुरुषांच्या मजुरी दरात झालेले बदल | स्त्रियांच्या मजुरी दरात झालेले बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | धरणापूर्वी | धरणानंतर | धरणापूर्वी | धरणानंतर | | |
| कुही | १४०.१२ | १९०.२७ | ११०.३२ | १८०.३७ | ५०.१५ | ७०.०५ |
| भिवापूर | १३५.११ | २१०.२२ | ११२.२७ | १८५.६२ | ७५.११ | ७३.३५ |
| पवनी | १२५.२१ | १९५.२७ | ११७.६७ | १८२.१५ | ७०.०६ | ६४.४८ |
| भंडारा | १२४.३२ | २१५.८९ | १०२.७३ | १७२.१७ | ९१.५७ | ६९.४४ |
| त्रावरी | १३९.५२ | २२७.३१ | ११७.१९ | १९९.१९ | ८७.७९ | ८२ |
| **एकूण सरासरी** | **१३२.८६** | **२०७.७९** | **११२.०३** | **१८३.९** | **७४.९४** | **७१.८६** |

(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

## आकृती क्र. ४.२२

## तालुकानिहाय प्रतिदिवस मजुरीच्या दरातील झालेला तुलनात्मक बदल




सारणी क्र. ४.४२ मध्ये प्रकल्पग्रस्तांचा प्रतिदिवस मजुरीच्या दरात झालेला पुरुषांचा व स्त्रियांचा बदल दर्शविलेला आहे. कुही तालुक्यात धरणापूर्वी १४०.१२ रुपये सरासरी प्रति

दिवस पुरुषांना मजुरी मिळत असे, तर धरणानंतर मजुरीच्या दरात वाढ होऊन १९०.२७ रुपये प्रति दिवस झाली, पुरुषांच्या मजुरी दरात ५०.१५ रुपयांनी वाढ झालेली आहे, तर स्त्रियांच्या बाबतीत धरणापूर्वी ११०.३२ रुपये मजुरी होती. धरणानंतर मजुरीत वाढ होऊन ती १८०.३७ रुपये झाली, तर ७०.०५ रुपयांनी स्त्रियांच्या मजुरी दरात वाढ झाली. भिवापूर तालुक्यामध्ये प्रकल्पबांधणीपूर्वी १३५.११ रुपये पुरुषांना प्रति दिवस मजुरी मिळत असे, प्रकल्पबांधणीनंतर मजुरीच्या दरात वाढ होऊन ती २१०.२२ रुपये प्रति दिवस झाली, तर स्त्रियांची मजुरी धरणापूर्वी ११२.२७ रुपये होती, तर धरणानंतर मजुरीच्या दरात वाढ होऊन १८५.६२ रुपये प्रति दिवस झाली. स्त्रियांच्या मजुरीच्या दरात पूर्वी आणि नंतरचा विचार करता ७३.३५ रुपयांची वाढ झालेली आहे. पवनी तालुक्यात पूर्वी १२५.२१ रुपये प्रति दिवस पुरुषांना मजुरी होती, तर धरणानंतर १९५.२७ रुपये झाली, त्यामध्ये ७०.०६ रुपयांनी वाढ झाली. स्त्रियांची प्रकल्पापूर्वी ११७.६७ रुपये मजुरी होती तर प्रकल्पानंतर १८२.१५ रुपये झाली. मजुरीच्या दरात ६४.४८ रुपये वाढ झालेली आहे. भंडारा तालुक्यामध्ये धरणापूर्वी पुरुष मजुरीचा दर १२४.३२ रुपये तर स्त्रियांना १०२.७३ रुपये प्रति दिवस होता. पुनर्वसनानंतर पुरुषांच्या मजुरी दरात वाढ होऊन ती २१५.८९ रुपये व महिलांच्या १७२.१७ रुपये प्रति दिवस झाली. पुरुषांच्या मजुरी दरात ९१.५७ रुपयांनी तर स्त्रियांच्या मजुरी दरात ६९.४४ रुपयांनी वाढ झालेली आहे. सावरी या चंद्रपूर जिल्ह्यातील तालुक्यामध्ये पूर्वी पुरुषांना १३९.५२ तर स्त्रियांना ११७.१९ रुपये प्रतिदिवस मजुरी मिळत होती. पुनर्वसनानंतर पुरुषांना २२७.३१ तर स्त्रियांना १९९.१९ रुपये मजुरी मिळते. पुरुषांच्या मजुरी दरात ८७.७९ रुपये तर स्त्रियांच्या ८२ रुपये वाढ झालेली आहे.

एकूण पाच तालुक्याच्या सरासरीमध्ये प्रकल्पापूर्वी पुरुषांची १३२.८६ रुपये तर स्त्रियांची ११२.०३ रुपये प्रति दिवस मजुरी होती. प्रकल्पबांधनीनंतर पुरुषांची मजुरी २०७.७९ रुपये तर स्त्रियांची १८३.९ रुपये झाली. पुरुषांच्या सरासरी मजुरीत प्रति दिवस ७४.९४ रुपयांनी वाढ झाली तर स्त्रियांची ७१.८६ रुपयांनी वाढ झालेली आहे, परंतु बाजार भावाप्रमाणे व शासकीय रोजगाराच्या दरापेक्षा हे दर कमी आहेत.

## ४.३.२१ एकूण उपभोगावरील खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण:

उपभोग खर्च हा वास्तव उत्पन्न पातळीवर अवलंबून असतो. वस्तू व सेवांचा उपभोग घेण्यासाठी ग्राहकाला उपभोग मूल्य घावे लागते. उपभोग हे उत्पन्नाचे फलन असते जेवढे उत्पन्न जास्त तेवढा त्या व्यक्तीचा उपभोग वाढत असतो. व्यक्ती कुठल्या घटकांचा उपभोग घेतो जसे खाद्यपदार्थ, मोबाईल, आरोग्य, शिक्षण यावर कुठल्या प्रमाणात किती खर्च करतो हे त्याच्या उत्पन्नावर अवलंबून असते.

**सारणी. क्र. ४.४३**


**एकूण मासिक उपभोगावरील खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण**

| खर्चाच्या बाबी | पुनर्वसनापूर्वी सरासरी मासिक खर्च (रु) | पुनर्वसनानंतर सरासरी मासिक खर्च (रु) | सरासरी मासिक खर्चात झालेला बदल (रु) |
|---|---|---|---|
| खाद्यपदार्थ | १४०० | १६०० | २००.०० |
| आरोग्य | १४० | २७० | १३०.०० |
| शिक्षण | ४० | १८० | १४०.०० |
| मनोरंजन | १५० | २२० | ७०.०० |
| मोबाईल | १६० | २१० | ५०.०० |
| सण–समारंभ | ३०० | २०० | –१००.०० |
| इतर | १२० | १०० | –२०.०० |
| **एकूण** | **२३१०** | **२७८०** | **४७०** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

## आकृती क्र. ४.२३

## एकूण उपभोगावरील खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण




सारणी क्र. ४.४३ मध्ये प्रकल्पबांधनीपूर्वी आणि प्रकल्पबाधणीनंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे एकूण उपभोगावरील खर्चाचे वर्गीकरण दर्शविले आहे. खाद्यपदार्थावर प्रकल्प बांधणीपूर्वी सरासरी महिन्याला १४०० रुपये खर्च करीत होते तर प्रकल्पबाधनीनंतर १६०० रुपये खाद्यपदार्थांवर खर्च होत आहेत. म्हणजे एकूण २०० रुपये खाद्यपदार्थावरील खर्चात वाढ झालेली आहे. तर आरोग्य या घटकावर धरणापूर्वी सरासरी १४० रुपये खर्च केले जात होते तर धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर त्यामध्ये २७० रुपयांनी वाढ झाली. म्हणजे पुनर्वसनानंतर १३० रुपये आरोग्यावरील सरासरी खर्चात वाढ झाली. शिक्षणावरील खर्चामध्ये पूर्वी सरासरी ४० रुपये खर्च केला जात असे, तर धरणानंतर १८० रुपये खर्च केले जात आहेत म्हणजेच शिक्षणावरील धरणबांधणीनंतर १४० रुपयांनी वाढ झाली. मनोरंजन या घटकावर पूर्वी १५० रुपये खर्च केल्या जात असे, परंतु धरणानंतर २२० रुपये खर्च केल्या जात आहे. एकूण ७० रुपये मनोरंजनावर जास्त खर्च केल्या जात आहेत. मोबाईलवर पूर्वी १६० रुपये खर्च होत असत, तर आता २१० रुपये खर्च होत आहेत. म्हणजे मोबाईलवरील खर्चात सुध्दा ५० रुपयांनी वाढ झालेली आहे. सण, समारंभ व उत्सव या घटकांवर पूर्वी ३०० रुपये खर्च केले

जात असे परंतु धरणानंतर २०० रुपये खर्च केले जात आहेत. म्हणजे या घटकावर १०० रुपयांनी घट झालेली आहे, तर इतर घटकांमध्ये पूर्वी १२० रुपये खर्च केले जात असत. धरणानंतर १०० रुपये खर्च केले जात आहेत. म्हणजेच इतर घटकांवरील खर्चात २० रुपयांची घट झालेली आहे. प्रकल्पग्रस्त कुटुंबांचा धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी एकूण सरासरी खर्च २३१० रुपये होता तो खर्च पुनर्वसनानंतर २७८० रुपये झाला, म्हणजेच प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या एकूण सरासरी उपभोग खर्चात ४७० रुपयांनी वाढ झाली.

**४.३.२२ आर्थिक परिस्थितीचे तुलनात्मक वर्गीकरण:** एखाद्या जलसिंचन प्रकल्पाची निर्मिती करण्यात येते तेव्हा, त्या प्रकल्पा सभोवताल राहणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थिती कशी आहे हे बघणे महत्वाचे आहे. प्रकल्प बांधणीपूर्वी प्रकल्पग्रस्तांची आर्थिक परिस्थिती कशी होती आणि प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांची आर्थिक परिस्थिती कशी झाली? पुनर्वसनापूर्वी ते समाधानी होते काय? प्रकल्प बांधणीनंतर  प्रकल्पग्रस्त समाधानी झाले काय? किंवा त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट झाली काय? याचा अभ्यास खालील सारणीमध्ये दिलेला आहे.

**सारणी. क्र. ४.४४**


**आर्थिक परिस्थितीचे तुलनात्मक वर्गीकरण**

| **आर्थिक परिस्थिती** | **धरणापूर्वी** | | **धरणानंतर** | | **वारंवारीतेतील बदल** | **टक्केवारीतील बदल** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **वारंवारिता** | **टक्केवारी** | **वारंवारिता** | **टक्केवारी** | | |
| असमाधाणी | ११ | २.९३ | १०८ | २८.७२ | ९७ | २५.७९ |
| समाधाणी | ३६५ | ९७.०७ | ३ | ०.८० | −३६२ | −९६.२७ |
| अत्यंत वाईट | ० | ०.०० | २६५ | ७०.४८ | २६५ | ७०.४८ |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** | **३७६** | **१००.००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

आकृती क्र. ४.२४

आर्थिक परिस्थितीचे तुलनात्मक वर्गीकरण




सारणी क्र. ४.४४ नुसार प्रकल्पग्रस्त व्यक्तीनां तुमची आर्थिक परिस्थिती कशी आहे असा प्रश्न विचारला असता धरणापूर्वी ११ प्रकल्पग्रस्त किंवा २.९३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी असमाधानी असल्याचे उत्तर दिले, तर धरण बांधणीनंतर यांच्या प्रमाणात वाढ होऊन ते १०८ झाले. म्हणजेच २८.७२ टक्के प्रकल्पग्रस्त असमाधानी आहेत, ते वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते, २५.७९ टक्के त्या असमाधानी प्रकल्पग्रस्त लोकांच्या प्रमाणात वाढ झाली. धरणापूर्वी ३६५ किंवा ९७.०७ टक्के प्रकल्पग्रस्त समाधानी होते, परंतु प्रकल्पबांधणीनंतर समाधानी असलेल्या लोकसंख्येत घट होऊन ती ३ किंवा ०.८० टक्के झाली. म्हणजे ९६.२७ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक परिस्थितीमध्ये समाधानाच्या पातळीत घट झालेली आहे. अत्यंत वाईट परिस्थिती असणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची धरणापूर्वी अर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट असणाऱ्या गटामध्ये शून्य प्रकल्पग्रस्त येतात. परंतु धरण बांधणीनंतर यामध्ये प्रचंड प्रमाणात

वाढ झालेली आहे. २६५ प्रकल्पग्रस्त म्हणजेच ७०.४८ टक्के प्रकल्पग्रस्त धरणानंतर अत्यंत वाईट आर्थिक परिस्थितीचा सामना करत आहेत.

**४.४ प्रकल्पग्रस्तांचे व्यावसायिक वर्गीकरण:** जलसिंचन प्रकल्पांच्या निर्मितीमधून हजारो कुटुंब विस्थापित होत असतात. या प्रकल्पामुळे सुध्दा शासकीय आकडेवारीनुसार सोळा हजार कुटुंबे विस्थापित झाली आहे. ही विस्थापित कुटुंबे प्रकल्प बांधणीपूर्वी कोणता व्यवसाय करीत होती? त्यां प्रकल्पग्रसतांना कोणत्या क्षेत्रात रोजगार उपलब्ध होता. कृषी, वनावर, बांधकाम क्षेत्र, इतर एखाद्या क्षेत्रात ते कार्य करीत होते. प्रकल्पाची निर्मिती झाल्याने प्रकल्पग्रस्तांना आपला व्यवसाय किंवा रोजगार सोडावा लागतो. कारण त्यांना विस्थापित केले जाते. प्रस्तुत प्रकरणांमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारावर व व्यवसायावर काय परिणाम झाला? त्यांच्या रोजगार विषयक काय समस्या आहेत? एकूणच त्यांच्या उपजीविकेवर काय परिणाम झाला? प्रकल्पग्रस्तांच्या उपजीविकेची आणि रोजगाराची साधने किती प्रमाणात कमी झाली आणि पुनर्वसित गावांमध्ये हे त्यांना शेकडा किती टक्के व्यवसाय किंवा रोजगार उपलब्ध आहे हे बघणे सुध्दा महत्वाचे असते, याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे.

### ४.४.१ कृषीवर आधारित (जोडधंदा) व्यवसायाचे तुलनात्मक वर्गिकरण:

शेळी–मेंढीपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मासेमारी या व्यवसायातून प्रकल्प बांधणीपूर्वी किती उत्पन्न मिळत होते? आणि या जोडधंद्याचा प्रकल्पग्रस्तांच्या विकासावर काय परिणाम होत होता? त्यांना किती उत्पन्न मिळत होते? आणि कोणकोणते कृषीवर आधारित प्रकल्पग्रस्त व्यवसाय करीत होते? या घटकांचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक असते. प्रकल्पापूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या व्यवसायाची काय परिस्थिती होती आणि प्रकल्पानंतर काय परिस्थिती झाली या घटकांचा अभ्यास तक्ता क्र. ३.४१ मध्ये केलेला आहे.

### सारणी. क्र. ४.४५


### कृषीवर आधारित (जोडधंदा) रोजगाराचे/ व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण

| कृषीवर आधारित रोजगार/ व्यवसाय | धरणबांधणी आणि पुनर्वसनापूर्वी | | धरणबांधणी आणि पुनर्वसनानंतर | | वारंवारितेतील बदल | टक्केवारितील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| शेळी/ मेंढी पालन | ६२ | १६.४९ | १९ | ५.०५ | −४३ | −११.४४ |
| कुक्कुटपालन | ५४ | १४.३६ | १४ | ३.७२ | −४० | −१०.६४ |
| मासेमारी | ३८ | १०.१० | १२ | ३.१९ | −२६ | −६.९१ |
| शिकार करणे | ८ | २.१३ | ० | ०.०० | −८ | −२.१३ |
| दुग्ध व्यवसाय | १७४ | ४६.२८ | १६ | ४.२६ | −१५८ | −४२.०२ |
| रोखमजुरी | ४० | १०.६४ | ३१५ | ८३.७८ | २७५ | ७३.१४ |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** | **३७६** | **१००.००** | **०** | **०.००** |

(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

### आकृती क्र. ४.२५

### कृषीवर आधारित (जोडधंदा) रोजगाराचे/ व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण



सारणी. क्र. ४.४५ नुसार प्राथमिक सर्वेक्षणात प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे पुनर्वसनापूर्वी कृषीवर आधारित रोजगार किंवा व्यवसायांच्या वर्गीकरणामध्ये शेळी किंवा मेंढी पालनाचा व्यवसाय किंवा त्यावर आधारित रोजगार करणारे प्रकल्पग्रस्त १६.४९ टक्के आहेत. तर कुक्कुटपालन करणाऱ्या प्रकल्पग्रस्त ५४ आहे, त्यांचे प्रमाण १४.३६ टक्के आहे. नदी किंवा नाल्याजवळ राहणारा ढिवर समाज मोठ्या प्रमाणात मासेमारी करीत होता, कारण त्यांची उपजीविका मासेमारी या व्यवसायावर आधारलेली होती. त्यांचे प्रमाण १०.१० टक्के होते. तर काही प्रमाणात प्रकल्पग्रस्त शिकार करीत होते. मुख्यता प्रकल्पग्रस्तांच्या शेतात येणाऱ्या जंगली जनावरांची आणि त्यातूनच ते आपली उपजीविका चालवत होते. त्यांचे प्रमाण २.१३ टक्के होते. दुग्ध व्यवसायामध्ये सर्वात जास्त लोकसंख्येचे प्रमाण आहे, ते ४६.२८ टक्के आहे, कारण शेती सोबत दुग्ध व्यवसाय करणे सोपे असते. शेतमजुरी म्हणजेच शेतीवर आधारित मजुरी करणे, यामध्ये ४० प्रकल्पग्रस्त समाविष्ट होते. त्यांचे प्रमाण १०.६४ टक्के आहे.

कृषीवर आधारित व्यवसायाच्या किंवा रोजगाराच्या वर्गीकरणामध्ये प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाच्या ठिकाणी शेळी किंवा मेंढी पालन करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची संख्या १९ झाली, म्हणजेच त्यांचे प्रमाण ५.५ टक्के तर कुक्कुटपालन करणारे व्यक्ती फक्त १४ राहिले, म्हणजेच ३.७२ टक्के झाले. मासेमारी या व्यवसायात ३.१९ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे आणि जंगलाची मोठ्या प्रमाणात कटाई झाल्यामुळे जंगली जनावरांचे प्रमाण त्या प्रकल्पग्रस्त भागात कमी झाल्यामुळे शिकार करणे या व्यवसायात एकही व्यक्ती आता कार्य करीत नाही. तर दुग्ध व्यवसायामध्ये ४.६ टक्के लोकसंख्या आणि रोख मजुरी किंवा मोलमजुरीचे प्रमाण फारच वाढले आहे हे पुनर्वसनानंतर ३१५ व्यक्ती म्हणजे ८३.७८ टक्के लोकसंख्या रोख मजुरी या रोजगारावर अवलंबून आहे.

कृषीवर आधारित एकूण रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या स्थितीची तुलना केली असता वारंवारितेमध्ये आणि एकूण टक्केवारीमध्ये मोठा बदल दिसतोय. शेळी किंवा मेंढी पालन करणाऱ्या व्यवसायात प्रकल्प बांधणीपूर्वी १६ टक्के कार्यरत होते परंतु प्रकल्प बांधणीनंतर या क्षेत्रात फक्त ५.०५ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे, यांचे प्रमाण ११.४४ टक्के कमी झाले, तर कुक्कुटपालन व्यवसायत प्रकल्पापूर्वी १४.३ टक्के लोकसंख्या कार्यरत होती आणि धरणानंतर

३.१ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे. कुक्कुटपालन व्यवसाय १०.६४ टक्के घट झालेली दिसते, तर मासेमारी या व्यवसायात पूर्वी आणि आजची तुलना केली असता ६.९१ टक्के घट झालेली आहे. सुरुवातीला प्रकल्प बांधण्यापूर्वी शिकार करणे या व्यवसायात २.१३ टक्के लोकसंख्या समाविष्ट होती, परंतु प्रकल्प बांधल्यानंतर जंगलांची मोठ्या प्रमाणात कटाई झाली आणि जंगली जनावरे नाहीशी झाली, त्यामुळे प्रकल्प बांधणीनंतर आता शिकार करणे या व्यवसायात एकही रोजगार शिल्लक राहिलेला नाही. दूध व्यवसायात प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने सहभागी होते. परंतु आता या व्यवसायात मोठ्या प्रमाणात घट झाली, ती घट ४२.०२ टक्के आहे, कारण हा व्यवसाय कृषीशी संबंधित होता, त्यामुळे ही घट जास्त झालेली आहे. पूर्वी रोख मजुरीमध्ये फक्त १०.६४ टक्के लोकसंख्या सहभागी होती. परंतु पुनर्वसनानंतर या रोजगारात बदल घडून आलेला आहे आणि आता ८३.७८ टक्के लोकसंख्या ही रोख मजुरी या रोजगारावर पूर्णपणे अवलंबून आहे. रोखमजुरी किंवा मोलमजुरी या क्षेत्रात ७३.१४ टक्के वाढ झालेली आहे. एकूणच रोजगाराच्या या क्षेत्रात प्रचंडपणे वाढ झालेली दिसते.

**४.४.२ कृषीवर आधारित रोजगार/ व्यवसायपासून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गिकरण**: कुठल्याही व्यवसायात किंवा रोजगारात उत्पन्नाला महत्वाचे स्थान असते. उत्पन्न आर्थिक विकासाच निर्देशांक आहे त्यामुळे उत्पन्नाशिवाय आर्थिक तुलना करणे शक्य होत नाही.

कृषीवर आधारित जोडधंदा ज्यामध्ये मासेमारी, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय आणि इतर व्यवसायातून त्यांना किती उत्पन्न मिळत होते? प्रकल्पग्रस्तांची यावरुन आर्थिक परिस्थिती लक्षात येते. उत्पन्न जास्त मिळते तितका त्या व्यक्तीचा विकास जलदगतीने होत असतो. शेतीसोबत जोडधंदा करणे हे शेतकऱ्यांना सहज शक्य असते आणि त्यातून शेतकरी उत्पन्न मिळवून आपली आर्थिक बाजू मजबूत करत असतात. खालील सारणी क्र. ३.४२ मध्ये याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## सारणी. क्र. ४.४६


## कृषीवर आधारित (जोडधंदा) रोजगार/ व्यवसायापासुन मिळनारे वार्षिक उत्पन्न

| कृषीशी संबंधित वार्षिक उत्पन्न | प्रकल्पापूर्वी व पुनर्वसनापूर्वी | | प्रकल्पानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारिता बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०–२५ हजार | ४७ | १२.५० | २४ | ६.३८ | –२३ | –६.१२ |
| २५–५० हजार | १३८ | ३६.७० | ३७ | ९.८४ | –१०१ | –२६.८६ |
| ५० हजार –१ लाख | १०६ | २८.१९ | ० | ०.०० | –१०६ | –२८.१९ |
| १–२ लाख | २० | ५.३२ | ० | ०.०० | –२० | –५.३२ |
| २–३ लाख | ९ | २.३९ | ० | ०.०० | –९ | –२.३९ |
| ३ लाखापेक्षा जास्त | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| रोख मजुरी | ४० | १०.६४ | २९९ | ७९.५२ | २५९ | ६८.८८ |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२६ | १६ | ४.२६ | ० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** | **३७६** | **१००.००** | **०** | **०.००** |

(स्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

## आकृती क्र. ४.२६

## कृषीवर आधारित (जोडधंदा) रोजगार/ व्यवसायापासुन मिळनारे वार्षिक उत्पन्न



सारणी. क्र. ४.४६ मध्ये प्रकल्पबांधणीपूर्वी किंवा पुनर्वसनपूर्वी प्रकल्पग्रस्तांना कृषीवर आधारित व्यवसाय किंवा रोजगारातून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नामध्ये ०–२५ हजार रुपये उत्पन्न मिळविणाऱ्या गटात १२.५ टक्के लोकसंख्या होती, तर २५–५० हजार रुपये या उत्पन्न गटात सर्वाधिक जास्त म्हणजेच ३६.७० टक्के प्रकल्पग्रस्त वार्षिक उत्पन्न मिळवित होती. ५० हजार ते १ लाख रुपये उत्पन्न मिळणारे १२२ व्यक्ती होते, म्हणजेच त्यांचे प्रमाण ३२.४५ टक्के इतके आहे. १–२ लाख रुपये उत्पन्न गटात ५.३२ टक्के प्रकल्पग्रस्त, तर २–३ लाख रुपये उत्पन्न गटात ९ प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांचे प्रमाण २.३९ टक्के आहे. ३ लाख रुपये उत्पन्नापेक्षा जास्त एकही व्यक्ती नाही म्हणजेच शून्य टक्के प्रमाण आहे. कृषी संबंधित व्यवसायात किंवा रोजगारात नसलेली लोकसंख्या ४० आहे, त्यांचे प्रमाण १०.६४ टक्के आहे. एकूणच कृषीशी संबंधित जोडधंदा म्हणून करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण जास्त आहे आणि त्यामुळे त्यांचे उत्पन्न सुध्दा वाढलेले होते.

प्रकल्पबांधणीनंतर पुनर्वसनाच्या ठिकाणी कृषीशी संबंधित व्यवसाय किंवा रोजगार करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण अत्यंत कमी झालेले आहे. २९३ प्रकल्पग्रस्तांना कुठल्याही प्रकारचा कृषीशी संबंधित व्यवयास किंवा रोजगार नाही, त्याचे प्रमाण ७७.९३ टक्के म्हणजेच सर्वात जास्त आहे. तर ०–२५ हजार या उत्पन्न गटात कृषी संबंधित व्यवसायातून उत्पन्न मिळणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ६.३८ टक्के आहे. २५–५० हजार रुपये उत्पन्न गटात ९.८४ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत व ५० हजार ते १ लाख रुपये उत्पन्न गटात १४ व्यक्ती आहेत, त्यांचे प्रमाण ३.७२ टक्के आहे. १–२ लाख रुपये उत्पन्न गटात २.१३ टक़्के प्रकल्पग्रस्त उत्पन्न मिळवितात. २–३ लाख रुपये व ३ लाख रुपयापेक्षा जास्त उत्पन्न गटात प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य आहे.

सारणी. क्र. ३.४६ मध्ये कृषीशी संबंधित व्यवसाय किंवा रोजगाराची उपलब्धता आणि त्यातून मिळणारे वार्षिक उत्पन्न दर्शविले आहे. कृषीशी संबंधित शेळी किंवा मेंढी पालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय म्हणजेच कृषीशी संबंधित जोडधंद्यापासून मिळणारे वार्षिक उत्पन्न त्यामध्ये ०–२५ हजार रुपये उत्पन्न गटात धरणांपूर्वी १२.५० टक्के लोकांना रोजगारातून उत्पन्न मिळत असे, परंतु धरणानंतर त्यांच्या प्रमाणात घट होऊन ते ६.३८ टक्के झाले म्हणजे एकूण

६.१२ टक्के या उत्पन्न गटात घट झाली, तर २५–५० हजार रुपये या उत्पन्न गटात पूर्वी १३८ आणि धरणानंतर ३७ म्हणजेच अनुक्रमे ३६.७० टक्क्यावरुन ९.८४ टक्के घट झाली आणि एकूण टक्केवारीत २६.८६ टक्के (३६.७०–९.८४ टक्के) या उत्पन्न गटात घट झालेली आहे. १–२ लाख उत्पन्न गटात ३.१९ टक्के झालेली आहे व २–३ लाख उत्पन्न गटात २.३९ टक्के घट आहे, तर ३ लाखापेक्षा जास्त उत्पन्न गटात काहीही बदल झालेला नाही. १०.६४ टक्के प्रकल्पग्रस्त धरणापूर्वी रोखमजुरी करीत होते, परंतु धरणानंतर त्यांच्या प्रमाणात प्रचंड वाढ झालेली आहे, ती म्हणजे ७७.९३ टक़्के आहे. धरणापूर्वी आणि धरणानंतर तुलना करता ६७.२९ टक्के (७७.९३–१०.६४) वाढ झालेली आहे. कारण ६७.२९ टक्के प्रकल्पग्रस्तांना कृषी संबंधित व्यवसाय किंवा रोजगार उपलब्ध नाही.

**४.४.३ शेती आणि शेती सोबत इतर व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण**: ग्रामीण भागामध्ये शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतीसोबतच इतर व्यवसाय सुध्दा मोठ्या प्रमाणात केले जातात. हल्ली शेतीचे प्रमाण हे फार कमी झालेले आहे. त्यामुळे शेतीसोबत मोलमजुरी, शेतमजुरी, वनमजुरी करणे किंवा इतर एखादा व्यवसाय करणे व आपली उपजिविका भागविणे ही सुध्दा एक गरज झालेली आहे.

**सारणी. क्र. ४.४७**

**शेती आणि शेती सोबत इतर व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण**


| जोडधंद्याचा प्रकार | प्रकल्पापुर्वी व पुनर्वसनापुर्वी | | प्रकल्पानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| शेती | ४७ | १२.५ | ७ | १.८६ | –४० | –१०.६४ |
| शेती आणि वनमजुरी | १३७ | ३६.४४ | २९ | ७.७१ | –१०८ | –२८.७३ |
| शेती आणि व्यवसाय (दुकान) | ४७ | १२.५० | १५ | ३.९९ | –३२ | –८.५१ |

| जोडधंद्याचा प्रकार | प्रकल्पापुर्वी व पुनर्वसनापुर्वी | | प्रकल्पानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| रोखमजुरी किंवा मोलमजुरी | ४० | १०.६४ | २५५ | ६७.८२ | २१५ | ५७.१८ |
| शेती आणि नोकरी | १० | २.६६ | २ | ०.५३ | –८ | –२.१३ |
| शेती आणि शेतमजुरी | ९५ | २५.२६ | ६८ | १८.०९ | –२७ | –७.१७ |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** | **३७६** | **१००.००** | **०** | **०.००** |

(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

**आकृती क्र. ४.२७**

**शेती आणि शेती सोबत इतर व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण**



सारणी. क्र. ४.४७ नुसार पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त व्यक्तीचे व्यवसायानुसार वर्गीकरण वरील तक्त्यात दर्शविले आहे, त्यामध्ये फक्त शेती हा व्यवसाय म्हणून करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण १२.५ टक्के आहे तर शेतीसोबत जंगलावर आधारीत वनमजुरी किंवा वनावर आधारीत व्यवसाय करणारे ३६.४४ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत. शेती आणि छोटे व्यवसाय म्हणजे सुतार, कुभांर, चहा टपरी, किराणा दुकान, न्हावी, सायकलदुरुस्तीचे दुकान इत्यादींमध्ये व्यवसाय करणारे १२.५० टक्के आहेत. रोखमजुरी किंवा मोलमजुरी करणारे प्रकल्पग्रस्त १०.६४ टक्के आहेत. शेती सोबत नोकरी जसे शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी क्षेत्रात काम करणारे १० प्रकल्प्रस्त आहेत म्हणजेच २.६६ टक्के आहेत. शेती आणि शेतमजुरी या गटात २५.२६ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत कारण प्रकल्पग्रस्तांना शेती फारच कमी प्रमाणात होती त्यामुळे ते इतर वेळात शेतमजुरी सुध्दा करत होते.

पुनर्वसनानंतर फक्त शेती व्यवसायामध्ये १.८६ टक्के प्रकल्पग्रस्त कार्य करतात. तर शेतीसोबत वनमजुरी किंवा वनावर आधारीत व्यवसाय करणाऱ्या प्रकल्पगग्रस्तांचे प्रमाण ७.७१ टक्के आहे. शेती आणि दुकान असा जोडधंदा करणारे प्रकल्पग्रस्त ३.९९ टक्के आहेत. पुनर्वसन किंवा धरणानंतर शेतमजुरी किंवा रोखमजुरी करणारे प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ६७.८२ टक्के आहे. शेती व नोकरीमध्ये ०.५३ टक्के प्रकल्पग्रस्त कार्यरत आहेत. शेती आणि शेतमजुरीत १८.०९ टक्के लोकसंख्या कार्यरत आहे.

धरणापूर्वी आणि धरणानंतरची तुलना करता शेती व्यवसायामध्ये १०.६४ टक्के, शेती आणि वनमजुरीमध्ये घट होऊन ते प्रमाण २८.७३ टक्के झाले. शेती व व्यवसायात सुध्दा घट होऊन ते प्रमाण ८.५१ टक्के झाले. शेतीसोबत दुकानाचा व्यवसाय करणारे त्यांचेही प्रमाण कमी होऊन ते ८.५१ टक्के झाले. परंतु रोखमजुरी व मोलमजुरी मध्ये प्रचंड वाढ झाली ती ५७.१८ टक्के आहे. कारण इतर क्षेत्रात रोजगार उपलब्ध नाही. त्यामुळे रोख मजुरीत वाढ झाली.

**४.४.४ शेती आणि शेतीसोबत इतर रोजगार किंवा व्यवसायातून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण**: वार्षिक उत्पन्नामध्ये प्रकल्पपूर्वी आणि प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नामध्ये किती वाढ किंवा घट झाली याचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे असते. खालील सारणी क्र. ४.४८ मध्ये ते दर्शविण्यात आले आहे.

## सारणी. क्र. ४.४८


## शेती आणि शेतीसोबत इतर रोजगार/व्यवसायापासुन मिळणारे वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण

| वार्षित उत्पन्न | प्रकल्पापुर्वी व पुनर्वसनापूर्वी | | प्रकल्पानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०–२५ हजार | १३ | ३.४६ | १२२ | ३२.४५ | १०९ | २८.९९ |
| २५–५० हजार | १३६ | ३६.१७ | १७२ | ४५.७४ | ३६ | ९.५७ |
| ५० हजार –१ लाख | ११३ | ३०.०५ | ४१ | १०.९० | –७२ | –१९.१५ |
| १–२ लाख | ५२ | १३.८३ | २२ | ५.८५ | –३० | –७.९८ |
| २–३ लाख | २२ | ५.८५ | ० | ०.० | –२२ | –५.८५ |
| ३–५ लाख | १२ | ३.१९ | २ | ०.५३ | –१० | –२.६६ |
| ५–१० लाख | १० | २.६६ | १ | ०.२७ | –९ | –२.३९ |
| १० लाखापेक्षा जास्त | ०२ | ०.५३ | ० | ०.०० | –२ | –०.५३ |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२६ | १६ | ४.२६ | ० | ०.०० |
| **एकूण** | ३७६ | **१००** | ३७६ | **१००** | ० | ०.०० |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

### आकृती क्र. ४.२८

### शेती आणि शेतीसोबत इतर रोजगार/व्यवसायापासुन मिळणारे वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण




प्रकल्पग्रस्तांचे शेती आणि शेती सोबत इतर रोजगार किंवा व्यवसायापासून मिळनारे वार्षिक उत्पन्न वरील सारणी क्रमांक ४.४८ दर्शविते. प्रकल्प बांधणीपूर्वी ज्या प्रकल्पग्रस्तांचे ०-२५ हजार वार्षिक उत्पन्न होते ते एकूण लोकसंख्येच्या ३.४६ टक्के इतके होते. तेच प्रमाण प्रकल्प बांधणीनंतर ३२.४५ टक्के इतके वधारले आहे. या दोहोतील वाढ २८.९९ टक्के इतकी आहे. शेकडा ३६.१७ टक्के लोकसंख्या प्रकल्प बांधणीपूर्वी २५-५० हजार उत्पन्न कमवणारी होती. ती प्रकल्प बांधणीनंतर ४५.७४ टक्के एवढी वाढली त्यातील बदल ९.५७ टक्के इतका आहे. ५० हजार ते १ लाख या उत्पन्न गटातील ३०.०५ टक्के लोकसंख्या प्रकल्पापूर्वीची होती, त्यात प्रकल्पानंतर बदल होऊन १०.९० टक्के घटली. या टक्केवारीतील बदलात १९.१५ टक्के घट आहे.

प्रकल्पापूर्वी १–२ लाख वार्षिक उत्पन्न गटाचे प्रमाण १३.८३ टक्के होते ते प्रकल्पानंतर मात्र ५.८५ टक्के इतक्यावर आले. यातील घट ७.९८ टक्के इतकी आहे. ५.८५ टक्के प्रकल्पग्रस्तांचा उत्पन्न गट २–३ लाखातील वाटा होता. तोच प्रकल्प बांधणीनंतर शून्य आहे. बदलाची टक्केवारी उणे ५.८५ टक्के आहे. ३–५ लाख वार्षिक उत्पन्न गटातील प्रकल्पग्रस्ताचे प्रमाण प्रकल्प बांधणीपूर्वी ३.१९ टक्के होते तेच प्रकल्पानंतर ०.५३ टक्के खाली आहे. त्या टक्केवारीतील घट २.६६ टक्के आहे. ५–१० लाख उत्पन्नवाटा असलेल्या गटाचे प्रमाण २.६६ टक्के होते तेच प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ०.२७ टक्के इतके कमी झाले म्हणजे २.३९ टक्के ने कमी झाले. १० लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेला गट ०.५३ टक्के प्रकल्पग्रस्तांचा होता तो प्रकल्प बांधणीनंतर शून्य झाला. त्या बदलातील फरक ०.५३ टक्के मात्र कमी आहे. उत्तर देऊ न शकलेल्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण एकूण लोकसंख्येपैकी अनुक्रमे ४.२६ टक्के आहे.

**४.४.५ वनावर आधारित रोजगाराचे किंवा व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण:** या वर्गीकरणामध्ये पुनर्वसनापूर्वी वनावर आधारित कोणते व्यवसाय प्रकल्पग्रस्त करीत होते आणि पुनर्वसनानंतर कोणकोणते व्यवसाय करीत आहेत, या घटकांचा अभ्यास केलेला आहे. त्यावरुन प्रकल्पग्रस्तांच्या वनावर आधारित व्यवसायाची किंवा रोजगाराची परिस्थिती समजून येते. जंगलापासून आपल्याला महत्त्वपूर्ण वनसंपत्ती मिळते. वनावर आधारित व्यक्तींना रोजगार उपलब्ध होते किंवा वनावर आधारित व्यवसाय करीत असतात. त्यापासून आपली उपजिविका चालवित असतात. पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त वनावर आधारित कोणता व्यवसाय करीत होते त्यांचा अभ्यास खालील त्तत्यामध्ये दिलेला आहे.

**सारणी क्र. ४.४९**


**वनावर आधारीत रोजगाराचे/व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण**

| **वनावर आधारित रोजगार** | **धरणापूर्वी व पुनर्वसनापूर्वी** | | **धरणानंतर व पुनर्वसनानंतर** | | **वारंवारीतेतील बदल** | **वारंवारीतेतील बदल** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **वारंवारिता** | **टक्केवारी** | **वारंवारिता** | **टक्केवारी** | | |
| बीडीपत्ती (तेंदुपत्ता) | ४२ | ३०.६६ | २२ | १६.०६ | −२० | −१४.६ |
| मोरी, गवत, काळ्या विकणे | २४ | १७.५२ | ४ | २.९२ | −२० | −१४.६ |
| झाडांची कटाई करणे, काड्या फोड्णे | १२ | ८.७६ | ० | ०.०० | −१२ | −८.७६ |
| डिंक, मोह, टोरी गोळा करणे | २७ | १९.७१ | २ | १.४६ | −२५ | −१८.२५ |
| कचर, कवट, चार, चिंच, खिरन्या विकणे | ३२ | २३.३६ | १ | ०.७३ | −३१ | −२२.६३ |
| वनावर आधारीत रोजगार मिळत नाही | ० | ०.०० | १०८ | ७८.८३ | १०८ | ७८.८३ |
| **एकुण** | **१३७** | **१००.००** | **१३७** | **१००.००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

## आकृती क्र. ४.२९

## वनावर आधारित रोजगाराचे/व्यवसायाचे तुलनात्मक वर्गीकरण




सारणी क्रमांक ४.४९ मध्ये वनावर किंवा जंगलावर आधारित रोजगारामध्ये धरण बांधण्यापूर्वी १३७ म्हणजेच ३६.४४ टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्या रोजगारात किंवा व्यवसायात समाविष्ट होती. धरण बांधणीनंतर ते प्रमाण फक्त ७.७१ टक्के (३६.४४-२८.७३) राहिले म्हणजेच २८.७३ टक्के प्रकल्पग्रस्तांच्या वनावर आधारित व्यवसायात किंवा रोजगार घट झाली आहे. पुनर्वसनाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे जंगल पहायला मिळत नाही त्यामुळे सुध्दा मोठ्या प्रमाणात रोजगारात घट झालेली दिसून येते. पुनर्वसनानंतर किंवा धरणबांधणीनंतर बीडीपत्ती व्यवसायात १६.०६ टक्के प्रकल्पग्रस्त काम करीत. पुनर्वसनापूर्वी ३०.३६ टक्के या व्यवसायात काम करीत होते. या बीडीपत्ती व्यवसायाच्या प्रमाणामध्ये १४.६ (१६.०६-३०.३६=-१४.६) टक्के घट झाली. मोळी विकणे किंवा गवत विकणे यावर आधारित व्यवसायात धरणापूर्वी २४ लोकसंख्येला रोजगार मिळत होता त्यांचे प्रमाण १७.५२ टक्के होते, परंतु पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे प्रमाण कमी होऊन ४ झाले म्हणजे २.९२ टक्के झाले. काड्या फोडणे जंगलातील मोठमोठ्या झाडांच्या काही प्रमाणात छोट्या झाडांच्या

जाळण्याकरिता काळ्यांचा, लाकडाचा उपयोग होतो काळ्या फोडण्याचे काम प्रकल्पग्रस्त व्यक्ती पुनर्वसनापूर्वी करत होते, त्यांचे प्रमाण ८.७६ टक्के होते. पुनर्वसनानंतर शून्य टक्के राहिले. म्हणजे ८.७६ टक्क्यांनी छोट्या झाडांची कटाई करण्याच्या प्रमाणामध्ये घट झाली. प्रकल्प बांधणीनंतर पुनर्वसनाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे जंगल नसल्यामुळे झाडांची कटाई करणे या क्षेत्रात रोजगार शिल्लक राहिलेला नाही. डिंक, मोह गोळा करणे, विकणे या व्यवसायात किंवा रोजगारात पूर्वी १९.७१ टक्के प्रकल्पग्रस्त सहभागी होते परंतु प्रकल्पानंतर या क्षेतात फक्त १.४६ टक्के लोकसंख्या कार्यरत राहिली. या रोजगाराच्या प्रमाणात घट होऊन १८.२५ टक्के झाले तर खिरण्या, चिंच, कवट, चार विकणे या व्यवसायात २३.३६ टक्के प्रकल्पग्रस्त सहभागी होते. पुनर्वसनानंतर ०.७३ टक्के लोकसंख्या शिल्लक राहिली. यांच्याही प्रमाणात घट होऊन ते २२.६३ टक्के इतके झाले तर १०८ लोकसंख्या अशी आहे की पुनर्वसनापूर्वी ते जंगलावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय करत नव्हती. आता पुनर्वसनानंतर जंगलावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय शिल्लक राहिलेला नाही.

**४.४.६ वनावर आधारित व्यवसायात स्त्री–पुरुषांचे प्रमाण:** स्त्री–पुरुषांचे प्रमाण कोणत्याही व्यवसायात किंवा रोजगारात असते. साधारणत: वनावर आधारित व्यवसायात किंवा रोजगारात स्त्रियांचे प्रमाण भारतामध्ये पुरुषांच्या तुलनेने जास्त दिसते. कारण स्त्रिया वनावर आधारित मोळी विकणे, गवत विकणे किंवा इतर व्यवसाय करीत असतात. वनावर आधारित व्यवसायातून उत्पन्न मिळविणे आणि त्या उत्पन्नावर आपली उपजीविका भागविणे याचे स्पष्टीकरण तक्ता क्र. ४.५० मध्ये दर्शविले आहे.

**सारणी क्र. ४.५०**


**वनावर आधारित व्यवसायात स्त्री–पुरुषांचे प्रमाण**

| स्त्री/पुरुष | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| स्त्री | ११० | ८०.२९ |
| पुरुष | २७ | १९.७१ |
| एकूण | १३७ | १०० |
| वनावर आधारित व्यवसायात स्त्री–पुरुष प्रमाण: पुरुष १०००: स्त्रिया ४०७४.०७ | | |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.३०**

**वनावर आधारित व्यवसायात स्त्री–पुरुषांचे प्रमाण**




सारणी क्र. ४.५० मध्ये वनावर किंवा जंगलावर आधारित व्यवसाय किंवा रोजगारामध्ये ११० स्त्रिया तर, २७ पुरुष लोकसंख्या आहे. एकूण ३७६ पैकी १३७ व्यक्ती वनावर आधारित व्यवसाय करीत होते. पुरुषांचे १९.७१ टक्के तर स्त्रियांचे ८०.२९ टक्के प्रमाण आहे. म्हणजे पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण चौपट आहे. वनावर आधारित व्यवसायात १००० पुरुषांमध्ये ४०७४.०७ स्त्रिया व्यवसाय करतात.

**४.४.७ तालुकानिहाय वनावर आधारित व्यवसायाची तुलनात्मक उपलब्धता:** वनावर आधारित व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न आणि वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगारावर आपली उपजीविका भागविणे या परिस्थितीचा अभ्यास खालील सारणी क्र. ४.५१ मध्ये तालुकानिहाय करण्यात आलेला आहे.

**सारणी. क्र. ४.५१**


**तालुकानिहाय वनावर आधारित व्यवसायाची तुलनात्मक उपलब्धता**

| तालुका | पुनर्वसनापूर्वी सरासरी व्यवसाय | पुनर्वसनानंतर सरासरी व्यवसाय | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|
| कुही | २.३१ | १.२० | −१.११ |
| भिवापूर | २.२६ | ०.४० | −१.८६ |
| पवनी | ३.२० | ०.२७ | −२.९३ |
| भंडारा | २.६१ | ०.९५ | −१.६६ |
| सावरी | २.१० | ०.१० | −२.०० |
| **एकूण** | **२.५** | **०.५८** | **−१.९२** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.३१**

**तालुकानिहाय वनावर आधारित व्यवसायाची तुलनात्मक उपलब्धता**




सारणी क्र. ४.५१ मध्ये पुनर्वसनापूर्वी आणि पुनर्वसनानंतर तालुकानिहाय वनावर आधारित व्यवसायाची उपलब्धता दर्शविली आहे. कुही तालुक्यामध्ये पुनर्वसनापूर्वी सरासरी २.३१ व्यक्तीं वनावर आधारित व्यवसाय करीत होते. परंतु पुनर्वसनानंतर त्याच तालुक्यात फक्त १.२० व्यक्तींना वनावर आधारित व्यवसाय शिल्लक राहिला. कुही तालुक्यात १.११ व्यक्तींच्या व्यवसायात किंवा रोजगारात घट झालेली आहे. भिवापुर तालुक्यात पूर्वी २.२६ प्रकल्पग्रस्त कुटुंबांना वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार उपलब्ध होता. पुनर्वसनानंतर

फक्त ०.४० कुटुंबांना रोजगार उपलब्ध आहे. म्हणजे एकूण सरासरी १.८६ भिवापूर तालुक्यात प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या रोजगारात घट झालेली आहे. पवनी तालुक्यात पुनर्वसनापूर्वी ३.२० प्रकल्पग्रस्त वनावर आधारित व्यवसाय करीत होते. पुनर्वसानंतर सरासरी १.२० प्रकल्पग्रस्त कुटुंबांना वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार शिल्लक राहीला म्हणजे सरासरी २.९३ प्रकल्पग्रस्तांच्या व्यवसायात घट झाली. भंडारा तालुक्यात पूर्वी २.६१ प्रकल्पग्रस्त व्यवसायात होते तर पुनर्वनानंतर फक्त ०.९५ व्यक्तींना वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार उपबल्ध आहे, म्हणजेच प्रत्येक कुटुंबातून सरासरी १.६६ प्रल्पग्रस्तांच्या रोजगारात घट झालेली आहे. सावरी तालुक्यात धरणापूर्वी २.१० प्रकल्पग्रस्त व्यवसायात होते तर धरणानंतर फक्त ०.१० प्रकल्पग्रस्तांना वनावर आधारित व्यवसाय उपलब्ध झाला. एकूण पाचही तालुक्यात पुनर्वसनापूर्वी सरासरी प्रत्येक कुटुंबातील २.५ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय उपलब्ध होता. पुनर्वसनानंतर फक्त ०.५८ प्रकल्पग्रस्तांना वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार उपलब्ध आहे. या व्यवसायात एकूण सरासरी १.९२ प्रकल्पग्रस्तांची रोजगारात घट झालेली आहे. याचे मुख्य कारण पुनर्वसनाच्या ठिकाणी अपेक्षेप्रमाणे जंगल उपलब्ध नाही.

**४.४.८ वनावर आधारित व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची तुलनात्मक स्थिती:** वनावर आधारित लोकसंख्येला जे वनसंपत्ती पासून उत्पन्न मिळते त्या उत्पन्नाचा त्यांच्या आर्थिक जीवनावर परिणाम होत असतो. वनावर आधारित उतपन्न काही आदिवासी समाजातील लोकांचा किंवा ग्रामीण भागातील लोकांचा महत्वाचा स्रोत असतो. खालील सारणी क्र. ३.५२ मध्ये वनावर आधारित व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या तुलनात्मक स्थितीचे वर्गीकरण दर्शविले आहे.

**सारणी. क्र. ४.५२**


**वनावर आधारित व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची तुलनात्मक स्थिती**

| वनावर आधारीत व्यवसायातून मिळालेले उत्पन्न | धरणापूर्वी व पुनर्वसनापूर्वी | | धरणानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारीतेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०–२५ हजार | १८ | १३.१४ | २१ | १५.३३ | ३ | २.१९ |
| २५–५० हजार | ९२ | ६७.१५ | ८ | ५.८४ | –८४ | –६१.३१ |
| ५० हजार –१ लाख | २१ | १५.३३ | ० | ०.०० | –२१ | –१५.३३ |
| १–२ लाख | ६ | ४.३८ | ० | ०.०० | –६ | –४.३८ |
| २–३ लाख | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| ३–५ लाख | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| वनावर आधारीत रोजगार मिळत नाही | ० | ०.०० | १०८ | ७८.८३ | १०८ | ७८.८३ |
| **एकूण** | **१३७** | **१००** | **१३७** | **१००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

## आकृती क्र. ४.३२

## वनावर आधारित व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नाची तुलनात्मक स्थिती




सारणी क्रमांक ४.५२ वरुन धरणबांधणी व पुनर्वसनापूर्वी ०-२५ हजार रुपये उत्पन्न मिळविणाऱ्या गटात १८ प्रकल्पग्रस्त आहेत त्यांचे प्रमाण १३.१४ टक्के आहे, तर धरणबांधणी व पुनर्वसनानंतर ०-२५ हजार रुपये त्याच उत्पन्न गटात १५.३३ टक्के प्रकल्पग्रस्त येतात. त्यामुळे या उत्पन्न गटात २.१९ (१५.३३-१३.१४) टक्क्यांनी वाढ झालेली आहे, तर २५-५० हजार रुपये या उत्पन्न गटात धरणापूर्वी ९२ प्रकल्पग्रस्त कार्यरत होते. त्यांचे एकूण प्रमाण ६७.१५ टक्के होते तर धरणबांधणीनंतर फक्त ८ प्रकल्पग्रस्त या उत्पन्न गटात येतात, त्यांचे प्रमाण फक्त ५.८४ टक्के आहे. या उत्पन्न गटात ६१.३१ टक्क्यांनी घट झालेली दिसते. ५० हजार ते १ लाख रुपये उत्पन्न गटात धरणापुर्वी २१ प्रकल्पग्रस्त रोजगारात समाविष्ट होते. त्यांचे प्रमाण १५.३३ टक्के होते. धरणानंतर ते शून्य टक्के झाले म्हणजेच १५.३३ टक्क्यांनी या उत्पन्न गटात घट झालेली आहे. १-२ लाख उत्पन्न गटात धरणापूर्वी ४.३८ टक्के प्रकल्पग्रस्तांना रोजगार होता परंतु धरणानंतर या उत्पन्न गटात शून्य टक्के प्रकल्पग्रस्त आहेत म्हणजे या उत्पन्न गटात ४.३८ टक्के घट झालेली दिसते. पुनर्वसनापूर्वी ज्या प्रकल्पग्रस्तांना वनावर आधारीत रोजगार मिळत होता. आवश्यकता नव्हती त्या वन व्यवसायावर किंवा रोजगारावर ते आधारीत नव्हते त्यांचे प्रमाण शून्य टक्के आहे. पुनर्वसनानंतर १०८ प्रकल्पग्रस्त कार्य करण्यास इछुक आहेत. त्यांना

वनावर आधारित रोजगार मिळत नाही. म्हणजेच ७८.८३ टक्के प्रकल्पग्रस्त असे आहेत की त्यांना वनावर आधारित रोजगार पाहिजे. वनाअभावी पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार मिळत नाही. एकूणच प्रकल्पबांधणीनंतर वनावर आधारित व्यवसायात किंवा रोजगारात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे.

**४.४.९ सर्व क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण:** प्रकल्पग्रस्त व्यक्तींच्या दृष्टिकोनातून त्या व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न महत्वाचे असते. उत्पन्न ही उपजिविका भागविण्याकरीता महत्वाचा स्त्रोत आहे. सारणी क्र. ४.५३ मध्ये प्रकल्पग्रस्तांना सर्वच क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक अध्ययन करण्यात आले आहे.

**सारणी. क्र. ४.५३**


**सर्व क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण**

| सर्व क्षेत्रातून मिळनारे एकूण वार्षिक उत्पन्न | प्रकल्पापुर्वी व पुनर्वसनापूर्वी | | प्रकल्पानंतर व पुनर्वसनानंतर | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०–२५ हजार | ८ | २.१३ | ८१ | २१.५४ | ७३ | १९.४१ |
| २५–५० हजार | ४० | १०.६४ | १६६ | ४४.१५ | १२६ | ३३.५१ |
| ५० हजार–१ लाख | १४० | ३७.२३ | १०७ | २८.४६ | –३३ | –८.७७ |
| १–२ लाख | ७५ | १९.९५ | २ | ०.५३ | –७३ | –१९.४२ |
| २–३ लाख | ३५ | ९.३१ | ० | ०.०० | –३५ | –९.३१ |
| ३–५ लाख | २७ | ७.१८ | ३ | ०.८० | –२४ | ६.३८ |
| ५–१० लाख | २२ | ५.८५ | १ | ०.२७ | –२१ | –५.५८ |
| १० लाख पेक्षा जास्त | १३ | ३.४६ | ० | ०.०० | –१३ | –३.४६ |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२५ | १६ | ४.२५ | ०.०० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००.००** | **३७६** | **१००.००** | **०** | **०.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

**आकृती क्र. ४.३३**

**सर्व क्षेत्रातून मिळनारे एकूण वार्षिक उत्पन्नाचे तुलनात्मक वर्गीकरण**




प्रकल्पग्रस्तांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्नाचा वरील तक्ता क्रमांक ४.५३ पाहिला असता त्यामध्ये चढउतार झाला आहे. ज्या प्रकल्पग्रस्तांचे ०-२५ हजार वार्षीक उत्पन्न होते ते एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात २.१३ टक्के इतके होते. तेच प्रकल्पबांधणीनंतर मात्र २१.५४ टक्के इतके वधारले आहे. या दोहोतील फरक किंवा वाढ १९.४१ टक्के इतकी आहे. शेकडा १०.६४ टक्के लोकसंख्या प्रकल्प बांधणीपूर्वी २५-५० हजार उत्पन्न कमवणारी होती. ती प्रकल्पबांधणीनंतर ४४.१५ टक्के एवढी वाढली. त्यातील वाढ किंवा बदल ३३.५१ टक्के इतकी आहे. ५० हजार ते १ लाख या उत्पन्न गटातील ३७.२३ टक्के लोकसंख्या प्रकल्पापूर्वीची होती, त्यात बदल होऊन प्रकल्पानंतरची लोकसंख्या २८.४६ टक्के वाढली, या टक्केवारीतील घट ८.७७ टक्के आहे. १-२ लाख वार्षीक उत्पन्न गटाचे प्रमाण १९.१५ टक्के होते ते बांधणीनंतर मात्र ०.५३ टक्के इतक्यावर आले. यातील घट १९.४२ टक्के आहे. ९.३१ टक्के शेकडा उत्पन्न गट २-३ लाखातील वाटा होता. तोच प्रकल्पबांधणीनंतर शून्य आहे. बदलाच्या टक्केवारीत ९.३१ टक्के घट आहे. ३-५ लाख वार्षिक उत्पन्न गटातील प्रकल्पग्रस्ताचे प्रमाण प्रकल्प बांधणीपूर्वी ९.४० टक्के होते, ते प्रकल्प बांधणीनंतर ०.८० टक्के खाली आहे. त्यातील घट ८.६ टक्के आहे. ५-१० लाख उत्पन्नवाटा असलेल्या गटाचे प्रमाण ५.८५ टक्के होते, ते

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ०.२७ इतके कमी झाले म्हणजे ५.५६ टक्के ने कमी झाले. १० लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेला गट ३.४६ टक्के होता. तो प्रकल्पबांधणीनंतर शून्य झाले. त्यातील फरक ३.४६ टक्के आहे. उत्तर देऊ न शकलेल्या प्रकल्पग्रस्ताचे प्रमाण एकूण लोकसंख्येपैकी अनुक्रमे ४.२६ टक्के आहे.

**सारणी क्र. ४.५४**

**प्रकल्पापूर्वी प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे तालुकानिहाय सर्व क्षेत्रातून मिळनारे एकूण वार्षिक उत्पन्न**

| | | ०-२५ हजार | २५-५० हजार | ५० हजार - १ लाख | १-२ लाख | २-३ लाख | ३-५ लाख | ५-१० लाख | १० लाखापेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | २ | १२ | ४४ | २४ | ११ | १० | ८ | ४ | ५ | १२० |
| | टक्केवारी | १.६७ | १०.०० | ३६.६७ | २०.०० | ९.१७ | ८.३३ | ६.६७ | ३.३३ | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | २ | ८ | ३१ | १६ | ७ | ६ | ५ | २ | ३ | ८० |
| | टक्केवारी | २.५० | १०.०० | ३८.७५ | २०.०० | ८.७५ | ७.५० | ६.२५ | २.५ | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | १ | ६ | १० | १० | ४ | ३ | २ | १ | ३ | ४० |
| | टक्केवारी | २.५० | १५.०० | २५.०० | २५.०० | १०.०० | ७.५० | ५.०० | २.५ | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | २ | ११ | ४२ | १८ | ९ | ६ | ४ | ४ | ४ | १०० |
| | टक्केवारी | २.०० | ११.०० | ४२.०० | १८.०० | ९.०० | ६.०० | ४.०० | ४.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | १ | ३ | १३ | ७ | ४ | २ | ३ | २ | १ | ३६ |
| | टक्केवारी | २.७८ | ८.३३ | ३६.११ | १९.४४ | ११.११ | ५.५६ | ८.३३ | ५.५६ | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **८** | **४०** | **१४०** | **७५** | **३५** | **२७** | **२२** | **१३** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **२.१३** | **१०.६४** | **३७.२३** | **१९.९५** | **९.३१** | **७.१८** | **५.५८** | **३.४६** | **४.२५** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे सारणी क्र.४.५४ वरुन पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे वार्षिक उत्पन्नावरुन आर्थिक परिस्थिती लक्षात येते. प्राथमिक सर्वेक्षणात २५ हजार ते १० लाख अशी मर्यादा दिसून येते. आपली माहिती न देणारे प्रकल्पग्रस्तांची टक्केवारीही नमूद केली आहे. एकूण पाच तालुक्यातील प्रकल्पग्रस्तांचे शेती, व्यवसाय, मजुरी सेवा या सर्व

क्षेत्रातून येणारे उत्पन्न हे वरीलप्रमाणे आहे. उत्पन्नाची संसाधने व मार्ग हे प्रकल्पामुळे बाधित झाले. कुही तालुक्यात एकूण वार्षिक उत्पन्नाची सरासरी पाहता ०–२५ हजार या उत्पन्न गटातील टक्केवारी १.६७ टक्के, २५–५० हजार १८.३३ टक्के, ५० हजार ते १ लाख ३६.६७ टक्के, १–२ लाखापर्यंतचे २० टक्के, २–३ लाख उत्पन्न असलेले ९.१७ टक्के, ३–५ लाख या गटातील ७.५० टक्के, ५–१० लाखापर्यंतचे १.६७ टक्के आणि १० लाखापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेली कुटुंबसंख्या ०.८३ टक्के टक्के आहे, तर उत्तर देऊ न शककेल्या कुटुंबांची ४.१७ टक्के संख्या आहे.

भिवापूर तालुक्यात ०–२५ हजार रुपये या गटात २.५० टक्के, २५–५० हजार या गटातील टक्केवारी १८.७५ टक्के, तर ५० हजार ते १ लाख या गटाची शेकडा टक्केवारी ३८.७५ टक्के आहे. १–२ लाख या उत्पन्न गटाची २० टक्के, २–३ लाखात ८.७५ टक्के, ३–५ लाख ७.५० टक्के आणि ५–१० लाख आणि १० लाखापेक्षा जास्त उत्पन्नगटाची टक्केवारी शून्य आहे. उत्तर देऊ न शकलेली कुटुंबांची टक्केवारी ३.७५ आहे.

उत्पन्न १–२ लाख या गटामध्ये सर्वाधिक टक्केवारी पवनी तालुक्यातील आहे ती २५ टक्के इतकी आहे. ०–२५ हजार गटात २.५० टक्के, २५–५० हजार गटात २२.५० टक्के, ५० हजार ते १ लाखापर्यंत २५ टक्के, २–३ लाखात १० टक्के, ३–५ लाख गटातील ७.५० टक्के तर ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त उत्पन्न गटाची टक्केवारी शून्य टक्के आहे. उत्तर देऊ न शकलेल्या कुटुंबांची सर्वात जास्त टक्केवारी एकट्या पवनी तालुक्यात ती ७.५० टक्के आहे.

एकूण तालुक्यातील पाचपैकी भंडारा तालुक्यात ५० हजार ते १ लाख या गटातील उत्पन्न घेणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची टक्केवारी सर्वात जास्त ४२ टक्के इतकी आहे, १–२ लाखात १८ टक्के, २५–५० हजारात १७ टक्के, ०–२५ हजार २ टक्के, २–३ लाखापर्यंत ९ टक्के, ३–५ लाखात ६ टक्के, ५–१० लाखापर्यंत २ टक्के, लोकसंख्या आहे, तर उत्तर देऊ न शकलेल्या कुटुंबांची टक्केवारी ४ टक्के आहे.

सावरी तालुक्याची टक्केवारी शेकडा २.७८ टक्के लोक ०–२५ हजार गटात आहेत. २५–५० हजार गटात १९.४४ टक्के, ५० हजार ते १ लाखापर्यंत ३६.११ टक्के, तर १–२ लाख गटात १९.४४ टक्के, २–३ लाखापर्यंत ११.११ टक्के आहेत. ३–५ लाखाची टक्केवारी ८.३३

टक्के आहे. ५–१० लाख आणि १० लाखापेक्षा जास्त उत्पन्न शून्य टक्के लोकांचे आहे. सर्वेक्षणात उत्तर न दिलेल्या कुटुंबांची टक्केवारी २.७८ टक्के इतकी आहे. एकूण वार्षिक उत्पन्न सरासरी ५० हजार ते १ लाख रुपयांचे असलेल्या कुटुंबांची संख्या जास्त आहे.

**सारणी क्र. ४.५५**

**प्रकल्पानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे तालुकानिहाय सर्व क्षेत्रातून मिळनारे एकूण वार्षिक उत्पन्न**

| | | ०–२५ हजार | २५–५० हजार | ५० हजार – १ लाख | १–२ लाख | २–३ लाख | ३–५ लाख | ५–१० लाख | १० लाखापेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | २४ | ५६ | ३२ | १ | ० | १ | १ | ० | ५ | १२० |
| | टक्केवारी | २०.०० | ४६.६७ | २६.६७ | ०.८३ | ०.०० | ०.८३ | ०.८३ | ०.०० | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | १८ | ३४ | २४ | ० | ० | १ | ० | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | २२.५० | ४२.५० | ३०.०० | ०.०० | ०.०० | १.२५ | ०.०० | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | ११ | १४ | १२ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४० |
| | टक्केवारी | २७.५० | ३५.०० | ३०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | २० | ४५ | २९ | १ | ० | १ | ० | ० | ४ | १०० |
| | टक्केवारी | २०.०० | ४५.०० | २९.०० | १.०० | ०.०० | १.०० | ०.०० | ०.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | ८ | १७ | १० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | २२.२२ | ४७.२२ | २७.७८ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **८१** | **१६६** | **१०७** | **२** | **०** | **३** | **१** | **०** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **२१.५४** | **४४.१५** | **२८.४६** | **०.५३** | **०.००** | **०.८०** | **०.२७** | **०.००** | **४.२५** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

वरील सारणी. क्र. ४.५५ मध्ये उपलब्ध झालेल्या आकडेवारीवरुन प्रकल्पग्रस्तांचे कौटुंबिक उत्पन्न लक्षात येते. येथे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाल्यानंतर त्यामध्ये मिळालेली आकडेवारी लक्षात घेता चढ–उतार झाल्याचे दिसून येते. एकूण पाच तालुक्याची उत्पन्नाची टक्केवारी कमी होताना दिसते.

कुही तालुक्यातील २० टक्के कुटुंबे ही ०–२५ हजार उत्पन्नाच्या गटातील आहेत. २५–५० हजार उत्पन्न गटात वारंवारिता अधिक आहे. येथे ४६.६७ टक्के उत्पन्न अधोरेखित झाली आहे. ५० हजार ते १ लाख शेकडा २६.६७ टक्के कुटुंबांचे उत्पन्न आहे. २–३ लाख या गटात शून्य टक्के कुटुंबे आहेत. १–२ लाख, ३–५ लाख आणि ५–१० लाख या गटातील कुटुंबे ०.८३ टक्के आहेत. उत्तर न दिलेले ४.१७ टक्के कुटुंबे आहेत.

भिवापूर तालुक्यात १–२ लाख, २–३ लाख, ५–१० लाख व १० लाखापेक्षा जास्त या उत्पन्न गटातील कुटुंबांची टक्केवारी शून्य आहे. ३–५ लाखापर्यंत १.२५ टक्के, ०–२५ हजारापर्यंत २२.५० टक्के, २५–५० हजारात ४२.५० टक्के तर ५० हजार ते १ लाखापर्यंत ३० टक्के आहेत. उत्तर न दिलेली कुटुंबे ३.७५ टक्के आहेत.

पवनी तालुक्यातील उत्पन्न मर्यादा एक लाखापर्यंतची आहे. ०–२५ हजार या गटात २७.५० टक्के, २५–५० हजारात ३५ टक्के आणि ५० हजार ते १ लाखापर्यंतची ३० टक्के कुटुंबे पवनी तालुक्यात आहेत. उत्तर देऊ न शकलेली सर्वाधिक ७.५ टक्के कुटुंबे येथील आहेत. १–२, २–३, ३–५ आणि ५–१० व १० लाखापेक्षा जास्त गटाची टक्केवारी शून्य आहे.

भंडारा तालुक्यात शेकडा ४५ टक्के कुटुंबे ही वार्षिक २५–५० हजार रुपये गटातील आहे. २० टक्के कुटुंबे ०–२५ हजार, ५० हजार ते १ लाखापर्यंतची २९ टक्के कुटुंबे, १–२ आणि ३–५ लाख या गटातील प्रत्येकी १ टक्के आहेत. २–३, ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेली शून्य टक्के कुटुंबे आहेत. उत्तर न दिलेली ४ टक्के कुटुंबे ही भंडारा तालुक्यातील आहेत.

सरासरी सर्वात जास्त उत्पन्न सावरी तालुक्यात २५–५० हजार रुपये या गटाची टक्केवारी ४७.२२ टक्के आहे. ५० हजार –१ लाख गटात २७.७८ टक्के तर ०–२५ हजार यामध्ये २२.२ टक्के कुटुंबे आहेत. पुढील चारही गटाची टक्केवारी शून्य आहे. उत्तरे न देऊ केलेली कुटुंबे २.७८ टक्के आहेत.  एकूण शेकडा टक्केवारीचा विचार करता २५–५० हजार रुपये उत्पन्न गटातील कुटुंब ४४.१५ टक्के आहे.

**४.४.१० एकूण वार्षिक खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण:** उपभोग उत्पन्नावर अवलंबू असतो. तसंच एखाद्या व्यक्तीचा खर्च हा त्या व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असतो. उत्पन्न जास्त मिळत

असेल तर खर्च सुध्दा वाढत जातो आणि उत्पन्न कमी झाले तर खर्चाचे प्रमाण सुध्दा कमी होत जाते. प्रकल्प बांधण्यापूर्वी प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचा वार्षिक खर्च किती होता आणि प्रकल्प बांधल्यानंतर त्याच प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचा वार्षिक खर्च किती झाला याचा अभ्यास सारणी क्र. ४.५६ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे.

**सारणी. क्र. ४.५६**


**एकूण वार्षिक खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण**

| एकूण वार्षिक खर्च (रुपये) | प्रकल्पापूर्वी वार्षिक खर्च | | प्रकल्पानंतर वार्षिक खर्च | | वारंवारितेतील बदल | टक्केवारीतील बदल |
|---|---|---|---|---|---|---|
| | वारंवारिता | टक्केवारी | वारंवारिता | टक्केवारी | | |
| ०-२५ हजार | ८ | २.१३ | १४१ | ३७.५० | १३३ | ३५.३७ |
| २५-५० हजार | ४८ | १२.७७ | १५९ | ४०.१६ | १११ | २७.३९ |
| ५० हजार -१ लाख | ११४ | ३०.३२ | ५७ | १५.१६ | -५७ | -१५.१६ |
| १-२ लाख | ९८ | २६.०६ | २ | ०.५३ | -९६ | -२५.५३ |
| २-३ लाख | ५९ | १५.६९ | १ | ०.२७ | -५८ | -१५.४२ |
| ३-५ लाख | २६ | ६.९१ | ० | ०.०० | -२६ | -६.९१ |
| ५-१० लाख | ७ | १.८६ | ० | ०.०० | -७ | -१,८६ |
| १० लाखापेक्षा जास्त | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| उत्तर न दिलेले | १६ | ४.२६ | १६ | ४.२६ | ० | ०.०० |
| **एकूण** | **३७६** | **१००** | **३७६** | **१००** | ० | ०.०० |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

## आकृती क्र. ४.३४

## एकूण वार्षिक खर्चाचे तुलनात्मक वर्गीकरण




सारणी क्र. ४.५६ मध्ये प्रकल्पापूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या एकूण खर्चाच्या वर्गीकरणामध्ये शेकडा २.१३ टक्के लोकसंख्या ०–२५ हजार गटातील आहे. २५–५० हजार रुपये दरम्यान सर्वात जास्त लोकसंख्या १२.७७ टक्के इतकी आहे. प्रकल्पबांधणीनंतर मात्र हे प्रमाण अनुक्रमे ३७.५० टक्के आणि ४०.१६ टक्के इतके वाढले आहे. या टक्केवारीतील वाढ अनुक्रमे ३५.३७ टक्के आणि २७.३९ टक्के टक्के इतकी सर्वाधिक आहे. ५० हजार ते १ लाख गटामध्ये प्रकल्पापूर्वी ३०.३२ टक्के वार्षिक खर्च करणारे लोक होते, प्रकल्पबांधणीनंतर १५.१६ टक्के इतक्या खाली आले, यातील घट १५.१६ टक्के झाली.

१–२ लाख गटामध्ये प्रकल्पापुर्वी २६.०६ टक्के वार्षिक खर्च करणारे लोक होते. प्रकल्पबांधणीनंतर ०.५३ टक्के झाले. या दोहोतील फरकाची घट २५.५३ टक्के एवढी निचांकी झाली आहे. २–३ लाख गटातील पूर्वीचा वाटा १५.६९ टक्के तर नंतरचा ०.२७ टक्के आहे यातील फरकामध्ये १५.४२ टक्के घट आहे. ३–५ लाख वार्षिक खर्च करणारे प्रकल्पापूर्वीची लोकसंख्या ६.९१ टक्के होती. ती प्रकल्पानंतर मात्र शून्य झाली आहे. म्हणजेच ६.९१ टक्के हा फरक किंवा घट आहे. ५–१० लाख खर्चाच्या वर्गीकरणात प्रकल्प बांधणपूर्वी १.८६ टक्के प्रमाण होते. तेच प्रकल्प बांधणीनंतर शून्य झाले. यातील झालेला बदल १.८६ टक्के इतका आहे. १०

लाखापेक्षा जास्त खर्च करणारे प्रकल्प्रगस्तांचे प्रमाण प्रकल्पापूर्वी व प्रकल्पानंतरही शून्यच आहे. उत्तरे देऊ न शकलेले प्रकल्प्रगस्त हे ३.५२ टक्के आहेत.

**सारणी क्र. ४.५७**

**तालुकानिहाय प्रकल्पापूर्वी कुटुंबाचे वार्षिक खर्चाचे (रुपये) वर्गीकरण**

| | | ०-२५ हजार | २५-५० हजार | ५० हजार - १ लाख | १-२ लाख | २-३ लाख | ३-५ लाख | ५-१० लाख | १० लाखापेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | २ | १४ | ४२ | ३० | १८ | ७ | २ | ० | ५ | १२० |
| | टक्केवारी | १.६७ | ११.६७ | ३५.०० | २५.०० | १५.०० | ५.८३ | १.६७ | ०.०० | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | २ | ९ | २३ | २५ | १२ | ५ | १ | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | २.५० | ११.२५ | २८.७५ | ३१.२५ | १५.०० | ६.२५ | १.२५ | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | १ | ७ | ११ | ५ | ८ | ४ | १ | ० | ३ | ४० |
| | टक्केवारी | २.५० | १७.५० | २७.५० | १२.५० | २०.०० | १०.०० | २.५० | ०.०० | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | २ | १२ | २९ | ३१ | १४ | ६ | २ | ० | ४ | १०० |
| | टक्केवारी | २.०० | १२.०० | २९.०० | ३१.०० | १४.०० | ६.०० | २.०० | ०.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | १ | ६ | ९ | ७ | ७ | ४ | १ | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | २.७८ | १६.६७ | २५.०० | १९.४४ | १९.४४ | ११.११ | २.७८ | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **८** | **४८** | **११४** | **९८** | **५९** | **२६** | **७** | **०** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **२.१३** | **१२.७७** | **३०.३२** | **२६.०६** | **१५.६९** | **६.९१** | **१.८६** | **०.००** | **४.२६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी. क्र. ४.५७ मध्ये उपलब्ध झालेल्या प्राथमिक आकडेवारीवरुन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनापूर्वी वार्षिक खर्चाचे तालुकानिहाय वर्गीकरणात शेकडा टक्केवारी पाहता कुही तालुक्यात ०-२५ हजार रुपये गटात खर्च करणारी प्रकल्पग्रस्तांची संख्या १.६७ टक्के, तर २५-५० हजार गटामध्ये ११.६७ टक्के लोक खर्च करतात. ५० हजार ते १ लाखापर्यंत ३५ टक्के, १-२ लाखापर्यंत २५ टक्के, २-३ लाखादरम्यान १५ टक्के, ३-५ लाख गटात ५.८३ टक्के, ५-१० लाखापर्यंत खर्च करणारी लोकसंख्या १.६७ टक्के आहे. १० लाखापेक्षा जास्त खर्च करणारे कुणीही नव्हते. प्रश्न विचारल्यास उत्तर देऊ न शकणारे ४.१७ टक्के लोक दिसून येतात.

भिवापूर तालुक्यामध्ये ०–२५ हजार गटात २.५० टक्के, २५–५० हजारी ११.२५ टक्के तर ५० हजार –१ लाखापर्यतचे २८.७५ टक्के लोकसंख्या आहे. १–२ लाखापर्यंत ३१.२५ टक्के, २–३ लाखात १५ टक्के, ३–५ लाखापर्यंत ६.२५ टक्के आणि ५–१० लाखादरम्यान १.२५ टक्के शेकडा लोकसंख्या खर्च करतांना दिसते. १० लाखापेक्षा जास्त खर्च करणारे शून्य लोक या तालुक्यात आहेत. तर ३.७५ टक्के लोकसंख्या उत्तर न दिलेली आहे.

२.५० टक्के लोकसंख्या पवनी तालुक्यात ०–२५ हजारापर्यंत खर्च करणारी आहे. एकूण पाच तालुक्यात २५–५० हजारापर्यंत खर्च करणारे सर्वात जास्त प्रकल्पग्रस्त होते. ते १७.५० टक्के आहेत. ५० हजार ते १ लाखापर्यंत २७.५० टक्के, १–२ लाख गटात १२.५० टक्के, २–३ लाख गटात २० टक्के, ३–५ लाख गटात १० टक्के तर ५–१० लाखापर्यंत २.५० टक्के लोकसंख्या आहे. १० लाखापेक्षा खर्चाची क्षमता शून्य लोकसंख्येची आहे. उत्तर देऊ न शकणारी लोकसंख्या ही सर्व तालुक्यात ७.५० टक्के ही सर्वोच्च आहे. भंडारा तालुक्यातमध्ये ०–२५ हजारापर्यंत खर्च करणारे २ टक्के प्रल्पग्रस्त आहेत. २५–५० हजारापर्यंत १२ टक्के, ५० हजार–१ लाखापर्यंत २९ टक्के, १–२ लाखापर्यंत ३१ टक्के तर २–३ लाख गटात १४ टक्के लोकसंख्या आहे. ३–५ या गटात ६ टक्के, ५–१० लाखापर्यंत खर्च करणारे २ टक्के, १० लाखापेक्षा जास्त खर्च करणारे शून्य प्रकल्पग्रस्त, तर उत्तर न दिलेले ४ टक्के प्रकल्पग्रस्त लोकसंख्या आहे.

सावरी तालुक्यामध्ये २.७८ टक्के लोकसंख्या ०–२५ हजारापर्यंत वार्षिक खर्च करणारे आहेत. २५–५० हजार या गटात १६.६७ टक्के तर ५० हजार ते १ लाखापर्यंत २५ टक्के प्रकल्पग्रस्त, १–२, २–३ लाखात प्रत्येकी १९.४४ टक्के, ३–५ लाख दरम्यान ११.११ टक्के, ५–१० लाखापर्यंत २.७८ टक्के प्रकल्पग्रस्त खर्च करतात. १० लाखापेक्षा शून्य टक्के लोक खर्च करतात. प्रश्न विचारले असता २.७८ टक्के लोकसंख्येने उत्तर दिले नाही. पुनर्वसनापूर्वी शेकडा ३०.३२ टक्के लोकसंख्या सरासरी पाहता ५० हजार ते १ लाख या गटात वार्षिक खर्चाचे नियोजन करतांना दिसते.

## सारणी क्र. ४.५८

## प्रकल्पानंतर तालुकानिहाय कुटुंबाचे वार्षिक खर्चाचे (रुपये) वर्गीकरण

| | | ०–२५ हजार | २५–५० हजार | ५० हजार – १ लाख | १–२ लाख | २–३ लाख | ३–५ लाख | ५–१० लाख | १० लाखापेक्षा जास्त | उत्तर न दिलेले | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कुही | वारंवारिता | ५० | ४७ | १६ | १ | १ | ० | ० | ० | ५ | १२० |
| | टक्केवारी | ४१.६७ | ३९.१७ | १३.३३ | ०.८३ | ०.८३ | ०.०० | ०.०० | ०.०० | ४.१७ | १००.०० |
| भिवापूर | वारंवारिता | २९ | ३५ | १३ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ८० |
| | टक्केवारी | ३६.२५ | ४३.७५ | १६.२५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ३.७५ | १००.०० |
| पवनी | वारंवारिता | ११ | १८ | ८ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४० |
| | टक्केवारी | २७.५० | ४५.०० | २०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ७.५० | १००.०० |
| भंडारा | वारंवारिता | ३७ | ४४ | १४ | १ | ० | ० | ० | ० | ४ | १०० |
| | टक्केवारी | ३७.०० | ४४.०० | १४.०० | १.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ४.०० | १००.०० |
| सावरी | वारंवारिता | १४ | १५ | ६ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३६ |
| | टक्केवारी | ३८.८९ | ४१.६७ | १६.६७ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | २.७८ | १००.०० |
| **एकूण** | | **१४१** | **१५९** | **५७** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **१६** | **३७६** |
| **एकूण टक्केवारी** | | **३७.५०** | **४०.१६** | **१५.१६** | **०.५३** | **०.२७** | **०.००** | **०.००** | **०.००** | **४.२६** | **१००.००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

सारणी क्र. ४.५८ नुसार पुनर्वसनानंतर एकूण तालुकानिहाय कुटुंबाचे वार्षिक खर्चाचे नियोजनाचे वर्गीकरण करताना कुही तालुक्यात १ रुपया ते २५ हजारापर्यंत खर्च करणारा गट ४१.६७ टक्के लोकसंख्येचा आहे. त्याखालोखाल ३९.१७ टक्के लोकसंख्या २५–५० हजारापर्यंत खर्च करते. ५० हजार ते १ लाखादरम्यान १३.३३ टक्के लोकसंख्या, १–२ आणि २–३ लाख या गटात ०.८३ टक्के प्रकल्पग्रस्त खर्चाचे नियोजन करतात. ३–५, ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त खर्च करणारे शून्य टक्के लोकसंख्या आहे. उत्तर देऊ न शकलेले ४.१७ टक्के प्रकल्पग्रस्त आहेत.

भिवापूर तालुक्यात पुनर्वसनानंतर ०–२५ हजारादरम्यान खर्च करणारे प्रकल्पग्रस्त ३६.२५ टक्के तर २५–५० हजारापर्यंत ४३.७५ टक्के लोकसंख्या आढळून येते. ५० हजार ते १ लाख या दरम्यान १६.२५ टक्के लोकसंख्या आहे. पुढील १–२, २–३, ३–५, ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्येची टक्केवारी शून्य आहे. उत्तर न देऊ केलेले ३.७५ टक्के लोक आहेत.

पवनी तालुकानिहाय टक्केवारी पाहिल्यास ०–२५ हजार या गटात २७.५० टक्के, २५ ते ५० हजार या गटात ४५ टक्के तर ५० हजार ते १ लाखापर्यंत २० टक्के लोकसंख्या वार्षिक खर्चाचे नियोजन करते. गट १–२ लाख, २–३, ३–५, ५–१० आणि १० लाखापेक्षा जास्त या गटातील खर्चाचे प्रमाण शून्य टक्के आहे. सर्वाधिक ७.५० टक्के प्रकल्पग्रस्त पवनी तालुक्यातील प्रश्न विचारल्यास उत्तरे न दिलेले आहेत.

भंडारा तालुक्यात देखील २ लाखापर्यंतच प्रकल्पग्रस्तांच्या खर्चाचे प्रमाण मिळते. यामध्ये शेकडा ०–२५ हजारात ३७ टक्के लोकसंख्या, २५–५० हजारी ४४ टक्के, ५० हजार–१ लाखार्पंत खर्च करणारे १४ टक्के तर १–२ लाखापर्यंत १ टक्के लोकसंख्या खर्च करते. २–३, ३–५, ५–१० व १० लाख रुपयापेक्षा जास्त या गटाची टक्केवारी शून्य आहे. या तालुक्यात उत्तर न दिलेली ४ टक्के लोकसंख्या आहे.

सावरी तालुक्यात १–१० लाखापेक्षा जास्त या दरम्यानच्या पाचही गटात शून्य टककेवारी दर्शविते. प्रश्न विचारल्यास सर्वेक्षणा दरम्यान उत्तर देऊ न केलेले २.७८ टक्के लोकसंख्या या तालुक्याची आहे. सर्वसाधारणपणे ०–२५ हजार या गटात ३८.८९ टक्के, २५–५० हजारात १.६७ टक्के तर ५० हजार–१ लाख या गटात १६.६७ टक्के प्रकल्पग्रस्तांची पुनर्वसनानंतर खर्च करणारी लोकसंख्या आहे.

**४.४.११ प्रकल्पबांधणीमुळे झालेल्या आर्थिक फायदा व तोट्यांचे वर्गीकरण:** एखाद्या जलसिंचन प्रकल्पाची निर्मिती करणे आणि त्या प्रकल्पबांधणीमुळे झालेल्या आर्थिक फायद्याचे वर्गीकरण करणे म्हणजेच या प्रकल्पामुळे आर्थिक फयदा होतो की किती तोटा होतो याची शहानिशा करणे. साधारणतः लाभार्थी क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या शेतकऱ्यांना प्रकल्पाचा फायदा होतो, तर

प्रकल्पग्रस्तांना तोटा सहन करावा लागतो. खालील सारणी क्र. ४.५९ मध्ये या घटकांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**सारणी क्र. ४.५९**

**प्रकल्पबांधणीमुळे झालेल्या आर्थिक फायद्यांचे वर्गीकरण**

| गोसीखुर्द धरणामुळे आर्थिक फायदा झाला आहे काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | ३७४ | ९९.४७ |
| होय | ०२ | ०.५३ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

गोसीखुर्द प्रकल्पामुळे आर्थिक फायदा झाला काय? वरील सारणी. क्र. ४.५९ मध्ये असा प्रश्न प्रकल्पग्रस्त लोकसंख्येला विचारण्यात आला. त्यामध्ये एकूण ३७६ प्रकल्पग्रस्तांपैकी ३७४ लोकसंख्येनी म्हणजेच ९९.४७ टक्के लोकसंख्येनी स्पष्टपणे नाही असे उत्तर दिले. तर फक्त २ म्हणजेच ०.५३ टक्के लोकसंख्येनी आर्थिक फायदा झाल्याचे मान्य केले.

## ४.४.१२ तालुकानिहाय रोजगाराची तुलनात्मक स्थिती:

पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार किती होता? पुनर्वसनानंतर सरासरी रोजगार किती झाला? सरासरी रोजगारामध्ये किती वाढ किंवा घट झाली हे आर्थिक दृष्टिकोनातून बघणे आवश्यक आहे. खालील सारणी क्र. ४.६० मध्ये पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्तांचा सरासरी रोजगार किती होता आणि पुनर्वसनानंतर सरासरी रोजगार किती झाला हे दर्शविण्यात आलेले आहे.

**सारणी. क्र. ४.६०**


**तालुकानिहाय प्रकल्पग्रस्त कुटुंबातील रोजगाराची तुलनात्मक स्थिती**

| तालुका | धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार | धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार | प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगारात झालेला बदल |
|---|---|---|---|
| कुही | ३.३१ | २.६ | −०.७१ |
| भिवापूर | ३.२६ | १.२ | −२.०६ |
| पवनी | ४.२५ | १.१ | −३.१५ |
| भंडारा | ३.७५ | १.२६ | −२.४९ |
| सावरी | २.९५ | १.२५ | −१.७० |
| **एकूण** | **३.५** | **१.८२** | **−१.६८** |

(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)

**आकृती क्र. ४.३५**

**तालुकानिहाय रोजगाराची तुलनात्मक स्थिती**




सारणी क्र. ४.६० नुसार तालुकानिहाय रोजगाराची स्थिती दर्शविली आहे. पुनर्वसनापूर्वी कुही तालुक्यात कुटुंबातील सरासरी ३.३१ प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध होता आणि पुनर्वसनानंतर त्यांचे प्रमाण कमी होऊन ते २.६ झाले. म्हणजेच सरासरी रोजगारीत

०.७१ टक्के घट झालेली आहे. भिवापूर तालुक्यात धरणापूर्वी ३.२६ कुटुंबांतील प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध होता. धरणानंतर सरासरी रोजगार १.२ झाला म्हणजेच सरासरी २.०६ प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारात घट झाली. पवनी तालुक्यात ४.२५ कुटुंबातील प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध होता. पुनर्वसनानंतर फक्त १.१ लोकांना रोजगार शिल्लक राहिला. म्हणजेच ३.१५ सरासरी रोजगारात घट झाली. भंडारा तालुक्यात पूर्वी ३.७५ प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध होता, तर पुनर्वसनानंतर १.२६ प्रकल्पग्रस्तांना रोजगार शिल्लक राहीला. त्यामध्ये २.४९ प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारात घट झाली. तर सावरी तालुक्यात धरणापूर्वी २.९५ प्रकल्पग्रस्तांना सरासरी रोजगार होता. परंतु पुनर्वसनानंतर १.२५ प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध आहे. म्हणजेच सरासरी १.७० व्यक्तींच्या रोजगारात घट झालेली आहे. एकूणच ३.५ प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनापूर्वी रोजगार उपलब्ध होता, परंतु फक्त १.८२ व्यक्तींना पुनर्वसनानंतर सरासरी रोजगार उपलब्ध आहे. म्हणजेच धरणापूर्वी आणि धरणानंतरची तुलना केल्यास एकूण सरासरी १.६८ प्रकल्पग्रस्तांच्या रोजगारात घट झालेली आहे.

**४.५ प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा अभ्यास:** देशाच्या ५० वर्षाच्या इतिहासात विकासाच्या व देशहिताच्या नावाखाली हे विस्थापन आणि पुनर्वसन करण्यात आले, परंतु त्याचा फटका बहुतांशी गरीब, शेतकरी, आदिवासी, दलित आणि जंगलातील वस्तूंवर आपला उपभोग भागविणारी लोकसंख्या यांनाच बसला. त्यांच्या पुनर्वसनाची अत्यंत हेळसांड झाली. विकासासाठी विस्थापन अगदीच आवश्यक असेल किंवा अनिवार्य असेल तरच विस्थापितांचे सुयोग्य पुनर्वसन हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात देशात अनेक कायदे पारित करुन देखील देशातील सरकारी यंत्रणेकडे विस्थापितांचे पुनर्वसन करण्यासाठी आवश्यक ती इच्छाशक्ती आणि क्षमता नाही की काय अशी आजची स्थिती आहे. एका बाजूने देशाच्या विकासाच्या नावाखाली काही थोड्यांनी स्वतःचा विकास घडवून आणला मात्र दुसऱ्या बाजूने ज्या विस्थापितांचे जीवन उद्धवस्त करण्यात आले. त्यांना खरे तर त्यांच्या विस्थापित होण्याआधीच्या राहणीमानाची सुयोग्य व योग्य ती न्याय भरभाई पर्यायी राहणीमानाच्या स्वरुपात द्यावयास हवी परंतु प्रत्यक्षात असे करतांना दिसत नाही. [१]

**४.५.१ पुनर्वसन कसे असावे?** वरील बाबींना लक्षात घेऊन केरनेया (१९९०) म्हणतात, By its very nature, displacement is a disruptive and painful process. Economically

and culturally it creats a high risk of chronic improverishment that typically occurs along one or several of the following dimensions, landlessness, joblessness, homelessness, marginalisation, food insecurity, morbidity and social disarticulation." [(2)]

**ऑसफोर्ड शब्दकोसामधल्या पुनर्वसन** (Rehabilitation) या शब्दाचा अर्थ "To restore to original" म्हणजे त्यांना पूर्वी प्रमाणेच सोयी उपलब्ध करुन देणे हे देखील पूर्ण होत नाही म्हणून फार कमी प्रमाणात चांगल्या सोई उबलब्ध केल्या जातात. उपजिविकेचे प्रश्न सोडविल्या जात नाहीत. यात भारतातील सर्व प्रकल्पांची निर्मिती झाल्यानंतर हे प्रश्न तसेच निरुत्तर आहेत.

**४.५.२ पुनर्वसनाचे शासनाचे धोरण:** (Government Policy of Rehabilitation): प्रकल्पग्रस्तांसाठी सरकारी धोरणाप्रमाणे (Section–14) जमीनीचे वाटप या प्रकल्पासाठी केल्या गेले. महाराष्ट्राच्या प्रकल्प बाधितासाठी केलेल्या पुनर्वसनाच्या (१९९९) कायद्यानुसार गावठाणांमध्ये १३ सोयी करुन दिल्या आहेत. [(३)]

**सारणी क्र. ४.६१**

**१९९९ कायद्यानुसार पुनर्वसित गावठणांमध्ये १३ सोयी**

| पुनर्वसित गावठाणांमध्ये (१९९९) कायद्यानुसार १३ सोयी करुन दिल्या आहेत काय? | | उत्तम | समाधानकारक | असमाधानकारक | अत्यंत वाईट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १) पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी, विंघन विहीरी | वारंवारिता | ० | ७२ | १८३ | २५ | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | २५.७१ | ६५.३६ | ८.९३ | १००.०० |
| २) शाळा व त्यात क्रीडांगण | वारंवारिता | १४८ | १३२ | ० | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ५२.८६ | ४७.१४ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ३) समाजासाठी मंदिर | वारंवारिता | २४४ | ३६ | ० | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ८७.१४ | १२.८६ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ४) अंतर्गत जोडरस्ते व मुख्य रस्ते | वारंवारिता | १२८ | १५२ | ० | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ४५.७१ | ५४.२९ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ५) वीज व्यवस्था | वारंवारिता | २६३ | १७ | ० | ० | २८० |

| पुनर्वसित गावठाणांमध्ये (१९९९) कायद्यानुसार १३ सोयी करुन दिल्या आहेत काय? | | उत्तम | समाधानकारक | असमाधानकारक | अत्यंत वाईट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | शेकडा प्रमाण | ९३.९३ | ६.०७ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ६) स्मशानाची जागा | वारंवारिता | २६८ | १२ | ० | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ९५.७१ | ४.२९ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ७) सांडपाण्याची जागा | वारंवारिता | १६६ | ११४ | ० | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ५९.२९ | ४०.७१ | ०.०० | ०.०० | १००.०० |
| ८) सार्वजनिक प्रसाधनगृह | वारंवारिता | ० | ० | २१२ | ६८ | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | ०.०० | ७५.७१ | २४.२९ | १००.०० |
| ९) जनावरांसाठी जागा (shed) | वारंवारिता | ० | ० | २४९ | ३१ | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | ०.०० | ८८.९३ | ११.०७ | १००.०० |
| १०) महाराष्ट्र राज्य रस्ता निगमामार्फ त बससेवा व बस स्थानक | वारंवारिता | २० | २५१ | ९ | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ७.१४ | ८९.६४ | ३.२२ | ०.०० | १००.०० |
| ११) चराई जमीन | वारंवारिता | ० | ११६ | १५२ | १२ | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | ४१.४३ | ५४.२८ | ४.२९ | १००.०० |
| १२) कुरण जमीन (झर्रीीीश डरपव) | वारंवारिता | ० | १३५ | १२५ | २० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | ४८.२१ | ४४.६५ | ७.१४ | १००.०० |
| १३) गावातील विस्तार योजनांसाठी व वावरासाठी जागा. | वारंवारिता | ० | १४९ | १३१ | ० | २८० |
| | शेकडा प्रमाण | ०.०० | ५३.२१ | ४६.७९ | ०.०० | १००.०० |

पुनर्वसित गावांमध्ये एकूण २८० प्रकल्पग्रस्त समाविष्ट आहेत. पुनर्वसित गावठाणामध्ये १९९९ च्या कायद्यानुसार प्रकल्पग्रस्तांना करिता ज्या १३ सोई करुन दिलेल्या आहेत त्याचे स्पष्टीकरण सारणी क्रमांक ४.६१ मध्ये दर्शविण्यात आले आहे. पुनर्वसित गावांमध्ये पाण्याकरिता विहीर किंवा बोरिंग निर्माण केले आहे. यामध्ये २५.७१ टक्के प्रकल्पग्रस्त समाधानी आहेत तर ६५.३६ टक्के असमाधानकारक आहेत. ८.५ टक्के प्रकल्पग्रस्तांनी पाण्याची परिस्थिती

अत्यंत वाईट आहे हे दर्शविले आहे. कारण गावामध्ये नळाची पाईपलाईन जरी असली तरी आठवड्यातून फक्त एक किंवा दोनदा नळाला पाणी येते. ते सुध्दा फक्त एक किंवा दोन तासासाठी पाणी येते. त्यामुळे पुनर्वसित गावांमध्ये पिण्याच्या पाण्यावरुन प्रकल्पग्रस्त असमाधानी आहेत. शाळा व त्याचे क्रीडांगण यामध्ये ५२.८६ टक्के प्रकल्पग्रस्तांनी उत्तम परिस्थिती आहे असे सांगितले. ४७.१४ टक्के प्रकल्पग्रस्त समाधानी आहेत. असमाधानी किंवा अत्यंत वाईट परिस्थिती म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य आहे. पुनर्वसित गावांमध्ये मंदिराची सोय केलेली आहे. पुनर्वसित गावांमध्ये ८७.१४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी समाजासाठी मंदिराची सोय उत्तम आहे तर १२.१६ टक्के प्रकल्पग्रस्तांनी समाधानकारक आहे हे दर्शविले. असमाधानकारक आणि अत्यंत वाईट परिस्थिती असणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. अंतर्गत जोड रस्ते व मुख्य रस्ते बांधकामामध्ये सुध्दा प्रकल्पग्रस्त समाधानकारक असण्याचे प्रमाण ५४.२९ टक्के आहे. उत्तम सोय म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ४५.७९ टक्के आहे आणि असमाधानकारक व अत्यंत वाईट यांचे प्रमाण शून्य टक्के आहे. म्हणजे पुनर्वसित गावात अंतर्गत जोड रसते व मुख्य रस्ते यांची व्यवस्था आणि बांधकाम चांगल्या प्रकारे केलेले आहे हे स्पष्ट होते. प्रत्येक पुनर्वसित गावांमध्ये विद्युत खांब निर्माण करुन प्रत्येक घरामध्ये वीज देण्याची व्यवस्था केलेली आहे. ९३.९३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी ही व्यवस्था उत्तम आहे हे दर्शविले तर ६.०७ टक्के प्रकल्पग्रस्तांनी वीज व्यवस्था समाधानकारक आहे हे सांगितले. असमाधानकारक व अत्यंत वाईट असणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. स्मशानाची जागा प्रकल्पग्रस्त गावांमध्ये म्हणजे पुनर्वसित गावांमध्ये स्मशानाकरिता शासनाने शेड निर्माण करुन दिलेले आहेत. ९५.७१ टक्के प्रकल्पग्रस्तांनी स्मशानाच्या जागेकरिता दिलेले शेड याची व्यवस्था उत्तम असल्याचं सांगितले. ४.२९ टक्के प्रकल्पग्रस्त समाधानकारकता दर्शविली. निवड केलेल्या २८० प्रकल्पग्रस्तामधून १६६ पकल्पग्रस्तांनी म्हणजे ५९.२९ टक्के पकल्पग्रस्तांनी सांडपाण्याची व्यवस्था उत्तम असे स्पष्ट केले. तर ११४ प्रकल्पग्रस्तांनी सांडपाण्याची व्यवस्था समाधानकारक आहे हे सांगितले. त्यांचे प्रमाण ४०.७१ टक्के आहे तर असमाधानकारक व अत्यंत वाईट परिस्थिती म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. पुनर्वसन गावांमध्ये सार्वजनिक प्रसाधनगृह अंतर्गत प्रश्न प्रकल्पग्रस्तांना विचारण्यात आला. तेव्हा ७५.७१ टक्के

प्रकल्पग्रस्तांनी असमाधानकारक असल्याचे म्हटले तर २४.२९ टक्के प्रकल्पग्रस्तांनी सार्वजनिक प्रसाधनगृहाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे दर्शविले. जनावरांसाठी जागा किंवा शेड कुठल्याही पुनर्वसन गावांमध्ये जनावरांसाठी शेडची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे ८८.९३ टक्के असमाधानकारक व ११.०७ टक्के प्रकल्पग्रस्तांनी जनावरांसाठी शेड किंवा जागा असण्याच्या परिस्थितीला अत्यंत वाईट दर्शविले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ता निगम मार्फत बससेवा व बसस्थानक योग्य आहे उत्तम आहे हे म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ७.१४ टक्के आहे तर ८९.६४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी बस सेवा व बस स्थानक असमाधानकारक असल्याचे स्पष्ट केले. चराई जमीन म्हणजेच ज्या जमिनीवर गुराढोरांना, जनावरांना चराईकरिता सोडले जाते म्हणजेच या जमिनीपासून प्रकल्पग्रस्त आपल्या गुराढोरांना चारा मिळवून देत असतात. या जमिनीमध्ये ४१.४३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी समाधानकारक आहोत असे म्हटले. तर ५४.२८ टक्के प्रकल्पग्रस्तांनी असमाधानकारक आहोत असे दर्शविले. ४.२९ टक्के प्रकल्पग्रस्तांनी अत्यंत वाईट परिस्थिती चराईच्या जमिनीची आहे हे सांगितले. कुरण जमिनीची परिस्थिती उत्तम आहे अशा म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. ४८.२१ टक्के प्रकल्पग्रस्तांनी कुरण जमीन पुनर्वसित गावांमध्ये समाधानकारक आहे हे सांगितले तर ४४.६५ टक्के प्रकल्पग्रस्तांनी कुरण जमिनीबाबत असमाधानकारक आहोत असे म्हटले. ७.१४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी कुरणाच्या जमिनीची परिस्थिती अत्यंत वाईट आहे हे सांगितले. पुनर्वसित गावांमध्ये विस्तार योजनांसाठी व वावरासाठी जागा, झुडपी जंगल आढळले. त्यामुळे वावरासाठी जागा व विस्तार योजनांसाठी जागा उत्तम आहे अशा म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. समाधानकारक आहोत म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ५३.२१ टक्के आहे आणि ४६.५९ टक्के असमाधानकारक आहेत. तर अत्यंत वाईट परिस्थिती असणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण शून्य टक्के आहे. म्हणजे गावातील विस्तार योजनांसाठी व वावरांसाठी काही प्रमाणात जागा शिल्लक आहे या जागेचा योजनांसाठी वापर करुन धरणग्रस्तांचा विकास करता येतो ते स्पष्ट होते.

**४.५.३ पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार उपलब्धतेचे वर्गीकरण:** पुनर्वसनाच्या गावातील प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध असतो काय? कोणत्या प्रकाराचा रोजगर उपलब्ध असतो?

त्यांना आठवड्यातून किती दिवस काम मिळते? त्यांची उपजिविका भागवली जाते काय? या घटकांचा अभ्यास तक्ता क्र. ४.६२ मध्ये केलेला आहे.

**सारणी क्र. ४.६२**

**पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार उपलब्धतेचे वर्गीकरण**

| पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार उपलब्ध आहे काय? | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| नाही | ३१३ | ८३.२४ |
| होय | ५४ | १४.३६ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्त्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे सारणी क्र. ४.६२ वरुन पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार उपलब्ध आहे काय? असा प्रश्न धरणग्रस्त लोकसंख्येला विचारला असता त्यामध्ये ३१३ लोकांनी स्पष्टपणे नाही उत्तर दिले. म्हणजेच ८३.२४ टक्के लोकसंख्येला पुनर्वसनाच्या ठिकाणी कोणताही रोजगार उपलब्ध नाही. १४.३६ टक्के लोकसंख्येला रोजगार उपलब्ध आहे हे स्पष्ट झाले.

### ४.५.४ पुनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधीची उपलब्धता:

पुनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधी आहेत काय? वनावर आधारित रोजगार उपलब्ध आहे काय? शेती संबंधित इतर कामे उपलब्ध आहेत काय? एखाद्या दुकानाचा व्यवसाय करता येतो काय? या घटकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे, तो खालील सारणी क्र. ४.६३ मध्ये केलेला आहे.

**सारणी क्र. ४.६३**

**पुनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधीची उपलब्धता**

| **पुनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत काय?** | **वारंवारिता** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|
| नाही | ३४३ | ९१.२२ |
| होय | ३३ | ८.७८ |
| **एकूण** | **३७६** | **१००** |

**(स्रोत: प्राथमिक सर्वेक्षण)**

४.६३ सारणी क्र. आधारे पुनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधी आहेत काय? असा प्रश्न विचारला असता ३४३ प्रकल्पग्रस्तांनी नाही असे म्हटले. म्हणजेच ९१.२२ टक्के लोकसंख्येला पुनर्वसनाच्या गावात कोणताही रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. ३३ लोकांनी होय असे उत्तर दिले. त्यामुळे ८.७८ टक्के लोकसंख्येला रोजगार किंवा व्यवसाय करण्याची संधी आहे, हे स्पष्ट झाले.

**४.५.५ पुनर्वसन व्यवस्थेचा अभ्यास:**

प्रकल्पाच्या कामासाठी लागणाऱ्या २९६१.१०२ हेक्टर वनजमिनीकरिता केंद्र शासनाने पत्र क्र.११/२६९/८७/एफ.सी./ दि.१९-०२-८८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. यात प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रासाठी १४८७.६ हेक्टर व उजव्या कालव्यासाठी १४७३.४९ हेक्टर वनजमिनीचा समावेश असून वनजमिनीच्या मोबदल्यात पर्यायी वनीकरणासाठी ५९२२ हेक्टर जमिन व १४.९२ करोड रूपये वन विभागाला दिलेले आहे. या पूर्ण क्षेत्राचे म्युटेशन झालेले आहे. हे पर्यायी क्षेत्र वनविभागाच्या ताब्यात दिलेले असुन हे क्षेत्र सुरक्षित वने म्हणून शासनाच्या दिनांक ४-२-९९ च्या राजपत्रात अधिसूचीत करण्यात आले.

**४.५.६ धरणग्रस्त गावांच्या पुनर्वसनासंबंधी माहिती:** भिवापूर तालुक्यातील घाटउमरी घाडेघाट, पेंढरी, मेंठा, घाटउमरी हे गाव धरणाच्या पायात येत असल्यामुळे या गावातील एकूण वनक्षेत्र तसेच एकूण शेतजमिन प्रकल्पात गेलेली आहे. या प्रकल्पग्रस्त गावातील लोकांना राहण्याकरिता

भिवापूर (खास) या ठिकाणी जमिनीचे पट्टे दिलेले आहेत आणि पुनर्वसनाचे काम जवळपास १०० टक्के झाले.

**४.५.७ पुनर्वसनाच्या ठिकाणी असलेली वनव्यवस्था:** भिवापूर या तालुक्यामध्ये एक वन विभागाचे कार्यालय आहे. भिवापूर खास या पुनर्वसनाच्या ठिकाणी असलेली झाडे झुडपी प्रकारचे जंगल तोडण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे पुनर्वसनाच्या भिवापूर खास या ठिकाणी सपाट प्रकारची कोरड्वाहू जमिन आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारातील नदी किंवा नाल्यांचा अभाव आहे. भिवापूर या शहराला लागूनच घाटउमरी, मेंढा व घाडेघाट गावाचे पुनर्वसन झालेले आहे. त्यामुळे या सर्व शहराच्या सभोवताल शहरीकरणाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**४.५.८ पुनर्वसनाच्या ठिकाणी वनव्यवस्थेवर आधारित रोजगारीची समस्या:** पुनर्वसनापूर्वी गावाच्या सभोवताल वनक्षेत्र असल्याने प्रकल्पग्रस्तांना वनावर आधारित मच्छिमारी, लाकूड कटाई, फळांचा व्यवसाय, बिडीपत्ती, टोरी, मोह, मध गोळा करणे या व्यवसायांवर धरणग्रस्त आपली उपजीविका चालवित होते. पुनर्वसनाच्या ठिकाणी या प्रकारच्या वनस्पती आणि फळांची झाडे जवळपास आढळलेली नाही. पुनर्वसनापूर्वी प्रकल्पग्रस्त गावात एकूण लोकसंख्येमध्ये वनावर आधारित लोकसंख्येत पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. पुनर्वसनाच्या ठिकाणी वनसंपदा नसल्यामुळे वनावर आधारित व्यवसाय ऱ्हास पावला आहे आणि वनावर आधारित रोजगारीची समस्या निर्माण झाली.

**४.५.९ पुनर्वसन गावात सामाजिक वनीकरणातील अडचणी:** महाराष्ट्र शासनाने पर्यायी वनीकरणासाठी ५९२२ हेक्टर वनजमीन व १४.९२ करोड रूपये वन विभागाला देण्यात आलेले आहे. एकंदरीत जवळपास २३ टक्के महाराष्ट्रात वनक्षेत्र आहे आणि एकट्या विदर्भात ३७.५० टक्के वनक्षेत्र उपलब्ध आहे. वन विभागाचा निर्णय आहे की प्रत्येक राज्यात जवळपास ३३ टक्के वन असणे आवश्यक आहे. एकट्या विदर्भात ३७.५० टक्के वनक्षेत्र उपलब्ध असल्यामुळे विदभातील वन विभागाने सामाजिक वनीकरणाला फारसे प्रोत्साहन दिलेले नाही. प्रकल्पग्रस्त गावातील पुनर्वसनापूर्वी वनक्षेत्राचा विचार केल्यास पुनर्वसन गावांच्या ठिकाणी वनक्षेत्र उपलब्ध नाही.

**४.५.१० पुनर्वसनाच्या ठिकाणी महत्त्वपूर्ण वनसंपत्तीचा अभाव:** ज्या ठिकाणी ९३ प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्यात आले आहे. त्या ठिकाणी वनसंपत्तीचा अभ्यास केल्यास असे आढळून आले की पुनर्वसनाच्या ठिकाणी लिंबू, चिंच, बेहडा, सागवन, सिसम, बाबूळ अशा महत्त्वपूर्ण अशा वनसंपत्तीचा अभाव आढळला. प्रामुख्याने काही प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन तालुक्याच्या ठिकाणी होत असल्याने जे झुडपी प्रकारचे जंगले होते ते सुध्दा तोडण्यात आलेले आहे आणि पुनर्वसन करण्यात आले. धरणग्रस्त गावी पूर्वी वनसंपत्ती फार विपूल प्रमाणात होती. त्यामध्ये, जाळण्याकरिता लाकूड, गवत, तेंदू–पान, मच्छिमारी इत्यादी वनसंपत्तीतून उत्पन्न होत असे परंतु पुनर्वसनाच्या ठिकाणी या वनसंपत्ती फारशा प्रमाणात आढळून आलेली नाही.

**४.५.११ वनावर अवलंबीत्व:** प्रकल्पग्रस्त लोकसंख्या वनावर खूप आधारित होती. घर बांधण्याकरिता लाकडाचा उपयोग करीत असत आणि हे सर्व लाकूड वनातून आणल्या जात असे त्याचप्रमाणे घरच्या स्वयंपाकाकरिता वनातील काळ्यांचा उपयोग केला जात असे. वनक्षेत्रावर आधारित प्रकल्पग्रस्त स्त्रियां मोळी विकून आपली उपजीविका चालवत. परंतु प्रकल्पामुळे वरील सर्व व्यवसायांना आळा बसला. प्रकल्पग्रस्त क्षेत्रातील काही घरांची छत ही गवताची आढळली तर काही घरांची छत कौलारु आढळली. वर्षातून जवळपास ९० दिवस बिडीपत्ती तोडण्याचा व्यवसाय प्रकल्पग्रस्त करीत असत. प्रकल्पामुळे या व्यवसायाला फारच धोका झाला. त्याचप्रमाणे डिंक गोळा करणे, मध गोळा करणे, मोह गोळा करणे, टोरी गोळा करणे, शिकार करणे, लाकूड कटाइ, गूरासाठी चारा या सर्व व्यवसावर परिणाम झाला. या व्यवसात मुख्य म्हणजे फळांचा व्यवसाय आणि मोह, टोरी, डिंक हा व्यवसाय प्रामुख्याने लहान मुल–मुली आणि स्त्रिया करीत होते. अशाप्रकारे वनावर आधारित व्यवसाय पूर्णपणे झालेला आहे. एकूणच प्रकल्पग्रस्तांची आर्थिक परिस्थिती फारच बिकट झालेली आहे.

**४.५.१२ वनावर आधारित सामाजिक जीवनावर परिणाम:** उजव्या बाजूने वैनगंगा नदी तर डाव्या बाजूने मरू नदी प्रकल्पग्रस्त गावात वाहत असे. गावाच्या सभोवताल झुडपी जंगल त्याचप्रमाणे टेंबूर, चिंच, बाबूळ, सिताफळ आणि इतर घरांच्या सभोवताल फळांची झाडे होती. नदीच्या सभोवताली रम्य असे वातावरण हे सर्व घटक प्रकल्पग्रस्त गावातील लोकांच्या

जीवनाला प्रभावित करीत असे आणि वनावर आधारित गावकऱ्यांची उपजीविका आणि वनाशी नाते हे सर्व जलसिंचन प्रकल्प बांधणीमुळे नाहीसे झालेले दिसून आले. आता या प्रकल्पग्रस्त गावात जिकडे पाहावे तिकडे ओसाड अशी जमिनी आणि उंचच उंच असे मातीचे धरण बघायला मिळते.

**४.६ बहुविध सहसंबंधाचे विश्लेषण:** तालुकानिहाय एकूण प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या १६ निर्देशांकामध्ये एक घटक दुसऱ्या घटकाशी कशाप्रकारे सहज संबंधित आहे म्हणजे त्या दोन घटकातील सहसंबंध काय आहे याचा अभ्यास बहुविध सहसंबंध (मल्टिप्लाय कोरिलेशन) या सांख्यिकीय पध्दतीने अभ्यास केला आहे. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येतील १६ आर्थिक निकष वापरून त्या १६ घटकातील आपसातील सहसंबंधाचे विश्लेषण खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**सारणी क्र. ४.६४**

**बहुविध सहसंबंध विश्लेषणाकरीता निवडलेले आर्थिक निकष**

| अ. क्र. | निवडलेले आर्थिक निकष (घटक) |
|---|---|
| X-1 | शैक्षणिक स्थिती |
| X-2 | पुनर्वसनानंतर कृषिवर आधारीत रोजगार/ व्यवसाय |
| X-3 | पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय |
| X-4 | पुनर्वसनानंतर वनावर आधारित रोजगार/व्यवसाय |
| X-5 | पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणार वार्षिक उत्पन्न |
| X-6 | पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न |
| X-7 | प्रकल्प बांधणीनंतर सर्व क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न |
| X-8 | घराचे स्वरूप |
| X-9 | बाजारभावानुसार घरांची किंमत |
| X-10 | शासनाने घरांचा दिलेला मोबदला |
| X-11 | बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत |
| X-12 | शासनाने जमिनीचा प्रति एकर दिलेला मोबदला |

| अ. क्र. | निवडलेले आर्थिक निकष (घटक) |
|---|---|
| X-13 | प्रकल्पबांधणीनंतर वार्षिक बचत (रु.) |
| X-14 | पुनर्वसनानंतर कुटुंबांचे वार्षिक खर्चं (रु.) |
| X-15 | कर्ज घेण्याचे कारण |
| X-16 | प्रकल्पबांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट |

## सारणी. क्र. ४.६५

## तालुकानिहाय प्रगल्पग्रस्त लोकसंख्येचे आर्थिक विकासाच्या निकषाचे बहुविध सहसंबंधाचे विश्लेषण:

| Variable | X-1 | X-2 | X-3 | X-4 | X-5 | X-6 | X-7 | X-8 | X-9 | X-10 | X-11 | X-12 | X-13 | X-14 | X-15 | X-16 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **X-1** | १.०० | | | | | | | | | | | | | | | |
| **X-2** | −०.२८ | १.०० | | | | | | | | | | | | | | |
| **X-3** | −०.१२ | −०.०२ | १.०० | | | | | | | | | | | | | |
| **X-4** | −०.३१ | ०.९८ | −०.०२ | १.०० | | | | | | | | | | | | |
| **X-5** | −०.२६ | ०.९९ | −०.०४ | १.०० | १.०० | | | | | | | | | | | |
| **X-6** | −०.१८ | −०.१८ | −०.३६ | −०.२४ | −०.२४ | १.०० | | | | | | | | | | |
| **X-7** | ०.८० | −०.३२ | −०.४६ | −०.३१ | −०.२७ | −०.३५ | १.०० | | | | | | | | | |
| **X-8** | ०.४३ | −०.४२ | −०.३१ | −०.५० | −०.४७ | −०.१९ | ०.६६ | १.०० | | | | | | | | |
| **X-0** | ०.५७ | −०.३५ | −०.३४ | −०.३९ | −०.३६ | −०.४० | ०.८४ | ०.९५ | १.०० | | | | | | | |
| **X-10** | ०.२१ | −०.२९ | −०.१८ | −०.३५ | −०.३४ | −०.३८ | ०.५३ | ०.९५ | ०.९० | १.०० | | | | | | |
| **X-11** | −०.०९ | −०.३९ | ०.९२ | −०.३९ | −०.४१ | −०.२८ | −०.३४ | −०.१० | −०.१६ | ०.०० | १.०० | | | | | |
| **X-12** | ०.४१ | −०.३८ | −०.२२ | −०.४४ | −०.४२ | −०.४० | ०.६९ | ०.९७ | ०.९७ | ०.९७ | −०.०२ | १.०० | | | | |
| **X-13** | −०.२० | −०.२० | −०.२९ | −०.०४ | −०.०५ | −०.१८ | ०.१९ | −०.२८ | −०.०९ | −०.२२ | −०.१९ | −०.१७ | १.०० | | | |
| **X-14** | ०.६३ | −०.३८ | −०.४४ | −०.२९ | −०.२६ | −०.३१ | ०.८६ | ०.२८ | ०.५२ | ०.१६ | −०.३१ | ०.३५ | ०.६१ | १.०० | | |
| **X-15** | −०.१५ | −०.८१ | −०.२० | −०.८१ | −०.८२ | ०.६५ | −०.०८ | ०.१७ | −०.०२ | ०.०४ | ०.१३ | ०.०५ | ०.१८ | ०.०३ | १.०० | |
| **X-16** | −०.३८ | ०.२६ | −०.२२ | ०.४२ | ०.४१ | −०.२० | −०.०८ | −०.५८ | −०.३७ | −०.४६ | −०.२९ | −०.४५ | ०.८८ | ०.३५ | −०.१६ | १.०० |

**१. शैक्षणिक स्थिती:** तालुकानिहाय एकूण प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या शैक्षणिक स्थितीचे व पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित रोजगाराचे किंवा व्यवसायाचे या दोन घटकांमधील संबंधाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, दोघांमधील सहसंबंध ऋणात्मक असून

सहसंबंध गुणक कमी आहे. म्हणजे –०.५२ आहे. शैक्षणिक स्थिती व पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार या दोन घटकांचा सहसंबंध गुणक हा सुध्दा फार कमी आहे. तो म्हणजे +०.३ इतका आहे तर पुनर्वसनानंतर शैक्षणिक स्थिती व कृषीवर आधारित एकूण वार्षिक उत्पन्नामध्ये सहसंबंध गुणक –०.७५ आहे. एकूण वार्षिक उत्पन्नामध्ये हा सहसंबंध गुणक धनात्मक आहे.

२. **कृषीवर आधारित रोजगार किंवा व्यवसाय:** पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित रोजगार किंवा व्यवसाय व पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय या दोन घटकांमध्ये सहसंबंध ऋणात्मक असून सहसंबंध गुणक –०.०२ आहे म्हणजे नगण्य आहे. पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित व्यवसाय किंवा रोजगार व पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसाय या दोन घटकातील सहसंबंध उच्चतम धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.९९ आहे. पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित व्यवसाय किंवा रोजगार व पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध उच्च धनात्मक आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.९९ आहे तर कृषीवर आधारित रोजगार व घरांचे स्वरुप यातील सहसंबंध मध्यम ऋणात्मक आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.४२ आहे. पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित रोजगार व प्रकल्पग्रस्त लोकसंख्येने कर्ज घेतलेत त्या कर्जाचे कारण यातील सहसंबंध उच्चतम ऋणात्मक आहे व या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.८१ आहे.

३. **शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय:** पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय आणि पुनर्वसनानंतर वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय या दोन घटकातील सहसंबंध फारच कमी ऋणात्मक आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.०२ आहे तर पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय व प्रकल्प बांधणीनंतर सर्व क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध मध्यम स्वरूपात ऋणात्मक आहे. यातील सहसंबंध गुणक –०.४६ आहे. शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय व बाजारभावानुसार घरांची किंमत या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.४६ आहे. म्हणजे मध्यम ऋणात्मक स्वरुपाचा आहे. पुनर्वसनानंतर शेती आणि

शेती सोबत इतर व्यवसाय आणि बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत या दोन घटकातील सहसंबंध उच्चतम असून धनात्मक आहे व या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.९२ आहे. पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय व पुनर्वसनानंतर कुटुंबाचे वार्षिक खर्च या दोन घटकातील सहसंबंध मध्यम ऋणात्मक आहे. सहसंबंध गुणक −०.४४ इतका आहे. पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय आणि प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट या घटकातील सहसंबंध गुणक ऋणात्मक आहे. तो −०.२२ आहे.

४. **वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय:** पुनर्वसनानंतर वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसाय आणि पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध उच्चतम धनात्मक आहे आणि तो सहसंबंध गुणक +०.९९ आहे. घराचे स्वरुप आणि वनावर आधारित रोजगार या दोन घटकांमध्ये मध्यम स्वरुपाचा ऋणात्मक सहसंबंध आहे. सहसंबंध गुणक −०.५० आहे. कर्ज घेतल्याचे कारण व पुनर्वसनानंतर वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसायामध्ये उच्चतम ऋणात्मक सहसंबध आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक −०.८१ आहे. तर प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट आणि वनावर आधारित रोजगार किंवा व्यवसायात मध्यम धनात्मक सहसंबंध आहे आणि या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.४१ आहे.

५. **वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न:** पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न व पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध कमी आहे. या दोन घटकातील सहसंबंध −०.२४ आहे, तर पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न व घराचे स्वरुप यातील सहसंबंध ऋणात्मक आहे आणि सहसंबंध गुणक −०.४७ आहे. बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत आणि वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन्ही घटकातील सहसंबंध सुध्दा ऋणात्मक आहे. तो म्हणजे −०.४० सहसंबधं गुणक आहे. तर शासनाने जमिनीचा प्रति एकर दिलेला मोबदला आणि वन व्यवसायावर आधारित असणारे वार्षिक उत्पन्न या घटकांचा सहसंबंध मध्यम स्वरुपात ऋणात्मक आहे. या

घटकातील सहसंबंध गुणक –०.४१ इतका आहे. प्रकल्पग्रस्त लोकसंख्येने कुठल्या कारणाने कर्ज घेतले आणि वनक्षेत्रावर आधारित प्रकल्पग्रस्तांचे वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध उच्च प्रतिचा ऋणात्मक आहे आणि या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.८२ आहे. तर प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांच्या सरासरी रोजगारात झालेली घट आणि पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध मध्यम धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.४० आहे.

६. **कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न:** पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न आणि प्रकल्प बांधणीनंतर सर्वच क्षेत्रातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन घटकांचा विचार केला असता या दोन घटकातील सहसंबंध ऋणात्मक स्वरुपाचा आहे आणि या दोन घटकातील सहसंबंध गुणक –०.३५ आहे. कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न आणि बाजारभावानुसार घरांची किंमत या दोन घटकात सहसंबंध मध्यम स्वरुपाचा ऋणात्मक आहे. तो सहसंबंध गुणक –०.४० आहे. शासनाने जमिनीचा प्रति एकर दिलेला मोबदला आणि कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न या घटकातील सहसंबंध मध्यम ऋणात्मक आहे. सहसंबंध गुणक –०.४० आहे, तर कर्ज घेतल्याचे कारण आणि कृषीवर आधारित वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध गुणक धनात्मक स्वरुपाचा आहे तो +०.६५ आहे.

७. **एकूण वार्षिक उत्पन्न:** सर्व क्षेत्रातून मिळणारे वार्षिक उत्पन्न व घराचे स्वरुप या दोन घटकातील सहसंबंध मध्यम धणात्मक आहे. तो सहसंबंध गुणक +०.६६ आहे. वार्षिक उत्पन्न आणि बाजारभावानुसार घरांची किंमत या दोन घटकांमधील सहसंबंध धनात्मक आहे व सहसंबंध गुणक +०.२ आहे, तर शासनाने घांचा दिलेला मोबदला आणि सर्वच क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या सुध्दा दोन घटकातील सहसंबंध मध्यम धनात्मक स्वरुपाचे आहे आणि सहसंबंध गुणक +०.५३ आहे. प्रकल्पानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबांचा एकूण वार्षिक खर्च व सर्वच क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या दोन घटकांचा सहसंबंध उच्च धनात्मक आहे व या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.८६ आहे.

८. **घरांचे स्वरुप:** प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या घराचे स्वरुप आणि बाजारभावानुसार घरांची किंमत या दोन घटकांचा अभ्यास केला असता या दोन घटकातील सहसंबंध उच्चत्तम धनात्मक आहे आणि या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.९६ आहे. प्रकल्पग्रस्तांच्या घराचे स्वरुप आणि शासनाने दिलेला मोबदला या सुध्दा दोन घटकातील सहसंबंध हा उच्चतम धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.९५ इतका आहे, तर घराचे स्वरुप आणि पुनर्वसनानंतर कुटुंबांचा वार्षिक खर्च या दोन घटकातील सहसंबंध कमी धनात्मक असून या घटकातील सहसंबंध गुणक +०.२८ आहे. प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे स्वरुप आणि प्रकल्पग्रस्तांच्या सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकांमध्ये सहसंबंध मध्यम स्वरुपाचा ऋणात्मक आहे व या दोन घटकातील सहसंबंध गुणक −०.५८ आहे.

९. **बाजारभावानुसार घराची किंमत:** बाजारभावानुसार घराची किंमत व शासनाने घरांचा दिलेला मोबदला या दोन घटकातील सहसंबंध उच्चतम धनात्मक आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.९८ आहे. बाजारभावानुसार घरांची किंमत आणि पुनर्वसनानंतर कुटुंबांचा वार्षिक खर्च या दोन घटकातील सहसंबंध मध्यम धनात्मक आहे आणि या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.५२ आहे. बाजारभावानुसार घरांची किंमत आणि प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट यातील सहसंबंध ऋणात्मक आहे. सहसंबंध गुणक −०.३७ आहे. बाजारभावानुसार घराची किंमत आणि प्रकल्पग्रस्तांचे सर्व क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध सुध्दा उच्चतम धनात्मक स्वरुपाचा आहे, तर सहसंबंध गुणक +०.८४ आहे.

१०. **शासनाने घरांचा दिलेला मोबदला:** शासनाने प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पात गेलेल्या त्यांच्या घरांचा दिलेला मोबदला आणि कर्ज घेतल्याचे कारण या दोन घटकांमध्ये सहसंबंध नगण्य स्वरुपाचा आहे. यातील सहसंबंध गुणक +०.०३ आहे. शासनाने घरांचा दिलेला मोबदला व प्रकल्पग्रस्तांचे सर्वच क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या दोन घटकात मध्यम धनात्मक सहसंबंध आहे तर या दोन घटकात सहसंबंध गुणक +०.९५ आहे. तसेच शासनाने घरांचा दिलेला मोबदला व घरांचे स्वरुप या दोन घटकांमध्ये हे सहसंबंध उच्च प्रतीचा धनात्मक आहे व सहसंबंध गुणक +०.९५ आहे. शासनाने घरांचा दिलेला मोबदला

व प्रकल्पग्रस्तांच्या घरांची बाजारभावानुसार किंमत या अत्यंत महत्वाच्या घटक़ांमधील सहसंबंध धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.९० आहे.

११. **बाजारभावानुसार प्रति एकर शेतजमिनीची किंमत:** बाजारभावानुसार प्रति एकर शेतजमिनीची किंमत व शासनाने प्रति एकर शेतजमिनीचा दिलेला मोबदला या दोन घटकातील सहसंबंध अत्यंत नगण्य आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक ऋणात्मक असून तो −०.०२ आहे. बाजारभावानुसार प्रति एकर जमिनीची किंमत आणि प्रकल्पग्रस्तांचे सर्वच क्षेत्रातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध ऋणात्मक आहे, तर सहसंबंध गुणक −०.३४ आहे. बाजारभावानुसार प्रति एकर शेत जमिनीची किंमत आणि प्रकल्प बांधणीनंतर वार्षिक बचत या दोन घटकांचा सहसंबंध ऋणात्मक आहे तर यातील सहसंबंध गुणक −०.१९ आहे. प्रकल्पग्रस्तांचा पुनर्वसनानंतर वार्षिक खर्च आणि बाजारभावानुसार प्रत्येक शेतजमिनीची किंमत या दोन घटकांमध्ये सहसंबंध ऋणात्मक आहे आणि या घटकातील सहसंबंध −०.३१ आहे तर प्रकल्पग्रस्तांनी घेतलेल्या कर्जाची कारणे आणि बाजारभवानुसार प्रति एकर शेतजमिनीची किंमत या दोन घटकातील सहसंबंध नगण्य धनात्मक असून +०.१३ आहे.

१२. **शासनाने प्रतिएकर जमिनीचा दिलेला मोबदला:** शासनाने प्रकल्पग्रस्त जमिनीचा प्रतिएकर दिलेला मोबदला आणि प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांची वार्षिक बचत या दोन घटकांमध्ये हे सहसंबंध नगण्य सवरुपाचा ऋणात्मक आहे. यातील सहसंबंध गुणक −०.१७ आहे. बाजारभावानुसार प्रतिएकर जमिनीची किंमत व त्याच जमिनीचा शासनाने प्रतिएकर दिलेला मोबदला या दोन घटकांमध्ये सहसंबंध अत्यंत नगण्य स्वरुपाचा आहे. यातील सहसंबंध गुणक −०.०२ आहे. शासनाने जमिनीचा प्रतिएकर दिलेला मोबदला आणि पुनर्वसनानंतर कुटुंबाचे वार्षिक खर्च या सुध्दा दोन घटकातील सहसंबंध धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.३५ आहे. शासनाने जमिनीचा प्रतिएकर दिलेला मोबदला आणि प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकातील सहसंबंध मध्यम ऋणात्मक असून सहसंबंध गुणक −०.४५ आहे.

१३. **एकूण वार्षिक बचत:** प्रकल्प बांधणीनंतर प्रकल्पग्रस्तांची एकूण वार्षिक बचत आणि प्रकल्प बांधणीनंतर कुटुंबांचा वार्षिक खर्च या दोन घटकातील सहसंबंध धनात्मक आहे. या दोन घटकातील सहसंबंध गुणक +०.६१ आहे. प्रकल्प बांधणीनंतर वार्षिक बचत आणि प्रकल्पग्रस्तांनी कर्ज घेतल्याचे कारण या दोन घटकातील सहसंबंध कमी धनात्मक असून, सहसंबंध गुणक +०.१८ आहे. प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट आणि प्रकल्पग्रस्तांची वार्षिक बचत यामध्ये उच्चतम धनात्मक संबंध आहे यातील सहसंबंध गुणक +०.८८ आहे. प्रकल्पग्रस्तांची वार्षिक बचत आणि प्रकल्पग्रस्तांना सर्वच क्षेत्रातून मिळालेले वार्षिक उत्पन्न या घटकातील सहसंबंध धनात्मक असून +०.१९ आहे.

१४. **वार्षिक खर्च:** पुनर्वसनानंतर कुटुंबांचे वार्षिक खर्च आणि प्रकल्पग्रस्तांनी घेतलेल्या कर्जाचे कारण या दोन घटकातील सहसंबंध नगण्य स्वरुपाचा धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.०२ आहे. कुटुंबांचा वार्षिक खर्च आणि प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकातील सहसंबंध धनातमक असून सहसंबंध गुणक +०.३५ आहे. सर्व क्षेत्रातून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न आणि पुनर्वसनानंतर कुटुंबांचे वार्षिक खर्च या दोन घटकातील सहसंबंध उच्चतम धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.८६ आहे. कुटुंबाचे वार्षिक खर्च व पुनर्वसनानंतर वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे वार्षिक उत्पन्न या दोन घटकातील सहसंबंध कमी ऋणात्मक असून सहसंबंध गुणक −०.२५ आहे. पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय व प्रकल्पग्रसत कुटुंबांचा वार्षिक खर्च यातील सहसंबंध ऋणात्मक असून सहसंबंध गुणक −०.४४ आहे.

१५. **कर्ज घेतल्याचे कारण:** प्रकल्पग्रस्तांचे कर्ज घेतल्याचे कारण आणि प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकांमध्ये ऋणात्मक सहसंबंध असून सहसंबंध गुणक −०.१७ आहे. कर्ज घेतल्याचे कारण आणि कृषीवर आधारित रोजगार या दोन घटकात उच्च ऋणात्मक सहसंबंध असून या दोन घटकांमध्ये सहसंबंध गुणक −०.८१ आहे. वनावर आधारित रोजगार आणि कर्ज घेतल्याची कारणे या दोन घटकांमध्ये उच्च ऋणात्मक सहसंबंध असून सहसंबंध गुणक −०.८२ आहे. सर्व क्षेत्रातून मिळालेले एकूण वार्षिक उत्पन्न आणि कर्जाचे कारण या दोन घटकांमध्ये नगण्य स्वरुपाचा धनात्मक

सहसंबंध आहे व सहसंबंध गुणक ०.०८ आहे. कृषीवर आधारित एकूण वार्षिक उत्पन्न आणि कर्ज घेतल्याच्या कारणांमध्ये धनात्मक सहसंबंध असून सहसंबंध गुणक +०.६५ आहे.

१६. **सरासरी रोजगार:** प्रकल्प बांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली घट आणि कृषीवर आधारित रोजगार या दोन चलामधील सहसंबंध धनात्मक स्वरुपाचा असून सहसंबंध गुणक +०.२६ आहे. पुनर्वसनानंतर शेती आणि शेती सोबत इतर व्यवसाय आणि सरासरी रोजगारात झालेली घट यातील सहसंबंध कमी ऋणात्मक असून सहसंबंध गुणक +०.२२ आहे. वनावर आधारित व्यवसाय किंवा रोजगार आणि प्रकल्पबांधणीनंतर सरासरी रोजगारात झालेली वाढ या दोन घटकात सहसंबंध मध्यम धनात्मक असून सहसंबंध गुणक +०.४२ आहे. वनावर आधारित व्यवसायातून मिळणारे उत्पन्न आणि सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकांमधील सहसंबंध नगण्य स्वरुपाचा ऋणात्मक आहे व या दोन घटकातील सहसंबंध गुणक −०.०८ आहे. शासनाने प्रति एकर जमिनीचा दिलेला मोबदला आणि सरासरी रोजगारात झालेली घट या दोन घटकात सुध्दा ऋणात्मक सहसंबंध असून सहसंबंध गुणक −०.४५ आहे, तर प्रकल्प बांधणीनंतर वार्षिक बचत आणि प्रकल्पग्रस्तांच्या सरासरी रोजगारात झालेल्या घटीमध्ये सहसंबंध उच्चतम धनात्म असून सहसंबंध गुणक +०.८८ आहे.

**४.७ गृहितकांची पडताळणी:** जेव्हा एका नमुन्यातील प्रत्येक निरीक्षणास इतर नमुन्यात असलेल्या निरीक्षणासह जोडी लावजी जाऊ शकते, तेव्हा दोन नमुन्यांची सरासरी तुलना करण्यासाठी Paired Sample T Test वापरली जाते. पियर्सनची Chi-Square चाचणी आकस्मिकता सारणीच्या एक किंवा अधिक श्रेणींमध्ये अपेक्षित वारंवारता आणि गणना केलेल्या वारंवारता दरम्यान सांख्यिकीय दृष्टीने महत्त्वपूर्ण फरक आहे की नाही हे निर्धारित करण्यासाठी वापरले जाते.

**H1: Gosikhurd project has led to the financial losses of the affected people**

For the purpose of testing the above hypothesis, the researcher has used the paired sample T Test to compare the means of the groups of data that relate to (a) Before Rehabilitation, (b) After rehabilitation. The following table represents the mean

values of income before and after rehabilitation. The following are the paired sample statistics.

**Statistical Hypothesis:**

Ho: There is no significant difference in the mean scores before rehabilitation and after rehabilitation.

Ha: There is a significant difference in the mean scores before rehabilitation and after rehabilitation.

**गृहितक–१**

Ho= धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नामध्ये काहीही बदल झालेला नाही.

H1= धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नामध्ये घट झालेली आहे.

**चाचणी सारणी. क्र. ४.६६**

## Paired Samples Statistics

| | | Mean | N | Std. Deviation | Std. Error Mean |
|---|---|---|---|---|---|
| Pair 1 | Monthly income of household members-Before Rehabilitation | 2563.7766 | 376 | 7602.70868 | 392.07976 |
| | Monthly income - After Rehabilitation | 527.1862 | 376 | 1794.17004 | 92.52725 |
| Pair 2 | Approximately, what was the worth of the agricultural produce that you could harvest before the rehabilitation? | 120731.3830 | 376 | 186988.20904 | 9643.18058 |
| | Currently, what is the worth of the agricultural produce that you are harvesting? | 226.0638 | 376 | 1936.17119 | 99.85040 |
| Pair 3 | What were your savings before rehabilitation? | 81977.4415 | 376 | 184688.39420 | 9524.57669 |
| | What are your savings after rehabilitation? | 1914.8936 | 376 | 8588.56241 | 442.92129 |
| Pair 4 | How was your financial condition | 3.9654 | 376 | .23410 | .01207 |

| | | Mean | N | Std. Deviation | Std. Error Mean |
|---|---|---|---|---|---|
| | before rehabilitation? | | | | |
| | How is your current financial condition? | 1.0080 | 376 | .11519 | .00594 |
| Pair 5 | Approximately, what was the market price of the land that you lost due to the project? | 3035172.8856 | 376 | 7191423.96347 | 370869.37334 |
| | How much did the government give you as a compensation for your land that was used forthe project? | 240207.4601 | 376 | 481640.83829 | 24838.72968 |
| Pair 6 | Approximately, what was the market price of the home you lived in? | 688909.5745 | 376 | 1430808.49212 | 73788.31391 |
| | What was the compensation given by the government for the home you lived in? | 153488.5638 | 376 | 175630.79806 | 9057.46683 |

## Observations:

1. The average monthly income of household members- before Rehabilitation was above Rs. 2500. After rehabilitation, it went down to Rs. 668.6.
2. The worth of the agricultural produce that the affected individuals could harvest before the rehabilitation was Rs. 120731.3. After rehabilitation, it went down to Rs. 226.06.
3. Average savings before rehabilitation of the affected individuals was Rs. 81977.4. After rehabilitation, the average savings plunged down to Rs. 1914.8.
4. The fourth pair was based on a likert scaling of 5 for the financial condition of the affected individuals. 5 stands for the Best Financial condition, 4 for good, 3 for neutral, 2 for bad and 1 for the worst financial condition. The financial condition of the respondents was 3.9 (Almost 4 and 4 stands for a good financial condition). After rehabilitation, it is 1.00 which stands for the worst financial condition.
5. The average market price of the land that the affected individuals lost due to the project was above Rs. 30 lakhs. What the government actually offered them as compensation is lower than 10 percent of the market price of the land.

6. Approximately, the average market price of the houses that the affected people lived in was Rs. 688909.5. What the government offered them was just Rs.153488 on an average. **Paired T –Test results are as follows:**

### चाचणी सारणी. क्र. ४.६७

### Paired Samples Test

| | | Paired Differences | | T | N | Sig. (2-tailed) | Null Hypothesis Rejected/ Accepted |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Mean | Std. Deviation | | | | |
| Pair 1 | Monthly income of household members- Before Rehabilitation - Monthly income of household members- After Rehabilitation | 2036.6 | 7890.9 | 5.005 | 376 | .000 | Rejected |
| Pair 2 | Approximately, what was the worth of the agricultural produce that you could harvest before the rehabilitation? - Currently, what is the worth of the agricultural produce that you are harvesting? | 120505.3 | 186923.5 | 12.501 | 376 | .000 | Rejected |
| Pair 3 | What were your savings before rehabilitation? - What are your savings after rehabilitation? | 80062.5 | 185593.7 | 8.365 | 376 | .000 | Rejected |
| Pair 4 | How was your financial condition before rehabilitation? - How is your | 3.0 | 0.3 | 205.093 | 376 | 0.000 | Rejected |

| | | Paired Differences | | T | N | Sig. (2-tailed) | Null Hypothesis Rejected/ Accepted |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Mean | Std. Deviation | | | | |
| | current financial condition? | | | | | | |
| Pair 5 | Approximately, what was the price of the land that you lost due to the project? - How much did the government give you as a compensation for your land that was used forthe project? | 2794965.4 | 6998396.7 | 7.744 | 376 | .000 | Rejected |
| Pair 6 | Approximately, what was the market price of the home you lived in? - What was the compensation given by the government for the home you lived in? | 535421.0 | 1382561.9 | 7.509 | 376 | .000 | Rejected |

The table No. 4.67 shows the paired T test results and in all the cases, the significance 2 tailed values are lesser than 0.05. This shows that means for the before and after group are statistically different. Therefore there is enough evidence to suggest that the means between all the pairs are significantly different. In all the cases the mean difference values are positive. Therefore we can conclude that the monthly income of household members, the worth of the agricultural produce that the affected individuals could harvest, savings - After Rehabilitation have reduced and the overall financial condition has become worst. The compensations offered to the affected people for their lands and homes is significantly lower than the market values. It can thus be concluded that the Gosikhurd Project has caused huge financial losses to the affected people.

वरील सारणी क्र. ४.६७ मध्ये असे दिसून येते की, धरण बांधण्यापूर्वीचे सरसरी उत्पन्न जास्त होते व तेच सरासरी उत्पन्न धरण बांधल्यानंतर कमी झालेले दिसून येते. Significance Value ०.००० इतकी (०.०५ पेक्षा कमी) आहे. याचा अर्थ नल हायपोथिसिस हा रिजेक्ट होतो व आपल्याला असे मानता येते की, धरण बांधण्यापूर्वी सरासरी उत्पन्न व धरण बांधल्यानंतरचे सरासरी उत्पन्नामध्ये सांख्यिकीय फरक आहे.

गोसीखुर्द प्रकल्पामुळे धरणग्रस्त लोकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या गृहीतकृत्याची पडताळणी करताना सारणी क्र. ४.४६, ४.४८ व ४.५२ वरुन स्पष्ट होते की, प्रकल्पग्रस्तांच्या एकूण उत्पन्नात घट झालेली आहे. प्रकल्पापूर्वी प्रकल्पग्रस्तांना शेतीतून, शेतीवर आधारित जोडधंदा, वनावर आधारित व्यवसाय, रोख मजुरी, मोलमजुरी या सर्व क्षेत्रातून जे उत्पन्न प्रकल्पग्रस्तांना मिळत होते ते प्रकल्प बांधणीनंतर किंवा पुनर्वसनानंतर मिळत नाही. सारणी क्र. ४.५३ वरुन हे स्पष्ट होते की त्यांच्या एकूण उत्पन्नात घट झालेली आहे. तसेच प्रकल्पग्रस्तांना शेतजमिनीचा व घरांचा योग्य आर्थिक मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना आर्थिक हानी सहन करावी लागली. सदर सर्व कारणांनी गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पामुळे धरणग्रस्त लोकांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे Ho = Null hypothesis is regected.

**H2: The sources of livelihood for the people affected by the project have reduced.**

The respondents were asked as to whether they were compensated in ways other than cash. They were also asked that if there were other sources of earning after rehabilitation were made available. The Chi-Square test was run to test this hypothesis and check if the responses were due to mere chance. Following are the tables and the P values after running the test.

### चाचणी सारणी. क्र. ४.६८

### Were you compensated by ways other than cash?

| | Observed N | Expected N | Residual |
|---|---|---|---|
| No | 282 | 188.0 | 94.0 |
| Yes | 94 | 188.0 | -94.0 |
| Total | 376 | | |

### चाचणी सारणी. क्र. ४.६९

### Is there any other source of earning available to you (after rehabilitation?)

| | Observed N | Expected N | Residual |
|---|---|---|---|
| No | 349 | 188.0 | 161.0 |
| Yes | 27 | 188.0 | -161.0 |
| Total | 376 | | |

### चाचणी सारणी. क्र. ४.७०

### Test Statistics

| | Were you compensated by ways other than cash? | Is there any other source of earning available to you (after rehabilitation?) |
|---|---|---|
| Chi-Square | 94.000[a] | 275.755[a] |
| Degree of Freedom | 1 | 1 |
| Asump. Significance | .000 | .000 |

a. 0 cells (०.० टक्के) have expected frequencies less than 5. The minimum expected cell frequency is 188.0.

In both the cases, as we can see from the above table, the P values are less than 0.05. Thus, we can say that the results were not due to mere chance and indeed

the sources of livelihood for the people affected by the project have reduced. The following table will clarify further as to which specific sources of livelihood have reduced. It should be noted that the original sources of livelihood have been considered for the following table. This is because once the affected individuals lost their old sources of livelihood, they either remained completely unemployed or started doing the work of miscellaneous labour and accepted whatever lower and alternate source of earning they could resort to.

**गृहितक–२**

$H_0$= धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उपजिविकेची / रोजगाराच्या साधणांमध्ये काहीही बदल झालेला नाही.

$H_1$= धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उपजिविकेची / रोजगाराची साधने किमी झालेली आहेत.

**चाचणी सारणी. क्र. ४.७१**

**Table showing the decreased sources of livelihood- Before and After Rehabilitation**

| वर्गीकरण | ओजगारे | धरणबांधणी आणि पुनर्वसनापूर्वी | धरणबांधनी आणि पुनर्वसनानंतर |
|---|---|---|---|
| कृषीवर आधारित रोजगार | शेळी/ मेंढी पालन | ६२ | १९ |
| | कुक्कुटपालन | ५४ | १४ |
| | मासेमारी | ३८ | १२ |
| | शिकार करणे | ८ | ० |
| | दुग्ध व्यवसाय | १७४ | १६ |
| शेतीशिवाय इतर रोजगाराची उपलब्धता | बांधकाम क्षेत्र | ७२ | ६२ |
| | शासकीय रोजगार हमी योजनेतील कामे | ९३ | ३० |
| वनावर आधारित रोजगार | बीडीपत्ती | ४२ | २२ |
| | मोरी, गवत, काळ्या विकणे | २४ | ४ |

| वर्गीकरण | ओजगारे | धरणबांधणी आणि पुनर्वसनापूर्वी | धरणबांधनी आणि पुनर्वसनानंतर |
|---|---|---|---|
| | झाडांची कटाई करणे | १२ | ० |
| | डिंक,मोह,टोरी गोळा करणे | २७ | २ |
| | कचर,कवट, चार,चिंच, खिरन्या विकणे | ३२ | १ |
| प्रकल्पग्रस्तांचे व्यवसायानुसार (जोडधंदा) | शेती | ४७ | ७ |
| | शेती आणि वनमजुरी | १३७ | २९ |
| | शेती आणि व्यवसाय (दुकान) | ४७ | १५ |
| | शेती आणि नोकरी | १० | २ |
| | शेती आणि शेतमजुरी | ९५ | ६८ |

A paired sample T test was run to see to compare the mean sources of livelihood stated above (N=17) before and after rehabilitation. The results are as follows:

### चाचणी सारणी. क्र. ४.७२

### Paired Samples Statistics

| | | Mean | N | Std. Deviation | Std. Error Mean |
|---|---|---|---|---|---|
| Pair 1 | Sources of livelihood before rehabilitation | 57.2941 | 17 | 45.49830 | 11.03496 |
| | Sources of livelihood after rehabilitation | 17.8235 | 17 | 20.23066 | 4.90665 |

## चाचणी सारणी. क्र. ४.७३

## Paired Samples Test

| | | Paired Differences | | | | | t | df | Sig. (2-tailed) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Mean | Std. Deviation | Std. Error Mean | ९५ टक्के Confidence Interval of the Difference | | | | |
| | | | | | Lower | Upper | | | |
| Pair 1 | Sources of livelyhood before rehabilitation - Sources of livelyhood after rehabilitation | 39.47059 | 39.00980 | 9.46127 | 19.41360 | 59.52758 | 4.172 | 16 | .001 |

The null hypothesis that the means of both the groups in the pair are equal can safely be rejected. The mean difference which is positive (39.47) suggests that the 17 sources of livelihood under consideration have reduced. Thus, we can conclude that the **sources of livelihood for the people affected by the project have reduced.**

वरील क्र. ४.७३ तक्त्यामध्ये असे दिसून येते की, धरण बांधण्यापुर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी आणि धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार बऱ्यापैकी कमी झालेले दिसून येते. Significance Value ०.०१ इतकी आहे. (०.०५ पेक्षा कमी). याचा अर्थ नल हायपोथिसिस हा रेजेक्ट (Null hypothesis is rejected) होतो व आपल्याला असे मानता येते की, धरणापुर्वी किंवा पुनर्वसनावापुर्वी प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार व धरणानंतर किंवा पुनर्वसनानंतर प्रकल्पग्रस्त कुटुंबातील सरासरी रोजगार या दोन्ही सरासरीमध्ये सांख्यिकीय फरक आहे.

गृहित क्रमांक दोन प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या उपजिविकेची किंवा रोजगाराची साधने कमी झालेली आहेत. गृहितकृत्य दोनची पडताळणी करताना प्रकल्पग्रस्तांच्या एकूण उपजिविकेची किंवा रोजगाराची साधने कमी झालेली आहेत. कृषीवर आधारित रोजगार, वनावर आधारित रोजगार त्याचप्रमाणे जोडधंदा यामध्ये शेळी पालन, मेंढी पालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय इत्यादींमधील सारणी क्र. ४.४५, ४.४७ व ४.४९ वरुन हे स्पष्ट होते की,

प्रकल्पग्रस्त लोकसंख्येच्या रोजगारात घट झालेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या उपजिविकेची साधने कमी झालेली आहेत. एकूणच सारणी क्र. ४.६० वरुन प्रकल्पग्रस्तांच्या सरासरी रोजगारात घट झालेली आहे. त्यामुळे Ho= Null hypothesis is rejected.

वरील सारणी क्र. ४.७३ वरुन Paired T-Test चे परिणाम दर्शविते त्यामध्ये, Significance 2 trail मुल्य ०.०५ पेक्षा कमी आहे. हे असे दर्शविते की आधी आणि नंतरच्या गटासाठी आणि सांख्यिकीय दृष्टीने भिन्न आहेत. सर्व प्रकरणांमध्ये सरासरी फरक शून्यापेक्षा जास्त आहेत यामुळे, असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की घरातील सदस्यांचे मासिक उत्पन्न, शेतीची किंमत, पुनर्वसनानंतर उत्पादन आणि बचत करण्याची क्षमता कमी झाली आहे आणि त्यांची आर्थिक स्थिती ढासळली आहे. म्हणूनच आपण असे म्हणू शकतो की परिणाम केवळ योगायोगामुळे झाले नाहीत. यामुळे प्रकल्पग्रस्तांसाठी कमाईचे स्रोत म्हणजेच व्यवसायाच्या किंवा रोजगाराच्या संधीत घट झालेली आहे.

**४.८ सारांश:** प्रकरण ४ मध्ये आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करीत असताना धरणापूर्वी आणि धरणानंतर प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक परिस्थितीत बराच बदल झालेला दिसून येतो. ३७६ पैकी ३६५ प्रकल्पग्रस्त धरण्यापूर्वी समाधानी होते परंतु धरणानंतर फक्त ३ प्रकल्पग्रस्त समाधानी आहेत. धरणापूर्वी अत्यंत वाईट परिस्थिती म्हणनारा एकही प्रकल्पग्रस्त नव्हता. परंतु धरणानंतर २६५ प्रकल्पग्रस्त हे अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आर्थिक जीवन जगत आहेत. धरण्यापूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नात आणि धरणानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नात यामध्ये सुद्धा तफावत आढळते. धरणानंतर प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नात घट झालेली आहे. त्याचप्रमाणे व्यवसायाच्या संधीतही घट झालेली आहे. एकूणच त्यांच्या धरणानंतर रोजगारात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. तसेच वनावर आधारित रोजगारामध्ये सुद्धा घट झालेली आहे. कारण शासनाने ही संपूर्ण वने शासकीय वन म्हणून घोषित करण्यात आली आहे. त्यामुळे वनावर आधारित कुठलाही व्यवसाय प्रकल्पग्रस्तांना करता येत नाही. धरणातून मासेमारी व्यवसायावर सुद्धा शासनाने बंदी आणली. त्यामूडे एकूणच प्रकल्पग्रस्तांचा विविध क्षेत्रातील रोजगारात मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. सांख्यिकीय साधनांमधील सहसंबंधाचा वापर करुन उत्पन्न आणि रोजगार, बचत आणि गुंतवणूक, शिक्षण आणि उत्पन्न, शिक्षण आणि

रोजगार, रोजगार आणि बचत संबंध, अशा विविध घटकांवर सहसंबंध दर्शविण्यात आलेला आहे. टि चाचणी व Chi-Square या सांख्यिकीय तंत्राचा वापर करुन मध्य काढून गृहितकाची पडताळणी करण्यात आली. दोन्ही गृहिते टि चाचणीच्या माध्यमाने सिद्ध झालेली आहेत. म्हणजेच धरण बांधणीमुळे प्रकल्पग्रस्तांच्या उत्पन्नात घट झालेली आहे. तर गृहित क्रमांक २ नुसार प्रकल्पग्रस्तांच्या व्यवसायाच्या किंवा रोजगाराच्या संधीत घट झालेली आहे.

# संदर्भ

१) मृणालीणी फडनवीस व प्राची देशपांडे–२००४ मगोसीखुर्द सिंचन प्रकल्पातील पुनर्वसनाच्या समस्या एक आर्थिक अध्ययनफ –भाऊराव देवरस मानव संसाधन विकास व शोध प्रतिष्ठाण नागपुर पान नं. प्रस्तावना

२) Cernea Michael M. (2000) Risks, safeguards and reconstruction: A model for population displacement and resettlement. Econnomic and Political Weekly, 35, 3659–3678.

३) GOI, Maharashrta Project Affected Persons Rehabilitation Act 1999, p. 11

४) Rao Sanjeevan / Tyagi Deepak (2009) Research Methodology with SPSS, Dr. Shree Nivas publication-Jaipur, pp. 39

# प्रकरण–५

# संशोधनाचे सारांश, निष्कर्ष व शिफारसी

## ५.१ प्रास्ताविक:

संशोधन प्रकरणाचा शेवट हा निष्कर्ष व शिफारसींनी होत असतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रकल्पग्रस्तांनी दिलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारावर निष्कर्ष हाती आले आहेत. या निष्कर्षावर आधारित संशोधकाने काही उपाययोजना सुचविलेल्या आहेत. कुठल्याही संशोधनाचे निष्कर्ष हे अत्यंत महत्त्वाचे असतात. निष्कर्ष हे संपूर्ण संशोधनाचे प्रतिबिंब असते, म्हणजेच संशोधनातून काय फलित झालं हे निष्कर्षामधून स्पष्ट दिसते.

प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक विषयाला अनुसरुन त्यांच्या आर्थिक समस्या दिलेल्या आहेत. प्रकल्पग्रस्तांना कुठल्या आर्थिक समस्या भेडसावित आहेत? त्यांच्या उत्पन्नावर, रोजगारावर, व्यवसायावर व उपजिविकेवर परिणाम झाला, हे निष्कर्षाच्या माध्यमातून मांडले आहे. त्याकरिता शासनाला काही शिफारशी सुध्दा सुचविलेल्या आहेत.

## ५.२ सारांश:

१) संपूर्ण भारतात १९५०–१९९१ मध्ये २,१३,००००० लोक स्थलांतरित झाले आहेत. हे स्थलांतरण, धरण, खाणी, वन्यप्राणी विकास, राष्ट्रीय उद्यान, उद्योगांची स्थापना, यामुळे झालेले आहेत. त्यातील ७८ टक्के लोकांच्या पुनर्वसनाचा विचारच झालेला नाही. भारतामध्ये स्वातंत्र्य काळापासून म्हणजेच १९४७ पासून तर ५० वर्षापर्यंत ३३०० मोठे जलसिंचन प्रकल्प बांधण्यात आले आहे. त्यामध्ये २० ते ४० दशलक्ष लोकसंख्या विस्थापित झाली आहे.

२) जलसिंचन प्रकल्पांच्या बांधणीमुळे १६.४ दशलक्ष लोकसंख्या विस्थापित झाली. तर औद्योगिक विकासाच्या नावावर १.२५ दशलक्ष लोकसंख्या विस्थापित झाली. जमिनीचे खोदकाम करुन जमीनीतून खनिज पदार्थ व दगडी कोळसा मोठ्या प्रमाणात काढला जातो. या खाणीमुळे २.५५ दशलक्ष लोकसंख्या विस्थापित झाली. वन्यजीव

अभयारण्यामुळे ०.५ दशलक्ष व इतर क्षेत्रात ०.५ दशलक्ष अशी एकूण प्रकल्पामार्फत २१.३ दशलक्ष लोकसंख्या विस्थापित झालेली आहे.

३) गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पामुळे एकूण ५६१०४ लोकसंख्या धरणग्रस्त झालेली आहे. साधारणता १६०० कुटुंब प्रकल्पग्रस्त झालेली आहेत. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील ८३१२ चंद्रपूर जिल्ह्यातील १५४२ आणि भंडारा जिल्ह्यातील ६००० कुटुंब आहेत.

४) प्रकल्पामुळे एकूण २५०८०० हेक्टर जमिनीला जलसिंचनाचा लाभ मिळणार आहे. प्रकल्पाचे बांधकामाला सुरुवात झाली तेव्हा या प्रकल्पाचा खर्च ३७२ करोड रुपये होता परंतु ३४ वर्ष होऊनही प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण झालेले नाही आणि प्रकल्पाचा खर्च वाढत जाऊन आज १८४९४.५७ कोटी रुपये खर्च आलेला आहे. प्रकल्पाची पाण्याची क्षमता ४० टीएमसी इतकी आहे. प्रकल्पाचा लाभ भंडारा, चंद्रपूर आणि नागपूर या तीनही जिल्ह्यांना मिळणार आहे. सध्या या प्रकल्पामुळे ५०३१७ हेक्टर जलसिंचन होते.

५) वेगवेगळ्या समस्यांचा सामना प्रकल्पग्रस्त लोकसंख्या करीत आहेत, त्यात रोजगाराची समस्या, उत्पन्नाची समस्या, पुनर्वसनाची समस्या, स्थलांतराची समस्या, घरांची समस्या, पीक लागवडीची समस्या, शिक्षणाची समस्या, पाळीव प्राण्यांची समस्या, जंगल तोडण्याची समस्या व वनसंपत्तीची समस्या निर्माण झाल्या, या समस्यांच्या निराकरणासाठी शासनाचे धोरण कासवाच्या गतीने वाटचाल करीत आहे.

६) ओपन संवर्गातील प्रकल्पग्रस्त लोकसंख्येचे प्रमाण अत्यंत कमी म्हणजे १.८६ टक्के आहे, तर ओ.बी.सी. संवर्गातील सर्वाधिक म्हणजेच ३५.९१ टक्के असून अनुसुचित जातीचे ३०.३२ टक्के आणि अनुसुचित जमातीचे २०.७४ टक्के, तर सर्वात कमी प्रमाण म्हणजे ११.१७ टक्के लोकसंख्या एन.टी. समाजाची आहे.

७) अशिक्षितांचे प्रमाण ४.५२ टक्के, तर ज्या प्रकल्पग्रस्त व्यक्तिंनी १० वी पर्यंत शिक्षण घेतले ते ५०.२७ टक्के आहे. १२ वी पर्यंत शिक्षण हे २७.९२ टक्के लोकसंख्येने घेतले व ज्यांनी पदवीपर्यंत शिक्षण घेतले आहे ते ९.८४ टक्के आहेत. तर ज्या प्रकल्पग्रस्त

लोकसंख्येनी पदविका (डिप्लोमा) शिक्षण घेतलेले आहे, ते ४.२६ टक्के आहे व ज्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे त्यांचे प्रमाण ३.९ टक्के आहे.

८) बाजारभावानुसार आज प्रति एकर जमिनीची किंमत १४–१५ लाख रुपये आहे. परंतू त्याच जमिनीचा शासनाने प्रति एकर दिलेला मोबदला २५ हजार –१.१५ लाख रुपये आहे.

९) ०.२७ टक्के प्रकल्पग्रस्तांना पाटबंधारे विभागात पहारेकरी पदांवर नौकरी दिलेली आहे, तर ९९.७३ टक्के लोकसंख्येला इतर स्वरूपात मोबदला दिलेला नाही. म्हणजेच त्यांना आर्थिक स्वरूपात किंवा शेती, भांडवल व इतर कोणत्याही स्वरूपात मोबदला दिलेला नाही.

१०) बाजारभावाप्रमाणे प्रकल्पात गेलेल्या घरांची किंमत जास्त आहे. परंतू शासनाने प्रकल्पग्रस्तांना घरांचा दिलेला मोबदला फारच कमी आहे.

११) वार्षिक बचतच करु न शकणारे प्रकल्पापूर्वी १.६० टक्के होते तेच प्रकल्पबांधणीनंतर ७६.३३ टक्के इतके वधारले, बचत न करु शकणाऱ्या टक्केवारीत ७४.७३ टक्के वाढ झाली आहे. वार्षिक ५–१० लाख बचत करणारे १.३३ टक्के प्रकल्पग्रस्त नंतर मात्र शून्य बचत करतात.

१२) शेती खरेदी करण्याकरीता ३.७२ टक्के, लग्न व समारंभासाठी २.३९ टक्के, व्यवसाय निर्मितीसाठी ३.४६ टक्के, आजारपणासाठी ३.१९ टक्के तर नवीन घर बांधणीसाठी ५.५९ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतले आहे. ८१.३८ टक्के लोकसंख्येनी कर्ज घेतलेले नाही.

१३) एकूण पाचही तालुक्यात ९२ प्रकल्पग्रस्तांच्या कर्जबाजारीपणापत वाढ झाली, तर २८४ लोकांच्या कर्जबाजारीपणामध्ये घट झालेली आहे. त्यांचे प्रमाण अनुक्रमे ३४.४७ टक्के वाढ व ७५.५३ टक्के घट झालेली आहे.

१४) प्रकल्पापूर्वी पुरुषांची १३२.८६ रुपये तर स्त्रियांची ११२.०३ रुपये प्रति दिवस मजुरी होती. प्रकल्पबांधनीनंतर पुरुषांची मजुरी २०७.७९ रुपये तर स्त्रियांची १८३.९ रुपये झाली. पुरुषांच्या सरासरी मजुरीत प्रति दिवस ७४.९४ रुपयांनी वाढ झाली तर

स्त्रियांची ७१.८६ रुपयांनी वाढ झालेली आहे, परंतु बाजार भावाप्रमाणे व शासकीय रोजगाराच्या दरापेक्षा हे दर कमी आहेत.

१५) प्रकल्पग्रस्त कुटुंबांचा धरणापूर्वी किंवा पुनर्वसनापूर्वी एकूण सरासरी खर्च २३१० रुपये होता तो खर्च पुनर्वसनानंतर २७८० रुपये झाला, म्हणजेच प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या एकूण सरासरी उपभोग खर्चात ४७० रुपयांनी वाढ झाली.

१६) प्रकल्पग्रस्तांची धरणापूर्वी अर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट असणाऱ्या गटामध्ये शून्य प्रकल्पग्रस्त येतात. परंतु धरण बांधणीनंतर यामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. २६५ प्रकल्पग्रस्त म्हणजेच ७०.४८ टक्के प्रकल्पग्रस्त धरणानंतर अत्यंत वाईट आर्थिक परिस्थितीचा सामना करत आहेत.

१७) शेळी किंवा मेंढी पालन व्यवसायात ११.४४ टक्के, कुक्कुटपालन व्यवसाय १०.६४ टक्के, मासेमारी व्यवसायात ६.९१ टक्के, दूध व्यवसायात ४२.०२ टक्के घट झालेली आहे. कारण हे व्यवसाय कृषीशी संबंधित होता, त्यामुळे ही घट जास्त झालेली आहे.

१८) पूर्वी रोख मजुरीमध्ये फक्त १०.६४ टक्के लोकसंख्या सहभागी होती. परंतु पुनर्वसनानंतर या रोजगारात बदल घडून आलेला आहे आणि आता ८३.७८ टक्के लोकसंख्या ही रोख मजुरी या रोजगारावर पूर्णपणे अवलंबून आहे. रोखमजुरी/ मोलमजुरी या क्षेत्रात ७३.१४ टक्के वाढ झालेली आहे.

१९) प्रकल्पबांधणीनंतर पुनर्वसनाच्या ठिकाणी कृषीशी संबंधित व्यवसाय किंवा रोजगार करणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण अत्यंत कमी झालेले आहे. २९३ प्रकल्पग्रस्तांना कुठल्याही प्रकारचा कृषीशी संबंधित व्यवयास किंवा रोजगार नाही, त्याचे प्रमाण ७७.९३ टक्के म्हणजेच सर्वात जास्त आहे.

२०) शेती व्यवसायामध्ये १०.६४ टक्के, शेती आणि वनमजुरीमध्ये २८.७३ टक्के, शेती व व्यवसायात ८.५१ टक्के व दुकानाचा व्यवसायात ८.५१ टक्के घट झाली. परंतु रोखमजुरी व मोलमजुरी मध्ये प्रचंड वाढ झाली ती ५७.१८ टक्के आहे. कारण इतर क्षेत्रात रोजगार उपलब्ध नाही. त्यामुळे रोख मजुरीत वाढ झाली.

२१) प्रकल्प बांधणीपूर्वी ज्या प्रकल्पग्रस्तांचे ०–२५ हजार वार्षिक उत्पन्न होते ते एकूण लोकसंख्येच्या ३.४६ टक्के इतके होते. तेच प्रमाण प्रकल्प बांधणीनंतर ३२.४५ टक्के इतके वधारले आहे. या दोहोतील वाढ २८.९९ टक्के इतकी आहे.

२२) धरणबांधणी व पुनर्वसनापूर्वी ०–२५ हजार रुपये उत्पन्न मिळविणाऱ्या गटात १८ प्रकल्पग्रस्त आहेत त्यांचे प्रमाण १३.१४ टक्के आहे, तर धरणबांधणी व पुनर्वसनानंतर ०–२५ हजार रुपये त्याच उत्पन्न गटात १५.३३ टक्के प्रकल्पग्रस्त येतात. त्यामुळे या उत्पन्न गटात २.१९ (१५.३३–१३.१४) टक्कयांनी वाढ झालेली आहे.

२३) प्रकल्पग्रस्तांचे ०–२५ हजार वार्षीक उत्पन्न होते ते एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात २.१३ टक्के इतके होते. तेच प्रकल्पबांधणीनंतर मात्र २१.५४ टक्के इतके वधारले आहे. या दोहोतील फरक किंवा वाढ १९.४१ टक्के इतकी आहे. शेकडा १०.६४ टक्के लोकसंख्या प्रकल्प बांधणीपूर्वी २५–५० हजार उत्पन्न कमवणारी होती. ती प्रकल्पबांधणीनंतर ४४.१५ टक्के एवढी वाढली. त्यातील वाढ किंवा बदल ३३.५१ टक्के इतकी आहे.

२४) खर्चाच्या वर्गीकरणामध्ये शेकडा २.१३ टक्के लोकसंख्या ०–२५ हजार गटातील आहे. २५–५० हजार रुपये दरम्यान १२.७७ टक्के इतकी आहे. प्रकल्पबांधणीनंतर मात्र हे प्रमाण अनुक्रमे ३७.५० टक्के आणि ४०.१६ टक्के इतके वाढले आहे.

२५) १–२ लाख गटामध्ये प्रकल्पापुर्वी २६.०६ टक्के वार्षिक खर्च करणारे लोक होते. प्रकल्पबांधणीनंतर ०.५३ टक्के झाले. या दोहोतील फरकाची घट २५.५३ टक्के एवढी निचांकी झाली आहे. २–३ लाख गटातील पूर्वीचा वाटा १५.६९ टक्के, तर नंतरचा ०.२७ टक्के आहे यातील फरकामध्ये १५.४२ टक्के घट आहे.

२६) पुनर्वसित गावांमध्ये नळाची पाईपलाईन जरी असली तरी आठवड्यातून फक्त एक किंवा दोनदा नळाला पाणी येते. ते सुध्दा फक्त एक किंवा दोन तासासाठी. शाळा व त्याचे क्रीडांगण यामध्ये ५२.८६ टक्के उत्तम परिस्थिती आहे असे सांगितले. ४७.१४ टक्के प्रकल्पग्रस्त समाधानी आहेत. पुनर्वसित गावांमध्ये ८७.१४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी समाजासाठी मंदिराची सोय उत्तम आहे. तर अंतर्गत जोड रस्ते व मुख्य रस्ते

बांधकामामध्ये सुध्दा प्रकल्पग्रस्त समाधानकारक असण्याचे प्रमाण ५४.२९ टक्के आहे. उत्तम सोय म्हणणाऱ्या प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण ४५.७९ टक्के आहे. पुनर्वसित गावांमध्ये विद्युत खांब निर्माण करुन प्रत्येक घरामध्ये वीज देण्याची व्यवस्था केलेली आहे. ९३.९३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी ही व्यवस्था उत्तम आहे हे दर्शविले. ९५.७१ टक्के प्रकल्पग्रस्तांनी स्मशानाच्या जागेकरिता दिलेले शेड याची व्यवस्था उत्तम असल्याचं सांगितले. सांडपाण्याची व्यवस्था उत्तम असे स्पष्ट केले. ७५.७१ टक्के प्रकल्पग्रस्तांनी असमाधानकारक सार्वजनिक प्रसाधनगृहाची परिस्थिती दर्शविले. जनावरांसाठी जागा किंवा शेड कुठल्याही पुनर्वसन गावांमध्ये व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे ८८.९३ टक्के असमाधानकारक आहे. ८९.६४ टक्के प्रकल्पग्रस्तांनी बस सेवा व बस स्थानक असमाधानकारक असल्याचे स्पष्ट केले. चराई जमिनीमध्ये ४१.४३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी समाधानकारक आहोत असे म्हटले. तर ५४.२८ टक्के प्रकल्पग्रस्तांनी असमाधानकारक आहोत असे दर्शविले. म्हणजे गावातील विस्तार योजनांसाठी व वावरांसाठी काही प्रमाणात जागा शिल्लक आहे या जागेचा योजनांसाठी वापर करुन धरणग्रस्तांचा विकास करता येतो ते स्पष्ट होते.

## ५.३ निष्कर्ष:

१) **वनावर आधारीत उपजिविकेच्या साधनांचा ऱ्हास झालेला आहे:** २०० गावातील लोकसंख्या या प्रकल्पामुळे प्रभावित झालेली आहे या गावातील वनक्षेत्र धरणाने बाधित झाले. त्या वनक्षेतात असलेली टेंबुर, चिंच, खिरणी, डिंक, मोह, टोरी, कचर, कवट, चार, तेंदुपत्ती इत्यादी झाडांवर आणि वनातील फळझाडांवरही धरणग्रस्त लोकसंख्या रोजगारात होती. प्रकल्प बांधणीमुळे ७८.६३ टक्के प्रकल्पग्रस्तांचा वनावर आधारित असलेला रोजगार किंवा उपजीविका ऱ्हास झालेली आहे.

२) **जलसिंचन प्रकल्पामुळे वनांचा विनाश:** काही वनक्षेत्र धरणातील बुडीत क्षेत्रात येत असल्यामुळे या एकूण वनक्षेत्राला तोडण्यात आले. एकूण ४७२०.२२५ हेक्टर चौ.कि.मि. वनक्षेत्र प्रकल्पाने बाधित झालेल्या या एकूण वनक्षेत्राला तोडण्यात आले आहे. एकूणच जलसिंचन प्रकल्प बांधणीमुळे वनसंपदेचा विनाश झालेला आहे.

३) **शासनाने जमिनीचा योग्य मोबदला दिलेला नाही:** शासनाने जमिनीचा प्रति एकर २४ हजार ते १ लाख ३० हजार रूपयापर्यंत मोबदला दिलेला आहे. शासनाने सिंचित जमीन व कोरडवाहू जमीन यात कोणताही फरक केलेला नाही. दोन्ही प्रकारच्या जमिनीचा सारख्याच प्रमाणात मोबदला देण्यात आला. सध्या प्रकल्पबाधित गावातील कोरडवाहू जमीन सरासरी प्रति एकर १०–१२ लाख व सिंचित जमीन १२–१४ लाख रुपयापर्यंत या जमिनीची किंमत आहे.

४) **जमिनीचा शिल्लक मोबदला मिळालेला नाही:** पुनर्वसन केलेल्या एकूण ९३ गावांचा शासनाने जमिनीचा जो मोबदला ठरविलेला आहे तो पूर्णत: प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळालेला नाही. मोबदल्यातील २५–५० टक्के शिल्लक असलेली रक्कम २०१८ पर्यंत शासनाने प्रकल्पग्रस्तांना दिलेली नाही. त्यामुळे पुनस्थापित ठिकाणी प्रकल्पग्रस्त शेतीसुध्दा खरेदी करु शकले नाहीत. जो मोबदला मिळालेला आहे, तो पैसा प्रथम २५ टक्के नंतर २५ टक्के या स्वरुपात मिळाला. शेतकऱ्यांचे पुनर्वसन होऊनही अद्याप काही शेतकऱ्यांचा शिल्लक मोबदला शासनाने दिलेला नाही.

५) **गावठाणाच्या बाहेर असणाऱ्या घरांचा मोबदला दिलेला नाही:** १९८३ पुर्वी वनविभागाच्या जागेवर प्रकल्पग्रस्त गावातील लोकांनी गावठाणाच्या बाहेर घरे बांधली आणि घरात वास्तव्य सुरू केले. तेव्हा वनविभागासाठी प्रकल्पग्रस्त गावातील गावठाणाच्या बाहेर असणाऱ्या घरातील लोकांना वन विभागाने कुठल्याही प्रकारची नोटीस दिलेली नाही. प्रकल्प अमलात आला तेव्हापासून वन विभागाचे म्हणणे आहे, की प्रकल्पग्रस्त गावातील गावठाणाच्या बाहेर जी घरे बांधण्यात आली ती वनविभागाच्या जागेवर आहेत. वन विभागाच्या अशा म्हणण्यावरून महाराष्ट्र शासनाने गावठाणाच्या बाहेर असणाऱ्या घरांचा मोबदला दिलेला नाही.

६) **मासेमारी व्यवसायावर परिणाम:** वनावर आधारित प्रकल्पग्रस्तांमध्ये १०.१० टक्के लोकसंख्या मासेमारी हा व्यवसाय करीत होते. प्रकल्प बांधण्याचे काम सुरू झाले तेव्हापासून अधिकारी वर्गाने प्रकल्पग्रस्त गावातील ढिवर समाजातील लोकांना नदीच्या पात्रातून मासेमारी हा व्यवसाय करण्यावर बंदी आणली. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावातील

मासेमारी व्यवसायात ६.९१ टक्के घट झाली आणि मच्छिमार व्यवसायावर अवलंबून असणारी उपजीविका ऱ्हास पावली.

७) **पर्यावरणीय असंतुलन निर्माण होण्याची शक्यता:** प्रकल्पामुळे वनाचा विनाश झालेला आहे. वनक्षेत्र हे जल तथा वायूपासून जमिनीचे संरक्षण करते. वन/ जंगल पावसाच्या प्रवाहाला रोखून पुराची संभावना कमी करते. वनाचे पादप आवरण जमिनीच्या ओलाव्यातील बाष्प कमी करते. वन वायुमंडळातील कार्बनडाय ऑक्साईड तसेच ऑक्सिजनच्या क्रांतीक संतुलनाला टिकवून ठेवते. वन कार्बनडाय ऑक्साइड आणि सल्फर डायऑक्साईड इत्यादी हानीकारक गॅसेस वायुमंडळातून अवशोषन करून पर्यावरण संतुलन टिकवून ठेवत, वायुमंडळातील आर्द्रतेला कमी करून पावसाला सहाय्यक ठरते. इत्यादी कारणावरून प्रकल्पग्रस्त भागात पर्यावरणीय असंतुलन निर्माण होण्याची शक्यता आढळली.

८) **पुनर्वसनाच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या:** पुनर्वसीत गावांमध्ये प्रकल्पग्रस्तांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केलेला दिसत नाही. काही पुनर्वसीत गावांमध्ये नळ जोडणी केली आहे, परंतु पुनर्वसीत गावात नळांना आठवड्यातून १ किंवा २ दिवस पाणी येते. त्यामुळे ही सर्व विस्थापित झालेली लोकसंख्या पुनर्वसीत गावाच्या ठिकाणी पाण्याच्या अपुऱ्या सोयीमुळे असमाधानी आहे.

९) **वनावर आधारित असणाऱ्या पशु–पक्षांचा विनाश:** गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत वनक्षेत्रात सांबर, चीत्तर, हरीण, इत्यादी पशू आढळले, याचप्रमाणे मोर, जंगली कबुतर, मैना, कोकिळा अशा विविध प्रकारच्या पक्षी आढळले. प्रकल्पबांधणीमुळे गावातील वनाचा जवळपास संपूर्ण विनाश झालेला आहे. त्यामुळे या वनावर आधारित पशू पक्षी दुसऱ्या वनक्षेत्राच्या ठिकाणी निघून गेले.

१०) **बिडीपत्ती (तेंदूपत्ता) व्यवसायावर झालेला परिणाम:** वनावर एकूण लोकसंख्येपैकी ३३.३३ टक्के पुरूष व ९४.२३ टक्के स्त्रिया आधारीत आहेत. वनावर २०.०० टक्के प्रकल्पग्रस्त बिडीपत्ती हा व्यवसायात करीत होते. परंतु या प्रकल्प बांधणीमुळे वनक्षेत्र

बाधीत झाले. त्यामुळे या वनक्षेत्रावर आधारित असलेला बिडीपत्ती हा व्यवसाय ५२.०० टक्के नष्ट झाला.

११) **शासकीय नोकरीची अपेक्षा:** प्रत्येक प्रकल्पग्रस्तांची एकच मागणी होती की, शासकिय सेवेत त्यांच्या शिक्षणाप्रमाणे नोकरी देण्यात यावी. परंतु फक्त एका व्यक्तिला शासकीय सेवेत गोसीखुर्द प्रकल्पाअंतर्गत नोकरी मिळाली. उर्वरित ३७५ कुटुंबांना शासकीय नोकरी मिळालेली नाही. त्यामुळे सर्व प्रकल्पग्रस्त कुटुंबांची एकच अपेक्षा आहे की, कुटुंबातील एकाला तरी चपराशी किंवा शिपाई या चतुर्थ श्रेणी गटात नोकरी देण्यात यावी ही सर्व प्रकल्पग्रस्तांची अपेक्षा आहे.

१२) **शेतमजुरांना वर्षभर रोजगार मिळत नाही:** जलसिंचन क्षमता कमी प्रमाणात असल्यामुळे मजुरांना काम फक्त खरीप हंगामातच मिळते. म्हणजेच त्यांना वर्षभर रोजगार मिळत नाही. त्याचप्रमाणे वनाचा विनाशामुळे मजुरांना वर्षभर रोजगार मिळत नाही असे आढळले.

१३) **अधिकारी वर्गाचे दुर्लक्ष:** प्रकल्पाच्या दृष्टिकोनातून विचार केला असता पर्यायी वनीकरणाची व्यवस्था आणि पुनर्वसनाची योजना राबवितेवेळी अधिकारी वर्गाचा अरेरावीपणा व दुर्लक्षता आढळून आली. पुनर्वसनाच्या ठिकाणी धरणग्रस्त लोकसंख्येच्या मुलांकरिता दवाखाने, कॉलेज व इतर दळण–वळणाच्या अपुऱ्या सोयी निदर्शनात आल्यामुळे विकास झाला नाही.

१४) **सरकारी योजना अपेक्षेप्रमाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही:** प्रकल्पाचे काम सुरू झाल्यापासून लोकांना रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना त्याचप्रमाणे गुरांच्या खरेदीकरिता दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या धरणग्रस्तांना ५० टक्के अनुदानाच्या रूपात जी रक्कम आधी मिळत होती ती रक्कम शासनाने जवळपास बंद केली. बी–बियाणे, किटकनाशके आणि रासायनीक खते काही प्रमाणात शासन यावर सूट देऊन शेतकऱ्यांना मिळत असे. परंतु या सर्व योजना शासनाने काही प्रमाणात बंद केल्या.

१५) **बारमाही पिकांचे प्रमाण कमी:** प्रकल्पग्रस्त शेतकरी वर्षातून फक्त एकच पिक घेताना आढळून आले. वर्षातून दोन्ही प्रकारचे म्हणजेच खरीप व रब्बी पिके घेतली तर

उत्पादनात वाढ होऊ शकेल. जलसिंचन योजना कमी असल्यामुळे तसेच जलसिंचनाचे साधन कमी प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे बारमाही पिकांचे प्रमाण कमी आहे.

१६) **योग्य मार्गदर्शनाचा अभाव:** धरणग्रस्त लोकसंख्या आणि शेतकरी वर्ग अशिक्षित असल्यामुळे सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या कृषीविषयक योजनांचा लाभ आणि वनावर आधारित योजनांचा लाभ तसेच मच्छिमारी व्यवसायावर आधारित योजनाचा लाभ कसा अधिक प्रमाणात घेता येईल अशा प्रकारचे योग्य मार्गदर्शन शासकीय अधिकाऱ्याकडून मिळत नाही आणि प्रकल्पग्रस्तांना मिळालेले नाही.

१७) **लागवड योग्य शेतजमिनीची कमतरता:** पुनस्थापित गावठाणात फक्त ३ टक्के प्रकल्पग्रस्तांनी शेती खरेदी केली आणि ती सुध्दा १ किंवा २ एकर इतकीच शेती खरेदी केली. पुनस्थापित भागात फारशी शेती नाही. साधारणतः राज्य किंवा जिल्हा महामार्गाच्या दोन ते पाच किलोमिटरच्या आत प्रकल्पग्रस्तांचे पुनस्थापन केले, तिथे शेतीचे प्रमाण अतिशय नगण्य दिसते. म्हणजे एकूणच पुनस्थापित गावांच्या ठिकाणी लागवडीयोग्य शेतजमिन नाही. त्यामुळे शेतीवरील रोजगार कमी आहे.

१८) **खर्चाच्या तुलनेत उत्पादन क्षमता कमी:** शेतकऱ्यांच्या लागवडी खर्चातही वाढ झालेली आहे. बी–बियाणे यांच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे रासायनिक खतांच्या किंमती सतत वाढत आहेत. मजुरांची मजुरी शेतकऱ्यांना द्यावी लागते. तसेच वीज दरामध्येही वाढ झालेली आहे, इत्यादी गोष्टीमुळे खर्चाच्या तुलनेत उत्पादन क्षमता कमी आहे.

१९) **गुराढोरांसाठी चाऱ्यांची आणि जाळण्याकरिता काड्यांची अडचण:** प्रकल्पामुळे जे वनक्षेत्र बाधित झाले, त्या वनक्षेतात असलेले गवत, काड्यांचा किंवा लाकडांचा स्त्रिया स्वयंपाकात जाळण्याकरिता उपयोग करीत. परंतु प्रकल्पामुळे वनक्षेत्राचा विनाश होऊन गुरा–ढोरासाठी चाऱ्यांची आणि जाळण्याकरीता काड्यांची अडचण आली.

२०) **रोजगाराची साधने उपलब्ध नाही (बेरोजगारी):** प्रकल्पग्रस्त गावात संपूर्ण शेतजमीन ही प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात गेलेली आहे. त्यामुळे शेतीवर आधारित किंवा कृषीसंबंधित रोजगार नाही. तसेच पुनर्वसित गावात सुध्दा शेतजमिन नाही, नदी नाही, जंगल नाही

त्यामुळे यावर आधारित शेतमजुरी, मच्छीमारी, वनांवरील रोजगार नाही. प्रकल्पापुर्वी फक्त १०.६४ टक्के प्रकल्पग्रस्त रोखमजुरी किंवा मोलमजुरीत रोजगार करीत होते. प्रकल्पानंतर रोखमजुरीच्या प्रमाणात ६७.८२ टक्के वाढ झाली. त्यामुळे त्यांचे जीवन हालाखीचे झालेले आहे आणि त्यांना आपल्या दैनंदिन गरजा कशाप्रकारे पूर्ण कराव्यात हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

२१) **अपुरा कर्जपुरवठा व अधिकारी वर्गाचे असहकार्य:** शेतीच्या उपयोगात येणारी यांत्रिकी अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि विहिरी बांधण्यासाठी व विहिरीत पंप बसविण्यासाठी तसेच मच्छिमारी व्यवसायाकरिता जाळे खरेदी करण्यासाठी मिळणारा कर्जपुरवठा कमी आहे आणि कर्जपुरवठा प्राप्त करण्यासाठी अडचणी निर्माण होतात. विशेषकरून अधिकारी वर्गाच्या निष्काळजीपणामुळे विकासाची गती मंदावली आहे.

२२) **शासनाने महत्त्वपूर्ण वनस्पतींचा मोबदला दिलेला नाही:** महाराष्ट्र शासनाने प्रकल्पाअंतर्गत शेतीतील ज्या वनस्पती आहेत, ज्यामध्ये सागवन, सिसम, बाबूळ, संत्र्याचा बगीचा, मोसंबीचा बगीचा, पेरूचा बगीचा आणि इतर फळांच्या वनस्पतीचा शासनाने मोबदला दिलेला नाही तर शेतीचा सुध्दा पैसा संतोषजनक दिलेला नाही.

२३) **शासनाने मागील १० वर्षापासून योग्य योजना राबविल्या नाहीत:** शासनाने रोजगार हमी योजना, ग्राम सडक योजना त्याचप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांसाठी ट्रायसेम (TRYSEM- Training of Rural Youth for Self-Employment) योजना यापैकी एकही योजना योग्य प्रकारे राबविण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र राज्याची अंत्योदय योजनाही २००३ या वर्षापासून जवळपास बंद करण्यात आली.

२४) **घरांच्या बाजूला असलेल्या फळझाडाचां मोबदला दिलेला नाही:** घरांच्या सभोवताल किंवा बाजूला जी फळझाडे आहेत प्रामुख्याने सिताफळाची झाडे, चिंच, बोर, आंबा, फणस इत्यादी प्रकारच्या झाडाचा शासनाने प्रकल्पग्रस्त कुटुंबांना काहीही मोबदला दिलेला नाही.

२५) **घराचां योग्य मोबदला दिलेला नाही:** धरणग्रस्त कुटुंबातील लोकांची उत्तरे ऐकल्यावर असा निष्कर्ष निघतो की, जुन्या घरात सागवानाचा उपयोग जास्त प्रमाणात आढळला

तर शासनाने १५ वर्षे अगोदरच्या भावाने घराची किंमत दिली. परंतु मोबदला योग्य नाही. असे निदर्शनास आले.

२६) **पुनर्वसनाच्या ठिकाणी मुलभूत गरजा नाहीत**: पुनस्थापित गावामध्ये प्रत्यक्ष पाहणी केली असता हे आढळून आले की, त्या मुलभूत १३ सोयी, ज्या शासनाने पुनस्थापित गावांच्या ठिकाणी ठरवून दिलेल्या आहेत त्या पाहावयास मिळालेल्या नाही. यामध्ये दवाखाना, सार्वजनिक प्रसाधनगृह, जनावरांसाठी जागा, कुरण जमीन, चराई जमीन, गावातील, वावरासाठी जागा. व इतर मुलभूत गरजा पुनर्वसन गावात बघायला मिळालेली नाहीत. त्यामुळे त्यांची हेळसांड झालेली आहे.

२७) **काही प्रकल्पग्रस्तांना घर बांधण्यासाठी जागा मिळालेली नाही**: प्रकल्पग्रस्त गावात ज्या व्यक्तीचे घर गावठाणामध्ये होते. फक्त त्या प्रकल्पग्रस्तांना पुनस्थापनेच्या भागात घरांसाठी जागा मिळालेली आहे, परंतु ज्यांचे घर गावठाणाबाहेर होते, त्या प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनात जागा दिलेली नाही. त्यामुळे त्यांना पुनर्वसन गावात घर बांधण्यासाठी मोठ्या अडचणी येत आहेत.

२८) **विहिरीचा किंवा बोरवेलचा पैसा दिलेला नाही**: शेतकऱ्यांच्या शेतामध्ये शेतीला पाणी देण्याकरिता त्यांनी ज्या विहिरीचे बांधकाम केले होते किंवा जमिनीला बोर मारून बोरवेल तयार केलेल्या होत्या, त्या विहिरी किंवा बोरवेलचा शासनाने कुठल्याही प्रकारची नोंद घेतलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना विहिरीचा किंवा बोरवेलचा कुठल्याही प्रकारचा मोबदला दिलेला नाही. यामुळे ते प्रकल्पग्रस्त शासनावर नाराज आहेत.

२९) **रोजगार हमी योजना**: प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित गावात वर्षातून फक्त ३ महिने योजनेची कामे मिळतात. मजुरीचा दर १९२ रुपये प्रतिदिवस असतो. रोजगाराच्या इतर संधी उपलब्ध नसल्याने पुनर्वसित गावात ही योजना अपुरी पडते. सर्व प्रकल्पग्रस्त रोजगार हमी योजनेची कामे करु इच्छितात परंतु प्रत्येकालाच काम मिळत नाही. त्यातच मजुरीचा दर सुध्दा अत्यंत कमी असून मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त काम करण्यास तयार आहेत.

३०) **सहकारी बँकेतील ठेवी बुडाल्या:** काही प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडून मिळालेला शेतीचा व जमिनीचा संपूर्ण पैसा भिवापूर सहकारी बँकेत ठेव स्वरुपात ठेवला. परंतु सहकारी बँक काही कारणाने बंद पडली. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण ठेवी बुडाल्या. शासनाने त्यांच्या ठेवी परत मिळाव्यात याकरिता कुठलेही फारसे प्रयत्न केलेले नाही. त्यामुळे काही प्रकल्पग्रस्तांना प्रचंड आर्थिक समस्या आहेत.

३१) **नविन योजनांचा अभाव:** प्रकल्प बांधण्याचे काम जवळपास १९८८ साली सुरु झालेले आहे, तेव्हापासून शासनाने गावांमध्ये आपल्या योजना कमी प्रमाणात राबविल्या. जवाहर रोजगार योजना २००१ पर्यंत जवळपास संपविलेल्या आहेत तसेच लहान मुलांकरिता शाळेच्या माध्यमातून जी अंत्योदय योजना महाराष्ट्र सरकार चालवित होती ती योजना जवळपास २००३ पर्यंत समाप्त करण्यात आली. मच्छिमारी व्यवसायाकरिता शासन पूर्वी मच्छिमारी लोकांना शासनाकडून अनुदानाच्या रूपात मच्छिमारी व्यवसायाकरिता जाळे देत. परंतु आता शासनाने ही जाळे देण्याची व्यवस्था बंद केलेली आहे.

३२) **गुरांसाठी चराईच्या साधनांची अडचण:** शासनाने झुडपी जंगले तोडण्याची वेगवान प्रक्रिया अवलंबिली आहे. त्यामुळे वनक्षेत्र आणि झुडपी जंगले व गुरांकरीता चाऱ्यांसाठी असणारे गवत हे सर्व वनक्षेत्र नष्ट झालेले आहे. पूर्वी गावांमध्ये चराईची जी साधने उपलब्ध होती ती साधने प्रकल्प बांधणीमुळे नष्ट झालेली आहेत. वनक्षेत्राच्या विनाशाच्या प्रक्रियेमुळे प्रकल्पग्रस्तांनी आपली गुरेढोरे विकण्याचा सपाटा जोरात सुरु केलेला आहे.

३३) **प्रकल्पाने बाधित सिंचित जमीन:** प्रकल्पग्रस्त गावातील जवळपास ३० टक्के जमीन सिंचित होती तर ७० टक्के जमिन ही असिंचित होती. जी ३० टक्के जमिन सिंचित होती ती पाण्यात पंपसेट बसवून शेतीला पाणी पुरवठा करीत असत. परंतु शासनाने जेव्हा प्रकल्पग्रस्त जमिनीचा मोबदला दिला त्यावेळेस सिंचित जमिनी आणि असिंचित जमिनीचा सारख्याच भावाने मोबदला वाटप केला.

३४) **शासकीय मोबदला:** शासनाने शेतीचा जो पैसा दिलेला आहे तो योग्य नाही. कारण शासनाने ३० वर्षा पूर्वीची जी शेतीची किंमत होती त्या दराने पैसा दिला परंतु धरण तयार करता करता ३० वर्षे पेक्षा जास्त कालावधी लागला तरीही धरण आज पूर्णपणे तयार झालेले नाही. शासनाने ३० वर्षे अगोदर जी शेतीची किंमत गृहित धरली ती फारच कमी होती. शासनाने २४ हजार ते १.२५ लाख रुपये प्रति एकर अशा निरनिराळ्या भावाने जमिनीचा दर निर्धारित केला. परंतु आजच्या स्थितीत त्या शेतीची किंमत १०–१५ लाख रुपये प्रति एकराच्या जवळपास आहे.

३५) **होणाऱ्या तोट्यांचा अभ्यास:** प्रकल्पामध्ये पूर्णत: प्रभावित एकूण ९३ गावातील बहुतांश व्यक्ति बिडीपत्ती (तेंदूपत्ता) व्यवसायात होते. हा नगदी व्यवसाय होता. त्याचप्रमाणे टोरी, मोह, डिंक, मध गोळा करणे या व्यवसायावर देखील प्रकल्पामुळे परिणाम झाला. जंगलावर अधारित चिंच, बोर, टेंबूर, आवळा, कवट, चार, सिंगाळे, खिरण्या, कचर, सिताफळ या फळांच्या व्यवसायावर सुद्धा परिणाम झाला. प्रकल्पानंतर नदीच्या खोऱ्यात तिथल्या अधिकारी वर्गाने आणि रक्षक विभागाने मासेमारी लोकांना मासे मारण्यास सक्त मनाई केली त्यामुळे तिथल्या मासेमारी व्यवसायावर परिणाम झाला.

३६) **पुनर्वसनाच्या ठिकाणी नदी आणि तलावांचा अभाव:** प्रकल्पग्रस्त गावांमध्ये डावीकडे मुरू नदी आणि उजवीकडे वैनगंगा नदी वाहत असे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावातील ढिवर समाजातील अशिक्षित तरूण पिढी मच्छिमारी करीत होते. तसेच बिडीपत्ती, मध गोळा करणे, लाकूड कटाई इत्यादी व्यवसायातून आपली उपजीविका चालवित होते. परंतु पुनस्थापित गावांमध्ये शहरीकरणाची प्रक्रिया बघायला मिळाली व पुनर्वसनाच्या सभोवताली कोणत्याही प्रकारच्या नदी किंवा तलावांचा अभाव, त्यामुळे प्रकल्पग्रस्त गावातील अशिक्षित ढिवर समाजांचा हा व्यवसाय लूप्त झाला त्यांना उपजीविकेचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

३७) **जंगलावर आधारित व्यवसायाचा अभाव:** जंगलावर आधारित लोकसंख्येत १९.७१ टक्के पुरुष तर ८०.२९ टक्के स्त्रिया होत्या. स्त्रिया प्रामुख्याने बिडीपत्ती व्यवसायात गुंतलेल्या होत्या तसेच डिंक, मोह, टोरी गोळा करणे व मोळी विकण्याचे काम करीत असे, परंतु

पुनस्थापनेच्या भागात जंगलाच्या अभावामुळे जंगलावर आधारित व्यवसायात २८.७३ टक्के घट झालेली आहे.

लोकांना राहण्यासाठी जमीन दिली जात आहे. परंतु त्यांना घरे स्वत:च बांधायची आहेत व शेतजमीन त्यांना दिलेली नाही त्यामुळे प्रकल्पग्रस्तांना अनेक समस्याचा सामना करावा लागत आहे. जसे बेरोजगारी, सीमांतीकरण (जमीनीचा फारच कमी हिस्सा लोकांकडे शिल्लक राहाणे), अन्न धान्याचा पुरवठा अपुरा पडणे, शेती सोडून इतर व्यवसायाकडे जाण्याची तयारी नसणे व सामाजिक अस्थिरता इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत.

## ५.४ शिफारसी:

१. **शासनाने जमीनीचा योग्य मोबदला द्यावा:** जमिनीचा मोबदल्यात शेतकरी वर्ग समाधानी नाही. शासनाने सिंचित जमिन आणि कोरडवाहू जमिन ह्या दोन्ही प्रकारच्या जमिनीचा एकाच भावाने मोबदला दिलेला आहे. परंतु हे योग्य नाही शासनाने सिंचित जमिनीचा जास्त मोबदला द्यायला हवा तर कोरडवाहू जमिनीचा सिंचित जमिनीपेक्षा कमी मोबदला देण्यात यावा. शासनाने शेतजमीनीचा ३० वर्षापूर्वीच्या भावाने मोबदला दिला परंतु मोबदला आजच्या दराने देण्यात यावा.

२. **शासनाने नवीन वनीकरणाला प्रोत्साहन द्यावे:** प्रकल्पामुळे वनक्षेत्राचा विनाश होत चाललेला आहे. त्यामुळे वनावर आधारित असलेली धरणग्रस्त लोकांची उपजीविका ऱ्हास पावत आहे. ह्या लोकांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने पुनस्थापनेच्या ठिकाणी वन निर्माण करूण धरणग्रस्त लोकांच्या उपजिविकेचा प्रश्न सोडवावा त्याप्रमाणे नवीन वनक्षेत्राची निर्मिती करून पर्यावरणीय संतुलन टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करावा.

३. **धरणग्रस्त लोकांसाठी नवीन योजना राबवाव्या:** धरणग्रस्त लोकांसाठी शासनाने जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान योजना, रोजगार हमी योजना त्याचप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांकरिता ट्रायसेम योजना (TRYSEM- Training of Rural Youth for Self-Employment), शाळेतील लहान मुलांकरिता अंत्योदय योजना राबवून धरणग्रस्त

लोकांच्या रोजगाराकरिता प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे दारीद्र्य रेषेखालील असणाऱ्या लोकांकरिता इंदिरा आवास योजना आणि घरकूल योजना जास्त प्रमाणात चालू कराव्या.

४. **प्रकल्पग्रस्तांना कमी व्याजदरात कर्ज देण्यात यावे:** शेतकरी वर्गाला मिळणाऱ्या कर्जपुरवठ्यावरील व्याजाचा दर अतिशय जास्त असल्यामुळे शेतकरी वर्ग कोंडित सापडतो. जर सरकारने कमी व्याजदराने कर्ज दिले तर शेतकरी वर्ग आपल्या शेतात जलसिंचन व्यवस्था करू शकतो. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांमधील मच्छिमारी हा व्यवसाय करणाऱ्या लोकांना कमी व्याज दराने कर्ज दिल्यास त्यांचा विकासाला चालना मिळेल.

५. **प्रकल्पग्रस्तांना शासकिय नोकरी देण्यात यावी:** गावामध्ये असलेली एकूण शेतजमीन त्याचप्रमाणे गावाच्या सभोवताल असलेले वनक्षेत्र पूर्णपणे धरणात गेलेले आहे. वनक्षेत्रावर आधारित असलेली त्याची उपजीविका ऱ्हास पावलेली आहे. त्यामुळे धरणग्रस्त लोकसंख्येला बेरोजगारीचा प्रश्न भेडसावीत आहे. हा बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने धरणग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तिला नोकरी देऊन त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा.

६. **नवीन जमिन वाटप करून देण्यात यावी:** धरणात बुडित गावातील एकूण जमिनी गेल्यामुळे त्या लोकांना उपजीविका चालविणे हा प्रश्न आहे. त्या लोकांकरिता पुनस्थापनेच्या ठिकाणी शेती देण्यात यावी. यातून त्या लोकसंख्येचा तर विकास होईलच. परंतु सोबत देशाच्या उत्पादनात वाढ होईल आणि आर्थिक विकासाच्या प्रगतीला चालना मिळेल.

७. **शासनाने कमी पैशात पाणी पुरवठ्याच्या सोयी कराव्यात:** शासनाने धरणग्रस्त लोकसंख्येला प्रकल्पामार्फत कमी पैशात पाणी-पुरवठ्याच्या सोयी कराव्या यामुळे धरणग्रस्त लोकांच्या शेतीच्या उत्पादन वाढून त्यांचा विकास होईल आणि देश प्रगतीच्या मार्गावर लागेल.

८. **अधिकारी वर्गाने योग्य मार्गदर्शन करावे:** विविध खात्यामार्फत शेतकऱ्यांसाठी ज्या विविध योजना राबविल्या जातात त्याकडे जर अधिकारी वर्गाने जातीने लक्ष पुरविले तर योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होऊन शेतकऱ्यांची उपेक्षा व अवहेलना होणार नाही व त्यांना योग्य ते मार्गदर्शन देऊन शेतीचा व वनक्षेत्राचा विकास वाढण्यास सहाय्य मिळू शकते.

९. **शेतीतील फळबागांचा मोबदला देण्यात यावा:** शासनाने शेतकऱ्यांना शेतीचा मोबदला तर दिलेला आहे. परंतु शेतामध्ये असणाऱ्या महत्त्वपूर्ण वनस्पती जसे सिताफळ, संत्र्याचा बगीचा, मोसंबीचा, पेरूचा बाग–बगीचा आणि फळांमध्ये आंबे, चिंच, बोर इत्यादी वनस्पतींचा मोबदला दिलेला नाही. तर शासनाने फळबागांचा आणि इतर महत्वपूर्ण वनस्पतींचा मोबदला देण्यात यावा.

१०. **शेतकऱ्यांना प्रशिक्षण व्यवस्था करण्यात यावी:** शेतकऱ्यांसाठी सरकारच्या वतीने विविध योजना येतात. परंतु त्या योजनेचा लाभ शेतकरी वर्ग घेऊ शकत नाही. याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांचे अज्ञान आहे ते दूर झाले पाहिजे. त्यासाठी सरकारने प्रशिक्षण योजना त्यांच्यासाठी आखायला पाहिजे. त्याद्वारे त्यांना त्या योजनेची माहिती पूर्णपणे लक्षात आणून देता आली पाहिजे. त्यांना प्रात्यक्षिक करून दाखविली पाहिजे. ती योजना सरळ भाषेत समजावून सांगून व त्यापासून किती लाभ मिळेल याची माहिती त्यांना देणे.

११. **पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल अशी योजना राबवावी:** वनाचा विनाश कमीत कमी प्रमाणात करावा. उपसा सिंचनाच्या योजनेतून वीज निर्मित प्रदूषित पाण्याच्या प्रवाहाला नदीत सोडून न देता त्या प्रदुषित पाण्याला दुसऱ्या नहराच्या माध्यमाने बाहेर सोडावे त्याचप्रमाणे नदीत काही प्रकारचे प्रदूषित जल सोडण्यावर बंदी असावी. अशा अनेक माध्यमातून पर्यावरणाची कमीत कमी हानी होईल अशी शासनाने योजना राबवावी.

१२. **मासेमारी लोकांना नदीच्या पात्रातून मासेमारी करण्याची व्यवस्था करावी:** मेंढा, घाटउमरी, घाडेघाट व पातरी या गावातील प्रामुख्याने ढिवर समाजातील लोक

मासेमारी हा व्यवसाय करीत. परंतु प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या परिसरात पाटबंधारे विभागातील कर्मचारी व अधिकारी वर्ग ढिवर लोकांना नदीच्या पात्रातून मासेमारी करण्याच्या व्यवसायावर बंदी आणली. त्यामुळे नदीवर आधारलेली त्यांची उपजीविका ऱ्हास पावली. त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्याकरिता नदीतील पात्रातून मासेमारी करणाऱ्या लोकांना नदीवर मासेमारी करण्याची व्यवस्था करावी.

१३. **वनावर आधारीत असणाऱ्या पशु–पक्षाकरिता पूरक सोय करणे:** गोसीखुर्द प्रकल्पा अंतर्गत जे वनक्षेत्र बाधित आहे. त्या वनक्षेत्राच्या सभोवताल नविन वनक्षेत्राची लागवड करावी. या वनक्षेत्राच्या लागवडीमुळे एक तर महत्वपूर्ण वनस्पती निर्माण होतील आणि दूसरी गोष्ट म्हणजे वनावर आधारित असणाऱ्या पशु–पक्षाकरीता पूरक सोय निर्माण होतील.

१४. **शासनाने फळबाग योजनेस प्रोत्साहन द्यावे:** वनावर आधारीत लोकांच्या उपजिविकेचे प्रश्न सोडविण्याकरिता पुनर्वसनाच्या ठिकाणी वनस्पतींची लागवड करावी यामुळे वनावर आधारीत लोकांच्या उपजिविकेचे प्रश्न सोडविण्यास व फळांवरील व्यवसाय सुध्दा करण्यास मदत होईल.

१५. **पिक–विमा योजनेची प्रभावी अंमलबजावनी करावी:** मान्सूनच्या लहरीपनामुळे व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांना नेहमीच संकटांना सामोर जावे लागते, त्यामुळे त्यांचे अपेक्षित उत्पन्न कमी प्रमाणात होते. यासाठी सरकारने पिक विमा सुरू केल्यास शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून नुकसान भरपाई मिळू शकेल आणि त्यांचा आर्थिक़ मागासलेपणा कमी होण्यास मदत होईल.

१६. **पुनर्वसनात पुरेशा सोयी उपलब्ध असाव्यात:** पुनर्वसनच्या ठिकाणी प्रकल्पग्रस्त लोकांच्या मुलांकरिता शाळा, महाविद्यालयाची व्यवस्था करावी त्याचप्रमाणे त्यांच्या आरोग्याकरिता दवाखान्याची सोय असावी. पिण्याकरिता शुध्द पाण्याची सोय असावी म्हणजेच जीवन जगण्याकरिता ज्या मूबलक सोयी आवश्यक आहेत, त्या पुनर्वसनाच्या ठिकाणी असाव्या. जेणेकरून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारेल.

१७. **शेतीतील बोरवेल किंवा विहिरींचा आर्थिक मोबदला मिळावा:** बाधित शेतजमिनीवर पूर्वी बऱ्याच शेतकऱ्यांच्या विहिरी किंवा बोरवेल होत्या. परंतु शेतात असलेल्या बोरवेल किंवा विहिरींचा कुठलाही आर्थिक मोबदला दिलेला नाही. प्रकल्पग्रस्त पूर्वी या बोरवेल किंवा विहिरींच्या मार्फत शेतीला पाणी पुरवठा करीत असत. तरी शासनाने प्रकल्पामुळे बाधित या विहिरी किंवा बोरवेलचा आर्थिक मोबदला प्रकल्पग्रस्तांना द्यावा.

१८. **व्यवसायिक प्रशिक्षण देण्यात यावे:** प्रकल्पग्रस्तांना व्यवसाय निर्मितीकरिता शासनामार्फत व्यावसायिक प्रशिक्षण द्यावे. TRYSEM किंवा जिल्हा उद्योग भवनातून प्रकल्पग्रस्तांना लघुउद्योग प्रशिक्षण द्यावे. या प्रशिक्षणामुळे प्रकल्पग्रस्त नवीन व्यवसाय किंवा लघु उद्योग सुरु करतील आणि यातून त्यांचा रोजगारीचा प्रश्न सुटेल.

१९. **शासकीय सेवेत शक्य असल्यास नोकरी मिळावी:** मांजरी गावातील २ लोकांना शासकीय सेवेत नोकरी मिळाली. परंतु इतर २०० बाधित गावापैकी कुठल्याही कुटुंबाला शासकीय किंवा पाटबंधारे विभागात नोकरी मिळालेली नाही. शासनाने शक्य असल्यास जलसिंचन विभाग, पाटबंधारे विभाग, पाणीपुरवठा विभाग, वनविभाग इत्यादींमध्ये त्यांच्या शिक्षणानुसार त्यांना नोकरी देण्यात यावी. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या आर्थिक समस्या काही प्रमाणात सुटू शकतील.

२०. **गुरा–ढोरांना पाण्याची व्यवस्था करणे:** पुनर्वसित गावात नदी नाल्यांचा, विहिरींचा बोरवेलचा व बोरींगचा अभाव आढळला. त्यामुळे लोकांनाच पिण्याकरिता पाणी नाही. तर पाळीव प्राण्यांकरिता व गुरा–ढोरांसाठी सुध्दा पाणी उपलब्ध नाही. शासनाने पुनर्वसित गावात बोरवेल किंवा विहिरी बांधून टाकीत पाणी साठवून गुराढोरांना उपलब्ध करुन द्यावे. त्यामुळे पाण्याची समस्या कमी होत गुराढोरांवर आधारित व्यवसाय भरभराटीला लागेल.

२१. **रोजगाराची साधने उपलब्ध करणे:** पुनर्वसित गावामध्ये शेतीची कमतरता असल्याने त्यावर आधारित रोजगार नाही. शासनाने विविध योजनांच्या मार्फत लहान उद्योग किंवा कृषी क्षेत्रातील वस्तूंचे उत्पादन करणारे लहान उद्योग यावर लक्ष द्यावे. त्यामुळे

या उद्योगातून रोजगार निर्माण होईल. कुठल्याही प्रकारचे उद्योग निर्माण करुन प्रकल्पग्रस्तांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन द्यावी.

२२. **शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय करणे**: पुनर्वसित गावामध्ये प्रकल्पग्रस्तांना पाण्याची समस्या भेडसावत आहे. गावात नळ जोडणी असली तरी, आठवड्यातून दोनदा पाणी येते. तसेच शासनाने बोरींग (Handpump), बोरवेल किंवा विहिर पुनर्वसन गावामध्ये बांधून दिलेली नाही. त्यामुळे पुनर्वसन गावात पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे पुनर्वसित गावातील लोकसंख्या शहराच्या दिशेने स्थलांतरित होत आहेत. शासनाने पाण्याची व्यवस्था करावी.

२३. **शासनाने रोजगार हमी योजनेची कामे सुरू करावी**: वर्षातून फक्त तीन महिने योजनेची कामे पुनर्वसित गावात उपलब्ध असतात. परंतु प्रत्येकाला या रोजगाराची आवश्यकता असते. इतर रोजगाराच्या संधी नगन्य आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्त रोजगार हमी योजनेच्या कामावर अवलंबून आहेत. तरी शासनाने रोजगार हमी योजनेतील रोजगारात ६ महिन्यापर्यंत वाढ करावी व मजुरीच्या दरात सुध्दा वाढ करुन प्रत्येकांना रोजगार योजनेची कामे मिळावीत अशी अपेक्षा प्रकल्पग्रस्तांकडून केली जात आहे.

२४. **अनुदानात आर्थिक मदत करणे**: प्रकल्पग्रस्तांची उपजीविकेची व व्यवसायाची संपूर्ण साधने प्रकल्प बांधणीमुळे नाहिशी झालीत. शासनाने या प्रकल्पग्रस्त लोकांकरिता रोजगाराची व व्यवसायाची नवीन साधने किंवा एखाद्या व्यवसायाकरिता लागणारे भांडवल यावर अनुदान स्वरुपात २० ते ४० टक्के आर्थिक मदत करावी. प्रकल्पग्रस्तांना आर्थिक अनुदानामुळे नवीन भांडवल निर्मिती करण्यास व नवीन व्यवसायाच्या संधी यात मोलाची मदत होईल.

२५. **प्रकल्पग्रस्त कुटुंबातील व्यक्तींना पेन्शन मिळावे**: सध्या ६० वर्षापुढील व्यंक्तीना रु. १००० पेन्शन मिळते ते रु. ३००० प्रति महिना पेन्शन मिळावी अशी अपेक्षा प्रकल्पग्रस्तांनी केलेली आहे. कारण पुनर्वसनाच्या ठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध नाही. प्रकल्पग्रस्तांना रोजगार मिळावा ही त्यांची एकमात्र अपेक्षा आहे. रोजगाराच्या अभावी प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला साधारणपणे ३ हजार रुपये माहिना या प्रमाणे

पेन्शन मिळावी जेणेकरुन प्रकल्पग्रस्तांच्या उपजीविकेचा प्रश्न काही प्रमाणात कमी होईल.

# संदर्भग्रंथ सूची

## अ) पुस्तके /ग्रंथ, प्रकल्प आणि सर्वेक्षण अहवाल


१) A.R. Desai (1986) Agrarian Struggles in Indian after independence Delhi Oxford University press.

२) Agarwal A.N.: Indian Economy, Himalaya Publication House, Nagpur.

३) Bernstein (1992): Rural Livelihoods: Crises and Responses, Oxford University Press.

४) Chand Ramesh (1991): Agricultural Diversification in India\$ Mittal Publication, New Delhi.

५) Datta and Sundaram (2005): Indian Economy, Chand Publication, New Delhi.

६) De Wet C. (2006) Introducing the Issues in Development-Induced Displacement: Problems, Policies and People, Berghahn Books.

७) Desai Vasant (1991) Fundamentals of Ruhal development a system approach, Himalaya Publishing House, Nagpur-1991.

८) Downie N.M. and Health R.W. (1970) Basic statistical Methods Harper and Row Publisher, New York.

९) E.G. Thukral (ed.) Big Dams, Displaced People: Rivers of Sorrow, Rivers of Change. Sage Publications, New Delhi.

१०) Economic Survey of Maharashtra 2010-11.

११) Fernandes, W and EG Thukral (eds) (1989): Development, Displacement and Rehabilitation, Indian Social Institute, New Delhi.

१२) Fernandes, Walter and Vijay Paranjype (eds) 1997. Rehabilitation Policy and Law in India: A Right to Livelihood. Indian Social Institute: New Delhi.

१३) G.B. Nath (1998) Problems of Agricultural Labour\$s Classical Publishing Company New Delhi.

१४) ICOLD (International Commission on Large Dams). World Register of Dams, General Synthesis. Available online: http://www.icold cigb.org/GB/World _register/general_synthesis.asp (accessed on 1 November 2018).

१५) Joshi B.L. (1982), "Displacement and Rehabilitation: Study of a Dam Affected Rural Community", Parimal Prakashan, Aurangabad.

१६) Joshi Vidut (1987), “Submerging Villages, Problems and Prospects”, Anantha Publication, Delhi.

१७) Kavimandan Vijay (2002), “Principles and Practice of Agricultural Economic, Shri Mangesh Prakasha, Nagpur.”

१८) Kelo major Irrigation project (2008) Resettlement and Rehabilitation Action Plan, Agriculture finance corporation Ltd. Volume-2

१९) Khagram, Sanjeev (2005) “Dams and Development: Transnational Struggles for Water and Power”. New Delhi: Oxford University Press.

२०) Land acquisition and Rehabilitation report -2002 Gosikhurd Prakalp Nagpur.

२१) Latha Ravindran and Babita Mahapatra- Gender Issue in displacement: A study of Irrigation Project in Southern Orissa.

२२) Lekhi R.K., Singh Joinder (2004): Agricultural Economics; Kalyanand Publication, New Delhi.

२३) Mankodi, K (1992): 'Resettlement and Rehabilitation of Dam Oustees: A Case-study of Ukai Dam' Sage. New Delhi.

२४) Mathur, H M (1995): Development, Displacement and Resettlement, Vikas Publishing House. New Delhi.

२५) Needs of Ramagundam Super Thermal Power Affected Families. Tata Institute of Social Sciences. Mumbai (mimeograph)

२६) Newton, Jason. “Displacement and Development: The Paradoxes of India\$s Tehri Dam” University of Louisville 2008

२७) Ota, A.B. & A. Agnihotri (eds) (1996) Involuntary Displacement in Dam Projects. New Delhi: Prachi Prakashan.

२८) Parasuraman,S., D.P.Singh and N. Purendra Prasad 1995. A Study on Displacement and Development

२९) Parsuraman Ray (2000) Development indused Displacement in Indian SARWATCH Vol.2 No.1 July.

३०) Parsuraman, S (1994): Resettlement and Rehabilitation of People Displaced by Development Projects: An Evaluation of the Indian Experience, Tata Institute of Social Sciences, Bombay.

३१) Parsuraman, S (1994): Resettlement and Rehabilitation of People Displaced by Development Projects: An Evaluation of the Indian Experience, Tata Institute of Social Sciences, Bombay.

३२) Patel V.M. (1991), "Sardar Sarover Project: Benefit-Cost Analysis," Oxford and IBH Publishing Co-op. Pvt. Ltd., New Delhi.

३३) Patkar Medha (1998), "The Tragic Story of the Displaced: A Case Study of the Tribles Affected by Sardar Sarovar", Dhule, Maharashtra.

३४) Pawar C.T. (1989) Impact of Irrigation – A Regional Perspective, Himalaya Publication House.

३५) Raj Ravindra, Singh Vijay, Upadhyay Alka- Planning and evaluation of irrigation system: Methods and implementation – 1st Edition.

३६) Rao Hanumantha, C. H. & Members of the Expert Committee (1997) "Report of Expert Committee On Rehabilitation & Environmental Aspects of Tehri Hydro-Electric Project". October, Vol. I & II. New Delhi.

३७) Report of A.P. Rehabilitation of displaced people in Irrigation Projects; Policies and Practice with Reference to Andra Pradesh.

३८) Roy A. (1999) The greater comman good, In the Cost of Living modern library New York :7-90

३९) Rudder Dutt and K.P. M. Sundaram (2005), "Indian Economy", Published by S. Chand and Company Ltd., New Delhi.

४०) S. Ramkrishna, Vind Gound- Perspective on Polavaram: A major irrigation project on Godavari – Biksham Gujja.

४१) Sadhu A. H. and Singh A. (1986), "Agricultural Problem in India" Himalaya Prakashan, Bombay.

४२) Shridharan L., Sravan Kumar D., & Ramesh K. S. (1993) Administrative Staff College of India (ASCI) & THDC: New Delhi. "An Appraisal of Rehabilitation and Resettlement: A Study of Tehri Hydro Development Project, UP and Sardar Sarovar Narmada Project, Gujarat". Sponsored by THDC: New Delhi. March.

४३) Shrinivas Murthy A.P.: "Irrigation Planning in India"- Himalaya Publishing House.

४४) Singh (1992): 'Evaluating Major Irrigation Projects in India', in Thukral (ed) Big Dams, Displaced People, Sage, New Delhi.

४५) Singh, Shekhar, Ashish Kothari and Kulan Amin (1992) _Evaluating Major Irrigation Projects in India\$ in E. Ganguly Thukral (ed.) Big Dams: Displaced People. Sage Publications, New Delhi.

४६) Sithole Pinimidzai (2008) Designing and Planning Dynamics: The Dande Irrigation Project, Zimbabwe.

४७) Socio Economic Impact of Irrigation on Living Standard of Farming Population in North-Syria by Salwa Almohamed -1, Werner Doppler-2.

४८) Socio-Economic Study of the Project affected persons of the Bhima-Ujjani irrigation sub project: Under the Maharashtra Composite Irrigation Project (MCIP-III).

४९) Subha Reddy & Devi (2010) Agriculture Economics.

५०) Sundaram and Kalam (1990), "The Uprooted-Development, Displacement and Rehabilitation," Gain Publication House, New Delhi.

५१) Tehri Hydro Development Corporation Limited (1998) Rehabilitation Policy: December.

५२) Tilt, B.; Gerkey, D. (2006) Dams and population displacement on China\$s Upper Mekong River: Implications for social capital and social–ecological resilience. Glob. Environ. Chang.

५३) Tyagi B.P. (1987), "Agricultural Economics and Rural Development, jai Prakash Nath and Co. (Meerut) U.P.

५४) V.Machimuthu (2009) Regional Economic disparities in India, New Century publication, New Delhi.

५५) World Bank (1994) Resettlement and Development: The Bank-wide Review of Projects Involving Involuntary Resettlement 1986-1993. Environment Department Paper, World Bank, Washington, D.C.

५६) World Commission on Dams (2000) Social Impact Assessment: WCD Thematic Review V. 2. Environmental and Social Assessment for Large Dams; World Commission on Dams: Cape Town, South Africa.

५७) World Commission on Dams. (2000) Dams and Development: A New Framework for Decision-Making: The Report of the World Commission on Dams; Earthscan: Abingdon, UK.

५८) भोंगळे सुधीर, जलसिंचन (२००७), सुज्ञान प्रकाशन, पुणे.

५९) भांडारकर पु.ल. (१९९९) सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ, औरंगाबाद.

६०) महाराष्ट्र शासन (२०१२), ''राज्यातील सिंचनाची प्रगती व भविष्यातील वाटचाल'', श्वेतपत्रिका, खंड–१, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

६१) महाराष्ट्र सिंचन विकास (२०१२) खंड–२६, अंक–४, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर.

६२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, सन २०१६–१७ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६३) शिवाजी भोसले (२०१२), ''महाराष्ट्रातील जलसिंचन : एक वास्तव महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टिकोन''

६४) एस्.व्ही. ढमढेरे, ''महाराष्ट्रातील जलसंपदा'', डायमंड पब्लिकेशन, पुणे,

६५) संतोष दास्ताने : (२०११) महाराष्ट्र २०११ जलसंपदा :

६६) कुलकर्णी उपेंद्र, समृद्धीसाठी सिंचन (२०१३) प्रकाशक–महाराष्ट्र सिंचन सहयोग.

६७) श्वेत पत्रिका (२०१३) जलसिंचन विभाग, महाराष्ट्र शासन.

६८) जाधव या.रा. (२०१२) कृष्णा खोरे पाणी वाटप लवाद, निर्णय आणि मिमांसा, प्रकाशक – अध्यक्ष महाराष्ट्र सिंचन सहयोग.

६९) जुगळे व्ही.बी. (२०११) जल–मुल्य निर्धारण,.

७०) शिंदे जगन्नाथ (२०१२) शास्वत शेतीसाठी जमीन व पाणी व्यवस्थापन गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.

७१) सिंह एस.पी. (१९९३) सांख्यिकीय सिध्दांत, इलाहाबाद.

## ब) पीएच.डी. प्रबंध

७२) Apte D.P. (1978-79), "Command Area Development Authority for Ghod, Bhima Project, Socio Economic Survey of Sample Villages in Command Area of Bhima (Ujjani) Irrigation Project in Solapur District," Gkhale Institute of Politics and Economics, Pune.

७३) Bodhale A.G. (2000): Socio Economic impact of irrigation in Pandharpur Taluka, Ph.D. Thesis submitted by Shivaji University, Kolhapur.

७४) Gadgil D.R. (1948), "Economic Effects of Irrigation: Report of Survey and Indirect Benefits of Godavari and Pravara Canals", Gokhale Institute of Politis and Economic, Pune.

७५) Gajarajan C.S. (1979), "Planned Rehabilitation and Economic Changes: A Case Study of Tungabhadra River Project, Rehabilitation colonies at H.B. Halli, G.I.P.E., Pune.

७६) Mulla G.R. and Kadam S.N. (1994), "Evolution Study of Land Development Work in the Command Area of the Bhima (Ujjani) Irrigation Project, Gokhale Institute of Politics and Economics, Pune.

७७) Sovani N. V. and Nilkanth Rath (1960), "Economics of A Multiple-Purpose river Dam: Report of Inquiry into the Economic Benefits of the Hirakud Dam", Gokhale Institute Studies, Pune.

## क) नियतकालिके आणि संशोधन लेख

७८) Development, Displacement and Rehabilitation – Locating Gender, Enakshi Ganguly Thukaral, Economic and Political Weekly, June 15, 1996.

७९) Appa, G (1992): 'Narmada Projects without World Bank Backing?', Economic and Political Weekly, Vol XXVII, No 47, November 28.

८०) Cernea, M (1988): Involuntary Resettlement in Development Projects, World Bank Technical Paper No 80.

८१) Cernea, M.M.; Mcdowell, C. Risks, safeguards, and reconstruction: A model for population displacement and resettlement. Econ. Political Wkly. 2000, 35,

८२) Cernea. M.M. 1996, _Piblic Policy Responses to development indused population displasment\$ EPW Jun 15 1996.

८३) Dogra, B (1990): Tribal Discontent; Timely Warning' Economic and Political Weekly, Vol XXV, No 14, April 17.

८४) Economic and Political Weekely – Vol. – 32, Issue No.9-10, March 1997 – Swangi Irrigation Project – Oustees Left in Lurch – Ramesh Sharan.

८५) Garikiputi Supriya-Resettlement sites of Narmada Valley Project- 2000 EPW vol-37.

८६) Guha, R C (1994): 'Forest Debate and Draft Forest Act: Who Wins, Who Loses?' Economic and Political Weekly, Vol XXIX, No 34, August 20.

८७) Hasan, M (1994): Are Dams Axioms of Development? Lessons from the Bilaspur Dam, paper prepared for the seminar at the Centre for Social Studies, Surat, 'Development, Displacement and Rehabilitation',

८८) Patkar Medha- The peoples policy on development and resettlement-EPW, Sept-1, 1998

८९) Rao, A (1986): 'Cost of Development Projects: Women among the 'Willing Evacuees' Economic and Political Weekly. Vol XXI, No 12, March 22.

९०) Reddy Bhaskar and B-Uday-1986 cost of River Valley Project in India-Indian Journal of Public Administration-35.

९१) Reddy, Sudhakar P (1994): Displacement and Rehabilitation Policy: A Study with reference to Project Affected Populations of Srisailam and Somasila Hydel Projects in Andhra Pradesh, paper prepared for a seminar at the Center for Social Studies, Surat 'Development, Displacement and Rehabilitation'.

९२) Singh, S (1990): 'Evaluating Large Dams in India'. Economic and Political Weekly, Vol XXV, No 11, March 17.

९३) Sinha, B.K. (1996) _Draft National Policy for Rehabilitation: Objectives and Principles.\$ Economic and Political Weekly, June 15.

९४) Wet Chris De-Economic Development and population displacement-EPW is, 2002

## ड ) वृत्तपत्रे

९५) Vivek Deshpande (2018): Gosikhurd irrigation project will be completed by 2022: VICD, The Indian express, September 28.

९६) Press Trust of India (2013) : 25 years on, Gosikhurd irrigation project still incomplete, Business Standard, April 23.

९७) Staff Reporter (2018): Gosikhurd project cost rose 50 times in 34 years; achieved only 20% of potential, The Hindu, March 28.

९८) Ashish Roy (2020): Completion of Gosikhurd project delayed by 2 years, Times of India, July 20.

९९) Local news (2018): Gosikhurd prakalpgrasthanchi dhadak ; Aamdar nivasala tale, Maharashtra Times, October 19.

## इ) संकेतस्थळे


१००) www.ijetae.com/files/volume 3 issue 9/ IJETAE_0913_82.pdf

१०१) www.indiatogether.org/2013/aug/env-chinchave.htm

१०२) www.Map of india.com.

१०३) www.Agri.Mah.nic.in. Com

१०४) www.Irrigation Development of India. Com.

१०५) www.Maharashtra.govt.in.com

१०६) www.maharashtragov.in

१०७) www.Medha Patkar.com

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## अर्थशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता प्रश्नावली

## 'गोसीखुर्द जलसिंचन प्रकल्पग्रस्त लोकांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन'

**अ) वैयक्तिक माहिती:**

१. पूर्ण नाव (आडनाव प्रथम)

२. संपूर्ण पत्ता

३. दूरध्वनी/ मोबाईल क्र.

४. वय — ० ते १४ ☐ १४ ते २५ ☐ २५ ते ३५ ☐

५. धर्म — हिंदू ☐ मुस्लिम ☐ ख्रिश्चन ☐ इतर ☐ शीख ☐ बौध्द

६. संवर्ग — एस.सी. ☐ एस.टी. ☐ ओ.बी.सी. ☐ एन.टी. ☐ ओपन ☐

७. मातृभाषा — मराठी ☐ हिंदी ☐ इंग्रजी ☐ इतर ☐

८. विवाहस्थिती — विवाहीत ☐ अविवाहित ☐ घटस्फोटीत ☐ विधवा ☐

९. अपत्यांची संख्या — एक ☐ दोन ☐ तीन ☐ चार ☐ ५ किंवा ५ पेक्षाजास्त ☐

१०. कुटुंबाचा प्रकार — एकत्र ☐ विभक्त ☐

११. कुटुंबातील एकूण सदस्य संख्या ☐

१२. कुटुंब रचना — एकूण पुरुष ☐ एकूण स्त्रिया ☐

१३. कुटुंबातील सदस्यांचीमाहिती

| अ.क्र. | नाव | नाते | वय | शिक्षण | व्यवसाय/ धंदा/ नोकरीचे स्वरुप | वार्षिक उत्पन्न रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |
| ५. | | | | | | |
| ६. | | | | | | |
| ७. | | | | | | |
| ८. | | | | | | |

**ब) आर्थिक माहिती:**

१) गोसीखुर्द प्रकल्पामध्ये आपली जमिन गेली आह`काय? होय ☐ नाही ☐

२) किती जमिन प्रकल्पामध्ये गेली आहे? ०–२.५ एकर ☐ २.५–५ एकर ☐ ५–१०ए ☐
१०–२५ एकर ☐ २५ एकरपेक्षा जास्त ☐ भुमिहीन ☐

३) जमिन कशी होती? पडीक ☐ पिकाखाली ☐ कोरडवाहून ☐ सचित ☐

४) अंदाजे बाजारभावानुसार किती रुपये किंमतीची जमिन प्रकल्पात गेली आहे? रु. ☐

५) त्याच जमिनीचा शासनाने किती रुपये मोबदला दिला? रु. ☐

६) किंवा मोबदला इतर स्वरुपात दिला काय? होय ☐ नाही ☐
अ) नोकरी ☐ ब) इतर ठिकाणी शेती ☐ क) साधने ☐ ड) भांडवल ☐
इ) इतर ☐

७) प्रकल्पाखाली गेलेल्या जमिनीवर सध्या कोणाचा अधिकारआहे? शेतकरी ☐ शासन ☐

८) कोणकोणतीप्र मुख पिके घेत होतात? ज्वारी ☐ बाजरी ☐ गहू ☐ हरभरा ☐

९) अंदाजे एकूण किती रुपयांचे उत्पन्न घेत होतात? रु. ☐

१०) सध्या किती रुपयांचे उत्पन्न मिळते? रु. ☐

११) स्वत:च्या मालकीचे घर आहे काय? होय ☐ नाही ☐

१२) घराचे स्थान कोठे आहे? गावठाण ☐ गावठाणाबाहेर ☐ शेतात ☐

१३) शासनाने घराचा मोबदला दिलाकाय? होय ☐ नाही ☐

१४) घराचे स्वरुप कसे होते? मातीचे ☐ सिमेंटचे ☐ गवताचे ☐ कवलांचे ☐
पत्र्याचे (टिन) ☐ घर नसलेले (भाडेकरु) ☐

१५) बाजारभावानुसार घराची अंदाजे किंमत किती होती? रु. ☐

१६) शासनाने घराची किंमत किती दिली? रु. ☐

१७) आपणास इतर रोजगार उपलब्ध आहे काय? कुक्कुटपालन ☐ शेळीपालन ☐
डिंक गोळा करणे ☐ मोह गोळा करणे ☐ मासेमारी ☐

१८) गोसीखुर्द धरणामुळे कोणता आर्थिक फायदा झाला आहे काय? होय ☐ नाही ☐

१९) प्रकल्पामुळे नुकसान झाले आहे काय? होय ☐ नाही ☐ असल्यास किती? ☐

२०) आपण पूर्वी किती बचत करतहोतात? रु. ☐

२१) आता किती बचत करत आहात? रु. ☐

२२) पूनर्वसनाच्या ठिकाणी रोजगार उपलब्ध आहे काय? होय ☐ नाही ☐

२३) पूनर्वसनाच्या ठिकाणी व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत काय? होय ☐ नाही ☐

२४) आपण बचत करता का? होय ☐ नाही ☐

२५) आपण कोठे बचत करत आहात? पतसंस्था/बँक ☐ सावकर ☐
खाजगी व्यक्ती ☐ पोस्ट ऑफिस ☐ इतर ☐

२६) आपली दरमहा बचतीची रक्कम किती? रु. ☐

२७) आपण कर्ज घेतले आहे काय? होय ☐ नाही ☐ असल्यास किती रु. ☐

२८) कोणाकडून कर्ज घेतले आहे? सावकर ☐ खाजगी व्यक्ती ☐ पतसंस्था/बँक ☐
इतर ☐

२९) कोणत्या कारणासाठी कर्ज काढले आहे? शेती खरेदी ☐ समारंभ व लग्न ☐
व्यवसाय निर्मिती ☐ आजारपण ☐ घर बांधणी ☐ शिक्षण ☐ इतर ☐

३०) कर्ज परफेड केली का? होय ☐ नाही ☐

३१) पुनर्वसनापूर्वी आर्थिक परिस्थिती कशी होती? समाधानकारक ☐
असमाधानकारक ☐ अत्यंत वाईट ☐

३२) पुनर्वसनानंतर सध्याची आर्थिक परिस्थिती आहे? समाधानकारक ☐
असमाधानकारक ☐ अत्यंत वाईट ☐

३३) पुनर्वसनापुर्वी कुटुंबातली सदस्यांचा व्यवसाय/ धंदा: शेती ☐ शेती आणि वनमजुरी ☐
शेती आणि व्यवसाय (दुकान) ☐ रोखजुरी किंवा मोलमजु ☐ शेती आणि नोकरी ☐
शेती आणि शेतमजुरी ☐

३४) पुनर्वसनापूर्वी एकूण किती रुपयांचे वार्षिक उत्पन्न घेत होतात? रु. ☐

३५) पुनर्वसनानंतर सध्या किती रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळते? रु. ☐

३६) सर्व क्षेत्रातुन प्रकल्पबांधणीनंतर एकूण वार्षिक किती रुपयांचे उत्पन्न घेत होतात? रु. ☐

३७) सर्व क्षेत्रातुन प्रकल्पबांधणीपूर्वी एकूण वार्षिक किती रुपयांचे उत्पन्न घेत होतात? रु. ☐

३८) पुनर्वसनापूर्वी कृषीवर आधारित इतर रोजगार उपलब्ध आहे काय? शेळी/मेंढीपालन ☐
कुक्कुटपालन ☐ मासेमारी ☐ शिकारकरणे ☐ दुग्धव्यवसाय ☐
रोखमजुरी ☐

३९) पुनर्वसनानंतर कृषीवर आधारित इतर रोजगार उपलब्ध आहे काय? शेळी/मेंढी पालन ☐
कुक्कुटपालन ☐ मासेमारी ☐ शिकार करणे ☐ दुग्धव्यवसाय ☐
रोख मजुरी ☐

४०) पुनर्वसनापूर्वी एकूण किती रुपयांचे वार्षिक उत्पन्न घेत होतात? रु. ☐

४१) पुनर्वसनानंतर सध्या किती रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळते? रु. ☐

४२) पुनर्वसनापूर्वी इतर रोजगार उपलब्ध होता काय? बांधकाम क्षेत्र ☐
शासकीय रोजगार हमी योजनेतील कामे ☐ रोख मजुरी ☐ आवश्यकता नाही ☐

४३) पुनर्वसनापूर्वी इतर रोजगारातून एकूण किती रुपयांचे वार्षिक उत्पन्न घेत होतात? ☐

४४) पुनर्वसनानंतर इतर रोजगार उपलब्ध आहे काय? बांधकाम क्षेत्र ☐
शासकीय रोजगार हमी योजनेतील कामे ☐ रोखमजुरी ☐ आवश्यकता नाही ☐

४५) पुनर्वसनानंतर इतर रोजगारातून एकूण किती वार्षिक रुपयांचे उत्पन्न मिळते? रु. ☐

४६) पुनर्वसीत गावठाणांमध्ये (१९९९) कायद्यानुसार खालील १३ सोयी करुन दिल्या आहेत काय?

| ४७) **पुनर्वसीत गावठाणांमध्ये (१९९९) कायद्यानुसार खालील १३ सोयी करुन दिल्या आहेत काय?** | | **उत्तम** | **समाधानकारक** | **असमाधानकारक** | **अत्यंत वाईट** |
|---|---|---|---|---|---|
| पिण्याच्या पाण्यासाठी विहीरी, विघन विहीरी | १ | | | | |
| शाळा व त्यात क्रिडांगण | २ | | | | |
| समाजासाठी मंदिर | ३ | | | | |
| अंतर्गत जोडरस्ते व मुख्य रस्ते | ४ | | | | |
| वीजव्यवस्था | ५ | | | | |
| स्मशानाची जागा | ६ | | | | |
| सांडपाण्याची जागा | ७ | | | | |
| सार्वजनिक प्रसाधनगृह | ८ | | | | |
| जनावरांसाठी जागा (shed) | ९ | | | | |
| महाराष्ट्रराज्य रस्ता निगमामार्फत बस सेवा व बस स्थानक | १० | | | | |
| चराई जमीन | ११ | | | | |
| कुटाई जमीन | १२ | | | | |
| गावातील विस्तार योजनांसाठी व वावरासाठी जागा. | १३ | | | | |

# जोडपत्र

## जोडपत्र क्र. १

### विकास प्रकल्पाच्या निर्मितीमुळे विस्थापित/ प्रकल्पग्रस्त लोकसंख्या

| | 1951-1995 | | 1947-2000 | | 1947-2004 | | 1965-1995 | | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| State/Type | Andra P. | Jarkhand | Kerala | Orissa | Assam | Bengal | Gujrat | Goa | |
| Water | 1865471 | 232068 | 133846 | 800000 | 448812 | 1723990 | 2378553 | 6473 | 7590113 |
| Industry | 539877 | 87896 | 222814 | 158069 | 57732 | 403980 | 140924 | 1470 | 1612762 |
| Mines | 100541 | 402882 | 78 | 300000 | 41200 | 418061 | 4128 | 0 | 1266890 |
| Power | 87387 | 0 | 2556 | 0 | 7400 | 145300 | 11344 | 0 | 254987 |
| Defence | 33512 | 264353 | 1800 | 0 | 50420 | 119009 | 2471 | 285 | 471850 |
| Environment | 135754 | 509918 | 14888 | 107840 | 265409 | 784952 | 26201 | 60 | 1845022 |
| Transport | 46671 | 0 | 151623 | 0 | 168805 | 1164200 | 1356076 | 43164 | 2930539 |
| Refugee | 0 | 0 | 0 | 0 | 283500 | 500000 | 646 | Nil | 784146 |
| Farms | 0 | 0 | 6161 | 0 | 113889 | 110000 | 7142 | 155 | 237347 |
| HR Develp. | 0 | 0 | 14649 | 0 | 90970 | 220000 | 16343 | 1677 | 343639 |
| Health | 0 | 0 | 0 | 0 | 23292 | 84000 | 0 | 3716 | 111008 |
| Administration | 0 | 0 | 0 | 0 | 322906 | 150000 | 7441 | 1453 | 481800 |
| Welfare | 37560 | 0 | 2472 | 0 | 25253 | 720000 | 20470 | NA | 805755 |
| Tourism | 0 | 0 | 343 | 0 | 0 | 0 | 2646 | 640 | 3629 |
| Urban | 103310 | 0 | 1003 | 0 | 1241 | 400000 | 85213 | 1270 | 592037 |
| Other | 265537 | 50000 | 0 | 100000 | 18045 | 0 | 15453 | 550 | 449585 |
| Total | 3215620 | 1548017 | 552233 | 1465909 | 1918874 | 6944492 | 4075051 | 60913 | 19781109 |

(Source: Lobo, Lancy: Land Acquisition, Displacement and Ressettlment in Gujrat 1947-2004, New Dehli, 2009)

# जोडपत्र क्र. २

## जलसिंचन प्रकल्पाच्या निर्मितीमुळे विस्थापित आदिवासी लोकसंख्या

| Name of the project | State | Population facing displacement | Tribal people as percentage of displsed |
|---|---|---|---|
| Karjan | Gujrat | 11,600 | 100 |
| Sardar Sarovar | Gujrat | 200,000 | 57.6 |
| Maheshwar | M.P. | 20,000 | 60 |
| Bodhghat | M.P. | 12,700 | 73.91 |
| Icha | Bihar | 30,800 | 80 |
| Chandil | Bihar | 37,600 | 87.92 |
| Koel Karo | Bihar | 66,000 | 88 |
| Mahi Bajaj Sagar | Rajasthan | 38,400 | 76.28 |
| Polavaram | A.P. | 150,000 | 52.90 |
| Maithon & Panchet | Bihar | 93,874 | 56.46 |
| Upper Indravati | Orisa | 18,500 | 89.20 |
| Pong | H.P. | 80,000 | 56,25 |
| Inchampali | A.P. Maharashtra | 38,100 | 76.28 |
| Tultuli | Maharashtra | 13,600 | 51.61 |
| Daman Ganga | Gujarat | 8,700 | 48.70 |
| Bhakra | H.P. | 36,000 | 34.76 |
| Masan Reservoir | Bihar | 3,700 | 31.00 |
| Ukai Reservoir | Gujarat | 52,000 | 18.92 |

(**Sourse:** Satyajit Singh.Taming the Waters. OUP. 1997 and government figures available at hppt: //www.dam.org)

# जोडपत्र क्र. ३

## राज्यांमधील धरणग्रस्त आदिवासी लोकसंख्येच पुनर्वसन व  पुन:स्थापनेच प्रमाण

| Sr. No. | State | No. of project Cleared | Total No. affected Persons | Total No. Affected ST Population |
|---|---|---|---|---|
| 1. | Andra Pradesh | 15 | 316242 | 123946 |
| 2. | Arunachal P. | 1 | Nil | Nil |
| 3. | Jharkhand | 1 | 70820 | 21000 |
| 4. | Chhattisgarh | 2 | 455 | 155 |
| 5. | Himachal P. | 1 | 836 | 9 |
| 6. | Kerala | 1 | 20 | 20 |
| 7. | Maharashtra | 11 | 151408 | 20534 |
| 8. | Madhya Pradesh | 4 | 195081 | 12261 |
| 9. | Orissa | 11 | 64674 | 42036 |
| 10. | Rajasthan | 11 | 34452 | 4258 |
| 11. | Uttarakhand | 2 | 6716 | 1489 |
| | **Total** | **60** | **665131** | **225708** |

(Sourc: data recived regarding displacement from the Ministry of Trible Affairs dated 21.11.2013)

# जोडपत्र क्र. ४

## जलसिंचन स्त्रोतांच्या निर्मीतीमुळे महाराष्ट्रातील विस्थापित आदिवासी लोकसंख्या

| Sr. No. | Name of Project and State | No. of ST Population Displased | SI. No. | Name of Project and State | No. of ST Population Displased |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Majalgaon Dam-II | 2738 | 20 | Shivam (Virchek) | 450 |
| 2. | Warna | 93 | 21 | Dhamni | 9672 |
| 3. | Waghur Irrigation project | 1320 | 22 | Khadakpura | 167 |
| 4.. | Bawanthali | 2294 | 23 | Madan Storage Tank | 158 |
| 5. | Dimbhe | 3955 | 24 | Chapdoh | 505 |
| 6. | Pimpalgaon | 3240 | 25 | Issapur dam | 2890 |
| 7. | Gosikhurd | 1673 | 26 | Sapali dam | 396 |
| 8. | Wadgaon dam | 2246 | 27 | Lal Nala | 224 |
| 9. | Lower Terna | 286 | 28 | Sapan River | 889 |
| 10. | Uppar Pravara | 2960 | 29 | Lendi | 501 |
| 11. | Karwa | 19 | 30 | Kalapathari | 162 |
| 12. | Waki | 579 | 31 | Lower Wardha | 1630 |
| 13. | Bhawali dam | 1841 | 32 | Sambarkund | 670 |
| 14. | Dham dam | 1708 | 33 | Dehraji | 1084 |
| 15. | Chillewadi Irrigation Project | 347 | 34 | Bewartola | 267 |
| 16. | Alandi | 105 | 35 | Jagaon | 3805 |
| 17. | Kar River | 85 | 36 | Bembla River | 2553 |
| 18. | Jam River | 316 | 37 | Lower Painganga | 11076 |
| 19. | Punad Irrigation Project | 1034 | | | |

(Source: Lok Sabha Started questions No. 198 dated 22.8.2013 Available at Reference Note no.30/Ref./December/2013)

## जोडपत्र क्र. ५

### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

| | |
|---|---|
| १. | प्रशासकीय मान्यता: रु.३७२.२२ कोटी (१९८१–८२ दरसूची) किंमत व दिनांक– ३१.०३.१९८३. |
| २. | प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय: रु.२०९१.१३ कोटी (१९९५–९६) |
| ३. | मान्यता किंमत व दिनांक: ०३.०७.१९९९ |
| ४. | एकूण पाण्याचा वापर: १६३४ द.ल.घ.मी. |
| ५. | पूर्ण संचय पातळीचा साठा: ११४६ द.ल.घ.मी. |
| ६. | धरणाची लांबी: ११.३५ कि.मी. |
| ७. | धरणाची महत्तम उंची: १२.५० मी. |
| ८. | सांडव्याची लांबी: ७७ मी. |
| ९. | कालव्याची लांबी: अ) उजवा कालवा– १०७ कि.मी. ब) डावा कालवा– २२.९३ कि.मी. |
| १०. | सिंचन क्षेत्र: १,९०,००० हे. |
| ११. | सिंचनाखालील पीक क्षेत्र: २,५०,८०० हे. |

**(स्त्रोत: विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर २००१ भुसंपादन व पुनर्वसन)**

## जोडपत्र क्र. ६

### महाराष्ट्राची भौगोलिक क्षेत्राची स्थिती

| अ.क्र. | महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्राची क्षमता |
|---|---|
| १. | भौगोलिक क्षेत्र = ३०७.५८ लक्ष हे. |
| २. | ओलीताखालील क्षेत्र = १७४.०४ लक्ष हे. |
| ३. | वनाखालील क्षेत्र = ६१.९३ लक्ष हे. |
| ४. | अकृषक वापराखालील क्षेत्र = १४.१२ लक्ष हे. |
| ५. | पिकाखालील क्षेत्र = २२६.१२ लक्ष हे. |
| ६. | लोकसंख्या ११.२४ कोटी (२०११ नुसार) |
| ७. | प्रति चौरस किमी लोकसंख्या = ३६५ |
| ८. | लोकसंख्या वाढीचा दर = १५.९९% |
| ९. | शहरी लोकसंख्या – ४५.२३ टक्के |
| १०. | ग्रामीण लोकसंख्या – ५४.७७ टक्के |
| ११. | दरडोई उत्पन्न (२०१०–२०११) = रु.८७६८६/- |
| १२. | १ हेक्टर पर्यंत शेती असलेली लोकसंख्या = ४४.५०% |
| १३. | १ – २ हेक्टर = ३०% |
| १४. | २ – ५ हेक्टर = २१% |
| १५. | ५ – १० हेक्टर = ४% |
| १६. | १० हेक्टर पेक्षा जास्त = ०.५०% |
|  | एकूण = १००% |

**(स्त्रोतः महाराष्ट्र सांख्यकी विभाग अहवाल २०१८–१९)**